Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवयुग वाचनमाला
पुस्तक सातवे

मराठी

साहित्य-परिचय

भाग तिसरा

665
651

संपादक
मानवे व ज्ञानोलकर

Publishing House, Bombay

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ....6.6.क./6 ग

पंजिका-संख्या २०२१०८

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवयुग वाचनमाला–पुस्तक सातवें

मराठी साहित्यपरिचय

भाग तिसरा

CHECKED 1973
Initial GI ....

संपादक

प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे,
बी. ए., एम्. एससी.

गंगाधर देवराव खानोलकर

665
6 (ग)

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

20290

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५ 5.9.2001

[सर्व हक्क स्वाधीन]

KARNATAK PUBLISHING HOUSE,
BOMBAY 2

1st Edition November 1935
Reprinted July 1936
Reprinted May 1938
Reprinted September 1938
Reprinted February 1940
Reprinted March 1943

Price 15 Annas
किंमत १५ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशकाचे दोन शब्द

भाषाविषय शिकविण्याच्या धोरणांत व पद्धतींत अलीकडे महत्त्वाचे फरक घडून आले आहेत. भाषा शिकावयाची म्हणजे केवळ तिच्यांतील कठीण असा शब्दसंग्रह शिकावयाचा नाहीं, किंवा त्या भाषेचे द्वारें केवळ उपयुक्त ज्ञान मिळवावयाचें नाहीं, तर तिच्यांतील सुंदर व नानाविध अशा वाङ्मयाचा मुलांना परिचय करून द्याव-याचा, हाच भाषाशिक्षणाचा प्रधान हेतु अलीकडे मानण्यांत येऊं लागला आहे. या धोरणाला अनुसरून आम्हीं प्रकाशित केलेल्या या 'नवयुगवाचनमाले'ची रचना केलेली आहे. मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतचीं—'बालवाचन' धरून—पांच पुस्तकें महा-राष्ट्रांतील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. अत्रे व श्री. घाटे यांनीं तयार केलीं. या प्राथमिक पुस्तकांचे भाषाज्ञान व वाङ्मयाभिरुचि हे मुख्य हेतु असल्यामुळें त्यांतील बरेच धडे मुद्दाम तयार करावे लागले. 'नवयुगवाचनमाले'चीं प्रस्तुत पुढील तीन पुस्तकें 'साहित्यपरिचय' या नांवानें प्रो. रानडे व श्री. खानोलकर या साहित्यिकद्वयांनीं तयार केलीं आहेत.

'साहित्यपरिचय' हें नांव प्रस्तुत पुस्तकांस मुद्दाम योजिलें आहे. कारण वरच्या वर्गांत मराठींतील उत्कृष्ट साहित्याचा व विशेषतः त्यांतील विविध प्रकारांचा विद्या-र्थ्यांना परिचय करून देणें हा हेतु आहे. जरी श्री. घाटे व अत्रे यांना पहिल्या चार पुस्तकांनंतर, पुढील पुस्तकांचें, कार्यबाहुल्यामुळें संपादन करतां आलें नाहीं तरी त्यांची या कार्याला पूर्ण सहानुभूति होती व त्यांनीं वेळोवेळीं उपयुक्त अशा सूचना करून मार्गदर्शनहि केलें आहे.

महाराष्ट्राकडून ज्याप्रमाणें पहिल्या चार पुस्तकांचें आनंदपूर्वक स्वागत झालें, त्याचप्रमाणें या तीन पुस्तकांचेंहि होईल अशी आम्हांला आशा आहे.

ता. १ नोव्हेंबर १९३५,
कर्नाटक पब्लिशिंग
हाउस, मुंबई (२)

मं. ना. कुळकर्णी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षकांशीं दोन शब्द

'साहित्यपरिचय' ही पुस्तकमाला 'नवयुगवाचनमाले'ची पुढची पायरी आहे. मानसशास्त्राप्रमाणें मुलांच्या अकराव्या वर्षी मनाची एक अवस्था संपते व दुसरीस प्रारंभ होतो. अकराव्या वर्षापर्यंत मुलांना वाङ्मयाचा 'साहित्य' या नात्यानें परिचय करून द्यावयाचा नसतो. वाङ्मयाचे वेगवेगळे प्रकार त्यांच्यापुढें मांडावयाचे नसतात. या प्राथमिक अवस्थेंत मुलें वर्तमानकालांत गुंग झालेलीं असतात. त्यांना लोककथा, लोकगीतें आवडतात. राक्षसांच्या-यक्षांच्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात. धावत्या चालीच्या कविता म्हणाव्याशा वाटतात. वाचण्याचा मजकूर बेताचा १।-१॥ पानें पुरेल एवढाच असावा लागतो. यामुळें 'नवयुगवाचनमाले'च्या पहिल्या चार पुस्तकांच्या संपादकांना बरेचसे धडे स्वतः लिहावे लागले किंवा लिहून घ्यावे लागले.

अकराव्या वर्षानंतर जीं मुलें मराठी पांचवी, सहावी, सातवी, या इयत्तांत शिकतात किंवा इंग्रजी शाळांत पहिल्या तीन इयत्तांत शिक्षण घेतात, त्यांचीं मनें प्राथमिक अवस्थेंतील मुलांच्या मनांइतकीं चंचल व अपरिपक्व नसतात किंवा हायस्कूलमध्यें शिकणाऱ्या १४ ते १६ वर्षांच्या मुलांच्या मनांइतकीं पक्व, जाणतीं व चिकित्सकहि (analytical) नसतात.

'साहित्यपरिचया'ची रचना या अशा मधल्या स्थितीस पोषक अशी केली आहे. या तीन पुस्तकांत मराठी साहित्याचा मुलांना प्राथमिक ओझरता परिचय करून देण्याचा आमचा हेतु आहे. शब्दचित्र, नाट्यछटा, लघुकथा, नाट्यसंवाद, आकाशनाट्य, लघुनिबंध, वर्णनात्मक व विवेचनात्मक निबंध या सर्व प्रकारांचा आम्ही या पुस्तकांत परामर्ष घेतला आहे. परंतु मुलांचें लक्ष त्या त्या वाङ्मयप्रकारांच्या तंत्राकडे न वेधितां त्या वाङ्मयप्रकारामुळें त्या लेखांत मौज कशी उत्पन्न झाली आहे इकडे तें वेधिलें आहे. तंत्राचा विचार थोड्याबहुत प्रमाणावर 'साहित्यपरिचया'च्या पुढच्या सहा पुस्तकांत ('गद्यवैभव' व 'महाराष्ट्र-रसवंती' यांत) केला आहे. यावरून हें दिसून येईल कीं नवयुगवाचनमालेंतील आरंभींच्या पुस्तकांपासून 'गद्यवैभव' व 'महाराष्ट्र-रसवंती' यांच्या शेवटच्या पुस्तकापर्यंत मुलांचें भाषाज्ञान, आकलनशक्ति, अनुभव, परिस्थिति व अवस्थांतरें यांचा योग्य विचार करूनच रचना केली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाट्यछटांचेंच उदाहरण घ्या. आरंभींच्या नाट्यछटा व पुढील पुस्तकांत आलेल्या नाट्यछटा यांत भाषा, विचार व मांडणी यांचा एक प्रकारचा क्रम दिसून येईल.

लेखांची निवड करितांना दोन प्रकारचीं धोरणें ठेविलीं आहेत. तो लेख त्या वाङ्मयप्रकारामध्यें उत्तम दर्जाचा असावा व तो त्या वयाच्या मुलांना झेपेल असा असावा. या कसोटीमुळें कांहीं प्रसिद्ध लेखकांचे लेख या पुस्तकमालेंत दिसणार नाहींत तर उलट कांहीं अगदीं अपरिचित लेखकांनीं त्यांची उणीव यशस्वी रीतीनें भरून काढलेली दिसून येईल. जुन्या कविता निवडल्या आहेत त्या त्यांच्या संस्कृत-प्राचुर्याच्या व कठीणपणाच्या परिमाणांवरून निवडल्या नसून, विषयवैचित्र्य, प्रसाद व भाषाशैली इत्यादि वाङ्मयगुणांमुळें निवडल्या आहेत. कविता शिकावयाची ती स्वतःचा शब्दसंग्रह वाढविण्याकरितां नव्हे, हें मत आतां सर्वमान्य झालें आहे.

आम्हीं लेखकांचीं चरित्रें दिलेलीं नाहींत. लेखकांच्या जीवनाचा त्यांच्या वाङ्मयावर परिणाम घडत असतो हें आम्ही जाणून आहों; परंतु या दृष्टीनें वाङ्मयाचा अभ्यास कॉलेजांत गेल्यावरच करावयाचा असतो. तो अभ्यास करण्याचें हें वय नव्हे. शिवाय लेखकांच्या जन्ममृत्यूंच्या तारखा, त्यांच्या शिक्षणाची व नोकरीची जुजबी माहिती आणि त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांचीं नांवें या तुटपुंज्या सामुग्रीचा निवडलेल्या लेखाच्या अभ्यासावर कितीसा प्रकाश पडणार आहे ?

मुलांना प्रचलित वाङ्मयाचा परिचय करून देण्याकडे शिक्षणतज्ज्ञांचा अलीकडे कल आहे. यामुळेंच इंग्लंडमधील शाळांत " Poems of To-day " " Essays of To-day " अशीं पाठ्यपुस्तकें चालू आहेत. ॲडिसन, स्विफ्ट, मेकॉले यांच्यापेक्षां लिंड्, लूकस्, चेस्टरटन, गार्डिनर यांचा नव्या पिढीला परिचय करून देणें तिकडे अधिक अवश्य वाटतें. आम्ही जुन्या विभूतींची व जुन्या वाङ्मयप्रकारांची हेळसांड न करितां अभिनव व प्रचलित वाङ्मयप्रकारांचा मुलांना परिचय करून दिला आहे. उदाहरणार्थ, गद्यकाव्य, आकाशनाट्य हे प्रकार अगदींच नवे आहेत. चित्रपरिचय हाहि आमचा उपक्रम अगदीं नवा आहे. आमची अशी समजूत आहे कीं सुंदर चित्रांकडे कोणत्या दृष्टीनें पाहावयाचें याचें योग्य मार्गदर्शन याच वयांत नीट केल्यास चित्रकलेबद्दल मुलांच्या मनांत शास्त्रशुद्ध अभिरुचि उत्पन्न होईल व चित्रकलेची आमच्या समाजांत सध्यां जी अवहेलना चालली आहे तशी पुढच्या पिढीकडून ती होणार नाहीं. शिवाय कलेंतील सौंदर्य स्वतःच्या भाषेंत सांगतां येऊं लागलें तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलांना वाङ्मयप्रकारांतील रहस्य जास्त सुलभपणें कळेल आणि त्यांचें मन सुसंस्कृतहि होईल.

नुसत्या सुंदर कविता किंवा गद्य उतारे मुलांसमोर ठेवून भागत नाहीं; त्यांचा आस्वाद कसा घ्यावयाचा हें मुलांना शिकविलें पाहिजे. नुसतें 'किती छान कविता,' 'किती छान कल्पना' असें बोलून मुलांना त्यांतील 'छानपणा' कळत नाहीं. लेखांच्या वाङ्मयगुणांचें पृथक्करण केलें पाहिजे; अलंकार, ध्वनि, नादमाधुर्य, विनोद, विचारगांभीर्य, कल्पनावैचित्र्य, वृत्तविशेष यांची त्यांना जाणीव करून दिली पाहिजे; अवतरणें (Quotations), श्रुतयोजन (Allusion) यांचा विचार केला पाहिजे; आणि तुलनात्मक विवेचन केलें पाहिजे. याशिवाय सूक्ष्म अभ्यास व सौंदर्यदर्शन यासाठींहि प्रश्न दिले पाहिजेत. आम्ही प्रत्येक धड्याच्या शेवटीं या प्रकारच्या परिचयाची व अभ्यासाची व्यवस्था केली आहे. शिक्षकांना त्यांच्या अध्यापन-कार्यांत याचा चांगला उपयोग होईल अशी आशा आहे. जातां जातां आणखी एका गोष्टीचा येथें निर्देश करावासा वाटतो. अलीकडे कांहीं कवींच्या लोकप्रिय कवितांच्या ध्वनिमुद्रिका (रेकॉर्डस्) तयार झाल्या आहेत. प्रस्तुत मालेंतील 'गुलामाचें गाऱ्हाणें' ह्या कवितेच्या, त्याचप्रमाणें 'तुकाराम', 'चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच' यांच्या 'हिज मास्टर्स व्हॉइस' कंपनीनें ध्वनिमुद्रिका तयार केल्या आहेत. हे उतारे शिकविण्याचे आधीं वर्गांत ग्रामोफोनवर या ध्वनिमुद्रिका लाविल्यास योग्य वातावरण उत्पन्न होऊन, शिक्षकास ते ते उतारे शिकविणें फारच सुलभ जाईल, व विद्यार्थ्यांनाहि खरा रसास्वाद घेतां येईल.

इंग्रजीसारख्या परक्या भाषेसाठीं आमच्या शिक्षणसंस्थांत **अवांतर वाचनाची** सोय केलेली असते; परंतु मातृभाषेच्या शिक्षणाकरितां केवळ शंभर दीडशें पानांचें एक पुस्तक किंवा त्यांचा निवडक भागच आम्हांला वर्षभर पुरेसा वाटतो. वास्तविक एवढ्या लहानशा पुस्तकांत कितीसे उतारे येणार आहेत? अशा पुस्तकांत कितीतरी लेखकांना वगळावें लागणारच.

तेव्हां आमची शिक्षकांना अशी अगत्याची सूचना आहे कीं त्यांनीं 'साहित्य-परिचय' या पाठ्यपुस्तकाशिवाय मुलांकडून अवांतर वाचनहि करून घ्यावें. या पुस्तकांतील कवितांशिवाय आमच्या 'महाराष्ट्र–रसवंती'च्या तीन भागांतून पुष्कळ सुंदर कविता त्यांना निवडतां येतील. शिवाय एखादी सुबोध कादंबरी, नाटक किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निबंधसंग्रह यांचेंहि वाचन करून घेतां येईल. या अवांतर वाचनांत तपशिलाकडे पाहावयाचें नाहीं, स्थूल अभ्यास करावयाचा एवढें धोरण ठेवलें म्हणजे झालें.

विद्यार्थ्यांसाठीं लिहिलेल्या या मालेंतील लेखांत कांहीं फरक करावे लागले याबद्दल लेखक आम्हांला क्षमा करतील अशी आशा आहे. तसेंच ज्यांनीं हे उतारे घेण्यास परवानगी दिली त्यांचेहि आम्ही अत्यंत आभारी आहोंत. त्याचप्रमाणें खास या तीन भागांकरितां ज्यांनीं लेख लिहून दिले ते आमचे स्नेही श्री. वि. स. खांडेकर, प्राचीन कवींच्या कविता निवडण्याला आम्हांला मदत करणारे महाराष्ट्र-भाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, पुस्तकांची चित्रांचे द्वारा उच्च दर्जाची सजावट करून देणारे चित्रकार श्री. विनायक मसोजी, श्री. धोपेश्वरकर व श्री. नी. म. केळकर यांचे तर आभार मानावे तेवढे थोडेच.

‘ नवयुगवाचनमाले’च्या पहिल्या चार पुस्तकांचें आणि ‘ महाराष्ट्र-रसवंती’चें ज्याप्रमाणें शिक्षकबंधूंनीं प्रेमपूर्वक स्वागत केलें, त्याप्रमाणेंच या पुस्तकांचेंहि ते करतील, अशी आम्हांला उमेद आहे.

ता. १ नोव्हेंबर १९३५
मुंबई

श्री. बा. रानडे
गं. दे. खानोलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

				पृष्ठ
१	जय हे भारत भाग्यविधाता !	(कविता)	रवींद्रनाथ टागोर	१
२	अचलेश्वराचें मंदिर		ह. ना. आपटे	६
३	श्रीशारदावन्दन	(कविता)	गिरीश	११
४	माडाचें पोर		वरेरकर	१३
५	रुक्मिणीचें श्रीकृष्णास पत्र	(कविता)	सामराज	२४
६	माझा प्रवास		विष्णुभट गोडसे	२८
७	तारापूरचा संग्राम	(कविता)	माधव	३६
८	ग्रंथसंग्राहक कवि मोरोपंत		ल. रा. पांगारकर	४४
९	गोदागौरव	(कविता)	चंद्रशेखर	४८
१०	दोन ग्रहणें		कु. वेणू गवाणकर	५२
११	कुणीं काय बांधिलें ?	(कविता)	माधव जूलियन्	५५
१२	मुंबई येथील जहाजें बांधणारें एक प्रख्यात पारशी घराणें		द. ब. पारसनीस	६०
१३	वेड्यांचें इस्पितळ		चिं. वि. जोशी	७२
१४	नटराज	(चित्रपरिचय)	रानडे	८८
१५	अंगाई	(कविता)	वि. भि. कोलते	८९
१६	एक कारकून	(शब्दचित्र)	विठ्ठलराव घाटे	९२
१७	रामदासस्वामींचें छत्रपति संभाजीस पत्र	(कविता)	रामदास	९७
१८	पानिपतचा रणकल्लोळ	(जुनें गद्य)	रघुनाथ यादव	९९
१९	ऐरण	(कविता)	अनंत काणेकर	११०
२०	हरवली म्हणून सांपडली	(लघुनिबंध)	प्रो. फडके	१११
२१	अजात व अज्ञात मित्राप्रत	(कविता)	तांबे	१२१
२२	मृगजळांतलें कमळ		वि. स. खांडेकर	१२४
२३	मृगया	(कविता)	मुक्तेश्वर	१३१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

			पृष्ठ
२४ हांसत कर्म करावें ! . .		. कमलाबाई देशपांडे	१३५
२५ घे कुठार . . .	(कविता)	. प्रो. मायदेव .	१४०
२६ निबंधमालेचें स्वरूप . .		. माडखोलकर .	१४१
२७ खिस्ताचे शिष्य . .	(चित्रपरिचय)	रानडे . .	१४४
२८ पाणपोई . . .	(कविता)	. यशवंत . .	१४६
२९ वर्डसूवर्थचें फुलपांखरूं .	(नाट्यछटा)	दिवाकर . .	१४८
३० स्फूर्तीचें काव्य . .	(अभंग)	. तुकाराम . .	१५०
३१ मेघाचा प्रवास . .	(कविता)	कृष्णशास्त्री चिपळूणकर	१५२
३२ इंग्रजी व्याकरण . .	(विनोदी गोष्ट)	रानडे . .	१५६
३३ सारीं फुलेंच फुलें . .	(कविता)	. टिळक . .	१६७
३४ निःस्पृहस्य तृणं जगत् .	(नाट्यसंवाद)	खाडिलकर .	१६९
३५ शांतता नको कधींच .	(कविता)	. रजनी . .	१७८
३६ असूया . . .	(चित्रपरिचय)	रानडे . .	१८०
३७ माझी आकांक्षा . .	(गद्यकाव्य)	. शंकर साठे .	१८२
३८ साधुसंत . . .	(विनोदी लेख)	श्री. कृ. कोल्हटकर	१८४
३९ रम्य तें बालपण . .	(शब्दचित्र)	. प्र. श्री. कोल्हटकर	१८९
४० बातमीदार . . .	(व्यंगचित्रपरिचय)	खानोलकर .	१९२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१

जय हे भारतभाग्यविधाता !

जन-गण-मन-अधिनायक जय हे भारत-भाग्य-विधाता !
पंजाब, सिंध, गुजराथ, मराठा, द्राविड, उत्कल, बंग;
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा, पूनित-जलधि-तरंग;
हीं तव नामें जागीं
होउनि आशीलागी
गाती तव जयगाथा.
जन-गण-मंगलदायक जय हे भारत-भाग्य-विधाता !
जय हे, जय हे, जय हे, जय जय, जय जय हे !
ऐकुनि वाणी तव होती त्या नित्य प्रचारित नादीं
हिंदु, बौध, शिख, जैन, पारसिक, ख्रिस्ति, मुसलमानादि;
पश्चिमपूर्व मिळोनी
प्रेम–हार गुंफोनी
अर्पिति तुज निज हातां
जन-गण-ऐक्य-विधायक जय हे भारत-भाग्य-विधाता !
पतन-अभ्युदय- बंधुर-मार्गी युगिं युगिं धावति यात्री,
चिरसारथि ! तव रथचक्रें हो मुखरित पथ दिनरात्रीं;
जैं क्षय-विप्लव माजे,
तव शंखध्वनि गाजे
'संकट-दुःख-त्राता'
जन-गणपथ-परिचारक जय हे भारत-भाग्य-विधाता !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घोर-तिमिर-घन-निबिड निशीथीं पीडित—मूर्छित-कालीं,
जागृत राहुनि अनिमिषनयनीं निज पुत्रां सांभाळीं
दुःस्वप्नीं, आतंकीं;
घेउनि त्यांना अंकीं,
स्नेहमयी तूं माता !
जन-गण-दुःखत्रायक जय हे भारत-भाग्य-विधाता !
प्रभात होउनि दिसत रवि-च्छवि पूर्व-उदय-गिरि-भालीं,
गाई विहंगम, पुण्य समीरण नव-जीवन-रस घाली;
तव करुणारुण-रागें
भारत होउन जागे
ठेवी तव पदिं माथा.
जय जय जय हे, जय राजेश्वर भारत-भाग्य-विधाता !
जय हे, जय हे जय हे जय जय जय जय हे !

रवींद्रनाथ टागोर (मराठीकरण **ना. म. भिडे**)

जय हे भारतभाग्यविधाता !

[स्वरलेखन]

[रवीन्द्रनाथ टागोर यांनीं दिलेल्या चालीवरून पंडित भीमरावशास्त्री यांनीं शांतिनिकेतनांत तयार केलेलें स्वरलेखन.]

ज न ग ण   म न अ धि   ना ऽ य क   ज य हे ऽ
सा ग ग ग।   ग ग ग ग।   मग ऽ ग ग।   गरे ग म् ऽ

भा ऽ र त   भा ऽ ग्य वि   धा ऽ ता ऽ   ऽ ऽ
मृग ऽ ग ग।   रे ऽ रे ऽ।   निृरे ऽ सा ऽ।   ऽ ऽ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पं ऽ जा ऽ ब सिं ऽ ध गुज ऽ रा ऽ थ म रा ऽ ठा ऽ
सा ऽ। साप ऽ प प। ऽ प प ऽ। प ऽ प पम। मप म ध प

द्रा ऽ वि ड उ ऽ त्क ल बं ऽ ग ऽ
म् ऽ म् ऽ। म् ऽ म् ग। गरे म् ग ऽ। ऽ ऽ ऽ ऽ।

विं ऽ ध्य हि मा ऽ च ल य मु ना ऽ। गं ऽ गा ऽ।
साग ग ग ग। ग ऽ ग रे रेप प प ऽ। पम् ऽ म् ऽ।

पू ऽ नि त ज ल धि त रं ऽ ग ऽ
ग ऽ ग ग। गरे रे रे नि़। नि़रे ऽ सा ऽ। ऽ ऽ ऽ ऽ।

ही त व ना ऽ मे ऽ जा ऽ गी
ग ऽ प प। ग ऽ ग म्। म्रे ग म्। ऽ ऽ ऽ ऽ

हो उ नि आ ऽ शी ला ऽ गी ऽ
म्गम् प प। म्ध ऽ म्ग। गरे म ग। ऽ ऽ ऽ ऽ

गा ऽ ती ऽ त व ज य गा ऽ था ऽ
साग ऽ ग ऽ। ग ग गरे रे। रेनि़ रे सा। ऽ ऽ ऽ ऽ

ज न ग ण मं ऽ ग ल दा ऽ य क ज य हे ऽ
साप प प प। प ऽ प म। प ऽ प प। पम ध प ऽ

भा ऽ र त भा ऽ ग्य वि धा ऽ ता ऽ ऽ ऽ ज य
म् ऽ म् म्। म्ग ऽ म् गम्। गरे म् म्ग। ऽ ऽ नि नि

हे ऽ ऽ ऽ ऽ ऽ ज य हे ऽ ऽ ऽ ऽ ऽ ज य
निसा ऽ ऽ ऽ। ऽ ऽ सानि ध। नि ऽ ऽ ऽ। ऽ ऽ प प।

हे ऽ ऽ ऽ ज य ज य ज य ज य हे ऽ ऽ ऽ
पध ऽ ऽ ऽ। धसा सा रे रे ग ग रे ग। म् ऽ ऽ ऽ॥

(अंतरा)

ऐ ऽ ऽ कु नि ऽ वा ऽ णी ऽ त व हो ऽ ती ऽ
सा सा सा सा। सा सा सानि़ सा। सारे रे रे रे। रे रे रे रे।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या ऽ नि त्य प्र चा रि त ना ऽ दीं ऽ
रेसा रे ग ग। ग ग ग ग। गरे ग म् म्।

हिं ऽ दु बौ ऽ द्ध शि ख जै ऽ न पा ऽ र सिक
म्प प प प। प म प म्। मप मध निध ध। प म पप।

ख्रि ऽ स्ति मु स ल मा ऽ ना ऽ दी ऽ
म म म म। ग ग रे रे। रेनि रे सा ऽ

प ऽ श्चि म पू ऽ र्व ऽ मि ऽ ळो नी
ग ग ग ग। ग ग ग ग। गरे ग म् म्। ऽ ऽ ऽ ऽ

प्रे ऽ म ऽ हा ऽ र गुं फो ऽ नी ऽ
म्ग म् प प। प प म्ग ग। गरे म् मग ग। ऽ ऽ ऽ ऽ

अ ऽ र्पि ति तु ज नि ज हा ऽ ता ऽ
साग ग ग ग। ग ग रे रे। रेनि रे सा सा। ऽ ऽ ऽ

ज न ग ण ऐ ऽ क्य वि धा ऽ य क ज य हे ऽ
प प प प। मप प प म्। म प प प। पम् ध धप प।

भा ऽ र त भा ऽ ग्य वि धा ऽ ता ऽ ऽ ऽ ज य०
म् म् म् म्। म्ग ग ग म्। म्रे म् ग ग। ऽ ऽ नी नी.

परिचय

किती गंभीर व ओजस्वी कविता ! ही कविता म्हणतांना आकाशांत आपण विहार करीत आहोंत असा भास होतो. हें राष्ट्रगीत कविसम्राट् रवींद्रनाथ टागोरांचें असून तें बंगालमध्यें सर्व उत्सवप्रसंगीं म्हणण्यांत येतें. पांच दहा हजार मुखांनीं म्हटलेलें हें गाणें ऐकलें तर राष्ट्रगीत कशाला म्हणतात त्याची तुम्हांला कल्पना येईल. राष्ट्रगीत म्हणजे राष्ट्राविषयीं एकाद दुसऱ्यानें म्हणावयाचें गीत नसून राष्ट्राविषयींचें व **राष्ट्रानें एकत्र येऊन एकमुखानें म्हणावयाचें गीत** होय. हें गीत कित्येक बालवीरांचीं पथकें, त्याचप्रमाणें शाळांतील सामुदायिक प्रार्थनेचे वेळीं विद्यार्थी म्हणतात. ही कविता भारताच्या भाग्यविधात्या देवतेला–राष्ट्राच्या देवतेला–उद्देशून आहे. या देवतेच्या हातीं भारताचें बरेंवाईट भाग्य घडविण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिकार आहे. ही राष्ट्रदेवता हिंदु, मुसलमान, बौद्ध, पारसिक इत्यादि सर्वांची आहे.

अभ्यास

१. पंजाब, सिंध, इत्यादि दोन ओळींतच सर्व हिंदुस्थानचें चित्र कवीनें आपल्या डोळ्यांसमोर उभें केलें आहे. उत्कल = ओरिसा. बंग = बंगाल.

२. 'पतन-अभ्युदय' इत्यादि. या दोन ओळींत व या कडव्यांतच किती गांभीर्य व उदात्त रस भरला आहे पहा! कल्पनेची भरारी किती दांडगी आहे! कवि म्हणतो, 'हे राष्ट्रदेवा, आम्ही हिंदी लोक हे या इहलोकांतील यात्रेकरू भल्या (अभ्युदय) बुऱ्या (पतन) दिवसांच्या खाचखळग्यांच्या (बंधुर) मार्गावरून अनेक युगें हिंडत आहोंत. तूं आमचा या युगयात्रेंतला चिरकालचा सारथी आहेस (जसा तूं अर्जुनाचा होतास). तुझ्या रथाच्या चाकांचा ध्वनि अहोरात्र मार्गावर उमटत आहे.' काय ही दांडगी कल्पना!! हिंदुस्थान हा एक यात्रेचा पथ आहे. त्या पथावरून अनेक युगांपासून राष्ट्रदेवता अहोरात्र आपल्या रथांतून चालली आहे; असें चित्र डोळ्यांसमोर उभें करा.

३. "जैं क्षय–विप्लव माजे" ज्या ज्या वेळीं नाश व अधोगतिरूप संकटें येतात, ("यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत" ही कल्पना येथें संदर्भित आहे) तेव्हां हे राष्ट्रदेवा, तूं आशेचा, उत्साहाचा शंखनिनाद करितोस (भारतकाळीं युद्धापूर्वी प्रत्येक योद्धा आपापले विशिष्ट शंख फुंकीत असे ही कल्पना येथें संदर्भित आहे).

४. शेवटच्या कडव्यांत अप्रतिम प्रसाद, उल्हास व तेज चमकत आहे. कवि म्हणतो, 'भारताचा प्रभात (सकाळ) झाला आहे, उदयगिरीवर सूर्याचीं कोवळीं किरणें तळपूं लागलीं आहेत, पक्षी गाऊं लागले आहेत व सकाळचे वारे नवीन उल्हास, जोम देत आहेत. राष्ट्रदेवा, तुझ्या दयेच्या अरुण रंगानें जागें होऊन भारत तुझ्या पायांवर डोकें ठेवीत आहे. हें चित्र डोळ्यानें, कल्पनेनें पहा, त्या सकाळच्या ताज्या वाऱ्याचा स्पर्श अनुभवा अन् उदयगिरीवरचें तें दृश्य पाहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. प्रत्येक कडव्याच्या शेवटीं 'भारतभाग्यविधात्या' देवाला अर्थसूचक असें नवें विशेषण दिलें आहे. तें त्या कडव्यांतील मध्यवर्ति कल्पना सूचित करतें. उदा० मंगलदायक,' 'पथ-परिचारक,' 'दुःखत्रायक.'

२

अचलेश्वराचें मंदिर

त्या ठिकाणीं हिंडणाऱ्या पशूंससुद्धां असें वाटलें कीं, आज परमेश्वरानें वायूस अगदीं मन मानेल त्याप्रमाणें वाहून, आणि मेघांस मन मानेल त्याप्रमाणें वृष्टि करून सगळा तो अर्बुद्ध (अबु) पर्वत वाहून नेण्याची परवानगी दिली असावी. त्या शिखरावरील आकाश मेघांनीं अगदीं व्याप्त होऊन गेलें होतें असें सांगितल्यानें त्या वेळच्या आकाशस्थितीची कल्पना कोणासहि येणें शक्य नाहीं. शिखरावरच्या बाजूस किती ढग असतील कोण जाणे. वर कांहीं दिसतच नव्हतें. परंतु त्या शिखरावर उभें राहण्याचें धैर्य व खालीं पाहण्याचें सामर्थ्य कोणा मानवी व्यक्तींत असून जर त्या दोहोंचाहि त्यानें उपयोग केला असता, तर त्यास आपण पर्वतशिखरावर उभे राहिलों आहों, आपल्या खालच्या बाजूस दऱ्याखोरीं आहेत असें स्वप्नांतसुद्धां वाटलें नसतें. सगळ्या त्या अबूच्या दऱ्या आणि खोरीं ढगांनीं आच्छादून जाऊन जिकडे तिकडे सपाटीच सपाटी झाली आहे असें त्यास वाटलें असतें. आपण अबूच्या अत्यंत उच्च शिखरांपैकीं एका शिखरावर आहों असें तर त्यास वाटलें नसतेंच; पण हिंवाळ्यांतल्याप्रमाणें धुक्यानें व्यापलेल्या एखाद्या पठारावर उभे आहों, अशीच त्याच्या मनाची समजूत झाली असती. झंझावातानें तर इतका कांहीं पराकाष्ठेचा आततताईपणा त्या दिवशीं चालविला होता कीं, जणूं काय त्यास भगवान् अचलेश्वरानें फार काळपर्यंत पाताळांत कोंडून ठेविल्या कारणानें संताप येऊन आज सुटका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होण्याबरोबर त्या सगळ्याचें उट्टेंच काढावें असा त्यानें निश्चय केला असावा. विद्युल्लताबाई एखाद्या संतप्त अशा वीराच्या शत्रुसैन्यांत दाणादाण करून देणाऱ्या खड्गलतेप्रमाणें सर्व आकाशांत चमकत होती. सर्व पंचमहाभूतें आजपर्यंत ठ्राबून ठेविलीं होतीं, तीं भगवान् अचलेश्वरानें आज कित्येक वर्षांनीं मोकळीं सोडून दिलीं, तेव्हां त्यांना पूर्वीचें स्मरण होऊन अर्बुद्धास तेथून हांकून लावण्यासाठींच हा त्यांचा प्रयत्न चालला होता असें दिसलें.

एका हिमालयाखेरीज या आर्यावर्तांत अर्बुद्ध पर्वतासारखें पुराणप्रसिद्ध स्थान नाहीं, असें म्हटलें असतां खरोखर शोभण्यासारखेंच आहे. आणि या पर्वताची पुराणांतरीं जी जन्मकथा दिली आहे, ती मनांत आणली म्हणजे प्राचीन कालच्या लोकांससुद्धां हिमालय वर्ज्य करून बाकीच्या सर्व पर्वतावलींत हाच पर्वत श्रेष्ठ असें वाटत असावें असें दिसून येतें. हा पर्वत अरवली पर्वतसंघाचा एक भाग खरा, परंतु त्यांच्यावर रुसून अगदीं विभक्त झालेल्या भावाप्रमाणें एकटाच निराळा उभा राहिलेला आहे.

शिवादि देव हिमाचलावर राहणारे खरे, परंतु एकाच उच्चस्थानीं राहून त्यांस कंटाळा आला असतां ते या स्थानीं येऊन राहत. कृतत्रेतादि युगांत हें स्थान अरवलीपर्वतापासून तुटलेलें नव्हतें, किंवा त्याच्यापेक्षां फार उंचहि नव्हतें; त्या पर्वताच्या इतर भागांच्याच सपाटीला हाहि पर्वत असे. त्या वेळीं यावर शिवभक्तिपरायण असें फार मोठें ऋषिमंडळ असून त्या मंडळाचे कुलपति भगवान् वसिष्ठ हे होते. सूर्योदयाच्यापूर्वी उठून आपले यज्ञ, आपलें यजन, जपतप वगैरे सर्व पवित्रकर्में सारावीं, आपल्या कामधेनूच्या दुग्धाचें सेवन करावें, आपल्या शिष्यांसहि प्रसाद द्यावा, कंदमूलफळें आणावीं आणि सर्वांनीं शरीररक्षण करून ब्राह्मणोचित अशीं आपलीं कर्में करावीं, असा त्या मुनिजनांचा कार्यक्रम असे. त्या कालीं अर्थातच तेथें शांति अगदीं पूर्णपणें वास करीत होती. कोणास अणुरेणु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्र काळजी नव्हती. व्याघ्र व अजा एका जलाशयावर जलपान करीत. असा सर्व प्रकार होता. आणि त्यामुळें ऋषींस, ऋषिपत्नींस किंवा ऋषिकुमारांस कधींहि कोणत्याहि प्रकारचा त्रास झाला नाहीं. शिवादि देवता तेथें मधून मधून वास करण्यास येत, यामुळें तर त्या तपोवनांतल्या ऋषिकुलांस फारच आनंद होत असे.

परंतु या तपोवनांत एक अतिशय विस्तृत व अतिशय खोल असें कुंड असे. या कुंडाच्या कांठावर उगवलेली हिरवीगार हरळी खातां खातां वसिष्ठ-ऋषींच्या कामधेनूचा पाय सरकून ती त्या कुंडांत पडली. ऋषींस अर्थातच असें वाटलें कीं, आतां आपणांस ही नाहींशी झाली; परंतु त्यांच्या पुण्यप्रतापानें त्या कुंडांत एकाएकीं गंगा उत्पन्न होऊन तिनें आपल्या पृष्ठभागावर कामधेनूस तारून ऋषीच्या स्वाधीन केलें. एक वेळां आपणास ही मिळाली, परंतु पुन: असा प्रसंगच येऊं नये अशी कांहींतरी तजवीज केली पाहिजे असें मनांत येऊन भगवान वसिष्ठऋषींनीं शंकराचा धांवा केला. मागणें मागितलें कीं, 'शंकरा, हें एवढें कुंड भरून जाऊन येथें एखादा उंच पर्वत व्हावा.' भगवान् शंकरास तें मागणें मान्य करणें प्राप्तच. कारण तो भक्तांचा कैवारी; तेव्हां त्यानें लागलीच हिमाच-लाच्या अनेक पुत्रांस बोलावून म्हटलें, "अरे, अरवली पर्वतावलींत वसीष्ठ-ऋषींच्या आश्रमांत जें एक कुंड आहे त्या कुंडांत जाऊन कायम राहण्याची कोणाला इच्छा असेल त्यानें पुढें व्हावें. हिमालयाचा सगळ्यांत लहान मुलगा अंमळ व्यंगशरीरी होता. त्यास वाटलें कीं, आपण येथें राहाण्यापेक्षां तेथें जावें. तेथें आपली अधिक मान्यता होईल. परंतु त्याचा पाय अधु; तेव्हां त्यानें इतक्या लांबीचा प्रवास करावयाचा कसा? कोणीतरी त्यास तेथें नेऊन ठेवण्यास पाहिजे होतें. हिमाचलावरच तक्षक होता, त्यास ही कामगिरी आपण पत्करावी असें वाटून त्यानें हिमाचलाच्या पुत्रास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'मी तुला नेण्यास कबूल आहें' असें सांगितलें, आणि नेऊन पोहोंचविलेंहि. आपल्या प्रार्थनेस मान देऊन आपल्या मागण्याप्रमाणें कुंड भरून काढण्यास श्रीशंकरानें प्रत्यक्ष हिमाचलाच्या पुत्रास पाठविलें हें पहातांच त्या शिवभक्तांस किती आनंद झाला असेल! आपण कां आलों हें हिमाचलपुत्रानें ऋषींस सांगून लागलीच त्यांस नमन करून त्या कुंडांत उडी टाकली. तक्षकासहि आपल्या मित्रास सोडून जावें असें वाटेना, यामुळें त्यानें आपल्या मित्राच्या शरीराभोंवतीं विळखे घालून आपणहि यापुढें तेथेंच राहण्याचा निश्चय केला. त्या वेळेपासून त्या ठिकाणीं हा पर्वत राहिला. पण तें कुंड त्या पर्वतानें पुरतें भरलें नाहीं; सभोंवतालीं जागा राहिली त्यामुळें म्हणा किंवा आपण आपला हिमाचल सोडून या त्याच्या पुत्राच्या नादीं लागून व्यर्थ येथें येऊन बसलों असा पश्चात्ताप होऊन तक्षक फार चळवळ करूं लागला म्हणून म्हणा, तो नवीन पर्वत फार डळमळावयास लागला. तेव्हां ऋषींस नवीनच भय उत्पन्न झालें कीं, एकादे वेळीं हा पर्वत डळमळून आपल्या आश्रमावर पडेल व आपल्या तपोवनाचा सत्यानाश करील; तेव्हां याला अचल करण्याकरितां कांहींतरी योजना केली पाहिजे. पर्वतास अचल करण्याला त्यांच्या हातीं उपाय म्हणजे त्या पार्वतीरमणाची प्रार्थना करणें एवढाच; तो उपाय वसिष्ठांनीं पुनरपि योजला. तेव्हां भगवान् शंकरांनीं पुनः भक्तकार्यासाठीं आपला तपोभंग करून आपल्या एका पायाचा आंगठा पाताळांत घालून तेथून तो पर्वतामध्यें शिरकवून थेट त्याच्या डोक्यांतून बाहेर काढला. भगवान् शंकरांच्याच पायाचा ज्याला आधार तो मग काय डळमळतो! तो नांवाचा जो अचल होता, तो आतां खरोखरच अचल झाला. ज्या स्थानीं तो शंकराचा आंगठा शिखरावर बाहेर निघाला होता त्या स्थानीं शंकराचें एक सुंदर मंदिर बांधून त्यास अचलेश्वर असें नांव दिलें.

हरि नारायण आपटे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

तुम्ही हरि नारायण आपटे यांचें चरित्र 'साहित्यपरिचय भाग १' मध्यें वाचलेंच आहे. त्यांनीं लिहिलेल्या 'रूपनगरची राजकन्या' या कादंबरींतील हें वर्णन आहे. राजस्थानांत अबू हा एकच उंच पर्वत असून तें अत्यंत पवित्रस्थान मानलें जातें.

ऐतिहासिक कादंबरींत अद्भुतरस उत्पन्न करण्यास, एकांतवासाचें, भक्तिभावाचें, राजकारणी मसलती करण्याचें गुप्त स्थान अबू पर्वतासारखें तेथें दुसरें कोठें असणार? 'उषःकाल' या कादंबरींतहि आपट्यांनीं अशाच एका भुयारांतील देवळाचें वर्णन केलें आहे. तुम्ही दुसरींतहि वर्णनें वाचलीं असतील. महाबळेश्वराचें वर्णन वाचा आणि या वर्णनाशीं तुलना करा. या वर्णनांत पावसाळ्याच्या रौद्र स्वरूपाचें वर्णन आहे व अबू पर्वताची जन्मकथा दिली आहे. वर्णनांत अलंकारांची खेचाखेच नाहीं. भाषा अगदीं सरळ व प्रासादिक आहे.

अभ्यास

१. तक्षक कोण होता?

२. झंझावाताचा आततायीपणा म्हणजे काय?

३. अचलेश्वर हें नांव कसें पडलें? युग म्हणजे काय? तीं किती आहेत? नांवें द्या.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३

श्रीशारदावन्दन

[वृत्त—मन्दारमाला]

छाया तरूंच्या किती रंगलेल्या तुझ्याभोंवतीं थाटुनी राहती
स्वर्गांतुनी पाझरे तेज खालीं, फुलें, पर्णराजी, तृणें नाहती;
तीरीं शिळेच्यावरी भव्य मूर्ती तुझी शुभ्रवस्त्रांकिता हांसते,
वीणा मृदु स्पर्शनें छेडुनी ही, तरंगावली अंगुली निर्मिते.
देवी ! तुझ्या दिव्य आलोकनाची शरच्चन्द्रिका त्यावरी नाचते;
चैतन्य संचारुनी अंतरंगीं जडांना तुझी दिव्यता लाभते;
नाचे तुझ्या गोड झंकारगानावरी ताल देऊन मंदाकिनी;
नाचे तरंगांतुनी गुंगलेली मुदें खालती मंद कल्लोलिनी.
वायू तुझ्या मंजु गुंजारवानें इथें मोहुनी सारखा थांबतो,
कादंबिनीखंड हा आंतराळीं तुझ्या प्रेरणेनेंच आंदोलतो.
ध्यानस्थ झालें तुझ्या आदिरूपामधें विश्व हें गायनीं डोलुनी !
संसार–दु:खामधें पोळलेले इथें बैसती अंतरें खोलुनी !
ओवी–अभंगाञ्जलि–श्लोक–आर्या–मुखांनीं तुला आळवीलें कुणी;
माते ! कृपावृष्टि केलीस त्यांच्या मनोभूत आर्तस्वरा ऐकुनी;
मी दीन; मी लीन; तेथें कशाला बरें अल्पधीनें उभें राहणें ?
ध्यावें तुझें ध्यान येथून, आई ! इथूनी तुला भक्तिनें वंदणें
जीवा हवें तें कुठें सांपडेना, म्हणोनी तुझ्या लागलों चिंतनीं;
माते ! मन:शान्ततेची सुधा या जिवा पाजवी गीत-गंगेतुनी;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निःस्वार्थतेनें तुझे शब्दबिंदू असे सांठवूनी सदा अंतरीं
सोडीन एके दिनीं कांचनाची शिरांतून गंगा गिरीशापरी

गिरीश

अ भ्या स

राजा **रविवर्म्यानें** काढलेलें श्रीसरस्वतीचें चित्र तुम्हीं पाहिलेंच असेल. रविवर्म्यानें आपल्या कुंचलीनें जें चित्र काढलें तेंच **गिरीशांनीं** आपल्या गोड शब्दांनीं काढलें आहे. त्यांनीं केलेली 'मंदारमाला' या वृत्ताची निवड पहा. या वृत्ताचा ओघ संथ, शांत व गंभीर आहे, बावीस अक्षरांच्या लांबलचक ओळींमुळें एका मागून एक लाटा सारख्या येतच आहेत असें वाटतें. गिरीशांचे मुख्य गुण म्हणजे नादमाधुर्य आणि शब्दलालित्य. सर्व कविता वाचा. शब्दरचना कशी गोड व मधुर आहे. कोठेंहि खांचखळगे सांपडायचे नाहींत.

चौथ्या श्लोकांतील कवीचा विनय पाहा व कवितेच्या शेवटच्या ओळींतील दर्पोक्ति पहा. याचा मेळ कसा घालाल ?

शेवटच्या ओळींत दोन भिन्न कल्पनांची भेसळ झाली आहे. गिरीश म्हणजे शंकर याच्या डोक्यावरून ज्या गंगेचें अवतरण झालें ती शुभ्र होती; परंतु, कवि म्हणतो मी शंकराप्रमाणें कांचनाची गंगा डोक्यांतून सोडीन. कांचनाची कल्पना येथें विसंगत असतां कवीला ती सुचण्याचें कारण एवढेंच दिसतें कीं 'कांचनगंगा' हें हिमालयाचें एक शिखर आहे व म्हणून गंगेबरोबर' पटकन् 'कांचना' चीं आठवण झाली. कवीनें नंतर आपल्या कवितासंग्रहालाहि 'कांचनगंगा' हें नांव दिलें आहे !

'गिरीश' या कवितेच्या शेवटच्या शब्दांत काय खुबी आहे ?

याच वृत्तांतील याच विषयावरची **यशवंतांची** 'श्री शारदावंदन' ही कविता वाचा व दोन्ही कवितांची तुलना करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४

माडाचें पोर

त्याला वाटलें अफाट विश्वाचा पसारा आपल्या नजरेसमोर आहे. दृष्टीचा टापू न पोंचेल इतक्या अंतरावर एका बाजूनें त्याला समुद्र दिसत होता. त्या समुद्राला सरहद्द घालणारा सह्याद्रि पर्वत दुसऱ्या बाजूनें नजरेच्या टापूला अडथळा करण्यासाठीं उभा राहिला होता. आजूबाजूला झाडांच्या शेंड्यां-खाळून डोकावणारीं घरांचीं छपरें, त्यांना विळखा देणारे तांबडे रस्ते आणि त्याच्याच बाजूला समुद्रापासून गांवांत घुसूं पाहाणारे खाडीचे फांटे चोहींकडे पसरलेले दिसत होते.

भा. वि. वरेरकर

हातांतील कोयता झावळाला खोंचून ठेवून क्षणभर तो त्या देखाव्याकडे पहात तसाच राहिला. विमानांतून फिरतांना अशींच दृश्यें दिसत असतील काय, कीं याहीपेक्षां बारीक दिसतील, बारीक दिसल्यामुळें त्यांचें सौंदर्य नष्ट होईल काय, वगैरे नाहीं नाहीं ते प्रश्न त्याच्या डोक्यांत उद्भवूं लागले. तो ज्या माडावर चढला होता, तो माड गांवांतील सर्व माडांपेक्षां उंच होता. त्या माडावर चढण्याची यापूर्वीं कोणाचीहि छाती नव्हती. त्यामुळें कित्येक दिवस पडून राहिलेला तो माड नुसत्या अभिमानानें त्यानें चालवण्यास घेतला. एखादे दिवशीं त्या माडावरून पडून हा मरेल, असें लोकांनीं म्हणावें आणि त्यानें नुसतें तुच्छतेनें हंसून निघून जावें असें वारंवार होत असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या माडावर 'माडी' काढण्यासाठीं तो ज्यावेळीं चढत असे त्यावेळीं त्याला स्वर्ग ठेंगणा भासत असे. माडाच्या प्रत्येक खापावर पाय ठेवितांना आपण स्वर्गाच्या पायऱ्या चढत आहों असें त्यास वाटे. शाळेंतील कित्येक मुलें, अचूक वेळ साधून, तो ज्यावेळीं या माडावर चढत असे त्यावेळीं त्याला मुद्दाम पाहण्यासाठीं खालीं जमत असत. त्या त्याच्या आवडत्या प्रेक्षकांसमोर, भराभर माडाचीं खापें चढून जात असतांना त्याचें हृदय अभिमानानें भरून जाई. आपण जें कांहीं साहस करीत आहों तें पाहावयाला कुणीतरी प्रेक्षक आहेत, ते आपलें कौतुक करीत आहेत, असें दिसून आल्यानें कोणाहि माणसाला साहजिक एक प्रकारचा कैफ येत असतो. तसल्याच कैफाच्या भरांत तो माडाचीं खापें तडातड चढून जात असे. मुलांना आश्चर्य वाटे कीं, इतक्या उंच चढून जातांना त्याचा पाय कसा चुकत नाहीं? त्याला चक्कर कशी येत नाहीं? पण त्यांना ठाऊक नव्हतें कीं, वर चढत असतांना तो चुकून सुद्धां खालीं पाहात नसे. त्याची नजर सदोदित माडाच्या शेंड्याजवळ असे. राजछत्रासारखीं पसरलेलीं तीं झावळें, गोंड्यासारख्या लटकणाऱ्या त्या नारळाच्या पेंदी, पोयीचे तुरे हीं त्याच्या नजरेला दिसूं लागलीं कीं, त्याला सर्व सृष्टीवर सत्ता चालवणारा आपण सम्राट् आहों, असें वाटूं लागे. आणि त्याच कल्पनेच्या कैफांत भराभर वर चढत जाऊन तो एखाद्या मजबूत झावळावर ठाणें मांडून आपल्या कामाला सुरवात करीत असे.

कमरेच्या आकडीला अडकविलेली चकचकीत कोयती हातांत घेतली कीं, त्याच्या अंगीं विलक्षण स्फुरण चढत असे. पोयीचा जरूर तेवढा भाग कापतांना कापण्याची थोडीशी देखील क्रिया घडूं नये इतकी त्या कोयतीची धार तीक्ष्ण असे.

त्या दिवशीं त्यानें नित्याप्रमाणें वर चढल्याबरोबर पोय कापण्यास सुरवात केली नाहीं. नुकत्याच होणाऱ्या सूर्योदयामुळें फांकणारे सूर्याचे किरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समुद्राच्या पृष्ठभागावर चमकून त्याच्या हातांतील चकाकणाऱ्या कोयतीवर परावर्तित झाले त्यावेळीं त्याची नजर खालीं पसरलेल्या सृष्टिसौंदर्याकडे गेली. या माडाची माडी तो बागेंतल्या 'तिरकूटांत' (ट्री फूट बूथ) विकावयाला देत नसे. या माडाची माडी केवळ 'निरा' या नात्यानें तो कांहीं ठराविक गिऱ्हाइकांना औषध म्हणून विकीत असे. त्याच्यासाठीं दररोज न्यावें लागणारें कोरें मडकें त्याच्या कमरेच्या दोरीला लटकाविलेलें असे. तें मडकें आज तसेंच कमरेला लटकत राहिलें होतें.

सृष्टिसौंदर्याकडे नजर जातांच त्याच्या मनांत अननुभूत असलेल्या कोमल भावना उत्पन्न झाल्या. पोयीवर असलेलें भरलेलें मडकें काढून त्यानें झावळाच्या एका बुंधावर ठेवून दिलें, आणि कापलेल्या पोयीच्या भागाकडे तो विव्हल नजरेनें पाहूं लागला. अजूनहि आंतून रसाचा एकएक बिंदु ठिबकत होता.

खोचलेली कोयती काढून त्यानें हातांत घेतली आणि दुसऱ्या एका पोयीचा अग्रभाग कापून त्यानें माडाच्या पातीनें घट्ट बांधून घेतला. पोयीं-तून बिंदूंचे फवारे सुरू झाले. कमरेला लटकणारें कोरें गाडगें काढून त्यानें त्या पोयीवर ठेवलें आणि भरलेलें गाडगें कमरेच्या दोरीला लटकावलें.

आकडीला कोयती अडकवून खिन्न अंतःकरणानें तो मागची एकएक खाप हळूहळू उतरत होता. अपरिचित असलेले नूतन विचार आज त्याच्या हृदयांत उद्भूत होऊं लागले होते. शेवटच्या खापाची पायरी उत-रून त्यानें जमिनीला पाय टाकतांच जमलेल्या मुलांपैकीं एकानें त्याला विचारलें, "फकीरदादा, आज हळूहळूसा उतरलास? प्रकृति बरी आहे ना तुझी?"

"मला काय धाड भरली आहे?" असें बेफामपणानें त्यानें उत्तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलें खरें, पण त्याची त्यालाच लाज वाटली. दररोजच्या वेगानें आपण आज खालीं उतरलों नाहीं याची त्याला आठवण होती.

" तूं कांहीं म्हण फकीरदादा," तो मुलगा त्याच्याशीं अगदीं लगट करून म्हणाला, " पण आज तुझीं खापावरचीं पावलें जड पडत होतीं, यांत शंका नाहीं. सांवळ्याबरोबर मीं पैजसुद्धां मारली कीं, तूं आजारी असला पाहिजेस म्हणून ! इतके दिवस मीं रोज तुझीं चढणारीं—उतरणारीं पावलं आंकड्यांनीं मोजीत असतों; पण दररोजच्या आंकड्यांत आज चौदा आंकडे वाढले. असं कधींहि झालं नव्हतं. खरंच सांग फकीरदादा, तूं आजारी आहेस का ?"

फकीर सुर्वे मनांतल्या मनांत ओशाळला. आपल्याबद्दल अभिमान बाळगणाऱ्या आपल्या एका भक्ताची निराशा व्हावी आणि त्याला कारण असें कांहींच सांगतां येऊं नये, याचेंही त्याला फार वाईट वाटलें. आकडीची कोयती काढून तिच्या दांडीनें डोकें खाजवीत तो त्या मुलाकडे न पाहतां म्हणाला, " मोठा चाणाक्ष आहेस तूं सुडक्या ! आज उतरतांना मला वेळ लागला खरा, पण असं कां झालं कांहींच सांगतां येत नाहीं."

बोलत बोलत दोघे इतर मुलांचा घोळका सोडून बागेंतल्या मळलेल्या वाटेनें चालले होते. फकीर म्हणाला, " आज मला काय झालं आहे तें सांगतां येत नाहीं. रोज मी माडावर चढत असें, पोय बांधून वर मडकं ठेवीत असें आणि भरलेलं मडकं घेऊन मी खालीं उतरत असें. इकडे तिकडे माझी नजर केव्हांहि जात नसे. पण आज काय झालं कोण जाणे, माझी नजर चोहींकडे गेली. माडाच्या शेंड्यावरून खालीं पसरलेलीं घरं—माणसं माझ्या नजरेला आलीं नि लांबवर हेरून पाहिलं, केवढं हें जग मोठं असेल, याची कल्पना माझ्या मनांत आली. पस्तीस वर्षें झालीं माझ्या वयाला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण मी ही रत्नागिरी सोडून कुठंहि गेलों नाहीं. तुला ठाऊक आहे, कीं मी जसा माडी काढतों तसा खलाशाचाहि धंदा करतों. रोज खपाव्यावर जातांना तूं मला पाहिलें असशील. आगबोटीवरून येणारीं किती तरी माणसं मी आजपर्यंत उतरून घेतलीं आहेत. पण हीं माणसं असतात कुठं, जातात कां, परत कां येतात याची कल्पनासुद्धां माझ्या मनांत केव्हां आली नव्हती. माडाच्या शेंड्यावरून आज मला त्रिभुवन दिसलं आणि तिथंच हा प्रश्न माझ्या मनांत आला. माडाच्या शेंड्यावरून मला चोंहीं-कडे पसरलेलं जग दिसलं आणि असं वाटलं कीं एकदां हें सारं जग पाहून यावं; पण 'गाबताला गुरू आणि भटाला तारू' काय कामाचं असा विचार मनांत येऊन मला मोठा खेद झाला. आणखी काय काय वाटलं—पण तें मला सांगतां येत नाहीं."

गंभीर मुद्रा करून सुडक्या म्हणाला, "तुझ्या मनांत आज देव उभा राहिला; त्याशिवाय हें असं व्हायचं नाहीं."

कोयतीच्या दांडीनें जोरजोरानें डोकें खाजवित फकीरा म्हणाला, "खरं आहे तुझं म्हणणं. असं कांहींतरी झालं असलं पाहिजे खरं. कोणत्या वेळेला काय होईल कांहीं सांगतां यायचं नाहीं. पण हें असं कां झालं, कोणता देव माझ्या मनीं कसा उभा राहिला, आणि त्याची ही समक्षा माडाच्या शेंड्यावरच मला कां झाली, याचा कांहीं मला उलगडा होत नाहीं."

झटकन् आठवण झाल्यासारखें करून सुडक्या म्हणाला, "इकडे कुठें निघालों मी हा? शाळेंत जायला वेळ होईल ना! पण हें पाहा फकीरदादा, उद्यां उतरतांना असा सावकाश उतरूं नकोस. पाय घसरावयाचा कदाचित्. पदोपदीं आज मला तुझी भीति वाटत होती. खापावर पाय देतांना आज तुझं लक्ष थाऱ्यावर नव्हतं. उद्यां असं डोकं फिरवून घेऊं नकोस हो!" असें म्हणून सुडक्या दुसऱ्या बाजूनें उड्या मारीत निघून गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फकीरा आपल्या घरीं आला. 'निरा' चें गिऱ्हाइक वाट पाहात आंगणांतल्या खाटेवर बसलें होतें.

फकीराला पाहातांच दचकून उठून तो म्हणाला, 'काय झालें रे फकीरा, असा बाबरलेला कां दिसतोस? कांहीं पडला-बिडलास तर नाहींस?"

हंसण्याचा खोटाच आव आणीत फकीरा म्हणाला, "मी पडणार माडावरून! मग जगबुडच आली म्हणायची!"

कमरेचें गाडगें सोडून त्यानें खालीं ठेवलें; गिऱ्हाईकाच्या हातांतील बाटली घेऊन त्यानें ती पाण्यानें स्वच्छ धुतली. आणि गाडग्यांतील 'निरा' तो त्या बाटलींत ओतूं लागला. गाडग्याच्या तोंडावर आलेल्या फेंसावर तो तोंडानें फुंकर घालीत होता. दररोज तो असेंच करीत असे; पण गाडग्यांतील माडाच्या उग्र वासानें आज त्याचें मस्तक भणभणूं लागलें.

बूच लावून त्यानें ती बाटली गिऱ्हाईकाच्या हातीं दिली, त्यानें दिलेले पैसे खिशांत टाकले, पण आपण काय केलें याची त्याला जाणीवहि नव्हती. गिऱ्हाईक 'रामराम' करून निघून गेलें, पण तो तसाच शून्य दृष्टीनें त्याच्याकडे पाहात होता. तो आपल्याशींच पुटपुटला "आज मला हें असं झालं आहे तरी काय?"

त्याची बायको त्याच्या तान्ह्या मुलाला घेऊन बाहेर आली. रोजच्या कार्यक्रमाप्रमाणें त्यानें मुलाला हातीं घेतलें आणि खाटेवर बैठक मारली. पलीकडच्या परसांतून पाणी आणण्यासाठीं त्याची बायको हातांत घागर घेऊन गेली. दोन्हीं हातांत मुलाला घेऊन तो खेळवूं लागला. खेळवीत असतांना त्याचें लक्ष शेजारीं पडलेल्या कोयतीकडे आणि मडक्याकडे गेलें.

त्याला आठवण झाली. माडाच्या गाभ्यांतून उगवलेली अशीच एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या मुलासारखी लुसलुशीतशी पोय याच कोयतीनें आपण रोज खसकन् कापीत असतों. आपल्या वंशावृक्षांचा त्याला मोठा अभिमान होता. शिवाजीच्या आरमारावर असलेल्या मालवणच्या मायनाईक भंडाऱ्याचे आपण कुठल्या तरी मुलीच्या बाजूनें वंशज आहों, असें त्याचा बाप त्याला नेहमीं सांगत असे. त्याची त्याला आठवण झाली. मायनाईकाच्या वंशाचें असेंच एखादें कोवळें लुसलुशीत---माडाच्या गाभ्यांतून उगवणाऱ्या पोयीसारखें--पोर जर कुणी कापून टाकलें असतें तर कुठें तो वंश वाढणार होता?

हातावर नाचत असलेल्या त्या आपल्या छबकड्या मुलाला पाहात असतांना त्याला माडाच्या पोयीची पुन्हां आठवण झाली. छोट्या सुडक्याचे शब्द त्याला आठवले. "तुझ्या मनांत आज देव उभा राहिला आहे." त्याचें मन विव्हळ झालें. शिवाजी महाराजांच्या काळांत तुफान दर्याच्या वक्षस्थळावर नाचणाऱ्या आरमारावर आपल्या पूर्वजांनीं तरवार गाजविली. चमकणाऱ्या तरवारीनें शत्रूचें रक्त गलबताच्या नाळीवर उधळून दिलें, त्या पराक्रमी पूर्वजांचा मी वंशज, आज माडीचे घोट मित्रांच्या घशांखालीं उतरून आपण त्यांना शत्रू बनवीत आहों. अशा विचारांची एक विलक्षण लहर त्याच्या हृदयांत वावरूं लागली.

माडाच्या पोयीशीं पोटच्या गोळ्याची तुलना करण्याची भावना आपणाला कां झाली, त्याचें रहस्य त्याला उकलेना. पुन्हां त्याला आठवण झाली. तेच सुडक्याचे शब्द 'तुझ्या मनांत आज देव उभा राहिला आहे.' हा देवाचाच कौल काय? पस्तीस वर्षांत जो विचार कधींहि ध्यानीं-मनींहि आला नाहीं तो आज असा सहज खळबळून उठला, हा देवाचाच आदेश काय? त्याचें मन अगदीं कासावीस झालें. त्या भरांत मूल त्याच्या हातून कदाचित् खालींहि पडलें असतें पण तो सावध झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलाला घेऊन त्यानें उराशीं घट्ट कवटाळलें आणि त्याचे पटापट मुके घेण्यास त्यानें सुरवात केली.



पाण्याची घागर डोक्यावर घेऊन त्याची बायको येत होती. ती त्याचा हा वात्सल्याचा उमाळा पाहून म्हणाली, "आज काय एवढं पोराचं प्रेम आलं ? एरव्हीं कधीं गालाला गाल लावला नाहीं, आणि आज अगदीं मटामट मुके घेतां आहां !"

गंभीरपणानें फकीरा म्हणाला, आज माझ्या मनांत देव उभा राहिला आहे—मयेकराच्या सुडक्यानं सांगितलं मला. त्यामुळं आज काय झालं आहे मला कुणाला ठाऊक ! बावचळल्यासारखा झालों आहें मीं !"

डोक्यावरची घागर खालीं उतरून ठेवून तिनें मूल त्याच्या हातांतून परत घेतलें. क्षणभर दोघांचेहि हात एकमेकांत गुंतले होते. तिनें त्याच्याकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

66 म/6(ग) | २०२९०

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिलें; त्यानें तिच्याकडे पाहिलें. दोघेंहि एकमेकांकडे पाहून अगदीं लाजल्यासारखीं झालीं.

फकीरा एकदम उमाळा आल्यासारखें करून म्हणाला, "उद्यां माझ्या हातून कांहींतरी चमत्कारिकच गोष्ट घडणार आहे."

बायकोच्या उत्तराची अपेक्षा न करतां तो अंगांत कुडतें चढवून आणि वल्हें खांद्यावर टाकून समुद्राच्या किनाऱ्याकडे वळला.

नित्याच्या नियमाप्रमाणेंच दुसऱ्या दिवशीं आकडीला कोयती आणि दोरीला गाडगें अडकवून फकीरा आपल्या आवडत्या माडाच्या बुंध्यापाशीं आला. येतांच त्यानें एकदां वर नजर फेंकली; मडक्याखालून डोकावणारी माडाची पोय तितक्या दूर अंतरावरूनहि त्याच्या नजरेला दिसली. ती आपल्याला वर लवकर बोलावते आहे असें त्याला वाटलें. तो भराभर माड चढून वर गेला. सुडक्या वगैरे प्रमुख भक्तमंडळी त्याची आरोहण-क्रिया पाहात नित्याप्रमाणें खालीं उभी होती.

नित्याप्रमाणेंच तो झावळाच्या बुंध्यावर बसला, मडकें दूर केलें; आणि तसें करतांच त्याची नजर पोयींतून टपटप गळणाऱ्या रसाच्या बिंदूंकडे गेली. माडाच्या लेकराचे ते बिनरंगाचे रक्तबिंदू पाहून भरलेलें गाडगें त्यानें जोरानें खालीं फेंकून दिलें.

कोयती आकडीला अडकवून तो भराभर खालीं आला.

घाबराघुबरा झालेला सुडक्या त्याला म्हणाला, "आज झालं आहे तरी काय तुला फकीरदादा? मला वाटलं, तूं आतां खालीं पडतोस!"

"भंडाऱ्याचा पाय माडाच्या खापावरून घसरत नसतो पोरा!" मोठ्या आवेशानें त्यानें उत्तर दिलें. सुडक्या टकमक त्याच्याकडे पाहातच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिला. सारीं पोरेंहि आश्चर्यचकित झालीं होतीं. त्यानें कमरेची कोयती काढून दूर फेंकून दिली, कमरेचें गाडगेंहि फोडून टाकलें आणि तें पाया-खालीं तुडवीत त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करीत तो म्हणाला. "सुडक्या पोरा, आजपासून धडा घे. तूं म्हटलंस तेंच खरं. माझ्या मनांत देव जागा झाला आहे. आमच्या पूर्वजांनीं शिवाजीच्या आरमारावर तरवारी चालविल्या. त्यांचेच आम्ही वंशज, आज माडाच्या पोरांचे गळे कापून पोट भरतों आहोंत! हा अघोरपणा आहे, असं नाहीं तुला वाटत?—ऐकलंत रे पोरांनो या कल्पवृक्षाच्या बुंध्यावर हात मारून शपथ घ्या कीं, 'यापुढें आम्ही माडाची पोय कापणार नाहीं."

त्या पोरांनाहि स्फुरण चढलें. सर्वांनीं मिळून एकाच वेळीं माडाच्या बुंध्याला हात लावून शपथ घेतली. सर्वजण मोठ्यानें ओरडले, "शिवाजी-महाराज की जय!"

भा. वि. वरेरकर

परिचय

गोष्ट नीट वाचली ना? कां बरें ही गोष्ट लिहिली आहे? **मामांना** (भा. वि. वरेरकर हे मामा वरेरकर या नांवानेंच अधिक प्रसिद्ध आहेत.) एखादें सुंदर कथानक आढळलें म्हणून त्यांनीं ही गोष्ट लिहिली काय? त्यांना बोध करावयाचा होता? ही बोधकथा आहे काय? मग काय माणसाच्या स्वभावाचें सुंदर वर्णन, सृष्टीचें सुंदर वर्णन करावयाचें होतें?

अर्थात् नाहीं. या गोष्टींत बोध नाहीं. माडी काढून लोकांना दारुबाज करूं नये असें **फकीराच्या** मनांत येतें, तो तो धंदा सोडतो, मुलांना शपथ घ्यायला लावतो; हा सारा ओघ बोधाकडेच वाहतो. पण बोध हा प्रधान हेतु **मामांच्या** मनांत खास नाहीं. त्यांना या गोष्टींत जी करामत करायची होती, ती करितांना बोध, नीति हीं उद्भवतात, पण मामांनीं विचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला असता तर तीं टाळतां आलीं असतीं. फकीराला माडाच्या शेंड्यावरून अनंत असा सागर दिसला. आपलें आणि आपल्या आवडत्या माडाचें क्षुद्रत्व त्याला जाणवलें. तो माड टाकून समुद्रावर सफरीस निघून गेला. कदाचित् गोष्टीचें नांव '**सागराची हांक**' (Call of the sea) असें झालें असतें. पण मामांनीं तसें केलें नाहीं. त्यामुळें गोष्ट बोधाकडे झुकते एवढें खास.

पण **मामांची** या गोष्टींतील मुख्य करामत सांगावयाची राहिलीच. ती मात्र सुंदर आहे. कथानकासाठीं नाहीं, व्यक्तिदर्शनासाठीं नाहीं, सृष्टि-वर्णनासाठीं नाहीं तर माणसांच्या मनांत कधींकधीं विचारांचें, भावनांचें काहूर माजतें, गुंतागुंत होते–कधीं कधीं कोठून कोणास ठाऊक पण एखादी प्रबळ कल्पना डोक्यांत येते, कांहीं सुचूं देत नाहीं. आयुष्याचा प्रवाह इकडचा तिकडे वदलतो हें दाखविण्यासाठीं ही गोष्ट लिहिली आहे. **मामांना** फकीरासारख्या अडाणी भंडाऱ्याच्या मनांत झालेला अशाच एका कल्पनेचा संचार ('देव उभा राहिला') दाखवावयाचा होता.

अभ्यास

१. गोष्टीला 'माडाचें पोर' हें नांव कां दिलें ? माडाचें पोर कोण ?

२. 'सागराची हांक' असें नांव देऊन तुम्हीं गोष्टींत काय बदल कराल ? लिहून पाहा बरें ?

३. अधोरेखित वाक्यांचे अर्थ द्या. संवादांतील भाषा स्वाभाविक आहे का कृत्रिम ? उत्तरें सोदाहरण द्या.

४. फकीराच्या स्वभावाचें वर्णन करा.

५. फकीराला माडाच्या शेंड्यावरून दिसलेलें अफाट जग (सागर, सह्याद्रि, खाड्या, क्षुद्र घरें, माड, माणसें) नाट्यछटेच्या रूपानें किंवा आत्मगत भाषणाच्या रूपानें वर्णन करा. त्यांत भावना–विचारांचें काहूर उत्पन्न करण्याचा प्रयत्न करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. "गाबत्याला गुरूं व भटाला तारूं", गाबित ही कोकणांतील, खलाशाचा व मासे मारण्याचा धंदा करणारी एक जात. त्यांना गुरेंढोरें व ब्राह्मणाला समुद्रावरील तारवें काय कामाचीं ?

७. झावळें, खापा, पेंदी, पोय, यांचे अर्थ द्या. जगबूड = प्रलयकाल. खपाटें = समुद्रांत नांगर टाकून उभ्या राहिलेल्या बोटीवरून उतारू धक्क्यावर आणणाऱ्या रुंद होड्या. या होड्यांत एकाच वेळीं ५०–६० माणसें बसूं शकतात. निरा = माडाचा ताजा गोड, न फसफसलेला रस; समक्षा = साक्षात्कार.

५

रुक्मिणीचें श्रीकृष्णास पत्र

राजाधिराज यदुवंश शिरोवतंसा,
कंसांतका, मुररिपो, कमळानिवासा !
राजश्रियासह विराजित राजमान्या,
वंदी तुझे चरण भीमकराजकन्या; ॥ १ ॥
येथील हें कुशल जाणुन लेखकाला,
आज्ञापिजे निजमहोत्सव लेखनाला !
हें लीहलें प्रकृत केवळ संप्रदायें,
मानूं नये परि यथार्थचि देवरायें ॥ २ ॥
विज्ञापना परिस यादववंशवीरा,
योगींद्रहृत्कमलपंजरगर्भकीरा !
हातास ये त्वरित आज उडोन माझ्या
वार्ता मला श्रवणगोचर होति तूझ्या ॥ ३ ॥
माझा मनोमधुप लुब्ध बहूत झाला,
तूझे पदांबुजयुगीं रहिवास केला !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काकूळती बहुत याजनिमित्त येतें,
कृष्णा तुझे चरणपल्लव हे धरीतें ॥ ४ ॥

जे आयकेत भवदीय गुणौघ कानीं,
त्यांचे निवेति उगले मग ताप तीन्हीं !
जे पाहती प्रति मनोहर रूप देवा,
त्या डोळसा अखिल लाभ अपूर्व व्हावा ॥ ५ ॥

जन्मास या तुजनिमित्तच जाण आलें,
आईकतां गुण तुझे सजणा, न धालें !
हे अच्युता, मन मला नकळेच तूझें
तूझे पदीं परि अपत्रप चित्त माझें ॥ ६ ॥

सर्वां गुणीं तुजसमान महावदान्या,
ते कोण तूज नवरी न वरील धन्या ! ॥
विद्यावयद्रविणरूपगुणौघधामा,
कृष्णा, नृसिंहनरलोकमनोभिरामा ॥ ७ ॥

या कारणें नियत म्यां वरिला स्वभावें,
येवूनियां त्वरित त्वां मज आजि न्यावें. ।
हा लागला जिव असे तुजवीण जाया
तूं आपुली हरि करी मज आजि जाया ॥ ८ ॥

हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळी,
वीरांमधें तुरत होइल येकि टाळी.
लज्जा त्यजून धिट आणिक येक बोलें
सिंहामिषा हरुनि नेतिल आज कोल्हे ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पर्वीं असे लगिन निश्चित जाण भावें,
सेनेसमेत अति गुप्त बहूत यावें,
मंथून चैद्यमगधेशबळासि धीरा,
रक्षोविवाहविधिनें मज नेयिं, वीरा ॥ १० ॥

यांचे कुळीं नववधूस असे विचित्रा
लग्नास पूर्वदिवशीं कुलदेवियात्रा ।
अंतःपुरांतुन वधू न वधून बंधू
नेऊं कशी म्हणशि तूं पुरुषार्थसिंधू ? ॥ ११ ॥

ग्रामास संनिध निकेतन अंबिकेचें;
जें हें असे निजमनोरथदायिकेचें;
तेथें बसोनि घटिकाद्वय वाट पाहे
मी ही, न ये तरि तुझी मज आण आहे ॥ १२ ॥

जैं हा तुझा चरणलाभ मला न व्हावा,
म्यां निश्चयें तरि हरी मग जीव द्यावा !
घेईन मी तुजनिमित्त सहस्र जन्में,
त्वत्प्रायकें करिन नित्य अनेक कर्में ॥ १३ ॥

विज्ञापना शपथपूर्वक तूज केली,
येथील तों सकळ रीत कळोनि गेली.
आणीक काय निपुणाप्रति म्यां लिहावें;
त्वां एक वेळ सगुणा इकडे पहावें ॥ १४ ॥

हेजीव हे जीभच जाण माझी,
येथें नसो किमपि विप्रतिपत्ति तूझी !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्रांत लेख्य अवशिष्ट असेल कांहीं,
याच्यामुखें विदित होईल तूज तेंहि ॥ १५ ॥

सामराज

परिचय

सामराज कवीच्या रुक्मिणीहरण या जुन्या काव्यांतून हा उतारा घेतला आहे. पूर्वी स्वयंवराची चाल होती, पण त्याप्रमाणें रुक्मिणीस स्वयंवर करण्याची परवानगी न देतां तिच्या भावानें शिशुपाल राजाशीं तिचें लग्न ठरविलें. रुक्मिणीनें श्रीकृष्णास एक पत्र लिहून तें ब्राह्मणाबरोबर पाठविलें. हा कथाभाग फार लोकप्रिय असल्यामुळें स्त्रियांनीं पत्रिकेवर रचलेलीं जुनीं गाणीं आहेत, हरिदास कीर्तनांत हा कथाभाग रंगून सांगतात व संगीत नाटकांतहि खाडिलकरांसारख्या नाटककारांनीं या कथेचा उपयोग केलेला आहे.

सामराजाची भाषा किंचित् संस्कृतप्रचुर आहे; समास—अलंकारांनीं खचलेली आहे. पण एकदां शब्दांचे अर्थ कळल्यावर या पत्रिकेंतील रसाळपणा तुम्हांला कळेल. सुरवात व शेवट हीं कशीं केलीं आहेत तें पाहा.

अभ्यास

१. जुन्या पत्राचा मायना कसा असे? "कुशल असें औपचारिक लिहिलें" असें मुद्दाम कां लिहिलें?

२. नागमोडी रेषेनें दाखविलेलीं रूपकें स्पष्ट करा.

३. अपत्रप = लज्जेनें वांकलेलें; सिंहामिष = सिंहाचें भक्ष्य; भाग = वाटा; रक्षोविवाह = वधूस पळवून लग्न लावण्याचा धार्मिक विवाहविधी; आण = शपथ; हेजीब = दूत; लेख्य = लिहिण्याजोगें; चैद्य = चेदी देशाचा राजा शिशुपाळ; मगधेश = जरासंध; विप्रतिपत्ति = संशय; समजुतीचा घोटाळा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६

माझा प्रवास

निघण्याचा दिवस प्राप्त झाला. कर्वे यांजपाशीं गाडीभाडें, भोजनखर्च वगैरेसंबंधीं ठराव करून आदले दिवशीं रात्रीं सर्व तयारी करून पडशी भरून ठेविली. तयारींत व चिंतेंत व भाषणांत, त्या रात्रीं झोंप कोणास आली नाहीं. "रात्रिरेवव्यरंसीत्" दोन घटका रात्रौ उठून मुखमार्जनादि आटोपून गाडी घेऊन कर्वे बाजाररस्त्यावर येऊन उभे राहिले व आम्हांस बोलावणें पाठविलें. नंतर तीर्थस्वरूप काका व मी कुळस्वामिणीस हळदकुंकू वाहून प्रार्थना करून तीर्थरूप मातोश्रीचे चरणावर मस्तक ठेविलें व बाहेर पडून गाडीपाशीं आलों. तेथें इष्टमित्र व वेदशास्त्रसंपन्न विनायकशास्त्री हेहि आले होते, त्यांचें सर्वांचें समाधान करून निरोप घेतला व प्रयाणास आरंभ केला. गांवाबाहेर पुष्कळ लांबपर्यंत घरचीं सर्व माणसें येतच होतीं. तीं कांहीं केल्या माघारीं जाईनात. पुनः एकवार उभें राहून त्यांचें समाधान केलें. तीर्थरूप व मातोश्री यांचे नेत्रांस पाणी येऊन कंठ भरून आल्यामुळें त्यांचा बोलण्याचा इलाज नव्हता, व माझाहि गळा भरून आला होता. तथापि मातुश्रीचे कंठास मिठी मारून सांगितलें कीं मी पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें आपले प्रकृतीस फार जपेन व माघ-फाल्गुनाचे सुमारास घरीं खचित परत येईन. तूं काळजी करूं नकोस. त्या समयीं मातुश्री बोलली कीं, तुझी भेट पुनः होईपर्यंत मी आपले प्राण कंठांत ठेविले आहेत; असें म्हणून माझे डोळे आपले पदरानें पुसले.

आम्ही पुढें चालूं लागलों तो दिवस, शके १७७८ कालयुक्त संवत्सर, फाल्गुन मास, वद्य–पंचमी, मंगळवार होता. त्या दिवशीं खोपवली मुक्कामीं धर्मशाळेंत वस्ती करून जेवणें केलीं. पहांटेस घाट चढून गेलों. तिसरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुक्कामास पुणें शहरांत शिरलों. पुण्यास स्वस्थ एक-दोन दिवस राहून वरसईची भाड्याची गाडी परत पाठविली व तीर्थरूपांस एक पत्र व एक मुकटा पाठवून दिला. आम्हीं पुण्यास कपडेलत्ते वगैरे सर्व सरंजाम तयार करविला व सोबत पाहून एक इंदूरपर्यंत भाड्याची गाडी ठरवून त्यांत कर्वे, त्यांची पत्नी व एक आठ वर्षांची कन्या व स्वयंपाकीण बाई, अशाप्रकारें आम्हीं कांहीं चालत, कांहीं पाळीपाळीनें गाडींत बसत, असा चैत्र शुद्ध पंचमीस पुणें सोडून प्रवासास आरंभ केला.

तारुण्याच्या भरांत, शक्तीच्या अमदानींत प्रवासासारखी मौज नाहीं. निरनिराळे प्रदेश, देखावे, नद्या, नाले, डोंगर, झाडें, शहरें, खेडीं, माणसें, रीतिभाति नजरेस पडून नूतनपणाची करमणूक मनास होते, व निरनिराळी माहिती होते, शहाणपणा येतो. सुखाची खरी आनंद देण्याची शक्ति कांहीं दुःखाची मिसळ असल्याशिवाय बाहेर पडत नाहीं. चालण्यानें अंग दुखणें, आज जेवावयास न मिळणें, उद्यां भर दोन प्रहरीं एकाद्या बाभळीच्या विरल छायेंत पाणी पाणी करीत बसणें, परवां रात्रीच्या भर थंडींत अरण्यांत कुडकुडत पडणें, एखादा जिन्नस विसरणें, थोडीशी भामट्यांची भीति असणें, वगैरे प्रसंगीं घडणाऱ्या गोष्टी प्रवासाच्या सुखांत मिळून सुखरूपच होऊन जातात. पहांटेस उठून आम्ही बहुतेक प्रातःकाळच्या थंडाव्यांत चालत असों, व नऊ-दहाचे सुमारास कोठेंतरी वस्ती करावी. मग एकाद्या सुंदर नदीचे प्रवाहांत दोन हात टाकून स्वच्छ स्नान करावें किंवा प्रसंगोपात एखाद्या डबक्यांतून पंचा नेसून तांब्यानें स्नान करावें. स्नान करून ब्रह्मकर्म संपतें आहे तों भात-पिठलें तयार होऊन जेवीत असूं व बहुतकरून दुपारची तीव्र उन्हाची वेळ टाळून पुनः चालूं लागत असूं. याप्रमाणें पुणें सोडून वाघोलीचा मुक्काम करून मजल दरमजल नगराजवळ येऊन पोंचलों, तों जंगलांत ओढ्याचे दोन्ही कांठांनीं तांबड्या पांढऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगणित कण्हेरी लागून गेल्या आहेत असें दृष्टीस पडलें. एका दिवसांत लक्षपुष्पपूजा होईल असें पाहून फार आनंद झाला, व पुष्पेंहि पुष्कळ गोळा केलीं. नंतर तेथेंच मुक्काम करून दुसरे दिवशीं दहा वाजण्याच्या सुमारास नगरांत शिरलों व नव्या कारंज्यापाशीं राजेश्री नाना जोशी मुळे यांजकडे जाऊन उतरलों. नगरांत कांहीं दिवस मुक्काम केला व सर्व शहर पाहिलें. पुढें हिंदुस्थानांत जाणाऱ्या दोन-तीन गाड्या मिळाल्या, त्यांत यज्ञाकरितां निघालेले कांहीं विद्वान् ब्राह्मण होते, त्यांचे संगतीनें नगराहून कूच केलें. मुक्काम दर मुक्काम करीत मालेगांवचे नदीवरचे धर्मशाळेंत उतरण्याकरितां आलों, तों पांच सहा गाड्या उतरल्या आहेत, पंचवीस तीस माणसें खटपटीस लागलीं आहेत, व एकीकडे स्वयंपाक सुरू आहे असें दृष्टीस पडलें. आम्हींहि तेथेंच एका कोपऱ्यांत उतरलों. चौकशीअंतीं बापुसाहेब संगमनेरकर तेथें उतरले आहेत असें कळलें. ते हारदेहांडे म्हणून त्यांचें नेहमींचें राहण्याचें ठिकाण होतें तेथें जात होते. बापुसाहेबांस वतनाचें सालीना अडीच हजार उत्पन्न असून जवळ अर्थहि पुष्कळ होता. हे गृहस्थ फार सज्जन व धर्मशील होते व चांगले व्युत्पन्न असून वेदहि बराच पठण केला होता. नेहमीं स्मार्ताग्नि सिद्ध ठेवल्यामुळें याज्ञिकीची माहिती त्यांस चांगली होती. त्यांचे हातून सप्तसंस्था दोन चारदां झाल्या होत्या. जवळ गृह्याग्निसागर वगैरे मोठमोठाले ग्रंथ होते. त्यांची पत्नी फार साध्वी, पतिसेवापरायण होती. अशा गृहस्थाच्या भेटीचा आम्हांस परम लाभ झाला. चार विद्वान् ब्राह्मण सहाजिक आले आहेत तेव्हां जागरण करावें, असें त्यांच्या मनांत आल्यावरून दोन प्रहरीं मजला व दुसरे दोघांस बरोबर घेऊन श्रीमंत राजेबहादर मालेगांवकर यांच्या भेटीस गेले. तेथें सत्कार वगैरे झाल्यावर रात्रौ जागरणाचा बेत ठरला. मालेगांवचे चार विद्वान् व आम्ही एकत्र नऊ असामी मिळून तेरा असामींचें दोन वाजेतोंपर्यंत जागरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालें. आटीव दूध पुष्कळ होतें व एक एक रुपया दक्षिणा मिळाली. नंतर आम्ही धर्मशाळेंत परत येऊन स्वस्थ निजलों.

आम्ही पुढें चालूं लागलों तो मजल दरमजल धुळ्यावरून सातपुड्याच्या पायथ्यापाशीं करबंद बारीचे मुक्कामावर येऊन पोहोंचलों.

सातपुड्यांतील वनप्रदेश अतिरमणीय आहे. एकंदर पर्वताची रुंदी सुमारें साठ सत्तर कोस असून मधून मधून मात्र उंच शृंगें आहेत, बाकी डोंगर सखल आहे. एकदम चढावहि नाहीं. कांहीं चढाव आहे, कांहीं उतार आहे. सातपुडा म्हणण्याचें कारण असें आहे कीं, डोंगराचे सात पुडे आहेत व सरसकट डोंगरापलीकडे जाण्यास सात दिवस लागतात. आम्ही डोंगर पहांटेच्या चार घटका राहिल्या होत्या तेव्हां चढावयास आरंभ केला. प्रात:काळचा गार वारा मंद मंद वहात होता. चांदण्याच्या प्रकाशानें वनप्रदेश संसारसुखाच्या आशेप्रमाणें अस्पष्ट रमणीय दिसत होता व अहंपणारूप सुवासानें वन दरवळून सोडलें होतें. आम्हीं पांच-सहा कोस आलों तरी सुवास भरून राहिला आहे हें पाहून आश्चर्य वाटलें व अरुणोदयानें दिसूं लागलें तों अनंत बिल्ववृक्ष डोंगरावर लागून राहिले आहेत व त्यांजवर कोंवळ्या आरक्त पल्लवांनीं युक्त सुगंधी पुष्पें भरलीं आहेत असें दृष्टीस पडलें. अगोदर आम्ही शैव, त्यांत पार्थिव पूजा मी लहानपणापासून घेतली आहे, तेव्हां तें शिवप्रिय वृक्षवन पाहून मला अत्यानंद झाला. कोंकणांत सगळ्या गांवामिळून दोन-चार बेलाचीं झाडें असतात, तीं पुन: सगळ्या गांवाच्या पूजेकरितां ओरखडून टाकलेलीं असून त्यांत सबंध त्रिदळ मिळावयाची पंचाईत. अशा अवर्षणाच्या देशांतून आलेल्या आम्हां उपोषितांस ते कोमल, आरक्त, त्रिदळांनीं भरलेले व सुवासिक पुष्पयुक्त बिल्ववृक्ष पाहून परम हर्ष झाला यांत नवल काय ? आम्ही पुष्कळ पत्रें व पुष्पें खुडलीं व लागलीच एके रस्त्याच्या बाजूचे धर्मशाळेंत उतरलों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अफूचे व्यापाराकरितां सरकारनें रस्त्याचे बाजूनें सहा सहा कोसांवर पाण्याच्या आश्रयानें कौलारू बंगले बांधले आहेत, तशा एका बंगल्यांत स्नान व जेवण झाल्यावर पुनः चालूं लागलों. ते दिवस वसंताचे होते, यामुळें वृक्ष सर्व पल्लवित, पुष्पित, फलित झाले होते. रक्तचंदन, मधुप (मोह), साग वगैरे वृक्ष मोठमोठाले उंच डोंगरावर दाट लागलेले होते. कोशिंबाचे वृक्ष अगदीं लाल होऊन गेले होते. मधून मधून भिल्ल लोकांच्या गढ्या—म्हणजे किल्ले—चिरेबंदी तट वगैरे सुद्धां लाखों रुपये खर्च करून बांधलेल्या उंच उंच शिखरांवरून रमणीय दिसत होत्या, व रस्त्यावर कोठें पाण्याच्या जागेवर चिरेबंदी चौथरे सोईकरितां बांधलेले दृष्टीस पडले. वाटेनें भिल्लांचीं मातीचीं बांधलेलीं गांवें फार लागलीं.

याप्रमाणें सातपुड्याची शोभा पाहात जातां जातां महूच्या छावणीहून तीन मजलांच्या सुमारास संध्याकाळचे वेळेस सडकेच्या बाजूचे बंगल्यांत उतरून जेवणखाण केलें. रात्र चार-पांच घटका झाली तों दोन पलटणी शिपाई बंगल्यांत उतरावयास आले. प्रवासांत ओळखी ताबडतोब होतात. शिवाय ते शिपाई गोव्याकडील असल्यामुळें आम्ही एकदेशी व एकभाषी जुळलों. मग स्वस्थपणें पानसुपारी खात बसून चोहींकडील हकीकती व सुखदु:खाच्या गोष्टी सुरू झाल्या....

उज्जयिनी क्षेत्रांत बराच मुक्काम घडला. क्षेत्रांत क्षेत्रचालीप्रमाणें दाट वस्ती व अरुंद दगडांनीं माचून काढलेले रस्ते आहेत. हें शहर फार प्राचीन असून येथें मोठमोठाले इतिहासप्रसिद्ध विक्रमादि चक्रवर्ती होऊन गेले. त्यांच्या अमानुष महत्त्वाची साक्ष देणारीं अशीं मोठमोठालीं दोन ताड उंचीचीं व पंधरा वीस हात रुंदीचीं भिंताडें चुनेगच्ची बरींच दृष्टीस पड-तात. असें म्हणतात कीं उज्जयिनी नगरी पालथी घातली आहे. तेथें विटा नवीन भाजण्याची जरुरी नाहीं. बहुतकरून भुईमध्यें जुन्या विटा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांपडतात. एकादे जमिनींत भिंताड लागलें म्हणजे मोठ्या इमारतीचें काम होतें. येथें भर्तृहरी पूर्वीं राज्य करीत होता. त्यास विषयसंबंधें अतिपश्चात्ताप होऊन सर्व राज्य सोडून विदेही होऊन तपश्चर्येस बसला, त्या गुहेस हल्लीं भर्तृहरीची गुंफा म्हणतात. तें ठिकाण भैरवगडावर असून फार रमणीय व शांतरसानुकूल आहे. अशी उज्जयिनीची मजा पाहात पाहात पांच सहा दिवस लोटले............

वाटेनें सारंगपूर म्हणून एक टुमदार शहर लागलें. येथील वस्ती चांगली असून बाजारपेठेंत भर मजल्याच्या हवेल्या आहेत. देवळें फार मनोहर आहेत. शहरचे दोन्ही बाजूनें नदी वहात आहे व बाहेर हिरवेंगार बागाईत लागून गेलें आहे. अशीं शहरें पाहात पाहात ग्वाल्हेरीस पोंचलों, व वैशंपायन यांजकडे उतरलों. दोहींकडे दंगे उत्पन्न झाल्याकारणानें यज्ञ राहिला होता. परंतु बायजाबाईसाहेबांनीं दक्षिणेंतून आलेल्या ब्राह्मणांची बरदास्त चांगली ठेवली होती. पावसाळा सुरू असल्याकारणानें बहुतेक मंडळी चातुर्मास्य तेथेंच राहिली. त्यांस बाईसाहेब दरमहा दहा रुपये खर्चाबद्दल पोंचवीत असत. आम्हींहि मुजुमदार यांचे वाड्यांत स्वतंत्र बिऱ्हाड करून स्वस्थ चार महिने राहिलों. ग्वाल्हेर किल्ल्यापासून नजीकच लहानसा गांव आहे. महादजी शिंदे बादशहावर स्वारी करण्याकरितां बरोबर मोठें लष्कर, तोफखाना घेऊन जातांना त्यांनीं येथेंच मुक्काम केला. येथून स्वाऱ्या करून शत्रूंपासून खंडण्या घेऊन जय होत गेला, यामुळें येथेंच वाडा बांधून राहिले. लष्करी लोक जेथें जेथें उतरले होते तेथेंच घर बांधून राहिले. एकंदर लष्करवसाहत सुमारें तीन साडेतीन कोस झाली आहे. भोंवतालीं भुंडे डोंगरांचें एक कडेंच आहे. झाडी कोठेंच नाहीं. शहरांत कोठें कोठें तलाव उकरले आहेत. राजधानीचे रस्ते प्रशस्त असून फरसबंदीचे आहेत. शहराजवळ फुलबाग म्हणून फार विस्तीर्ण सुंदर उपवन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्यांत नाना तऱ्हेच्या देशोदेशींचे वृक्षवेल पुष्पवाटिका असून मध्य-भागीं हवा खाण्याकरितां एक जलमंदिर बांधलें आहे. त्याचें काम पाहाण्या-लायक आहे. तेथून सुमारें चार मैलांवर नदी आहे, त्या नदीचे कांठावर शिंदे-सरकारची मोठी छावणी आहे.

याप्रमाणें ग्वाल्हेरींत सकाळ-संध्याकाळ फिरून चातुर्मासाचे दिवस काढले. शहरांत एका नामांकित गृहस्थाचे येथें आषाढ महिन्यांत मुलाचा व्रतबंध झाला, त्याबद्दल मोठें ग्रामण्य माजलें. त्यामुळें लोकोत्तर विद्वानांच्या सभा पाहाण्यास सांपडल्या. हा फार अलभ्य लाभ झाला. वेदशास्त्रसंपन्न तातु दीक्षित हे फार विद्वान् वेदशास्त्रनिष्णात होते व त्यांच्या मतावरून व्रतबंध झाला होता. त्यांनीं विठ्ठलमंदिरांत स्मृतिवाक्यें, सूत्रप्रमाणें यांवरून आषाढांत उपनयन विष्णुशयन होईतोंपर्यंत करावें असें सिद्ध केलें. सारांश, मुंज शास्त्रोक्त ठरून सभा विसर्जन झाली. कार्तिकांत बाईसाहेबांनीं दक्षिणें-तून आलेल्या ब्राह्मणांची सभा करवून बिदागिरी दिली. त्यांत आम्हांस पीतांबर व दीडशें रोख रुपये मिळाले. याप्रमाणें ग्वाल्हेरीचें कार्य मनाजोगें झाल्यावर आतां पुढें काय करावें याविषयीं विचार करूं लागलों.

विष्णुभट गोडसे वरसईकर

परिचय

विष्णुभट गोडसे नांवाचे दक्षिणेंतील एक विद्वान् भटजी १८५७ सालच्या बंडाच्या सुमारास उत्तर हिंदुस्थानांत राजदरबारीं द्रव्यप्राप्ति होईल या आशेनें गेले व इंदूर, उज्जैन, धार, झांशी, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणीं राहून आले. या शहरांतली बंडाची धामधुम त्यांनीं स्वतः पाहिली होती. परत आल्यावर म्हातारपणीं त्यांनीं आपल्या प्रवासाचें वर्णन स्मरणानें लिहून काढलें. तें रा. ब. चिं. वि. वैद्यांनीं त्यांच्याकडून मिळवून "माझा प्रवास" या नांवानें प्रसिद्ध केलें. इंग्रजीचा गंध नसलेल्या या भटजींची मराठी भाषा किती सरळ व बालबोध वळणाची आहे पाहा. इंग्रजी वाक्यरचनेचा व वाक्प्रचारांचा या लिखाणांत गंध नाहीं. हें पुस्तक अवश्य वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भटजींच्या वरसई (जि. ठाणें) पासून ग्वाल्हेरपर्यंतच्या प्रवासाचा उतारा आम्ही घेतला आहे. आगगाड्यांची सोय झाल्यापासून आपली भौगोलिक दृष्टि आंधळी बनली आहे. आगगाडी होण्यापूर्वी लोक प्रवास कसे करीत, मुक्काम कोठें व कसे करीत, वेळ कसा घालवीत, सृष्टिशोभा त्यांना कशी पाहावयाला मिळे, त्यांना चोराचिलटांचा त्रास कसा होई, विशेषतः त्या वेळीं दक्षिणेंतून उत्तर हिंदुस्थानांत जाण्याचे रस्ते कोणते होते, त्या रस्त्यांवर मुख्य गांवें कोणतीं होतीं हें सर्व समजून घेणें अवश्य आहे.

अभ्यास

१ व्युत्पन्न = व्याकरण पढलेला; स्मार्ताग्नि = ब्राह्मणानें लग्नानंतर किंवा वेगळें बिऱ्हाड केल्यानंतर निरंतर पाळावयाचा अग्नि. विवाहानंतर वधूसह गृहप्रवेश करते वेळीं ज्या अग्नीवर होम करावयाचा तोच अग्नि पुढें निरंतर जतन करून ठेवावयाचा असतो व यावर नित्य सकाळ-संध्याकाळ होम द्यावयाचा असतो. बारी = खिंड; गढी = लहान किल्ला.

२. अधोरेखित वाक्यें व शब्द यांचे अर्थ द्या. विष्णुशयनाची धार्मिक कल्पना कर्क व मकर वृत्तांमधील सूर्याच्या मार्गाविषयीं आहे. ती भूगोल-शिक्षकाकडून समजावून घ्या.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७

तारापूरचा संग्राम

(चाल०-तुतारी)

१

“ तुडुम् तुडुम् हा झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा !
मर्द मराठे ! उठा उठा तर !
गर्जत ‘ हर ! हर ! ’ चला करा सर
बुलंद बांका गढ तारापुर !

२

तीन बाजूंला खंदक खोल,
चवथ्या बाजुस पाणी लोल;
आंत जिवांचें घ्याया मोल
उड्डाणोत्सुक आयस गोल !
भय न तयाचें तुम्हास तिळभर
आद्यशक्तिचे तुम्हीं किंकर,
उठा ! करा सर गढ तारापुर !

३

अर्यस्त्रांची तमा कुणाला ?
कचदिल पापी नादानांला !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्यस्त्रांची तमा कशाला
शिवशाहीच्या रणमर्दाला ?
पहावया हा अपूर्व संगर
वर वर चढतो नभीं दिवाकर !
मर्द मराठे ! उठा उठा तर !"

४

खाडीमधल्या माडीमाजी
सूत्रधार रणधीर चिमाजी
असंख्य त्याच्या ताबिन गाजी
'करूं अरीची' म्हणती 'भाजी !'
पवार, शिंदे, शूर होळकर
फौजबंद सर्दार मातबर
एल्गाराला उठले सत्वर !

५

एका मागुनि एक अंतरें
सुरंग नामी उडती सारे,
बंद गडाचीं दोन्ही द्वारें
तटास पडलीं परि खिंडारें !
हालुं लागला गर्जत 'हरहर !'
मराठियांचा सेनासागर
डुबवायाला गढ तारापुर !

६

सुरंगनिर्मित दारीं दारीं
निघे घुसाया सेना सारी;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गनिमाचा परि मारा भारी
करुनि करामत दावी न्यारी !
 वरुनि कोसळे आग भयंकर,
 थबकुनि बोले मराठि लष्कर,
 'अजिंक्य बांका गढ तारापुर !'

७

तुडुम् तुडुम् तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा !
 चढलें तेणें स्फुरण अनावर
 गर्जत चाले पुनरपि लष्कर
 करावया सर गढ तारापुर !

८

खंदकांवरी सांकू पडती,
त्यांवरुनी रणधीर धांवती !
किती अधोगति जातां घेती
तसेच परि सांवरुनी उठती
 गर्जत 'हरहर ! जय हर शंकर !
 महाराष्ट्राचें धांवे लष्कर,
 करावया सर गढ तारापुर !

९

रुस्तुम हशामी बेदरकार
क्षणांत झाले खंदकपार !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुगम न एकहि परि खिंडार
वर्षति गोळ्या तिथें अपार !
अगणित होके उडति भराभर
ओतित राहे आग निरंतर
बुलंद बांका गढ तारापुर !

१०

गोळ्यांची त्या तमा कुणाला ?
कचदिल पापी नादानांला !
होक्यांची त्या तमा कुणाला ?
पिंडचि ज्यांचा गुलाम त्यांला !
शाण्णव कुळिंचे समरधुरंधर !
खिंडारांवरी घुसले सत्वर
करावया सर गढ तारापुर !

११

तुडुम् तुडुम् तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा !
तळ्हातावरि घेउनियां शिर
लढति भवाचे भगवे किंकर
करावया सर गढ तारापुर !

१२

उपाय सारा करी अपाया,
सीमेपरतें माणुस जाया !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरीहि ईर्षा मनीं शिपायां
भगवी दीक्षा गढास द्याया !
इरेस आलें मराठि लष्कर,
तटास:लावुनि शिड्या भराभर
झटे घ्यावया गढ तारापुर !

१३

करावयाला मर्दामर्दी
शिड्यांवरोनि झाली गर्दी !
शिड्या लोटुनि तों रिपु दर्दी
खचवि मराठी हिंमत अर्धी !
'विजयवंत नित संत झेवियर !'
फिरंगियांचें गर्जे लष्कर,
'अजिंक्य बांका गढ तारापुर !'

१४

तुडुम् तुडुम् तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा !
चेव येउनि उठले बेडर
शिवशाहीचे डंबर हंबिर
करावया सर गढ तारापुर !

१५

निशाण भगवें घेऊनि हातीं
चढे तटावर एक पदाती,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागुनी गोळी परी ललाटीं
गतप्राण तो पडे खालतीं
चढले दुसरे जंगबहाद्दर
ठरे न एकहि तरी तटावर !
बुलंद बांका गढ तारापुर !

१६

मर्दाने बहु आले कामीं,
क्षणभर पडली शिडी रिकामी !
माजवावया तोंच मर्दुमी
धीट धारकरि उठले नामी !
उदार होउनि निज जीवावर
चढुनि तटावर करिती सत्वर
भगवा दीक्षित गड तारापुर !

१७

ढालेवरती झेलीत गोळी
काबिज केली प्रथम सफेली !
ढालेवरती झेलीत गोळी
गडांत शिरले उतरुनि खालीं !
गनिमाला तंव चिरुनि चराचर
खिंडारांतुनि घुसलें लष्कर
करावया सर गढ तारापुर !

१८

आंतिल मेढेकोट फोडिला,
उगारला अरि सर्व तोडिला !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जवामर्दिनें बुलंद किल्ला
फिरंगियाचा काबिज केला !
विजयानंदें गर्जे लष्कर
'असो कितीही वसई मातबर
दशा अखेरिस हीच तिची पर !'

१९

जासुद सुटले कळवायाला
छत्रपतींला, श्रीमंतांला
दुस्मन्दाणा कटुनी मेला
स्वामींच्या यश तल्वारीला !
भगवा झेंडा धरुनि शिरावर
शिवशाहीचा बनला किंकर
"बुलंद बांका गढ तारापुर !"

माधव

परिचय

मराठी भाषेंतील कांहीं थोड्या यशस्वी वीररसपर कवितांपैकीं ही कविता आहे. चाल पाहा कशी खडी आवेश उत्पन्न करणारी आहे. भाषाहि वीररसाला पोषक आहे. कविता ऐकतांच मराठी सैन्याची पायदौड आपल्या कानीं पडते, यांतच कवीचें कसब आहे. टेनिसनची "'Charge of the Light Brigade' ही कविता या दृष्टीनें वाचा. 'Half a league, half a league' म्हणतांना घोड्यांच्या टापा ऐकूं येतात ना? तसेंच "तुडुम् तुडुम् हा झडे नगारा, एल्गाराचा देत इशारा" या ओळींचा काय परिणाम होतो तें पाहा. ही कविता केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेच्या चालीवर म्हणावयाची.

ही कविता वाचल्यानंतर चिमाजी अप्पा पेशवे यांनीं लिहिलेलें वसईच्या मोहिमेसंबंधीचें पत्र वाचा. हें 'गद्यवैभव' भाग पहिला (पृष्ठ ८५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांत तुम्हांला वाचावयास सांपडेल. तें वाचल्यावर ही कविता पुन्हां एकदां वाचा. तुम्हांला तिचें स्वारस्य अधिक कळेल.

ठाणें जिल्ह्यांतल्या मुंबई बेटाच्या उत्तरेस समुद्रकांठीं असलेला चिंचणी-तारापूर गांवचा किल्ला पोर्तुगीजांच्या ताब्यांत होता. तो घेण्यास मराठ्यांनीं हल्ला केला त्या प्रसंगाचें वर्णन या कवितेंत आहे. तारापूर घेतल्यावर पुढें मराठे वसईच्या किल्ल्यावर चालून गेले (१७३९).

नवीन शब्दांचे अर्थ

एल्गार = हल्ला; बुलंद = दुर्गम; बांका = श्रेष्ठ; लोल = चंचल, ओढ घेणारे; आयसगोल = (तोफांचे) लोखंडी गोळे; आद्यशक्ति = भवानीमाता; किंकर = सेवक; अर्यस्त्र (अरि + अस्त्र) शत्रूंचीं अस्त्रें; तमा = पर्वा; कचदिल=कच खाणारें ज्यांचें दिल म्हणजे मन, भ्याड; फौजबंद = फौजेसह असलेलें; मातबर = वैभवशाली; उमदे = शूर; गनिम = शत्रू; सांकव = (सांकू) मध्यें लाकडें टाकून तयार केलेला छोटा तात्पुरता पूल; रुस्तम = पराक्रमी; हशमी = लढाऊ; बेदरकार = बेपर्वा; होके = हातबॉम्ब; शाण्णव कुळी = मराठे जातींत एकंदर शहाण्णव मूळ घराणीं समजण्यांत येतात; भगवे किंकर = भगव्या झेंड्याचे अनुयायी; इरेस येणें=चेव येणें; दर्दी=हुशार, हिकमती; डंबर = धीट; हंबीर-(मूळ शब्द 'अमीर') सरदार; जंगबहाद्दर =जंगांतले म्हणजे युद्धांतले शूर वीर; मर्दाना=शूर गडी; धारकरी=तरवारीनें लढणारा; सफेली=तटावर आंतल्या बाजूनें, शिपायांना हालचाल करण्यासाठीं सभोंवार केलेली गच्ची; मेढेकोट=मेढ्या देऊन किल्ल्याच्या आंतल्या तटांत उभारलेला तात्पुरता लांकडी तट. जवांमर्दीनें=पराक्रमानें; दाणा=शूर, उमदा; श्रीमंत=पेशवे; छत्रपती = सातारचे राजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८

ग्रंथसंग्राहक कवि मोरोपंत

बारामतीस आपल्या श्रीमंत यजमानाच्या घरीं रामायणादि मोठमोठे ग्रंथ पंतांस वाचावयास मिळत होते; पण स्वतः आस्थेनें त्यांनीं अनेक ग्रंथ लांबलांबून आणवून लिहून घेतले. खरें विद्यार्थीपण पंतांत होतें. विद्येची खरी अभिरुचि उत्पन्न झाल्यामुळें परगांवांहून मोठाले ग्रंथ आणवून स्वतः पाठीचा कणा वांकेतों रात्रंदिवस जागून त्यांनीं ते लिहून घेतले. त्यावेळीं ग्रंथसंपादन करून ते लिहून घेणें किती खर्चाचें, श्रमाचें व आस्थेचें काम होतें याची अलीकडील लोकांस कल्पनाहि होणार नाहीं. कांहीं लोक आपले ग्रंथ दुसऱ्यास देण्यास किती नाखुष असत हें समर्थांच्या, " आपण वाचीना कधीं। कोणास वाचाया नेदि॥ पुस्तक बांधोनि ठेवि बंदी। तो एक मूर्ख॥ " या दासबोधांतल्या मूर्खांच्या लक्षणांतल्या एका ओंवीवरून उघड दिसतें. कित्येक लबाड व मूर्ख लोक मागून नेलेले ग्रंथ ज्याचे त्यास परत देण्याचे कामीं तेव्हांहि सध्यांप्रमाणेंच कुचराई किंवा दिरंगाई करीत असत, हेंहि एक कारण पुस्तक 'बंदी' बांधून ठेवणारांच्या तर्फेनें पुढें आणतां येण्यासारखें आहे. सांप्रत एवढा शिक्षणाचा प्रसार झाला असूनहि व छापील पुस्तकांच्या हव्या तितक्या आवृत्त्या स्वल्प किंमतींत वाटेल तेथें मिळण्यासारख्या असूनहि, असे कित्येक खप्पी आहेत कीं, दुसऱ्याचें पुस्तक वेळेवर परत करण्याचें त्यांना भान राहात नाहीं; इतकेंच काय पण सार्वजनिक संग्रहालयांतूनही पुस्तकें मागवून तीं संभावितपणानें ते खुशाल दडपून ठेवतात, किंवा त्यांतील महत्त्वाचीं पृष्ठें, फोटो, किंवा नकाशे फाडून घेऊन नंतर गुपचुप तीं परत करितात! हा असत्याचा किंवा संभावित ठकबाजीच एक प्रकार आहे! पोथ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिहून घेण्याचे श्रम व आनंद ज्यांना माहीत नाहींत, त्यांना खुशाल पोथ्यांचे ढीग उकिरड्यावर, चंद्रभागेच्या डोहांत, किंवा होळींत नेऊन टाकतांना मी पाहिलें आहे! पूर्वजांनीं महत्प्रयासानें लिहून संग्रहित केलेले ग्रंथ वाचण्याचें तर दूरच राहो, पण जतन करण्याचेंहि शहाणपण ज्यांचे अंगीं नाहीं, असे 'सूर्यपोटीं शनैश्वर' जन्मलेले दिवटे आजकालहि पुष्कळ ठिकाणीं आढळतात. पुष्कळ जुन्या पोथ्यांच्या मलपृष्ठावर आढळणारे पुढील दोन श्लोक पंतांनींहि कांहीं ग्रंथांच्या मलपृष्ठांवर लिहिले आहेत. तैल, जल व शिथिलबंधन यांपासून आपलें रक्षण करण्याची एका श्लोकांत ग्रंथानें मनुष्याची विनवणी केली आहे; व 'कंबर, पाठ, व दृष्टि यांना अति कष्टवून मीं लिहिलेल्या ग्रंथाचें योग्य परिपालन करा' अशी दुसऱ्या श्लोकांत लेखकानें ज्यांच्या हातीं ग्रंथ पडेल त्यांची विनंती केली आहे. ते श्लोक असे आहेत :—

'तैलाद्रक्षेज्जलाद्रक्षेद्रक्षेच्छिथिलबंधनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यम्'—एवं वदति पुस्तकम् ॥ १ ॥
भग्नपृष्ठकटिग्रीव ऊर्ध्वदृष्टिरधोमुखि ।
कष्टेन लिखितं ग्रंथं यत्नेन परिपालयेत् ॥ २ ॥

इतर प्रकारच्या आनंदाहून विद्यानंदाची पायरी फारच वरची आहे. अंतरात्म्याची शुद्धता व बुद्धीचा विकास झाल्याशिवाय मूर्त व पार्थिव सुखांना तुच्छ लेखण्याची बुद्धि होत नाहीं. मूर्ताकडून अमूर्ताकडे दृष्टि वळली कीं, एक पायरी वरची लागली. विद्यानंदाची खरी गोडी लागल्याशिवाय पाठ, मान व कंबर यांना क्लेश देऊन ग्रंथ लिहून घेण्याची खटपट कोणी करणार नाहीं. क्षुद्र सुखांत क्षुद्र जीवच रमायचे. 'ग्रंथसामुग्री करी । तो सत्वगुण' असें समर्थांनीं म्हटलें आहे तें खरें आहे. ग्रंथसंग्रह करण्याच्या नित्य छंदामुळें पंतांच्या सत्वगुणाचाहि बुद्धिबरोबरच विकास होऊं लागला. दहा बारा वर्षांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथसंग्रहकारित्वामुळें त्यांच्या अंगचा आळस झडला, उद्योगप्रियता वाढली, तुच्छ ऐहिक सुखापासून मन परावृत्त झालें व पंतांनीं २९ व्या वर्षीं रचलेल्या प्रल्हादविजय ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें त्यांची 'हरिध्यानासक्ति' बळावली. असो. ग्रंथ जवळ असणें हें तेव्हां श्रीमंतांशिवाय किंवा आस्थेवाईक विद्यार्थ्यांशिवाय इतरांस फारसें सुलभ नव्हतें. तेव्हां ग्रंथसंग्रह ही एक संपत्ति मानली जात होती. पंतांची ग्रंथसंग्रह करण्याची आवड व जलद लिहिण्याची तऱ्हा यांची द्योतक अशी एक आख्यायिका मीं कोल्हापूर प्रांतीं ऐकिली, ती येथें सांगतों. आपल्या ग्रंथांस आपला वियोग क्षणभरहि न होऊं देणारा एक गृहस्थ कोल्हापुरास होता. त्याजपाशीं 'भारतचंपू' असल्याचें पंतांस कळलें. तो गृहस्थ आपला ग्रंथ कोणासहि देत नसे व पंतांस तर तो ग्रंथ वाचण्याची अनिवार इच्छा झाली. तेव्हां पंतांनीं पुढील मजेची युक्ति काढली. आपला एक स्नेही बरोबर घेऊन पंत त्याच्या घरीं गेले व आपल्याबरोबर त्यांनीं लिहिण्याचें सर्व सामान घेतलें. तो स्नेही ओटीवर त्या गृहस्थाजवळ बसून ग्रंथ अंमळ सावकाश वाचूं लागला. पंत जवळच्या खोलींत कागद, दौत, लेखणी घेऊन बसले होते. तो गृहस्थ संकेताप्रमाणें स्पष्ट व सावकाश वाची व पंत आंतून ऐकून भराभर लिहून घेत. या प्रमाणें पहांटेपर्यंत त्या गृहस्थाचें वाचन चाललें असतांना पंतांनीं तो सारा ग्रंथ अतिद्रुत लिहून घेतला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपला 'भारतचंपू' मालकापुढें ठेवला ! त्यास पंतांची आस्था, जलद लिहिण्याची तऱ्हा व चातुर्य पाहून मोठें कौतुक वाटलें ! ! खऱ्या विद्यार्थ्यास आवश्यक असे अलौकिक गुण पंतांत होते. ते कोल्हापुराहून, पंढरीहून, साताऱ्याहून, वाईहून फार काय पण काशीहूनहि ग्रंथ आणवीत. कांहीं वाचून परत करीत, व कांहींच्या नकला करून घेत.

ल. रा. पांगारकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. आजच्यासारखे छापखाने नव्हते अशा काळांतील मोरोपंतांसारख्या ग्रंथाभ्यासी माणसाला ग्रंथसंग्रह करण्याचे कामीं किती कष्ट पडत असत! आणि एवढे कष्ट पडूनहि त्यांचें रक्षण व अध्ययन मोठ्या प्रमाणांत चाले.

२. पूर्वजांनीं महत्प्रयासानें लिहून ठेवलेल्या ग्रंथांचें जतन न करतां ते नष्ट करणाऱ्या लोकांवर पांगारकर फार रागावले आहेत. हें त्यांचें रागावणें बरोबर आहे का?

३. खप्पी, सूर्यापोटीं शनैश्वर, व दिवटा यांचे अर्थ स्पष्ट करा.

४. समजा तुमच्या घरांतील माळ्यावर तुमच्या पणजोबापासूनचीं, नाहींतर त्यांच्याहि पणजोबापासूनचीं खूप जुनीं दप्तरें आहेत, व संदुका आहेत. कांहींत पोथ्या, कांहींत पत्रें भरलीं आहेत. तुमच्या वडिलांच्या मनांत 'कशाला हवी ही अडगळ' असें येऊन तीं ते जाळून टाकायला निघाले तर तुम्हीं त्यांना मदत कराल कीं नाहीं? कां कराल? किंवा कां करणार नाहीं? हीं कारणें संवादरूपानें द्या.

५. आख्यायिका म्हणजे काय? आख्यायिका व दंतकथा यांत फरक कोणता? तुम्हीं ऐकलेली एखादी आख्यायिका लिहून काढा.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९

गोदागौरव

(चाल०–'दों दिवसांची तनु' इ० फटक्याची)



तुज हृदयंगम रवें विहंगम—भाट सकाळीं आळविती,
तरु तीरींचे तुजवरि वल्ली पल्लवचामर चाळविती;
तुझ्या प्रवाहीं कुंकुम वाही बालरवी जणु अरुणकरीं,
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी. १
अवयव थिजले, शरीर भिजलें, उठले रोम तृणांकुरसे,
सद्गद कंठीं बुद्बुद करितें वचन घटोन्मुख नीर जसें;
अधर थरारे, अश्रुमलिनमुख हो मतिसंकट मदन्तरीं,
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी. २
मधुमासामधिं मधुर हवा ती, स्पर्श मधुर तव मधुर चवी,
सायंप्रातः सेवियली ती साखर वानिल केविं कवी ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किती कितीदां तरि तरंग तुझिये अवलोकियले म्यां नवलें!
अभिनव तनुला जलकुंभ्यासम तवावगाहन मानवलें. ३

अस्तोन्मुख रवि कुंकुम, केशर, चंदन वाहुनियां तुजला,
वसंतपूजा करितां तूझी तासावरुनि दिसे मजला;
करिती झुळझुळ विंझणवारे या समयीं तुज त्या झुळकी,
संध्या करितां रमवि तुझें हें दर्शन देवि! सुमंजुळ कीं! ४

गंगे! येतां ग्रीष्म दिनान्तीं पवनहि तव जलकेलि करी,
जे रवितेजो-ग्रहणें करपति, ते कर चंद्र तुझ्यांत धरी;
मासे तळपति, तरंग झळकति, तुषार चमकति, जेविं हिरे!
या समयाला रूप तुझें हें दिसतें रम्य किती गहिरें! ५

लंघुनि तट जें प्रावृट्कालीं सैरावैरा धांवतसे,
तवौदार्य तें असीम होउनि सलील वाहे सलिल नसे;
तल्लीलेमधिं तल्लीन न हो कल्लोलिनि! कवि कवण तरी?
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरी. ६

वरि घन वरसति धो धो, इकडे महापुराच्या घनगजरीं
"कृष्ण कृष्ण" "जन, झन् चक् झन् चक्" टाळ, मृदंगहि दंग करी
अभंग–गंगा जणु शतधा ही वाहुनि मिसळे त्वदंतरीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे! भवताप हरी. ७

परिसर जलमय, वनकुसुमांनीं झांकुनि जाती कुंप वया,
उभय तटींचीं हिरवीं, चित्रित, शेतें डोलति ज्या समया,
नव तृण धान्यें सुमनें, सुफलें, सुचविति चंगळ हीं अगदीं!
गंगथडीचें रंगुनि राहे मंगलरूपचि भाद्रपदीं. ८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सायंकालीं स्फटिकविमल तव गंगे ! जल नहि वानवतें
या समयाला सुधाकराचें वैभव त्यांतुनि कालवतें;
नयनमनोरम तरंगतांडव रसरूपी शिव करुनि हंसे,
स्वर्गंगेचें प्रतिबिंबचि जणु गंगा होउनि हें विलसे. ९

हिमऋतुमाजीं प्रभातकालीं बाष्प तवौघावर तरतें,
सकरुण वरुणें शाल धवल ते भासे घातली तुजवरते;
जणु म्हणुनिच जें सुखोष्ण लागे गे ! मज घे घे त्या उदरीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी. १०

शिशिरामाजीं गांगहि शिशिरचि, करी हिमाची बरोबरी,
ताप दुजे हिम हरितें परि तें भवतापातें काय करी ?
तया गदावरि गदा बसे ह्या—ह्या अगदाची निरंतरीं.
जय् संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे ! भवताप हरी. ११

चंद्रशेखर

परिचय

राजकवि **चंद्रशेखर** हे मूळचे नाशिकचे. गोदास्नान व गोदापान करण्यांत त्यांचें लहानपण गेलें. **गोदेच्या** सहवासांतले त्या वेळचे अनुभव प्रेमानें आठवून कवीनें हें सुंदर काव्य रचिलें आहे. जीं माणसें नदीकांठीं राहतात त्यांना त्या नदीविषयीं इतका जिव्हाळा वाटत असतो कीं ती नदी जणूं काय चालतें बोलतें माणूस आहे अशा रीतीनें तिच्याविषयीं तीं बोलतात. या कवितेंत असाच जिव्हाळा तुम्हांला आढळेल.

चंद्रशेखरांची भाषा सुसंस्कृत, अलंकारिक व प्रासादिक असते; त्यांच्या वाणीचा ओघ अप्रतिहत असतो; सुंदर वर्णनें करण्यांत त्यांचा हातखंडा आहे; सुंदर अनुप्रास साधण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे.

पहिल्या श्लोकांत गोदाकांठच्या प्रातःकाळचें वर्णन आहे. दुसऱ्यांत गोदेस पाहून होणारी भाविक मनाची स्थिति वर्णिली आहे. यापुढील श्लोकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत व शिशिर या ऋतूंतील गोदावैभव क्रमानें वर्णिलें आहे. मूळ काव्यांतील निवडक श्लोक येथें घेतले आहेत.

या कवितेंत अनुप्रास खचून भरले आहेत. उदाहरणें: **हृदयंगम, विहंगम; वल्ली, पल्लव; प्रवाही, वाही;** उत्तम उदाहरण—'तल्लीलेमधि' ही सबंध ओळ. असे अनुप्रास शोधा व अनुप्रास म्हणजे काय तें सांगा.

नवीन शब्दांचे अर्थ

१ मतिसंकर=मनाचा घोटाळा; २ मधुमास = वैशाख महिना; ३ जलकुंभा= पाणवुब्या किंवा खंब्या नांवाचा पक्षी; ४ तास = पाण्यासरपट दगडी पूल; ५ विंझण = पंखा; ६ कल्लोलिनी = खळखळ आवाज करणारी नदी; ७ परिसर = भोवतालचा प्रदेश; ८ कुंप=कुंपण; ९ नयनमनोरम तरंगतांडव०=किती दांडगी कल्पना आहे! नदींचे तरंग हें जणूं काय शंकराचें तांडवनृत्य. पाय तांडवनृत्य करीत असतां वरून शंकराचें तोंड चंद्राच्या रूपानें (रस = चंद्र) हांसत आहे. १० दहाव्या श्लोकांत कवीच्या प्रतिभेचा असामान्य विलास दृष्टीस पडतो. मौज पाहा; वरुण हा जलदेव—नदीचा बाप. तो आपल्या मुलीच्या अंगावर प्रेमानें धुक्याची धवल शाल घालितो. गोदा ही कवीची माता. थंडीच्या दिवसांत ती उबदार पांघरूण घेऊन निजलेली पाहातांच कवि, 'आई ग! घे मला तुझ्या पांघरुणांत!" म्हणून विनवितो! एकावर एक कल्पनांचा नुसता मनोरा बांधला आहे. ११ गांग = गंगेचें (जल); गोदेला गंगा म्हणतात. वसंतपूजा व वसंतोत्सव म्हणजे काय? गद = रोग; अगद = औषध.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०

दोन ग्रहणें

सूर्यग्रहण होतें त्या दिवशीं. आठाला वेध लागून दुपारीं दोनला सुटणार होतें. त्यादिवशीं मोठ्या पहांटे उठून देवपूजा वगैरे आटोपून आम्हां सर्वांना खायला करून घातलें होतें.

तो दिवस कांहीं वेगळाच वाटत होता. जेवणाची वेळ झाली होती तरी घरोघरीं स्वयंपाकघरांत अगदीं सामसूम होतें. आमची खेड्यांतील शाळा—तिला सुटी ही असायचीच त्या दिवशीं. अंगणांत पोरांनीं नुसता धुडगुस चालविला होता अगदीं. कार्डबोर्डावर भोंक पाडून त्यांतून सूर्याचा कवडसा जमिनीवर पाड, नाहींतर काळ्या बाटलीची कांच सांपडली तर पाहा! ती नच सांपडली तर पांढऱ्या कांचेवर काजळी धरून त्यांतून सूर्याकडे पाहाण्याचा प्रयत्न कर.

"अरे बाबा, त्या दिव्याचीच कांच चांगली."

"बोर्ड जरा नीट धरशील का?" अस्सें सारखें चाललें होतें मुलांचें.

ओटीवरच बसलें होतें मी. नाताळाच्या सुटींत मी माझ्या भावंडांना घेऊन जरी आजोळीं आलें होतें, तरी त्यावर्षी मला मॅट्रिकला बसायचें होतें. मी ओटीवर बसून अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत होतें—पण मला कांहीं अभ्यास सुचूं देत नव्हतीं तीं मुलें! चिडलें, चिडलें व पुस्तकाकडे मन लावण्याचा प्रयत्न करीत होतें! इतक्यांत—

इतक्यांत चार वर्षांची छोटी सुली 'ताऽऽई....' करीत धांवत आली न् माझ्या पायाला आपल्या चिमकुल्या हाताचा घट्ट विळखा देऊन उभी राहिली. आधींच चिडलेली—'चल्' म्हणून दूर ढकललं तिला मी!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'ताई मला खायला—' त्यावेळीं ज़ेवायचें नव्हतें इतकें ठाऊक होतें तिला. सकाळीं साताला अवेळीं पोटांत गेलेलें अन्न, सारखें हुंदडण्यानें केव्हांच पचून गेलें होतें.

'मला नाहीं ठाऊक—आजीला विचार जा.' मी एकदम खेंकसलें.

ती तशीच आंत गेली. ग्रहण लागल्याची आंघोळ करून आजी देवापुढें डोळे मिटून जप करीत होती—

'आजी ग, मला भूक—खायला' पुष्कळ कटकट लावली सुद्रनें! जप करतांना मध्येंच आजी कशी बोलणार? मानेनें खुणा करून तिनें सुद्रला माझ्याकडे जायला सांगितलें.

'देऽऽना खायला मला—ताई!' सुद्र बाहेर येऊन मला म्हणाली.

'मी नाहीं जा! आजी रागावेल....इथं कशाला कटकट उगीच?' तिथूनहि हांकून लावलं मी तिला!....पुन्हां वाटतं ती आजीकडे गेली—तरीहि कांहीं चाललं नाहीं तिचं....

कांहीं वेळ गेला....चाहूल कशी नाहीं पोरीची! बाहेर कशी नाहीं आली अजून? मी हातांतलं पुस्तक तसंच धरून झटकन् आंत गेलें....

बाहेर राहू सूर्याला ग्रासत चालला होता—अंधुकता वाढत होती सारखी!

कौलारू बैठं घर आणि त्यांतीलहि ती सामानाची अडगळीची खोली. उजेड ओझरताच होता आणि त्यांत मध्यभागीं सुद्रची ती खालीं बघत असलेली, दोन्ही हात दोन मांड्यांवर ठेवून, मांडी घालून बसलेली तिची ती इवलीशी मूर्ति—मला जरा नाविन्यच वाटलें, मी तिथेंच थबकलें. मुळींच हालचाल नव्हती तिची! खपाटीला गेलेल्या पोटावरून चड्डी खालीं घसरली होती, भुकेनें डोळेसुद्धां ओढलेले दिसत होते—व त्याच तेजो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीन डोळ्यांनीं ती आलटून पालटून जमिनीकडे व माझ्याकडे पहात होती.

कुणास ठाऊक कां तें; पण आमच्या त्या अंधाऱ्या अडगळीच्या खोलींत, त्या चंद्रमौळी घरांत सुद्धचा चिमुकला निस्तेज वदनचंद्र पाहून ग्रहण लागलेल्या चंद्राची मला आठवण झाली व पोटांत तोडायला लागलं! बाहेर सूर्यग्रहण आणि घरांत हें हृदयाला पाझर फोडणारं चिमुकलं चंद्र-ग्रहण! पोटाचा प्रश्न, नव्हे भुकेचा प्रश्न, जणुं मोठ्या गहन विषयावर विचार चालले होते पोरीचे. बाहेर 'दे दान छुटे गिराऽऽण' चाललं होतं आणि जो तो आपापल्या परीनं सूर्याचं ग्रहण लवकरच सुटण्याचा प्रयत्न करीत होता–पण माझ्या लाडक्या सुद्धच्या इवल्याशा मुखचंद्राला भुकेमुळं लागलेलं ग्रहण–मला नसतं कां तें सोडवितां आलं? माझ्या या चिमुकल्या जीवाचा निस्तेज मुखचंद्र सतेज करणें खरेंच का शक्य नव्हतें–त्यासाठीं आकाशांतला सूर्य कांहीं वेळ राहूच्या त्रासांत असला तरी मी त्याची खरंच कां पर्वा करावी?

मला काय वाटलें कोण जाणे–मी तश्शीच आंत गेलें–हळूच, आवाज न करतां दुभत्याच्या कपाटांतून दुधाचें भांडें बाहेर काढलें—

सुद्धला जवळ घेतलें–तिच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविला आणि 'हें बघ सुले, आजीला यांतलं कांहीं सांगायचं नाहीं बरं का–अजून ग्रहण सुटायचं आहे.' ग्रहणांत पाणीसुद्धां तोंडांत घ्यायचें नाहीं हें आजीनें बजावलेलें 'शास्त्र' तिला चांगलें ठाऊक होतें—

मी दुधाचा अर्धाच कप तिच्या तोंडाला लावला—किती घुटकन् प्याली ती तें! आणि फुलपांखरासारखी उडत जाऊन पोरांच्या खिदळण्यांत पुन्हां सांमीलहि झाली लबाड पोर!—पोरीचें हंसरें आणि सतेज तोंड पाहून खग्रास ग्रहणांतून मुक्त झालेल्या शांत व शीतल चंद्राची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आठवण झाली मला. डोळ्यांतून ओघळलेले आनंदाश्रु पदरानें टिपून मी पुन्हां बाहेर येऊन अभ्यास करूं लागलें.

कु० वेणू गवाणकर

परिचय

गोष्ट कांहीं मोठीशी नाहीं, गोष्ट नाहींच ती. एका लहानशा प्रसंगाचें हें एक सुंदर चित्र आहे. भाषा थोडीबहुत विस्कळित असली तरी छानदार आहे. 'सूर्यग्रहण होतं त्या दिवशीं' कोणत्या दिवशीं हें आधीं सांगितलें नाहीं व वाक्यरचनेच्या दृष्टीनें 'त्या दिवशीं सूर्यग्रहण होतें,' असें लिहिलें नाहीं; यांत काय हेतु असेल ?

अभ्यास

१. या शब्दचित्रांतील कोणत्या कल्पना तुम्हांला आवडतात ? २. वेध, अडगळीची खोली, चंद्रमौळी घर, दुभत्याचें कपाट यांचे अर्थ द्या. चंद्रमौळी या शब्दाची व्युत्पत्ति द्या.

११

कुणीं काय बांधिलें ?

(चाल० 'गोदागौरव' या कवितेप्रमाणेंच)

तेज पाहतां याचें दिपते होउनि जाते मूक गिरा,
कोहिनूर जणु ! अद्वितीय हा कला—किरीटांतील हिरा.
रवितापानें वितळेना जर हिममंदिर मी यास म्हणूं,
कर्पूराचें कसें ? गंध नच, न जाय उडुनी अणू अणू.
उदात्त जणु मंदारमंडपीं बघे स्वप्न मधु वास्तुकला,
कुराणवचनाक्षरी हार हा जिच्या गळां न पहा सुकला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्य कुणाचें असें रूप घे हृदयंगम संगमरवरी ?
शांति मनाला पावे येथें, मृत्युहि शोभा अमर वरी.
यमुनातीरीं कीर्तिकुंज हा बघतां साक्षात् काळ म्हणे,
“ धर्म नको मज माझा, नलगे यापुढती अथवा जगणें. ”
काय नवल जर आले सोडुनि यक्ष सौधमय निज नगरी
जीतें बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिका धौत करी ?
स्मारक धन्य ! प्रीति धन्य ही ! धन्यच राणी **मुम्ताज !**
चिरनिद्रेचें स्थान तिच्या हो मंदिरराज असा **ताज !**
यवनीप्रिय—कवि—रसगंगेचा पडे फिकाच इथें नखरा !
दिल्लीवल्लभ **शहाजहान्** ! तूं **जगन्नाथ** दयितेंद्र खरा !
भस्म चर्चुनी कृष्णमूर्ति हे कोण उभे जागोजागीं ?
बैरागी का सुकाळ्ले जे हिंदुस्थानीं हतभागी ?
गांभीर्याचे वा स्थैर्याचे पुतळे भव्य, सदैव खडे,
यांच्या डोळ्यासमोर झाले कितीक तख्तांचे तुकडे !
हतबल यांच्या पुढें जाहले सृष्टींतिल राक्षस सगळे—
गांठ पडे निःस्पृह शूराशीं तंव सत्वर बळि—गर्व गळे.
भुऱ्या काजळी जटांसंगतीं वायु करी खेळुनि दंगा,
भीति कुणाची त्याला जाचे नाचे जो जगभर नंगा ?
सह्यसुतांना सह्य सदोदित उष्णशीतवायूवृष्टी,
करी प्रतीक्षा कालाज्ञेची उदासीन मिटली दृष्टी.
कुणी यांजला प्रसन्न केलें महत्त्व यांचें ओळखुनी ?
शिरीं घातले किरीट नूतन, भग्न तरी दिसती अजुनी.
दुर्गस्तंभीं याच उभविला कुणी घुमट शिवराईचा ?
शिंग वाजतां ध्वनि दुमदुमला हिंदुपदाच्या द्वाहीचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे किती **गड** ज्यांवर आतां फडकेना झेंडा भगवा
हालवूनि जो हृदय मराठी म्हणे "स्वत्व मरुनी जगवा !"
त्यांत रायगड, राय गडांचा, राज्यारोहण तेथ घडे,
स्वामिनिष्ठ शिवरक्षारक्षक ! आज अ-नाथ कडेस पडे.
धन्य महत्त्वाकांक्षा, धर्मप्रीति, राज्यकारण नव तें !
धन्य शिवाजी राष्ट्रब्रह्मा ! चरित्र उद्बोधक तव तें !
स्थळें शोधुनी निसर्गसुंदर रम्य मंदिरें, घाट कुणी
वा पडशाळा बांधुनि केले येते जाते लोक ऋणी ?
पुनरुद्धारें नवीं पाहतां किती मंदिरें, भग्न जुनीं
धन्यवाद आसेतुहिमाचल मिळती कोणाला अजुनी ?
अन्नछत्रही विद्याभिक्षुक, यात्रिक यांस्तव करुनि सुरू
संसृतिचिंतेंतुनि सोडविले विद्याध्यापक धर्मगुरू ?
जिच्या व्यक्तिगत उत्पन्नांतुनि वाहे दानाची सरिता
ती गंगाजल-निर्मल राणी कोण जिचा नच कोश रिता ?
भोगपराङ्मुख होय परि न घे कर्तव्याचा संन्यास,
निदिध्यास घे सदा शिवाचा—योग कठिण हा अन्यास.
राजयोग जनकाचा नाहीं भाकड गोष्ट पुराणींची
रहस्य दावी इतिहासींची कथा **अहल्याराणीची**.
कांचनगंगा वाहवूनि जी उभवि यशाचा धवलगिरी
होळकरकुलप्रभा, कोण हो तत्स्मृतिला न धरील शिरीं ?
प्रेक्षणीय हे हौद पर्वतीवरि कुणी गर्वें दाखविती.
आणि कशाचे आणुनी चित्तीं भोजनपर्वें आठविती
पक्वान्नांचे म्हणतां येई अजुनिहि तद्गंध त्वरित—
या दुष्काळीं महाभोजनस्मरणहि होई रसभरित !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थू थू त्याच्या राजवटीवर ज्याचें स्मारक हेंच असे !
बघुनि मराठी हृदय भग्न हो, उपहासें जग बघुनि हंसे.
लाडुबहादुर, कामांधातुर, वाक्चतुर परी जो बाजी
भेकड पाजी, महाल–गाजी, करी पुण्याची शोभा जी !
कुणीं काय बांधिलें पाहतां दिसतो क्रम इतिहासाचा,
अंध सदा नर, अमार्ग दिसला स्पष्ट जरी किति ऱ्हासाचा !

माधव जूलियन

परिचय

माधव जूलियन या अर्वाचीन कवीनें पंचचामर या वृत्तांत चंद्रशेखर कवींच्या 'गोदागौरव' या काव्यांतील भाषापद्धतीच्या धाटणीवर ही सुंदर कविता लिहिली आहे. या जगांत जन्मून कोणीं काय बांधलें? 'दिल्लीवल्लभ' 'दयितेंद्र' शहाजहाननें प्रेमासाठीं **ताज-महाल** बांधला व लोक अजून त्याच्याकडे टकमक पाहात आहेत. 'राष्ट्रब्रह्म' **शिवप्रभूनें हिंदुपदाच्या** द्वाहीचा ध्वनि दुमदुमविण्यास सह्याद्रीवर **राय-गडासारखे किल्ले** बांधले व जतन केले. अजूनहि हे किल्ले मराठी हृदय हालवून त्याला म्हणतात "मरा पण स्वत्व जगवा, टिकवा." होळकरकुलप्रभा **अहल्याराणीनें** 'विद्याभिक्षुक' 'यात्रिक' यांच्यासाठीं–**धर्मासाठीं** रम्य **'मंदिर' 'घाट' 'पडशाळा' 'अन्नछत्रें'** बांधलीं व अजूनहि सर्व लोक तिच्या स्मृतीला 'शिरीं' धरितात. पण 'महाल–गाजी, भेकड, पाजी, वाक्चतुर, लाडुबहादुर,' दुसऱ्या **बाजीरावानें** काय बांधिलें? पर्वतीच्या टेकडीवरील **ब्राह्मणभोजनासाठीं पक्वान्नांचे हौद !!** अजूनहि मराठी हृदय ते हौद पाहून भग्न होतें, माना लाजेनें खालीं लवतात व जग उपहासानें हंसतें.

कवि माधव जूलियन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

सांगा बरें कोणीं काय कशासाठीं बांधिलें ? जगानें प्रत्येकाच्या कृतीकडे कसें पाहिलें ?

गिरा = वाणी; कलाकिरीट = ललितकलारूपी मुगुट, त्यांतील **ताज** हा कोहिनूर आहे.

वास्तुकलेचें मधु-स्वप्न = वास्तुकला म्हणजे इमारती बांधण्याची कला हीच कोणी देवी; तिनें अनुभविलेलें ताजमहाल हें एक गोड स्वप्न आहे.

" मृत्युहि शोभा अमर वरी " किती सुंदर कल्पना ! वास्तविक ताजमहाल म्हणजे मुम्ताजराणीचें थडगें, मृत्यूचें चिन्ह. पण तें इतकें सुंदर आहे कीं **मृत्यूनें** जणूं काय **अमर** अशी शोभा–सौंदर्य–येथें धारण केलें आहे असें वाटतें.

बाह्योद्यानस्थितहरशिरश्चंद्रिका = बागेच्या बाहेर असलेल्या देवालयांतील शंकराच्या डोक्यावरील चंद्रकोर.

" यवनीप्रिय कवि " = जगन्नाथराय नांवाचे अकबराच्या मर्जीतले संस्कृत कवि. अकबरानें अर्पण केलेली एक मुसलमान तरुणी त्यांची वल्लभा होती. जगन्नाथरायांनीं " गंगा–लहरी " हें नामांकित काव्य लिहिलें. कवि म्हणतो, ताजमहालाच्या सौंदर्यापुढें जगन्नाथरायांची रसगंगा म्हणजे काव्यप्रतिभा फिकी आहे !

" सह्यसुत ' = सह्याद्रीवरील किल्ले. केव्हां मरायचें या कालाज्ञेची वाट पहात दृष्टि मिटून ते पडले आहेत. ' मराठी हृदय ' खऱ्या मराठ्याचें हृदय. पडशाळा = थोडा वेळ ' पडण्या'साठीं (पाहुण्यासाठीं) बांधलेल्या इमारती (waiting rooms). विद्याभिक्षुक = विद्यार्थी. अहल्याबाईनें विद्यार्थ्यांसाठीं अन्नछत्रांची सोय करून शिक्षणाची काळजी दूर केली. ' राजवट ' = अमदानी; राज्यकारभार.

" कांचनगंगा " :वाहवून राणीनें यशाचा " धवलगिरि " उभारला ही किती मजेदार कल्पना आहे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेवटच्या दोन ओळींत कवितेचें सार आलें आहे.

या काव्यांत मुख्यतः उत्प्रेक्षा व रूपक हे अलंकार आले आहेत. 'तुझे डोळे **जणूं काय** कमळें आहेत' ही उत्प्रेक्षा. 'तुझे डोळे कमळेंच आहेत' किंवा 'हीं तुझीं सुंदर कमळें पाहा' हें रूपक. आतां या काव्यांतून वरील अलंकार शोधा.

ही कविता व केशवसुतांच्या **'दोन बाजी'** आणि **'मयूरसिंहासन आणि ताजमहाल'** या कवितांची तुलना करा.

१२

मुंबई येथील जहाजें बांधणारें एक प्रख्यात पारशी घराणें

हिंदुस्थानामध्यें फार प्राचीन कालापासून नौकानयनविद्या आणि नौकाशिल्पशास्त्र ह्यांची माहिती एतद्देशीय लोकांस फार चांगल्या प्रकारची असून, त्या विद्येमध्यें ते अतिशय निष्णात होते, हें प्राचीन संस्कृत ग्रंथ, पुरातन लेणीं इत्यादिकांवरून सुप्रसिद्धच आहे. नौकानयनाचा प्राचीन इतिहास उपलब्ध नसल्यामुळें ही कला हिंदुस्थानामध्यें किती उन्नत दशेप्रत पोंचली होती, हें स्पष्ट रीतीनें समजण्यास मार्ग नव्हता. अलीकडे बंगाल्यांतील एक प्रसिद्ध विद्वान संशोधक प्रो. राधाकुमुद मुकर्जी यांनीं 'हिंदुस्थानांतील नौकाशास्त्राचा इतिहास' नांवाचा एक सुंदर ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

द. ब. पारसनीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्यामध्यें त्यांनीं नौकानयनाचा प्राचीन इतिहास उत्कृष्ट रीतीनें देऊन, भारतवर्षीय लोकांनीं एके काळीं त्यामध्यें किती प्राविण्य मिळविलें होतें, तें साधार कथन केलें आहे. त्यावरून हिंदुस्थानांतील लोक नौकानयनशास्त्रामध्यें फार पारंगत असून त्यांनीं ही कला एके वेळीं पूर्णतेस आणिली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें पर्यालोचन केलें, तर नौकानयनविद्या हिंदुस्थानांत एके काळीं किती उच्चतेस पोंचली होती हें चांगलें दिसून येतें. सांची, अजंठा, वेरूळ, वगैरे ठिकाणच्या कोरींव लेण्यांमध्यें जहाजांचीं व नौकांचीं निरनिराळीं चित्रें आढळून येतात. त्यांवरून प्राचीन काळीं भिन्नभिन्न नौका अस्तित्वांत होत्या ह्याची साक्ष पटते. मुसलमानी अमदानीचा विचार केला, तर त्यावेळींहि जहाजें व आरमार ह्यांची विशेष सुधारणा झाली होती, असें आढळून येतें. अकबर बादशहाचे कारकीर्दींत अबुल फजल ह्या इतिहासकारानें 'ऐनेअकबरी' नामक जो ग्रंथ लिहिला आहे, त्यामध्यें आरमारखातें म्हणून एक स्वतंत्र खात्याचा त्यानें उल्लेख केला असून, त्याच्या कायदेकानूंचें सविस्तर वर्णन दिलें आहे. ह्या खात्याचा जो मुख्य कामगार असे, त्यास 'मीर बेहरी' अशी संज्ञा असे. औरंगजेब बादशहाचे कारकीर्दींत स्वतंत्र बादशाही आरमार संस्थापित होऊन, सुरत हें त्याचें मुख्य ठिकाण बनलें होतें; आणि जंजिऱ्याचे शिद्दी ह्यांजकडे त्या आरमाराचें मुख्य आधिपत्य होतें. औरंगजेबाच्या कारकीर्दींत महाराष्ट्रराज्यसंस्थापक श्रीछत्रपति शिवाजी महाराज निर्माण झाले. त्यांनीं लढाऊ जहाजें तयार करून व समुद्रकिनाऱ्यावर विजयदुर्ग, कुलाबा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल, इत्यादि ठिकाणीं गोद्या तयार करून, स्वतंत्र आरमार स्थापन केलें. शिवाजीच्या आरमाराचे अधिपति दर्यासारंग व मायनाक भंडारी हे दोन प्रसिद्धच आहेत. शाहूचे कारकीर्दींत कान्होजी आंग्रे हा मराठ्यांच्या आर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माराचा मुख्य सेनापति असून, त्यानें नवीन जहाजें बांधून व उत्तम दर्यावर्दी फौजेचा संग्रह करून, पश्चिम किनाऱ्याचें चांगलें संरक्षण केलें. तो एके वेळीं इंग्रजी आरमारासहि भारी झाला होता, व त्याचें पारिपत्य करण्यासाठीं मुंबईकर इंग्रजांस पुष्कळ प्रयत्न करावा लागला. इ. स. १७५५ मध्यें आंग्र्यांची सत्ता रसातळास पोंचली; तथापि मराठ्यांच्या आरमाराचें बळ कमी झालें नाहीं. बाळाजी बाजीराव पेशव्याचे कारकीर्दींत आरमारी विद्येमध्यें धुळपांचें घराणें उदय पावून, त्यानें समुद्रयुद्धामध्यें आपलें कौशल्य आणि पराक्रमतेज चांगलेंच प्रकाशित केलें. ह्या घराण्यानें विजयदुर्ग हें आपलें आरमाराचें मुख्य ठिकाण करून तेथें जहाजें बांधण्याचा जंगी कारखाना स्थापिला होता. आनंदराव धुळप व त्यांचे बंधु हरबाजीराव धुळप हे पेशव्यांच्या आरमाराचे मुख्य सेनापति असून, त्यांचें शौर्य व त्यांचे पराक्रम मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत.

ह्या वर दिलेल्या संक्षिप्त माहितीवरून, हिंदुस्थानामध्यें नौकाशास्त्र फार प्राचीन कालापासून अस्तित्वांत असून, त्याची भरभराट अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत होती, असें निःसंशय दिसून येईल. अर्थात् नौकाशास्त्राची माहिती एतद्देशीय लोकांस पूर्णपणें असल्यामुळें नौकाबंधनकला म्हणजे जहाजें बांधण्याची कला त्यांस पूर्ण अवगत होती, हें निराळें सांगावयास नकोच. मराठ्यांचीं पाल, गुराबा वगैरे लढाऊ जहाजें, गलबत, तरांडीं वगैरे व्यापारी जहाजें; हीं सर्व येथेंच बांधण्यांत येत असून, त्यांचें काम फार खंबीर व टिकाऊ असें केलें जात असे. एवढेंच नव्हे तर तें सशास्त्र व प्रमाणशुद्ध असून, तें पाश्चात्य लोकांनींहि वाखाणण्यासारखें होत असे. म्हणून इंग्रज लोक देखील आपलीं जहाजें हिंदुस्थानांत बांधविण्याचा एके काळीं प्रयत्न करीत असत असें दिसून येतें. हें वाचून कित्येक लोकांस फार अचंबा वाटेल. ह्या जहाजें बांधण्याच्या कलेची व ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बांधणाराची माहिती फार मनोरंजक व महत्त्वाची आहे. परंतु ती अप्रसिद्ध व अविश्रुत असल्यामुळें, हिंदुस्थानांत जहाजें बांधण्याची कला इतक्या परिपूर्णतेस पोंचली होती, हें सकृद्दर्शनीं कोणासहि खरें वाटणार नाहीं.

मुंबई येथें अठराव्या शतकाच्या प्रारंभीं, मुंबई बंदरांत व्यापाराकरितां येणारीं चांगलीं जहाजें पुष्कळ आढळून येत असत. परंतु हीं सर्व जहाजें मुंबई येथें बांधलेलीं नसून तीं मुख्यतः सुरत बंदरामध्यें बांधलीं जात असत. ह्या वेळीं सुरत बंदर फार प्रसिद्ध असून, तेथें जहाजें बांधण्याचा कारखाना मोठ्या भरभराटींत चालत असे.

इ. स. १७३५ चे पूर्वीं मुंबई येथें चांगलीशी गोदी बांधण्यांत आलेली नसून, मुंबईच्या इंग्रज लोकांस तेथील एतद्देशीय व्यापाऱ्यांस लागणारीं जहाजें सुरत येथूनच तयार करून आणलीं जात असत. या वेळीं सुरत येथील जहाजें बांधण्याचा कारखाना, एकट्या मुंबई इलाख्यांतच नव्हे, परंतु सर्व हिंदुस्थानामध्यें प्रसिद्ध असे. आणि तेथें तयार झालेलीं जहाजें दूरदूरच्या देशास जात असत. त्यामुळें मुंबईकर इंग्रज लोकांसहि सुरत येथेंच नवीन जहाजें बांधविणें अधिक सोईचें वाटत असे. इ. स. १७३५ चे सुमारास मुंबईच्या इंग्रज गव्हर्नरानें, सुरत येथें मि. डडूले ह्या नांवाचा आपला एक इसम 'क्वीन' नांवाचें एक आरमारी जहाज बांधण्यासाठीं पाठविला होता. त्यानें, सुरत येथील मुख्य जहाजें बांधणारे कारखानदार, धनजीभाई नांवाचे एक पारशी गृहस्थ होते, त्यांच्याकडून हें जहाज तयार करून घेतलें. तें इतकें उत्कृष्ट झालें कीं, तें पाहून मि. डडूले हे अत्यंत संतुष्ट झाले, व त्यांनीं धनजी-भाईंच्या कारखान्यांतील मुख्य कारागीर लौजी नसरवानजी ह्यांस मुंबईस आणण्याचा प्रयत्न चालविला. ह्या वेळीं मुंबई येथें जहाजें बांधण्याचा कारखाना सुरू करावा, अशी मुंबईचे गव्हर्नराची विशेष इच्छा होती. परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डङ्ले ह्याच्या नुसत्या विनवणीनें लौजी नसरवानजी हा, सुरत येथील आपल्या मालकास सोडून मुंबईस आला नाहीं. तेव्हां मि. डङ्ले ह्यांनीं मुंबई सरकारास लिहून, त्यांच्याकडून सुरतेच्या कारखान्याचे मालक धनजी-भाई, ह्यांची मनधरणी करून, लौजीस मुंबईस पाठविण्याबद्दल परवानगी घेतली. नंतर लौजी आपल्या थोड्याशा साहित्यानिशीं मुंबईस येऊन दाखल झाला, व त्यानें मुंबईची जुनी गोदी (Dock-yard) होती तेथें आपला कारखाना सुरू केला. ह्या वेळीं तेथें लोकवस्ती थोडी असून समुद्रावरचे अधिकारी आणि खलाशी वगैरे राहत असत. लौजी ह्यानें ज्यावेळीं हा कार-खाना स्थापिला, त्यावेळीं त्यास सर्व प्रकारच्या अडचणी सोसाव्या लागल्या. त्या वेळीं मुंबई येथें सागाचें लांकूड बिलकूल मिळत नसे. तेव्हां त्यास, मुंबई सरकारच्या परवानगीनें, आसपासच्या गांवकरी लोकांशीं लांकडाचा व्यापार सुरू करावा लागला, व जंगलांतून चांगला माल पैदा करावा लागला. अशा रीतीनें व्यापारी लोकांकडून चांगलें लांकूड मिळविण्याची तजवीज झाल्यानंतर त्यानें लहान लहान मचवे तयार केले; आणि व्यापारा-करितां लौकरच मोठीं गलबतें तयार केलीं. अशा रीतीनें त्याचा कारखाना नांवारूपास येऊं लागतांच त्याजकडे सरकारी आरमारी जहाजांची दुरुस्ती करण्याचें काम येऊं लागलें, आणि तो थोड्या वेळांत फार प्रसिद्धीस आला.

इ. स. १७५४ मध्यें मुंबई बंदराची बरीच भरभराट झाल्यामुळें व तेथील जहाजांचे कारखान्यांस चांगलें उत्तेजन मिळाल्यामुळें, तेथील 'सुप-रिंटेंडंट ऑफ दी मरीन' ह्यांनीं मुंबई येथें एक बिनपाण्याची गोदी (Dry-Dock) स्थापन करण्याबद्दल सरकारास शिफारस केली. आणि लौजीच्या साहाय्यानें बारा हजार रुपयांमध्यें ती तयारहि केली. त्यामुळें लौजीच्या कारखान्यास विशेष महत्त्व येऊन, दूरदूरचे लोक आपलीं जहाजें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुरुस्त करण्यासाठीं मुंबईस पाठवूं लागले. अशा रीतीनें लौजीच्या अंगीकृत कार्यांत विशेष यश आल्यामुळें सरकारची त्यावर विशेष मेहरबानी जडली; आणि त्याचा कारखाना सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध झाला. अर्थात् हा धंदा चांगला किफायतशीर होऊन त्यांत लौजीचा लौकिकहि वाढल्यामुळें लौजीनें माणकजी व बम्मनजी ह्या नांवाच्या आपल्या दोन मुलांस याच धंद्यामध्यें घातलें; आणि त्यांना जहाजें बांधण्याची कला चांगल्या तऱ्हेनें अवगत करून दिली. त्यामुळें हे दोन्ही मुलगे त्यास साहाय्य करण्यास चांगले समर्थ होऊन लौजीचा कारखाना एकसारखा वाढत चालला. आणि त्यास असलेली जागा पुरेनाशी होऊन, दुसरी एक गोदी इ. स. १७६० मध्यें बांधण्याचा प्रसंग आला.

ह्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनीनें, मुंबईच्या गोदीचा लौजीच्या कारखान्यानें चांगला उपयोग केला आहे असें पाहून, त्यायोगानें मुंबईच्या व्यापाराची दिवसेंदिवस अभिवृद्धि होत असल्याचें लक्षांत घेऊन, मोठ्या आनंदानें नवी गोदी बांधण्याबद्दल परवानगी दिली. ह्या वेळीं लौजीची आपल्या धंद्यांतील वाकबगारी आणि प्रामाणिकपणा हे गुण ईस्ट इंडिया कंपनीच्या विशेष नजरेस येऊन, त्यांनीं त्याची फार तारीफ केली आणि त्यास कांहीं पारितोषकहि दिलें.

मुंबई येथें दुसरी गोदी संस्थापित झाल्यानंतर तिचें महत्त्व इतकें वाढलें कीं, तेथें आणखी तिसरी गोदी बांधण्याबद्दल कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ह्यांनीं मंजुरी दिली आणि लौजी आणि त्याचे दोन मुलगे ह्यांच्या कर्तबगारीची फार तारीफ करून त्यांच्या पगारामध्यें बढती केली. अशा रीतीनें लवजीस ईस्ट इंडिया कंपनीचें चांगलें पाठबळ मिळाल्यामुळें त्यानें आपल्या घराण्यांतील तिसऱ्या पिढीसहि ह्याच धंद्यांत घातलें. इ. स. १७७१ मध्यें लौजीचे नातू फ्रामजी माणेकजी व जमशेटजी बम्मनजी हे लौजीच्या कार-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खान्यांत दरमहा बारा रुपये पगारावर सुताराचें काम करीत असत. ह्यावरून त्या कालीं वैभवसंपन्न झालेले लोक अल्पवयांमध्यें उद्योग आणि स्वावलंबन ह्यांचा धडा शिकण्याकरितां किती क्षुल्लक दर्जाचें काम करीत असत, त्याची चांगली साक्ष या उदाहरणावरून दिसून येते.

लौजी नसरवानजी हा ईस्ट इंडिया कंपनीची चाळीस वर्षें इमानें इतबारें सेवा करून, मृत्यु पावला. त्या वेळीं त्याजजवळ अवघी वीस हजार रुपयांची शिल्लक व एक घर इतकी इस्टेट होती. परंतु त्यानें आपल्या मुलांकरितां आपल्या अंगच्या कौशल्य, उद्योगशीलता आणि प्रामाणिकपणा इत्यादि उत्कृष्ट गुणांचा विपुल ठेवा जतन करून ठेवला होता तो त्यांस फार फलप्रद झाला. लौजी मृत्यु पावल्यानंतर त्याचा वडील मुलगा माणेकजी हा जहाजें बांधण्याचें मुख्य काम करूं लागला; व बम्मनजी त्याच्या हाताखालीं मदतनीस बनला. ह्या दोघांनीं आपल्या वडिलाप्रमाणेंच ह्या कारखान्याची भरभराट करून कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ह्यांच्याकडून वाहवा मिळविली.

दिवसेंदिवस मुंबई बंदर हें राजकीय महत्त्वाचें झाल्यामुळें, तेथें आरमाराचा पुष्कळ भाग राहूं लागला, आणि लढाऊ जहाजांचा दारूगोळाहि तेथें येऊन पडूं लागला. इ. स. १७७६ पासून इ. स. १७९० पर्यंत पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांचीं युद्धें चालू असल्यामुळें, त्यांच्या लढाऊ जहाजांची डागडुजी करणें व नवीन नवीन जहाजें तयार करणें हें फार जरूरीचें व महत्त्वाचें काम असे. तें माणेकजी व बम्मनजी ह्यांनीं इतकें उत्कृष्ट रीतीनें केलें कीं त्यावेळचे आरमाराधिपति सर एडवर्ड ह्यूजेस हे फार संतुष्ट झाले. ह्या दोघांनींहि आपल्या घराण्याची कीर्ति चांगल्या रीतीनें कायम ठेवून, मुंबई बंदरांतील जहाजांचा कारखाना आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या योगानें फार प्रसिद्धीस आणिला. ह्या कारखान्यांमध्यें त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीं जहाजें तयार केलीं, तीं फार मजबूत, डौलदार व सुंदर असून, युरोपखंडांतील कोणत्याहि बंदरांत तयार झालेल्या जहाजाशीं बरोबरी पावण्यासारखीं होतीं, असें त्या वेळच्या युरोपियन लेखकांनीं प्रांजलपणें कबूल केलें आहे.



मुंबईच्या गोदींत तयार केलेलें जहाज.

माणेकजी व बम्मनजी हे मृत्यु पावल्यानंतर, त्यांचे पुत्र फ्रामजी माणेकजी व जमशेटजी बम्मनजी हे मुंबई येथील जहाजें बांधण्याचें काम करूं लागले. त्यांत त्यांनीं आपलें कौशल्य इतकें व्यक्त केलें कीं, त्यांचें नांव त्यांच्या वाडवडिलांपेक्षांहि अधिक प्रसिद्धीस आलें. त्यांनीं पूर्वीं कधींहि बांधलीं गेलीं नाहींत अशीं प्रचंड जहाजें तयार केलीं, आणि बादशाही आरमाराचीं मोठमोठीं जहाजें वेळोवेळीं दुरुस्त करून दिलीं. त्यांच्या कारखान्यांत तयार झालेलीं जहाजें अतिशय मजबूत व प्रमाणशुद्ध असल्यामुळें इंग्लंडांतील आरमारखात्याच्या प्रधानमंडळानें तीं जहाजें अधिक पसंत केलीं; आणि मुंबई येथें बांधलेलें 'कार्नवालीस' नांवाचें पन्नास तोफांचें लढाऊ जहाज सर्वांत उत्तम आहे असें ठरवून, इंग्लंडांतील लढाऊ जहाजें मुंबई येथेंच बांधवावींत, असा, इ. स. १८०२ मध्यें निणय केला. त्यावेळीं प्रथमतः प्रधानमंडळाचे मनांत असें आलें कीं, जहाजें बांधण्याच्या कलेंत कुशल असा एक युरोपियन कारागीर मुंबई येथें पाठ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वावा व त्याच्या देखरेखीखालीं हीं जहाजें तयार करवावीं. परंतु बोर्ड ऑफ ॲडमिरल्टीचे एक सभासद, सर टॉमस ट्रौब्रिज, ह्यांनीं अशी हमी घेतली कीं, जमशेटजीच्या कारखान्यांत उत्तम लढाऊ जहाजें व व्यापारी गलबतें इतकीं उत्कृष्ट रीतीनें तयार होतात कीं, त्यास युरोपियन देखरेखीची किंवा मदतीची जरूर नाहीं. ह्या वेळीं इंग्लंडमध्यें ह्या प्रश्नाबद्दल बरीच चर्चा झाली, व शेवटीं असें ठरलें कीं, दोन लढाऊ जहाजें व एक गलबत मुंबई येथेंच तयार करवून घ्यावें. त्याप्रमाणें जमशेटजी यास हुकूम मिळाला. त्यानें तदन्वयें उत्तम प्रकारें काम करून दोन ३६।३६ तोफांचीं नमुनेदार आरमारी जहाजें व दुसरें एक ७४ तोफांचें लढाऊ गलबत हीं तयार केलीं. हीं जहाजें पाश्चात्य नौकाशास्त्रज्ञ लोकांस विशेष पसंत पडून, जमशेटजींच्या नौकाबंधनकौशल्याबद्दल फार तारीफ झाली; आणि त्यांचीं जहाजें हीं एतद्देशीय कलाकौशल्याचे उत्तम मासले होऊन राहिलीं. हीं जहाजें बांधण्याच्या संबंधांत, रियर–ॲडमिरल सर टॉमस ट्रौब्रिज ह्यांनीं जमशेटजी बमनजी यास जीं पत्रें पाठविलीं आहेत, तीं उपलब्ध झालीं आहेत. त्या पत्रांवरून जमशेटजीच्या नौकाबंधननैपुण्याबद्दल ह्या थोर अधिकाऱ्याचें किती उत्कृष्ट मत होतें व त्यावर त्याचा केवढा भरंवसा होता हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

अशा रीतीनें जमशेटजी बम्मनजी ह्याच्या कारखान्याची दिवसेंदिवस विशेष प्रशंसा होऊन, त्याची एकसारखी भरभराट होत चालली, व आरमार-खात्याचे मोठमोठे अधिकारी त्यावर अतिशय प्रसन्न झाले. त्याचप्रमाणें एतद्देशीय आणि परदेशी व्यापारी लोक ह्या कारखान्याचा विशेष उपयोग करून घेऊं लागले. अर्थात् अनेक जहाजें व गलबतें हीं मुंबई बंदरांत तयार होऊं लागल्यामुळें तेथील गोदीचा विस्तार झपाट्यानें होऊं लागला, व जहाजांच्या हालचालीचे नियम अमलांत आले. आणि लोकांच्या सोयी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां, धक्के (Pier) बांधण्यांत आले. अशा रीतीनें जमशेटजीच्या कारखान्याची व त्याबरोबर मुंबई बंदराची प्रसिद्धी विशेष झाली.

इ. स. १८०५ मध्यें मुंबई येथें आणखी नवीन दोन गोद्या तयार करण्यांत आल्या. त्यांचें काम कॅप्टन कौपर ह्यांच्या देखरेखीखालीं तडीस गेलें, म्हणून त्यांस 'कूपरसाहेबांच्या गोद्या' असें म्हणत असत. ह्या गोद्या तयार झाल्यानंतर तेथें जमशेटजी ह्यांनीं 'मिंडेन' ह्या नांवाचें ७४ तोफा ठेवण्यासारखें एक अतिशय उत्कृष्ट व नमुनेदार जहाज तयार केलें. त्याचें बांधकाम, त्याचा प्रमाणशुद्धपणा, त्याची बळकटी आणि त्याचा सुबकपणा इत्यादि गुण पाहून, तो एक आरमारी कलाकौशल्याचा मासला आहे, असें इंग्लंडांतील नामांकित नौकापरीक्षकांनीं ठरविलें, आणि ब्रिटिश राज्यामध्यें अशा प्रकारचें दुसरें एकहि जहाज तयार झालें नाहीं, असें प्रांजलपणें कबूल केलें. अर्थात् ह्या अप्रतिम कर्तबगारीबद्दल जमशेटजी ह्यांची कीर्ति युरोपखंडामध्यें अतिशय प्रसृत झाली; एवढेंच नव्हे तर सर्व इंग्रजी जहाजें मुंबई बंदरामध्यें बांधून घ्यावींत, अशी वाटाघाट तिकडे सुरू झाली. मि. जमशेटजी ह्यांनीं मुंबई येथें बांधलेल्या 'सालसेट' व 'मिंडेन' ह्या दोन जहाजांबद्दल, इंग्लंडमधील मोठमोठ्या दर्यावर्दी लोकांनीं आपले फार अनुकूल अभिप्राय व्यक्त केले.

ह्या जहाजांची कसोशीनें परीक्षा घेण्याकरितां आरमारखात्याच्या सेनापतींनीं कॅप्टन एस्. डब्ल्यू. होअर नामक एक नौकानयनकुशल गृहस्थाची योजना केली. त्यानें 'रसेल' जहाजापेक्षां 'मिंडेन' जहाज अनेक गुणांनीं श्रेष्ठ आहे, असें स्पष्टपणानें आपलें मत दिलें. ईस्ट इंडिया कंपनीस तें मत विशेष ग्राह्य वाटून त्यांनीं मुंबई येथील दर्यावर्दी खात्याचे सुपरिंटेंडेंट मि. मनी ह्यांजकडून अधिक खुलासेवार माहिती मागितली. त्यांनीं एक उत्कृष्ट रिपोर्ट सादर केला. ह्या रिपोर्टामध्यें त्यांनीं लौजीचा कारखाना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबईत आल्यापासून जहाजें बांधण्यास लागणाऱ्या सागाच्या लांकडाचा व्यापार अतिशय भरभराटीस आला, व त्याचें सर्व श्रेय लौजी व त्याचे वंशज यांजकडे आहे, असें कबूल केलें. आणि जहाजें बांधण्याच्या कामासंबंधानें असे उद्गार काढिले कीं, "जमशेटजी बम्मनजी ह्यांच्या अंगीं उत्तम जहाजें बांधण्यास लागणारें कौशल्य व सामर्थ्य पूर्णपणें वसत असून तें काम त्यांच्या हातून निःसंशयपणें सिद्धीस जाईल. त्यास लागणारी सर्व सामुग्री त्यांस अनुकूल असून त्यांच्या हाताखालीं काम करण्यास त्यांचा मुलगा नवरोजी व दुसरे एक हजार कारागीर तत्पर आहेत."

ह्यावरून इ. स. १८११ पर्यंत तरी लौजी व त्यांचे वंशज ह्यांचा जहाजें बांधण्याचा कारखाना उत्तम स्थितिप्रत पोंचला होता ह्यांत शंका नाहीं. इ. स. १८१६ मध्यें एक हजार टनांचीं नऊ जहाजें, ८०० टनांचीं पांच, ७०० टनांचीं व ६०० टनांचीं पांच व त्याशिवाय ३५ लहान होड्या बांधण्यांत आल्या होत्या. ह्यावरून हा कारखाना बरेच दिवस भरभराटींत होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इ. स. १८२९ मध्यें मुंबई येथें 'ह्यू लिंडसे' ह्या नांवाची पहिली स्टीमर बांधण्यांत आली. त्यानंतर आगबोटीचें प्रस्थ विशेष माजून, मुंबईचा जहाजें बांधण्याचा कारखाना हळूहळू खालावत चालला, आणि आजमितीस त्याचें नांव देखील, अस्तित्वांत राहिलें नाहीं !

ह्या अल्प माहितीवरून हिंदुस्थानामध्यें जहाजें बांधण्याची कला, प्राचीन काळींच नव्हे, तर अर्वाचीन काळीं देखील, किती अत्युच्च स्थितीस पोंचली होती, तें चांगलें दिसून येतें.

द. ब. पारसनीस

परिचय

नौकानयनाबद्दल आपल्याला कांहीं माहिती नसते; इंग्रजी पुस्तकें वाचतांना त्यांत आलेलीं नाना प्रकारच्या जहाजांचीं व जहाजांच्या निर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निराळ्या भागांचीं नांवें, वाऱ्यांचीं नांवें, आरमारी अधिकाऱ्यांचीं नांवें, इत्यादि वाचलीं म्हणजे आपण पटकन् म्हणतों, "काय बुवा, आमच्या मराठी भाषेंत हें कांहींच नाहीं." पण आपण चुकतों. कोंकणांत सुट्टींत जा; गाबित, भंडारी, गावडे या लोकांत मिसळा, त्यांच्या होड्यांतून खाड्यांमधून फिरा, त्यांना बोलायला लावा म्हणजे आपली मराठी भाषा नाविक परिभाषेच्या बाबतींत किती श्रीमंत आहे हें तुम्हांला समजेल. कोंकणची सफर मात्र करून या.

प्रस्तुत लेख प्रसिद्ध इतिहाससंशोधक द. ब. पारसनीस यांच्या 'इतिहास–संग्रह' या ७-८ वर्षें चालून बंद झालेल्या सुंदर मासिकांतून घेतलेला आहे. असे लेख त्या मासिकांत कितीतरी आहेत. जुने अंक मिळवून वाचा व त्यांतील चित्रें जरूर पाहा.

अभ्यास

या लेखांतील जहाजें बांधणाऱ्या पारशी घराण्याला 'वहाणडिया' (वहाण = जहाज) म्हणजे जहाजें बांधणारा असें आडनांव पडलें. हेंच नांव आतां 'वाडिया' रूपानें मुंबईंत प्रचलित आहे.

१. नौकानयनविद्या = जहाजांतून सफरी करण्याची कला. नौकाशिल्पविद्या = जहाजें बांधण्याची कला. २. विनपाण्याची गोदी = जहाज आंत आणवून ज्या गोदींतलें पाणी समुद्रांत काढलें जातें व मग जहाजाची डागडुजी करितां येते अशी गोदी. ३. गोदी, धक्का म्हणजे काय? ४. या लेखांत लहानमोठ्या जहाजांचीं कोणतीं नांवें आलीं आहेत? आणखी नांवें मिळवा व त्या त्या प्रकारच्या जहाजांचीं चित्रें तयार करा. ५. निरनिराळ्या दिशांनीं वहाणाऱ्या वाऱ्यांचीं नांवें सांगा. ६. गलबतें व होड्या यांचीं शिडें, दोर, काठ्या यांचीं नांवें मिळवा ७. जुन्या मुंबईचे फोटो मिळवा. ८. या लेखाची भाषा जुन्या बालबोध वळणाची आहे. स्थितिप्रत, नामक, एतद्देशीय असे जुने शब्द व प्रचार निवडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३

वेड्यांचें इस्पितळ

आम्ही म्हणजे गुंड्याभाऊ व मी असे दोघे एका जिल्ह्याच्या ठिकाणीं कांहीं कारणानें गेलों असतां तेथें प्रेक्षणीय स्थळें पाहाण्याची आम्हांला इच्छा झाली. दुर्दैवानें वेड्यांच्या इस्पितळाशिवाय दुसरें कोणतेंहि पाहाण्या-जोगें ठिकाण त्या गांवांत नसल्यानें त्याच्या नांवाचा स्पष्ट उल्लेख मी करीत नाहीं. विनाकारण तेथल्या गांवकऱ्यांशीं तंटा उपस्थित करून मला काय करावयाचें आहे? या उन्मत्ताश्रमावरील अधिकारी ओळखीचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें पुरुषांचा आणि बायकांचा असे दोन्ही विभाग पाहाण्याची आम्हांस परवानगी मिळाली.

इस्पितळाच्या ऑफिसांत परवानगी मिळतांच आम्ही इस्पितळाच्या फाटकांत प्रवेश मिळविला. आंत शिरतांच कोट, विजार व वहाणा पेहरलेला, खांद्यावर स्वच्छ टॉवेल टाकलेला असा चाळिशी उलटलेला पारशी गृहस्थ आम्हांला सामोरा आला व हस्तांदोलन करून उद्गारला, "या गृहस्थ हो, डॉक्टरसाहेबांचे पुण्याचे दोन मित्र येणार अशी बातमी मला अगोदरच कळली होती. प्रेक्षकांना इस्पितळ दाखवायचं काम नेहमीं माझ्या-कडे असतं. तुम्ही वर्षा दोन वर्षांकरितां आलां नसून तत्काळ परत जाणार आहां असं तुमच्या चर्येवरून दिसतं!"



"इथलीं निरनिराळीं वेडं पाहून स्वतःला वेड नाहीं लागलं तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तात्काळ परत जाण्याची आशा. नाहींतर म्हणतील आतां इथेंच रहा म्हणून!" मी म्हणालों.

चिं. वि. जोशी

असें बोलतां बोलतां आम्हीं एका वाफ्याजवळ जाऊन पोंचलों. त्या ठिकाणीं इस्पितळांतील ठराविक पोषाख केलेला पण डोळ्यांस चष्मा असलेला एक मनुष्य हातांत सूक्ष्मदर्शक घेऊन पुनःपुन्हां जमिनीकडे पाहात होता. "गुड मॉर्निंग रेगोसाहेब!" आमच्या मार्गदर्शकानें त्यास म्हटलें.

"गुड मॉर्निंग पेस्तनजी!" रेगोनें प्रतिप्रणाम केला.

"आतां कसला प्रयोग चालला आहे?"

"प्रयोग कसला आपल्या नशिबाचा! या गांवच्या जमिनींत कांहीं-सुद्धां उगवत नाहीं. मीं धान्यं लावून पाहिलीं, फळझाडं लावून पाहिलीं, फुलझाडं लावून पाहिलीं, पण कांहींच उगवत नाहीं. काल संध्याकाळीं मी इथें फुलझाडाचं बीं लावलं होतं. कालपासून आतांपर्यंत बारा वेळ पाणी घातलं, दहा वेळ माती बदलली, पण अद्याप एकादा कोंब देखील कुठें उगवलेला दिसत नाहीं. माझी महत्त्वाकांक्षा अशी आहे कीं झाडावर कलम करून वाटेल ती वस्तु झाडापासून आपल्याला मिळाली पाहिजे." आपला हात जमिनीवर आपटून निश्चयानें रेगो म्हणाला.

गुंड्याभाऊनें विचारलें, "आगपेट्या, घड्याळें, सदऱ्यांच्या गुंड्या वगैरे पदार्थ झाडापासूनच मिळवायचे कीं काय?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यावर तो म्हणाला, "अलबत्, मी या ठिकाणीं नेमला जाण्याच्या अगोदर कलमबहादर होतों. (म्हणजे लेखक नव्हे हो.) झाडांचीं कलमें करण्यांत तरबेज होतों. आंब्याचं कलम निंबाच्या झाडावर आणि गुलाबाचं सोनचाफ्यावर लावून त्यांचीं कलमी झाडं करून प्रदर्शनांत मीं बक्षिसं मिळवलेलीं आहेत. पण सरकारची दृष्टि फार मर्यादित आहे. अमुक मर्यादेबाहेर मनुष्यानं शहाणपण दाखवूं नये असं त्याला वाटत असतं."

"त्याचा काय अनुभव तुम्हांला आला? तुम्हांला वाटतं तितकं सरकार अन्यायी नाहीं. फक्त योग्य मार्गानं त्याच्याकडे अभिगमन केलें पाहिजे." पेस्तनजी बोलूं लागला. तेव्हां रेगोनें मध्येंच म्हटलें; "झाली याची टकळी सुरू. आमच्या कलमबहादुरींत आम्ही असा विचार केला, फळझाडांवर फुलझाडाचं जर कलम होतं तर लाकडी फळांच्या झाडाचं कां होऊं नये? किंवा कागदी फुलवेलीचं कां होऊं नये? तेव्हां एका चिनी कारागिराकडून कागदाच्या वेली खरेदी करून त्यांचीं कलमें मीं जिवंत झाडावर केलीं, आणखी त्या वेली वाढायची वाट पाहूं लागलों. त्यानंतर कलमं जशीं झाडांना होतात तशीं जिवंत प्राण्यांना कां होऊं नयेत? असा विचार करून मीं आपल्या कुत्र्याची शेपटी कापून तिच्या खुंटाला मांजराची शेपटी कलम केली. हा प्रयोग मी घरच्या मुलांबाळांच्यावर करून पाहाणार होतों, इतक्यांत सरकारला सुगावा लागला! माझ्या बायकोनेंच निमकहरामी करून ओरँग ओटँगला बोलावलं—"

"हा रंग्या टांग्या कोण बुवा?" गुंड्याभाऊनें विचारलें.

पेस्तनजीनें घाबऱ्या घाबऱ्या चहूंकडे नजर फेंकली आणि सांगितलें कीं इस्पितळाच्या डॉक्टरचें हें नांव वेड्या लोकांनीं ठेविलें आहे. एकंदरीनें वेड्यासहि बरीच विनोदबुद्धि असते म्हणावयाची!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक बारीकशी डिकशी चाकूनें ताशीत रेगो पुढें बोलूं लागला, " सॅमसनला त्याच्या बायकोनंच शत्रूच्या हवालीं केलं होतं; तोच प्रकार माझा झाला. मी स्वतःच्या मुलांवर प्रयोग करीत होतों यांत सरकारचं काय खर्च होत होतं? पण आम्हीं हिंदी लोकांनीं शास्त्रीय शोध लावूंच नयेत असं त्याला वाटतं, तेथें कोण काय करणार!"

" हा शहाणा आपल्या मुलाच्या पायाचा आंगठा तोडून त्याच्यावर कमळाचं कलम करणार होता! म्हणतो कसा, माझ्या मुलाचीं पदकमलं बघून लोक त्याला कृष्णाचा अवतार समजतील. आहे का नाहीं शहाण-पणा! आणखी असल्या घातकी माणसाला मोकळा ठेवूं न देणारी याची बायको मात्र निमकहरामी!" पेस्तनजीनें सांगितलें.

त्यावर रेगो चाकू उगारून पेस्तनजीवर धावला आणि " तूं ओरँग ओटँगचा खुषमस्कऱ्या आहेस. स्वतः वेडा असून दुसऱ्यांना वेडे म्हणतोस? तुझ्याच जिभेला कुत्र्याच्या जिभेचें कलम केलेलें दिसतें!" इत्यादि शिव्या देऊं लागला. पेस्तनजीनें तेथून यःपलाय केलें व दूर अंतरावरून तो आम्हांस बोलावूं लागला.

आम्ही पेस्तनजीच्या दिशेनें गेलों. तेथें पिंपळाचा पार होता व त्यावर एक चिंताग्रस्त झालेला वेडा बसून सारखा बोटें घालून मोजीत होता. पेस्तनजीनें माहिती दिली कीं, त्या मनुष्याला भाऊबंदांनीं बुडविलें असून हा त्यांच्यावर खटले भरतां भरतां वेडा झाला आहे. याचें नांव सदोबा पाटील.

" कसं काय सदोबा? तब्येत बरी आहे ना?" मी त्यास विचारिलें, सदोबांचें आतां कुठें आमच्याकडे लक्ष गेलें व त्यांनीं मला विचारिलें " काय पुणेकर, इथें काय पाहायला आलां?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेड्याचें सूक्ष्म निरीक्षण पाहून गुंड्याभाऊ चमकला. तुम्हीं आम्हांला पुण्यास कधीं पाहिलें होतें काय ? गुंड्याभाऊच्या अशा चौकशीस त्यानें उत्तर दिलें कीं, आपण पुणें कधींहि पाहिलें नाहीं, पण पुण्याच्या



माणसास तात्काळ ओळखतों.

वेड्या लोकांचा वेडाचा एकच मुद्दा सोडल्यास ते बाकीच्या बाबतींत शहाण्याहून शहाणे असतात असा विचार पेस्तनजीनें प्रगट केला.

सदोबांनीं विचारलें, 'का पुणेकर, कोर्टांत तुम्हींही एखादा खटला आणला आहे वाटतं ? मी तेवीस अन् बारा पस्तीस—बारा वर्षें ह्या पारा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खालीं बसून वाट बघतों आहें. पण अजून माझं नांव कोणी पुकारीत नाहीं. तुम्ही शहाणे असाल तर ह्या कोर्टाची पायरी चढूं नका. अरे, ही पाहा, पंजाब मेल आली सपाट्यानं. बाजूला व्हा, नाहींतर धक्का बसेल !" घाबऱ्या घाबऱ्या सदोबा ओरडला.

सदोबाचा इषारा पूर्ण होण्याच्या आंतच मनुष्याच्या तोंडचा कुऊऊ असा आवाज आमच्या कानीं आला व आम्हीं वळून पाहाण्याच्या आंत गुंड्याभाऊ खालीं पडून त्याच्या अंगास अडखळून एक धिप्पाड काळा देह पलीकडे कोलमंडलेला दिसला. गुंड्याभाऊनें उठून अंगावरची माती झाडीत त्या देहाच्या मालकास म्हटलें, "अरे, जरा बघून नाहीं का चालतां येत ? आतां येथें वेड्यांच्या इस्पितळांत भांडण तरी काय करणार ?"

तो काळा मनुष्य उठून आपले इस्पितळी कपडे झाडीत रागानें हिंदुस्थानींत म्हणाला, "ए पागल, पंजाब मेलला अडथळा करून टपालची खोटी करतोस ? तुझ्यावर खटला केला पाहिजे !"

हे धाकाचे शब्द ऐकून पारावर बसलेला वेडा तिरस्कारानें हंसून म्हणाला "अरे मूर्खा ! कोर्टांत खटला भरलास तर बारा वर्षे तुझी गाडी ह्याच स्टेशनवर खोळंबून राहील. दे सोडून त्याला. मार शिटी, आणखी गाडी जाऊं दे पुढें."

काळ्या वेड्यानें प्रथम कुर्रर्र अशी गार्डाची शिटी दिली. परंतु इंजिनाची शिटी लौकर होईना. कारण पेस्तनजी आपला हात शरीराशीं काटकोनांत धरून उभा राहिला होता. पंजाब मेलनें रागावून "ए सिग्नल् डाऊन करो, पंजाब मेलको खोटी होती है. समझता नहीं यू फूल ?" असें म्हणतांच पेस्तनजीनें सिग्नल् दिला व जोरानें शिटी फुंकून पंजाब मेल वायुवेगानें धापा टाकीत निघाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सदोबा कोर्टवाल्यास तुझें नांव आजच पुकारलें जाईल असें आश्वासन देऊन आम्हीं पुढें निघून इस्पितळाच्या इमारतींत शिरलों. तेथें एका टेबलाशीं बसलेला एक रोगी हातांत प्लँचेट घेऊन कागदावर रेघोट्या ओढण्यांत गुंग झाला होता. रेघोट्या ओढून ओढून चिताड झालेले अनेक कागद भोंवतालीं पडलेले होते. या रोग्यास इस्पितळी पोषाख दिलेला नसून युरोपियन पद्धतीचा भर पोषाख त्यानें केलेला होता. पेस्तनजीनें आम्हांस त्याच्याजवळ नेऊन म्हटलें, "गुड मॉर्निंग प्रोफेसर भट."

"गुड मॉर्निंग पेस्तनजी शेट. आज हे कोण आमच्याकडे पाहायला घेऊन आलां आहां?"

"हे पुण्याचे मिस्टर जोग आणि हे मिस्टर दांडेकर."

"वा! ही लॉरेल हार्डीची जोडी कॉलेजांत कशाला शिरली? पण तें जाऊं द्या. मी आहें निमग्न महत्त्वाच्या संशोधनकार्यांत. भवभूतीचा आत्मा प्लँचेटमध्यें आणून त्याचं पद्मपूर आमच्या छत्तीसगड प्रांतांतच होतं असं मी सिद्ध करणार आहे. प्लँचेटसारखं विश्वसनीय विनिमय-साधन उपलब्ध झालं असतांना विद्वानांनीं विनाकारण अंतर्गत नि बहिर्गत पुरावे धुंडाळीत बसावें हें आश्चर्य आहे. मिस्टर दांडेकर, आतां तुम्ही प्लँचेटला एक हात लावा. मी ह्या बाजूनं लावतों. आतां गडबड करूं नका," असें म्हणून त्यानें गुंड्याभाऊस समोर बसविलें व आपण चिंतनांत मग्न झाला. आम्हांपैकीं कोणी बोलण्याचा यत्न केला कीं, तो लगेच डोळे वटारून गप्प बसवी. गुंड्याभाऊस त्या ताटकळल्या स्थितीचा कंटाळा येऊं लागला. परंतु उपयोग काय? 'वेड्याच्या गांवा जावें वेडें होऊनियां यावें' अशांतली आमची गत झाली. ही कंटाळवाणी स्थिति किती वेळ राहणार असें आम्हांस वाटूं लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोड्या वेळानें खुद्द प्रोफेसरसाहेबांसदेखील त्या स्थितीचा कंटाळा आला व ते बोलूं लागले, "हॅलो, भवभूति ! तूं पद्मपूरचा म्हणवितोस; परंतु तुझं पद्मपूर वऱ्हाडांत होतं कीं, पुण्याजवळ पद्मावतीच्या तळ्याजवळ कीं आमच्या छत्तीसगडांतल्या रतनपूरजवळ ? या प्रश्नाचं उत्तर देऊन संशोधनाचा नवा मार्ग सुलभ करून दे."

"अहो प्रोफेसर रा. स. भट ! आतां जरा तें प्लँचेट आमच्या वांट्याला येऊं द्या कीं !" संपूर्ण इंग्लिश पोषाखांत नटलेला परंतु विक्षिप्त पेहरण्याच्या तऱ्हेवरून स्वतःचें वेडेपण जगास दाखविणारा आणखी एक वेडा पलीकडील दालनांतून येऊन म्हणाला, "भवभूतीला मरून झालीं दीड हजार वर्षं ! आतां तो कशाला येतो आहे या फळकुट्यांत तोंड घालायला. मला वनस्पतिशास्त्रांतले शोध लावायला नुकतेच वारलेले शास्त्रज्ञ डॉक्टर नेव्हरवॉज यांची मदत घ्यायची आहे. विस्कॉन्सिन युनिव्हर्सिटींत मी त्यांचा लाडका विद्यार्थी होतों." असें म्हणून त्या वेड्यानें गुंड्याभाऊस बाजूस ढकलून त्याच्या हाताची जागा स्वतःच्या हातास दिली. दोन वेडे जमतांच प्लँचेट झपाट्यानें काम देऊं लागलें. दिव्य लोकांतून नानाप्रकारचे संदेश येऊं लागले; परंतु ते भवभूतीकडून येत होते कीं, डॉक्टर नेव्हरवॉजकडून याचा वाद त्या दोघांत लागला; व आम्ही तेथून पाय काढता घेतला.

इमारतीच्या एका सज्जांत एक रोगी ताडाच्या पंख्यानें वारा घेत बसलेला होता. गुंड्याभाऊची व त्याची नजरानजर होतांच दोघेहि आश्चर्यानें थबकले. तो रोगी मुसलमान असावा असें त्याच्या दाढीवरून दिसत होतें. पेस्तनजीनें सांगितलें कीं, त्या वेड्यास खून करण्याचें वेड लागलें होतें. कोर्टांत हा वेडा आहे हें शाबीत झाल्यामुळें यास शिक्षा न होतां त्याची रवानगी पागलखान्यांत झाली. हा अगदीं शहाण्यासारखा वागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन द्वाड कुत्रे एकमेकांसमोर आले म्हणजे ज्याप्रमाणें एकमेकांचें आपुच्छमस्तक निरीक्षण करीत गुरगुरतात, त्याप्रमाणें तो मुसलमान व गुंड्याभाऊ एकमेकांस बघत नानाप्रकारचे आवाज तोंडांतून काढीत होते. शेवटीं गुंड्याभाऊ म्हणाला, 'क्यंव ?'

'क्या बे !' त्याचा प्रतिस्पर्धी म्हणाला.

"होय, मीच. त्यावेळीं तूं माझा नेम चुकवलास, पण ती बाकी आत्तां वसूल करतों बघ," असें म्हणून त्यानें गुंड्याभाऊस एक ठोसा लगावला.

मारामारी दुरून विशेष चांगली दिसते असें जाणून पेस्तनजी व मी चारसहा पावलें मागें उभे राहिलों. गुंड्याभाऊनें त्याचे दोन्ही हात आपल्या उजव्या हातानें पकडले व डावा हात उगारून तो ओरडला, "पागलचं सोंग घेऊन तूं न्यायाधिशाला फसवलंस तरी आमचा बजरंग-बली तुला न्याय द्यायला सदोदित जागृत बसलेला आहे. 'उडी घालितो संकटीं स्वामि तैसा.' आतां तुझीं बारा वर्षं—"

कुऊऊऊ ! अशी जोराची शिटी वाजवीत मघां वर्णन केलेली पंजाब मेल पुन: वायुवेगानें आली, व त्या दोघां वेड्यांना जमिनीवर पाडून काल्पनिक लाहोर-पेशावरकडे निघून गेली. ही संधि पाहून मिया-भाईनीं झटकन् अंग झाडून तेथून पळ काढिला.

तेथून आम्ही तिघे एका खोलींत शिरलों. तेथें मध्यभागीं एक बुद्धि-बळाचा पट मांडलेला व त्याचे दोन बाजूस दोन रोगी बसलेले होते. त्यांपैकीं एकानें डावांतील हत्ती हातांत घेऊन तो कोठें ठेवावा याचा विचार चालविला होता, व दुसरा त्याच्या विचारांचें निरीक्षण करीत होता. पेस्तनजी म्हणाला, "हीं बुद्धिबळं बरं का ! बुद्धीचं बळ वाढविण्याऐवजीं माणसाला कशीं निर्बुद्ध करून टाकतात तें पाहा."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या रोग्यांपैकीं एक म्हणाला, " ए शहाण्या, बुद्धिबळं न खेळल्यामुळेंच तुझी बुद्धि इतकी तिखट राहिली आहे वाटतं? हा डाव मीं जिंकला कीं आम्ही दोघे विलायतेंत जाऊन टूर्नामेन्टमध्यें खेळणार आहोंत. स्टेटसेक्रेटरीला सांगणार कीं, व्हाइसरॉय हिंदी कायदेमंडळाला तरी जबाबदार कर, नाहींतर तीन डावांपैकीं निदान एक डाव आमच्यावर लावून आपली श्रेष्ठ बुद्धि स्थापन कर. आम्ही हिंदी लोक बुद्धिबळांत हार जाणार नाहीं—" त्याचा प्रतिस्पर्धी बोलला, " शिवप्पा, ह्या लोकांशीं बोलण्यांत वेळ घालवूं नको. हा डाव सुरू होऊन दोन महिने झाले तरी सरला नाहीं."

पेस्तनजीनें आम्हांस सांगितलें कीं, हे दोन वेडे रात्रंदिवस बुद्धिबळें कुटीत असतात. खाणेंपिणें वगैरे शरीरकृत्यांस लागणारा वेळ सोडल्यास ते सारखे खेळतच बसलेले असतात. आतां आणखी एक अवलिया बघा. आम्ही वळून बघितलें. टेलिफोनची पुंकणी हातांत

घेऊन व तबकडीवरील आंकडे मागेंपुढें फिरवीत एक मनुष्य बसलेला दिसला. 'हॅलो स्टेशनमास्तर, लाहोरचं तिकीट घेऊन आज किंवा काल कुणी तरुण मनुष्य निघाला काय?....कांहो उत्तर देत नाहीं? आतां पोलिस सुपरिन्टेन्डेन्टला तरी विचारलं पाहिजे........"

अशा तऱ्हेनें तो मनुष्य सारखे टेलिफोनचे संदेश पाठवीत होता. टेलिफोनचें साहित्य टेलिफोनच्या तारेशीं जोडलेलें नसून नुसतें दिखाऊ होतें हें सांगावयास नकोच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" ह्या बिचाऱ्याचा मुलगा लाहोरला जायला निघाला, पण वाटेंत अपघातानें मरून गेला. त्यावेळेपासून याचं डोकं फिरलं, आणखी हा रात्रंदिवस मुलाकरितां अशी धडपड करितो आहे."

त्या हतभागी वेड्याच्या स्थितीबद्दल वाईट वाटून आम्ही बाहेर पडलों व झाले इतके मासले पुरे असें म्हणून बाकीच्या वेड्यांचा परिचय करून न घेतां माघारे फिरलों.

इस्पितळावरील डॉक्टरची खाजगी ओळख असल्यानें (त्या दयाळू डॉक्टरचें नांव वरिष्ठ अधिकाऱ्यांस कळूं नये म्हणून शहराच्या नांवाचा उल्लेख मी मुद्दामच टाळला आहे.) इस्पितळाचा स्त्रीविभाग पाहण्याची आम्हांस परवानगी मिळाली. पेस्तनजीबरोबर आम्ही दोघे स्त्रीविभागांत गेलों. तेथें एकच रोगी होती. नाकांत नथ, केसांचा आंबाडा बांधून डोक्यांत फूल खोवलेलें, गळ्यांत कांचेच्या मण्यांचे पुष्कळसे दागिने, लुगडें ठेवणीचें, असा तिचा पोषाख होता. ती स्त्रीविभागाच्या आवारांत एका निंबाच्या झाडाखालीं बसून गुलबशीच्या फुलांचा हार करण्याचा यत्न करीत होती. पेस्तनजीनें सांगितलें कीं, ह्या बाईचा नवरा गेल्या वर्षी जयंती बोटीनें कोकणांत जाण्यास निघाला, परंतु बोटीबरोबर त्याला जलसमाधि मिळाली. त्या वेळेपासून त्या बाईला वेड लागलें. प्रत्येक क्षणास नवरा परत येईल अशी आशा करीत त्याच्याकरितां हार विणीत ही वर्षभर बसली आहे.

आशा! आशेपायीं लोक कसे वेडे होऊन जातात! म्हणूनच कवीनें म्हटलें आहे 'आशाया: परमं दु:खं। नैराश्यं परमं सुखम्॥' तिच्या देखत तिचा नवरा मेला असता तर त्या वेड्या आशेला तिच्या हृदयांत ठाणें मिळालें असतें काय?

परंतु विधिघटना उलटी होती, म्हणजे तिच्या हृदयाला ठाण्यांत जागा मिळायची होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेस्तनजीचा शब्द ऐकूनच तिनें वर मान केली. गुंड्याभाऊस पाहातांच आपला नवरा परत आल्यासारखें तिला वाटलें असावें. गुलबशीचा वेडावांकडा हार घेऊन ती म्हणाली, "जयंतीची मयंती झाली हें खोटंच ना एकंदरींत? सुखरूप परत यायचं होईल अशी माझी मनोमय साक्ष होती. सामानसुमान कुठं ठेवून यायचं झालं?...."

एरवीं सैतानालाहि भीक न घालणारा गुंड्याभाऊ त्या अस्थिपंजर उरलेल्या निस्तेज बाईच्या बोलण्यानें गांगरून गेला. केवढाहि वीर पुरुष असला तरी स्त्रीसमाजांत तो गोगलगाय बनतो असें नेपोलियन म्हणत असे त्याची मला आठवण झाली. ती बाई त्याच्यासमोर उभी राहून लाजल्यासारखें करून म्हणाली, "इश्श! इथंच काय मेलं उभं राह्यचं? घरांत नाहीं काय यायचं?" गुंड्याभाऊ भीतीनें आणि लाजेनें लालबुंद व घामाघूम झालेला दिसला. त्याला धरण्याकरितां ती बाई जवळ आली आणि त्याच्या कोटाची बाही पकडून कांहीं बोलूं लागणार इतक्यांत "छल" असें ओरडून गुंड्याभाऊनें पळ काढिला व थेट रखवालदारापर्यंत जाऊन दाखल झाला.

पेस्तनजीनें व मी त्या आक्रोश करणाऱ्या वेडीची तात्पुरती समजूत केली व आम्ही बाहेर यावयास निघालों. येतांना पेस्तनजी म्हणाला, "पाहिलंत मिस्टर, दिवाण्या लोकांचें आयुष्य कसं असतं तें! अनबॅलन्स्ड माइण्ड (पासंग नसलेलें मन). एकाच बाजूला मन झुकत असतं, त्यांत दुसऱ्या बाजूला कांहींच विषय नसतात. इथें दुसऱ्यांचीं वेडं पाहून स्वतःचं वेड माणसाला कळूं लागतं, आणखी तो बरा होतो. वेड म्हणजे तरी मनाचा रोग आहे. योग्य व्यायामानें, आणखी औषधोपचारांनीं तो दूर झालाच पाहिजे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें तो बोलत असतां आम्ही गुंड्याभाऊ उभा होता त्या फाटकाशीं आलों. गुंड्याभाऊची थट्टा करीत "काय रावसाहेब, चांगली बायको मिळत होती ती सोडून पळून आलांत!" असें पेस्तनजी त्यास म्हणाला. त्या फाटकांतून आम्ही बाहेर पडतांच रखवालदारानें पेस्तनजीस हटकलें. पेस्तनजी चिडून त्याला शिव्या देऊं लागला. तेव्हां मीं रखवालदाराला विचारलें, "कायरे हपीसरांचा अपमान करायला तूंहि वेडा झालास कीं काय?"

रखवालदार उत्तरला, "ह्या पेस्तनजीशेटला बाहेर जायचा हुकूम नाहीं. (कानांत) हाही एक वेडा आहे." तेव्हां पेस्तनजी रागावून म्हणाला, "तूं ह्यांना काय सांगतोस तें मला समजलें. हें बघा मिस्टर, मीं जगांतला एक मोठा शोधक आहें. परंतु माझ्या शोधांनीं शेफिल्डचे कारखाने बुडतील म्हणून मला इथं कोंडून ठेवलं आहे."

गुंड्याभाऊनें विचारलें, "तुमचा एखादा शोध सांगा पाहूं!"

तो म्हणाला, "मी आगगाडीच्या इंजिनकरितां अशी युक्ति शोधून काढली आहे कीं, तें चालवायला वीज किंवा वाफेची मुळींच गरज नाहीं. ओळखा पाहूं काय असेल तें?"

रखवालदार मध्यें म्हणाला, "एंजिनला हत्ती जोडावा."

पेस्तनजीनें जमिनीवरचा एक खडा उचलून त्याला मारून आम्हांस म्हटलें, "अगदीं बिन-खर्चाची युक्ति आहे. एक लोहचुंबकाचा फुटबॉल एवढा गोळा एंजिनापुढें ठेवायचा. एंजिन लोखंडाचं करायचं. जसजसा गोळा पुढें जाईल तसतसं एंजिन त्याच्यामागें ओढलं जाणारच!"

यावर गुंड्याभाऊनें शंका काढली, "पण तो गोळा पुढें कसा जाणार?"

पेस्तनजी हंसत म्हणाला, "तुम्हांला एवढं समजत नाहीं तरी तुम्हांला मोकळं ठेवलं आहे आणि मला मात्र पागलखान्यांत कोंडलें आहे! अरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवाण्या, एंजिन मागून चालतच असतं, तें गोळ्याला पुढें ढकलीत जाईल, अन् गोळा एंजिनला ओढील !"

रखवालदारानें सांगितलें कीं, पेस्तनजीनें एक बीनकिल्लीचा बीनवीजेचा पंखा तयार केला होता. एका सायकलच्या जुन्या चाकाला ताडाचे पांच-सहा पंखे आडवे बांधले होते व तें चाक पेडलच्या साहाय्यानें गरगर फिरविलें कीं वाराच वारा सुरू व्हावयाचा. त्यांतल्यात्यांत त्याचा महत्त्वाचा शोध म्हणजे स्वदेशी विमानाची योजना हा होय. ह्याकरितां त्यानें चार गिधाडें पकडलीं होतीं आणि त्यांच्या पायांना दोऱ्या बांधून त्यांना तो लोंब्रकळला आणि दहा फूट उंचीवरून दगडावर आपटला. त्याच्या विमानाचीं वाहनें पसार झालीं !....यापुढें पेस्तनजीचे पराक्रम आम्हांला ऐकायला मिळाले नाहींत. कारण रखवालदार जीव घेऊन पुढें व पेस्तनजी शिव्या देत व धोंडे फेकीत त्याच्या मागें असे धावत धावत इस्पितळाच्या इमारतींत शिरून अदृश्य झाले.

चिंतामण विनायक जोशी

परिचय

तुम्ही विनोदाचे अनेक प्रकार पाहिले आहेत. कोणाचा विचित्र स्वभाव, कोणावरचा चमत्कारिक प्रसंग, दोन विचित्र माणसांची भेट, कांहीं हास्यास्पद कल्पना किंवा शब्दावरच्या कोट्या, असे विनोद उत्पन्न करणारे अनेक प्रसंग व विषय असतात. वास्तविक वेड म्हणजे मनाचा रोग. रोगी ठेवाव-याचें ठिकाण तें इस्पितळ. वेड्याचें इस्पितळ पाहून वाईट वाटावयाचें का विनोदानें हंसावयाचें. पण हा लेख वाचतांना तुम्हांला कुठें कुठें हंसू आलें तें बारकाईनें पाहा ! कार्यकारणभाव कळत नाहीं; तर्क चालत नाहीं म्हणून वेडा. एकच छंद धरतो म्हणून वेडा. विनोदाला तरी हेंच कारण पुरेसें होतें. एकेकाचें वेड पाहा. तें वेड घालविण्याची, त्याच्याच कलानें चालण्याची युक्ति पाहा. सारखें हंसू येईल. मार्गदर्शक पेस्तनजी वेडा होता हें तुमच्या लक्षांत अगोदर खासच आलें नसेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्लँचेट = भविष्य लिहून दाखविणारें यंत्र. पुष्कळ लोक यावर विश्वास ठेवून वेडे झाल्याचीं उदाहरणें आहेत. लॉरेल हार्डी (जाड्या, रड्या) = सिनेमांतील प्रसिद्ध विनोदी दुक्कल.

नेव्हरवॉज (कधींच नव्हता) मुद्दाम दिलें आहे नांव !

जयंती = कोंकण किनाऱ्याजवळ समुद्रांत बुडालेली आगबोट. पण जयंती म्हणजे जन्मोत्सव, मयंती म्हणजे श्राद्ध दिवस. ही शब्दावर कोटी आहे. या लेखांत शब्दावर फारशा कोट्या नसून वेड्यांच्या छांदिष्टपणावर विनोदाची उभारणी केली आहे.

तुम्हांला कोणत्या वेड्याची दया येते किंवा हंसू येतें ? त्याचें कारण काय ? ही गोष्ट खरोखरच घडली आहे असें दाखविण्यासाठीं लेखकानें काय युक्त्या केल्या आहेत ? शहराचा उल्लेख केला आहे कीं नाहीं ?

कांहीं लोक कशानें वेडे झाले तें सांगण्यांत लेखकाचा हेतु काय असावा ?

अधोरेखित शब्दांचा संदर्भ किंवा खुलासेवार अर्थ किंवा आंतील खोंच सांगा. पृष्ठ ७७ ओळ ८ मध्यें सदोबा 'तेवीस अन् बारा पस्तीस' असें म्हणतो. याचा अर्थ १९२३ पासून १९३५ (हा लेख लेखकानें १९३५ सालीं लिहिला) पर्यंत बारा वर्षें असा घ्यावयाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४

नटराज

मूर्तिपरिचय

या ताम्र मूर्तींत आपणांस प्राचीन भारतीय कलेचा नमुना पाहाण्यास मिळतो. ही नटराजाची मूर्ति मद्रास इलाख्यांत इसवी सनाच्या नवव्या शतकांत दक्षिण हिंदुस्थानांतील पल्लव राजांच्या कारकीर्दींत घडविली आहे. तांडवनृत्य करणाऱ्या शिवाचें नटराज हें रूप आहे. या मूर्तीचें सिंहासन कमलाप्रमाणें असून सभोंवतीं ज्योतींनीं मंडित केलेली अंडाकृति प्रभावळ केली आहे. 'अपस्मार' दैत्याला पायाखालीं तुडवीत शंकर नृत्य करीत आहे. मूर्तीवर अलंकार दिसतात तशा प्रकारचे अलंकार कोरीव लेण्यांतहि सांपडतात. अंगावरील उत्तरीय डाव्या बाजूला फडफडत आहे. नृत्याच्या स्थितींतील वांकलेल्या पायांकडे व चारी हातांकडे पाहा. डमरू व अग्नि वरच्या दोन हातांत आहे. उजवा हात उताणा उभा धरून 'अभयमुद्रा' केली आहे. असा हात बुद्धमूर्तींतहि आढळतो. या हाताजवळ नागाची उभारलेली फणा दिसेल. मुगुटावरचा पिसारा ज्योतींनींच खचलेला आहे.

शिव ही फार प्राचीन देवता आहे. कैलास हें त्याचें स्थान, नंदी हें वाहन. सिंध प्रांतांतील मोहेन्जोदारो येथें सात हजार वर्षांपूर्वींच्या संस्कृतीचे जे अवशेष सांपडले आहेत त्यांत नंदीचें चित्र काढलेल्या मुद्रा व नटराजाची भग्न मूर्ति सांपडली आहे. या मूर्तीवरून आपल्या देशांत फार पूर्वी सुंदर मूर्तिकला व नृत्यकला किती उच्च प्रतीची होती हें तुम्हांला समजेल.

श्री. बा. रानडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



(ताम्रमूर्ति)   नटराज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५

अगाई

१

काय झालं सोनुलीला ?
रडूं कशाचं डोळ्यांत
पोरक्या वासरावाणी
कशापायीं हा आकांत ?

२

डोळ्यांतल्या आसवांच्या
पाणीदारशा मोत्यांनीं
डंवरले काहून ग !
लाल गुलाब हे दोन्ही

३

रडुं नको ग ? अं हं ! मीं
देतें बाईला भुलजाई
हांसतील कशा मग
ओठावर जाईजुई

४

जांभया कां देशी अशा
नीज आली कां मैनेला ?
झोप झोप झबुकडे !
मीच थोपटतें तुला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५

जाय उडून रे ! हाड्या
नको करूं काव काव
नीजते ही पांघरूनी
लुगड्याचा माझ्या शेव

६

गुंगी जाईल निघून
हड हड दूर आकू
डोळा लागला बाईचा
वायकारणी नको भुंकू

७

ये ग ये ग हम्मा ये ग
दुदु दे ग तान्हुलीला
राघो ! पळत ये तूंहि
घाल वारा साळुंकीला

८

पाय वजे वजे टाका
गोड गोड ओव्या म्हणा
चारा घेऊन तुम्ही या
टांगा मैनाइ ! पाळणा

९

चिड्या रंगीत तावाच्या
द्या ग ! त्यावर लावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुलाबाच्या पाकळ्यांचं
करा छान अंथरूण

१०

मीच निजवितें त्यांत
माझ्या जिवाची ही राणी
हिंदवतें अन् बाईला
गात गात गोड गाणीं

वि. भि. कोलते

परिचय

कवितांचे विषय अनेक असतात; त्यांपैकीं **शिशुगीतें** या प्रकारांत मुलांसाठीं सोप्या भाषेंत व त्यांना आवडतील अशा विषयावर लिहिलेल्या कविता; मुलासंबंधीं व त्यांनाच उद्देशून लिहिलेल्या कविता, मुलांना पाहून मोठ्या माणसांना काय वाटतें त्या कविता; असे अनेक प्रकार आहेत. पहिला प्रकार इंग्रजी Nursery Rhymes मध्यें दृष्टीस पडतो. दुसऱ्या प्रकारच्या कविता दत्त, तांबे, माधव जूलियन्, प्रो. मायदेव, ना. गं. लिमये वगैरे आधुनिक कवींनीं लिहिल्या आहेत. जुन्या अंगाई गीतांत, ओव्यांत व पाळण्यांतहि त्यांचें उत्तम स्वरूप आढळतें. प्रो. वि. भि. कोलते यांच्या कवितेंत तुम्हांला दोनतीन नवीन गोष्टी सांपडतील. भाषा सोपी असून कांहीं शब्द वऱ्हाड–नागपूर प्रांतांतील आहेत, आणि कल्पना सोप्या असून सुंदर आहेत. कावळा, कुत्रा, गाय, पोपट, मैना हे सारे मुलीच्या पूर्ण माहितीचे सवंगडी.

प्रांतिक शब्दांचे अर्थ :–काहून = कां म्हणून. भुलजाई = बाहुली; हाब्या = कावळा; शेव = पदर; आकु = कुत्रा; वायकारणी = विनाकारण; वजेवजे = हळू हळू; चिव्या = चिमण्या (पाळण्यावर टांगावयाचीं चित्रें); हिंदवतें = झोके देतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. या कवितेची नाट्यछटा तयार करा व तींत तुमच्या प्रांतांतच रूढ असलेले शब्द मुद्दाम घाला.

२. या कवितेंतील कोणत्या कल्पना तुम्हांला गोड वाटतात ?

३. आईनें मुलीला कोणकोणत्या नांवांनीं हांका मारल्या आहेत तें पाहा (सोनुली) आणि मुलांना व मुलींना दुसऱ्या कोणकोणत्या नांवांनीं हांका मारतात त्यांची यादी तयार करा.

१६

एक कारकून

बोलून चालून कारकून तो ! त्याच्या चरित्रांत तें विशेष काय असणार ?



अंधाऱ्या रात्रीं भयाण अरण्यांत मुसळधार पावसांत भरधांव घोडा फेंकायला तो रजपूत राजपुत्र थोडाच होता ? सुंदर युवतीची एखाद्या खलापासून ऐन प्रसंगीं सुटका करायला तो काय कादंबरीनायक होता ? तो, जगाचा मार्ग सरळ नाकासमोर दिसणाऱ्या वाटेनें चालणारा फक्त एक कारकून होता.

त्याला कोणीं नव्हतें. मुगभाटांतल्या एका आडवळणी चाळींत तळमजल्यावरील एका असूर्यपश्या खोलींत त्यानें आपला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संसार थाटला होता. खोलीच्या मध्यभागीं, जुनी ठिकठिकाणीं भोकें पडलेली बारा आणेवाली एक चटई होती. तिच्यावर कापूस बाहेर डोकावीत असलेल्या गादीची वळकटी भिंतीला लागून होती. गादीच्या त्या स्थितीला कदाचित् वळकटी असें म्हणतां आलें नसतें. कारण सकाळीं उठल्यावर पंत एका लाथेनें बिछाना भिंतीकडे झुगारीत तेव्हां यदृच्छेनें त्याचा जो आकार होईल तो खरा. रात्रीं भिंतीच्या बाजूनें एक लाथ पाठींत बसली म्हणजे ती गादी चटईवर उताणी होई. गादीवर जुन्या धोतराची चादर व जुन्या भल्या मोठ्या शब्दकोशाची उशी होती. चटईच्या आंवतींभोंवतीं विड्यांचे तुकडे व जळक्या काड्या पसरल्या होत्या. कोपऱ्यांत टिन्‌ची एक ट्रंक उघडीच पडलेली होती. खुंटीवर एकुलता एक कोट व त्याच्यावर मेणचटलेली टोपी होती. समोर भिंतीला एक जस्ती दिवा शोभत होता. एका कोपऱ्यांत बादली व कधीं न हात फिरला गेलेला तांब्या व दुसऱ्या कोपऱ्यांत एक टमरेल व फाटका दक्षिणी जोडा होता.

पंत गेल्या वीस वर्षें या ऐश्वर्याचा उपभोग घेत होते. या वीस वर्षांत त्यांच्या खोलींत गृहलक्ष्मीच्या कांकणाचा किंवा लहानग्या बाळाच्या रडण्याचा आवाज कोणी ऐकला नव्हता. या वीस वर्षांत कोणी शेजाऱ्यानें पंतांचा उंबरा ओलांडला नव्हता. चाळींतलीं व्रात्य पोरें पंताच्या खोली-पर्यंत दंगामस्ती करीत धांवत येत, पण खोलीजवळ येतांच गुपचुप खालीं मान घालून पुढें जात. पंत चाळीजवळ येतांच नळावरील बाय-कांचीं भांडणें थांबत व त्या एकमेकींकडे पाहात. पंत मात्र त्या घाबरलेल्या मुलांकडे किंवा गोंधळलेल्या बायांकडे मान वळवून पाहात नसत.

रोज नियमानें खोलींत येणाऱ्या मांजराप्रमाणें पंतांचें आयुष्य नियमबद्ध झालें होतें, त्यांचा दिनक्रम अगदीं रेखींव, ठरलेला असे. सकाळीं उठल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर तोटीखालीं स्नान आटोपल्यावर बरोबर सात वाजतां पंत समोरच्या इराण्याच्या हॉटेलांत शिरत. नेहमींच्या एका कोपऱ्यांत छत्री ठेवून स्वारी खुर्चीवर बसे. खुर्चीचें तोंड नेहमींप्रमाणें भिंतीकडे नसल्यास आधीं ते तसें करीत. एका कपाच्यावर पंतांनीं दुसरा कप कधीं मागितला नाहीं. काकूंच्या खाणावळींत साडेनवाच्या पहिल्या पंक्तीला पंत आपल्या नेहमींच्या पाटावर बसत. जेवण संपेपर्यंत त्यांची मान वर कधीं होत नसे. त्यांनीं कधींहि दह्याची जादा वाटी किंवा श्रीखंडाची बशी मागविली नाहीं.

पंतांची कचेरी कोटांत कुठेंशीशी होती. कचेरींत जाण्याचा रस्ता व रस्त्याची बाजू एकच. धोबीतलावाजवळच्या एका आंधळ्या भिकाऱ्याच्या हातावर नियमानें ते एक दिडकी ठेवीत असत. कचेरींत आपण बरे कीं आपलें काम बरें. तपकिरीची चिमटी घ्यायला पंत कधीं जागेवरचे उठले नाहींत. अकरा ते पांचपर्यंत पंतांचा टाक चुरुचुरु चालून त्यांतून तिरपीं कारकुनी बाण्याचीं अक्षरें निघत.

कचेरी सुटल्यावर चौपाटीवर एका ठराविक बांकावर समोरच्या चिवडे-वाल्याकडे पाहात पंत बसत. पाठ नेहमीं समुद्राकडे. हातांत नेहमीं पांढऱ्या रंगाची छत्री असावयाची, पण तिचा उपयोग ते काठीसारखा करीत. उन्हांत किंवा पावसांत छत्री उघडण्याचें स्मरण पंतांना क्वचितच होई. चालणें नेहमीं खालीं पाहून. चालतांना ओठ मधून मधून हालत; कधीं मधीं एखादा सुस्कारा बाहेर पडे. पण तो ऐकणार कोण ? संध्याकाळीं जेवण झाल्यावर पंत तडक बिऱ्हाडीं जात. दिवा लावण्याचा प्रसंग क्वचितच येई. एका लाथेसरशीं बिछाना घालून ते त्यावर पडून अंधारांतच वरच्या तुळईकडे पाहात तासच्या तास घालवीत. अशींच आणखीं वीस वर्षें गेलीं. पंतांचा दिनक्रम पूर्वींप्रमाणेंच चालला होता. जुन्या इराण्याचें दिवाळें निघाल्यामुळें व काकूस कैलासवास घडल्यामुळें जो बदल करावा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागला असेल तेवढाच. चाळीस वर्षांपूर्वी होतें तसेंच टमरेल कोपऱ्यांत पडलेलें होतें. अन् पंत ? त्याच खोलींत राहत होते. त्याच कचेरींत काम करीत होते, त्याच रस्त्यानें जात व परत येत. रेकले जाऊन व्हिक्टोरिया आल्या; ट्रॅम झाल्या; त्यांचे घोडे जाऊन त्या तशाच धावूं लागल्या; दुसऱ्या बिन-घोड्याच्या गाड्या दिसूं लागल्या, पंत तेच पूर्वीचे पुराणपुरुष होते. पण आतां त्यांचें शरीर थकलें होतें. दम्याचा विकार जडला होता. रात्रभर खोकत बसावें लागे. परंतु पंतांनीं वैद्य डॉक्टर पाहिला नाहीं, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचा सल्ला विचारला नाहीं. आतां चालतांना पाय कांपत व खांबाचा आश्रय घ्यावा लागे. कचेरींत आतां पूर्वीसारखें वळणदार अक्षर निघत नसे. हात कांपे, चुका होत. हेडक्लार्क खेंकसून म्हणे, "पंत, तुम्हांला आतां म्हातार-चळ झालाय. काय हें अक्षर! परत ड्राफ्ट करा. त्या बेरजा पण चुकल्यात. बेअक्कल कुठचे!" पंत नाकाच्या टोंकावर असलेल्या चष्म्यांतून निर्विकारपणें हेडक्लार्कसाहेबांकडे पाहात व त्यांचें भाषण संपल्यावर शांतपणें कागद घेऊन आपल्या जागीं जात.

आजकाल लहान मुलांनीं आपल्या खोलींत यावें असें पंतांना वाटूं लागलें होतें. पण त्यांना कशी हांक मारावी, त्यांच्याशीं काय बोलावें हें माहीत नसल्यानें तें जमलें नाहीं. तरी पण अलीकडे एक उनाड शेंबडें पोर पंतांच्या खोलींत कधीं कधीं दिसे. पंत त्याच्याशीं न बोलतां पाठी-वरून हात फिरवीत व त्याला दोन पेपरमिटाच्या वड्या देत. शेजारच्या एक आजीबाईहि पंतांना दम्याची उबळ आली म्हणजे खोलींत येत. पंतांची पिकदाणी आजकाल कोणीतरी घेऊन जाऊन साफ करून आणून ठेवी. पंतांना हें कांहीं दिवसांनीं कळलें, पण त्यांनीं चौकशी केली नाहीं.

असेच दिवस चालले. दमा बळावला. रात्रीच्या रात्री जागरणें पडूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागलीं. खोलीस थुंकीनें गटाराचें रूप येऊं लागलें. आतां तोटीवर जातांना त्यांना भिंतीचा आश्रय घ्यावा लागे. तें शेंबडें पोर चहाचा कप आणून देई. आजीबाई घरगुती औषध देऊं लागल्या व पंत न बोलतां घेऊं लागले. कचेरीस जाणें बंद झालें. पंतांच्या खुर्चीवर नवा कारकून बसला, व काम पुढें चाललें.

एक दिवस उजाडला. शेजाऱ्यांना पंतांच्या खोकण्याचा आवाज ऐकूं आला नाहीं. आजीबाई बघण्यासाठीं आंत गेल्या. त्या चाळीस वर्षांच्या जुन्या गादीवर पंतांचें प्रेत पडलें होतें. जवळ बादली, टमरेल व ट्रंक होती. आजपर्यंत साथ दिलेल्या त्या मूक मित्रांचा पंतांनीं शेवटचा निरोप घेतला होता. आजीबाईंनीं लगबगीनें पुरुषमंडळीस बोलाविलें. पुढची तयारी चालली. पोलीस लोक आले. माल सरकार जमा झाला. पंतांचें प्रेत गादी-वरून काढल्यावर उशाचा शब्दकोश बाहेर पडला. एकजणानें तो उघडून सहज चाळला. त्याच्यांत एक फोटो होता! फोटोला येत असलेला मधुर वास त्या घाणेरड्या खोलींत पसरला.

पंत कचेरीच्या रस्त्यानेंच सोनापुरास गेले. रस्त्यानें ट्रामगाड्या मोटारी चालल्या होत्या; दुकानदार दुकानांत बसले होते; भय्येलोक दूध देऊन परतले होते. चाळींतील बाया भांडत होत्या व पोरें दंगामस्ती करीत होतीं. अन् पंतांच्या ऐवजीं लागलेला नवा कारकून कचेरींत जाण्याची तयारी करीत होता.

वि. द. घाटे

परिचय

हें एक शब्दचित्र आहे. यांतील वाक्यें अगदीं लहान व सुटसुटीत आहेत. अत्यंत बारीक तपशील देऊन हें चित्र खुलविलें आहे. पंतांची मुंबईच्या चाळींतील राहणी तुम्हांला थोडीशी सपरिचित वाटेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. पंतांना मुलें कां घाबरतात ? बाया पंतांना पाहून गप्प कां होत ? २. पंतांचें आयुष्य नियमबद्ध कां झालें होतें ? त्यांच्या राहणीचें तुम्ही थोडक्यांत कसें वर्णन कराल ? ३. पंतांचें असें आयुष्य कां बनलें होतें ? ४. म्हातारपणीं पंतांत काय बदल झाला ? ५. कां झाला ? ५. अधोरेखित शब्दांचा खुलासा करा.

असूर्यंपश्या = जिला सूर्य पाहूं शकत नाहीं अशी. या शब्दाचा अर्थ 'राणी' असाहि होतो. ड्राफ्ट् = कच्चा मसुदा.

पंत सोनापूरास गेले. सोनापूर हें मुंबईचें स्मशान. पुण्याचें कोणतें ? तुमच्या गांवचें कोणतें ?

या शब्दचित्राचा शेवट पाहा, पंत गेले, पण त्यांच्या जागीं त्यांच्या खुर्चीवर दुसरा कारकून आला. मोटारी चालल्या होत्या, भय्ये दूध घालीत होते, इत्यादि वर्णन देण्यांत लेखकाचा काय हेतु असावा ?

१७

रामदासस्वामींचें छत्रपति संभाजीसं पत्र

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें । तजविजा करीत बसावें । एकांत—स्थळीं ॥ १ ॥ कांहीं उग्र स्थिति सांडावी । कांहीं सौम्यता धरावी । चिंता लागावी परावी । अंतर्यामीं ॥ २ ॥ मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे । सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥ पाटवणी तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना । तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥ जनाचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला । जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥ श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बसलें । मग जाणावें फावलें । गलिमांसी ॥ ६ ॥ ऐसें सहसा करूं नये । दोघें भांडतां तिसऱ्यासी जय । धीर धरोन महत्कार्य । समजून करावें ॥ ७ ॥ आधींच पडला धास्ती । म्हणजे कार्यभाग होय नास्ती । याकारणें समस्तीं । बुद्धि शोधावी ॥ ८ ॥ राजी राखितां जग । मग कार्यभागाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लगबग। ऐसें जाणोनियां सांग। समाधान राखावें ॥ ९ ॥ आधीं गाजवावे तडाके। मग भूमंडळ धाके। ऐसें न होतां धक्के। राज्यास होती ॥१०॥ समय प्रसंग ओळखावा। राग निपटून काढावा। आला तरि कळो न द्यावा। जनामध्यें ॥ ११ ॥ राज्यामध्यें सकळ लोक। सलगी देऊन करावे सेवक। लोकांचे मनामध्यें धाक। उपजोचि ॥ १२ ॥....आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मिळवावें। महाराष्ट्रराज्य करावें। जिकडे तिकडे ॥१३॥ लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी। चढती वाढती पदवी। पावाल येणें ॥ १४ ॥ शिवराजास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें। इहलोकीं परलोकीं राहावें। कीर्तिरूपें ॥ १५ ॥ शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं ॥ १६ ॥ शिवरायाचें कैसें चालणें। शिवरायाचें कैसें बोलणें। शिवरायाची सलगी देणें। कैसें असे ॥ १७ ॥ सकळ सुखांचा त्याग। करून साधिजे तो योग। राज्यसाधनाची लगबग। कैसी असे ॥ १८ ॥ त्याहूनि करावे विशेष। तरीच म्हणावे पुरुष। याउपरी आतां विशेष। काय लिहावें ॥१९॥

रामदास

परिचय

शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर संभाजीनें कारभारीमंडळीचा वध केला व तो स्वच्छंदानें वागूं लागला हें पाहून समर्थ रामदासांनीं त्याला हें उपदेशाचें पत्र पाठविलें होतें. या पत्रास ऐतिहासिक महत्त्वाइतकेंच काव्य या दृष्टीनें महत्त्व आहे. समर्थांच्या वाणींत जोम, तडफ विलक्षण; बोल खडे, स्पष्ट. 'शिवरायास आठवावें' 'शिवरायाचें आठवावें रूप' इ. ओळी वाचतांना असा कोण अभागी आहे कीं ज्याच्या डोळ्यांत पाणी येणार नाहीं?

अभ्यास

१. तजवीजा = राजकारण, मनसुबे, मसलती. २. कांहीं उग्र स्थिति = थोडी बहुत. कांहींचा क्रियाविशेषणासारखा उपयोग आहे. ३. परावी =

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्यांची. ४. मागील अपराध क्षमावे=अण्णाजी दत्तो वगैरे कारभाऱ्यांनीं राजारामास गादीवर बसविण्याचा कट करून त्यास गादीवरहि बसविलें होतें हा त्यांचा मागील अपराध. ५. पाटवणी तुंब निघेना=पाण्याचा ओघ ठिकठिकाणीं तुंबवून तसाच कोंडून ठेविला तर त्यापासून कार्य होणार नाहीं. त्याचे पाट चोंहोकडे नेऊन पिकें भिजविलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें कर्त्या माणसांना डांवून ठेवण्यांत हांशील नाहीं. त्यांना वेगवेगळ्या कार्याला लावलें पाहिजे. ६. साक्षेप=प्रयत्न.

१८

पानिपतचा रणकल्लोळ

विश्वासरावसाहेब व भाऊसाहेब या उभयतांनीं तैलाभ्यंग करून मंगलस्नानें केलीं. देवतार्चनें संपादून, फलाहार अल्प करून, पिकले पानाचे विडे घेऊन, जामदारखान्यांत जाऊन, रणांगणींचीं पीतवस्त्रें घेतलीं. शिरपेंच व तुरे व चौकडे व बाजूबंद, व मोत्यांच्या कंठ्या व शस्त्रास्त्रें ठायीं ठायीं बांधून तरकसकमाना हातीं घेऊन सज्ज झाले. नंतर निशाणबारदारांनीं निशाणें घेऊन नगारा नौबदी करून एकदांच गर्जना केली. तेव्हां भूमंडळ नादेंकरून तुंबळ जाहालें. तेणेंकरून रणरंगधीरांस वीरश्रीचीं स्फुरणें आलीं. प्रातःकाळ होतांच दुसरा नगारा जाहाला. तेव्हां तमाम सरदार तयार होऊन, सदाशिवपंतांस मुजरे करून आपापले घोड्यावर स्वार जाहले. भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड यांस सन्निध बोलावून आणून सांगितलें कीं "आजचा निदान समय, शंभर वर्षें पूर्ण भरलीं, आणि आज सतीचें वाण घेतलें. त्यावरती दुसरी गोष्ट अणूमात्र चित्तांत आणूं नये. तुम्ही पुरातन कैलासवासी रावसाहेब व आपासाहेब यांचे वेळचे यशल्यारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गी रावसाहेब व आपासाहेब भलें म्हणतील तें कर्म करावें! रायांनीं दौलतसुद्धां आम्हांस तुमच्या हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुम्हांस असावी. यश किंवा अपयश हें तुमचें तुम्हीं सांभाळावें!" म्हणून भाऊसाहेबांनीं सर्वांस पदर पसरून सांगितलें. तेव्हां होळकरादि सरदार यांनीं उत्तर दिलें कीं "आम्ही जीवित्वाची तमा धरीत नाहीं, महाराजांचें पुण्य आमचे मस्तकीं असतां इराणीची बिशाद काय? मारून गर्दीस मिळवून देऊं. आपण कांहीं चिंता न करावी." याप्रमाणें बोलून मुजरा करून आपआपल्या मिसलेस उभे राहिले.

पेशजी इराणीनें शुभ्रकुंजर भाऊसाहेबांस दिला होता तो ऐरावतातुल्य भयंकर, दुसरा शामसुंदर गज कज्जलप्राय शूरत्वांत आगळा रणरंगधीर, तिसरा गजाननबक्ष. हे तीन हत्ती शृंगारून आणून उभे केले. पंचरंगेंकरून चित्रविचित्र शुंडादंड मस्तकावर रेखिले व बादली पाखरा गजपृष्ठावर घालून सुवर्णमंडित पिंपळपानें, मुक्तलडांच्या झालरी व गळ्यांत रुप्याच्या घंटा व रुप्याच्या वांकीं, तोडर पायीं, रुप्यासोन्याच्या अंबाऱ्या हत्तीवर ठेवून चौफेर मोत्यांचे घोस लाविले. ते मदोन्मत्त वारण विलोकितां केवळ सुरेश्वराचे ऐरावत भासले. रणरंगधीर गजावर सदाशिवपंत भाऊ आरूढ जाहाले व गजानन बक्षावर खांसे विश्वासराव साहेब स्वार जाहाले, शुभ्रवर्ण गजबक्षावर जरीपटका ठेवला. तिसरी नौबत करवून, भीमाऐशी गर्जना करून खंदकपार जाहाले. पुढें बाणांच्या खोंचेचे तफावतीनें उभे राहिले; व संपूर्ण सरदार लहान थोर भाऊसाहेबांजवळ येऊन फिरून मुजरे केले. सर्वांचे मुजरे घेऊन सेनासमेत उभे राहिले. भाऊसाहेब यांनीं सारी सेना गोचर केली. तों फौज असंख्यात, नजर पुरेनाशी झाली. तेव्हां भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर यांस विचारलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं, "कोणते तऱ्हेनें सैन्याचा विभू रचावा? शत्रु आपले कब्जांत कोणते तऱ्हेनें आणावा? एकदांच चालून घ्यावें किंवा तीन टोळ्या कराव्या? कोणते टोळीस कोण नेमावा? याचा विचार सांगावा." त्यांवर मल्हारजी होळकर यांनीं विनंति केली कीं, "फौजेच्या तीन टोळ्या कराव्या." डावे बाजूस विश्वासरावसाहेब यांजकडे लोकांच्या नेमणुका जाहाल्या.

यशवंतराव पवार पंचवीस हजार फौजेनिशीं केवळ महाभारतींचा वीर, नामांकित, जगप्रसिद्ध, ज्याच्या पराक्रमाचा लौकिक वडिलोवडिलीं सरकार चाकरी करून संपादीतच आले. याप्रमाणें नामी नामी सरदार व धारकरी मिळोन एकंदर राऊत चाळीस हजार. शिवाय पायदळ इभ्रामखां गारदी यांजकडील, प्रमुख सफेजंग जमादार व हसनखां व फरदुल्लाखां व चंदूखां वगैरे गारदी लोक पंचवीस हजार व फूटपथके पांच हजार एकूण विश्वासराव साहेबांचे टोळीस फौज सत्तर हजार. दुसरी टोळी सदाशिवपंत भाऊ खांसे अंबारींत बसून (अंबारीच्या) खांबास नवरत्नाचे फर्श बांधिले कारण कीं, संपूर्ण वसुन्धरेचें राज्य करीन किंवा इंद्रपदींचें घेईन! अंबारींत बसतांच सर्व शरीर लाल झालें व नेत्रहि आरक्त झाले. त्यासमयीं भाऊ कसा भासला कीं केवळ कल्पांतींचा आदित्य! याप्रमाणें भयानक दिसूं लागला. त्या वेळेस कोणाच्यानेंहि पाहावेनासें झालें. हा केवळ कलियुगीं कर्ण जन्मला यांत संदेह नाहीं. सभोंवतीं फौज ५० हजारांचा गलोल घेऊन मध्यभागीं इराणीसमूर परम आवेशें उभे राहिले. तिसरी टोळी जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व समशेर बहादूर व किरकोळ पतके मिळोन साठ सत्तर हजार घोडेस्वार, याप्रमाणें जमाव करून उभे राहिले. याप्रमाणें तीन टोळ्या करून निशाणें सोडून, जुंभस न खातां उभे राहिले. श्रीमंत भाऊसाहेबांची स्त्री सौभाग्यवती पार्वतीबाईसाहेब व इतर सरदारांचे कबिले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व बुणगेबाजार यांचे संरक्षणास मल्हारराव होळकर दहा हजार फौजेनिशीं मागें ठेविले. हें पाहून इराणी, दुराणी व दिल्लीपति बादशहाकडील व सुजातदौले व मनसूरअली यांनीं आपले गोठ सोडून, फौजेचा पुस्तपन्हा राखून त्यांनींहि तीन टोळ्या करून, लढाई प्रसंगास खासा इराणी मध्यभागीं सत्तर हजार फौजेनिशीं व डावेकडे मनसूरअली चाळीस हजार फौजेनिशीं व उजवेकडे सुजातदौले व हस्तनापुरवासी इसाफतखां, येणेंप्रमाणें दीड लक्ष, फौजेनिशीं उभे राहिले. दोघे पुत्र मात्र पुढें आले होते त्यांचीं नांवें, एकाचें नांव तेजूरशहा व दुसऱ्याचें नांव नजीमखां. यांजवळ रोहिले यांची खांसी खांसी जमेत एकदिलाची होती. त्यांतून तेजूरशहा यांनीं पन्नास हजार फौजेनिशीं दिन् ! दिन् ! म्हणून नीट चालून घेतलें.

तेव्हां युद्धास तोंड लागलें. दारुण संग्राम जाहाला. हवद्यांस हवदे, राउतांस राऊत, एकमेळ जाहला; व सुतरनाले, बाण्याच्या कैंच्या व करोलाच्या गोळ्या व गरनाळा व तोफांचा मारा एकदांच जाहला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली. धुरेंकरून दिनमणीचा अस्त झाला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना. पुढचा पाय पुढें. कोणास कोणी हरेना. एकापरीस एक आगळे, इराणीची जात-अरबुज, आपपर म्हणावयाची नाहीं. महाबळी, महापराक्रमी, मोगल, पठाण, रोहिले, रांगडे व रजपूत व पंजाबी, बिलंदे, माळवी व काठेवाडी वगैरे नाना जातीचे, त्यांनीं संग्रामाची सीमा केली. बहूत मराठे-दळ खपलें. रक्तोदकाचे पाट रणभूमीस वाहूं लागले. बीभित्स शरीरें दिसों लागलीं. देहाभिमान कोणांत उरला नाहीं. चौफेर लढाईची बेहद्द होऊन गेली. थोरथोर अमीरांचे हौदे खालीं जाहाले. इराणी हांवभरी होऊन फिरून नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां मराठे फौज कच खाऊन माघारी सरली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें पाहातांच भाऊसाहेबांनीं फौजेसुद्धां आपला अंबारीचा हत्ती फौजेंत लोटला. तेव्हां डावी टोळी विश्वासरावसाहेबांची होती, ती बेजरब उठली. उजवेकडून जनकोजी शिंदे कमरग्यांत शिरून मोठी मारामार जाहली. शरसंधान अगदींच राहिलें. निमचे व समशेर चालूं लागल्या. तीन चार तासपर्यंत एकच घाई शस्त्रसंधानाची झाली. मुर्द्यांवर मुर्दे पडूं लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखनासे जाहाले. वीर रणांमध्यें माजले. रणमद चढला. खांशा खाशांचे हौदे एकास एक लागून जोरावारीनें लढों लागले. केवळ दशाग्री शताग्रीशीं मारूं लागले. ते समयीं सदाशिवपंत (यांणीं) अंबारींतून उतरून, दोहों हातीं पट्टे घेऊन, नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां नामी नामी सरदार व धारकरी नांवाबिना-वांचे यांणीं जीवित्वाची तमा न धरतां बेलाशक हैदोसच केला. कोणास क्षतें वर्मी लागलीं, ते विष्णुलोकास गेले. व कोणी रणांगणीं मूर्छित पडले. व कोणाचीं शिरें तुटोन धडांवेगळीं झालीं. व कोणाचीं उदरें फुटोन अंतरमाळा लोंबूं लागल्या. परंतु अणुमात्र कोणीं लढाईविषयीं कसर केली नाहीं. एकच गर्दी होऊन गेली. खांसे विश्वासराव साहेब अगदींच गर्दीत गर्द होऊन गेले. तेव्हां सदाशिवपंत पायउतारा होते ते घोड्यावर स्वार होऊन सैन्यांत मिसळले. मोठी तरवार करून विश्वासरावसाहेब अंबारीसुद्धां संभाळून माघारे आपले जमातींत पाठविलें. परंतु कायम आहेत किंवा वैकुंठवासी जहाले याचें वर्तमान पुरतेपणें लागलें नाहीं. आपण तसेच पुढें चालून गेले. तेथें नामी नामी लोक दोन हजार ठार पडलें. इराणीनें नामोहरम होऊन पाठ दिली.

त्या युद्धांत इकडील व तिकडील एकंदर चाळीस हजार लोक कामास आले. खेरीज केवळ जखमी लोक दहा हजार, याप्रमाणें युद्ध जाहालें. यामागें या कलियुगीं असा योद्धा कोणी जाहला नाहीं. पुढेंही होणें कठीण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारती युद्धासमान सदाशिवपंतांनीं युद्ध केलें. या कलियुगीं मानवाकृतींत ब्राह्मणकुळांत जन्म घेऊन पराक्रम थोर केला. धन्य त्यांची जननी कीं असा पुत्र प्रसवली! येणेंकरून सत्पुरुष उद्धरून विष्णुलोकास गेले. धन्य त्या पुरुषाचा पिता! त्यास साम्यता, दशरथाची, किंवा पंडूची! चिमाजी आपाची धन्य कीं हा पुत्र रामाप्रमाणें निर्माण जाहाला! हें युद्ध पाहून स्वर्गीं इंद्र व देवगण व गंधर्व स्तुती करूं लागले कीं मानवी होऊन, जातीचा विप्र असतां, प्रताप कर्णाप्रमाणें केला!! केवळ रामरावण यांच्या युद्धासमान युद्ध झालें. इराणीकडील लोक तीस सहस्र कामास आले व आठ हजार जखमी जाहाले. शिवाय घोडीं वीस हजार, उंटें सातशें व हत्ती दोनशें. येणेंप्रमाणें अमित्राकडील तळावर राहिले. भाऊसाहेबां-कडील नामी सरदार व धारकरी, एकांडे हुजरातीचे लोक वीस हजार ठार पडले. शिवाय उंटें पांचशें व घोडे पंधरा हजार व हत्ती नग सव्वाशें. ऐसा संग्राम जाहाला. मुख्य अबदल्लीचा पुत्र तेजूरशाह बहादर व नजीबखां वगैरे मातबर पठाण व रोहिले हक्क होऊन गेले. खांसे सुजातदौले यास चार जखमा जाहाल्या. इराणीचे फौजेनें शिकस्त खाऊन माघारी फिरली. अवसान अगदीं खत्ता जाहलें. भाऊंनीं सेनासहित पिच्छा पुरविला. आणि इराणीच्या गोटांत फौज नेऊन घातली. एकीकडे पठाणांची टोळी होती ती नेस्तनाबूद केली. सदाशिवराव भाऊ अभिनव यश पावले. आनंदसागरास पारावार नाहीं. शत्रू पराभवातें पावून, भाऊसाहेब व विश्वासराव साहेब उभयतां आपआपल्या अंबारींत बसून, महागर्जना करून रणतुरें व नौबती आणखी जयवाद्यें वाजवीत आपले गोटांत चालिले. एकच सिंहनाद झाला. त्यांची फौज शिकस्त खाऊन मागें गेली.

त्या संधींत मागें अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं आपले गोटांत तयारच होता. त्याचे पुत्र उभयतां लढाईत हक्क जाहाले, त्यांचें वर्तमान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रवण करून वाईटपणाचें ऐकतांच अबदल्ली यानें फौजेसहवर्तमान या अल्ला! या खुदा! या रहिमान! याप्रमाणें देवाचा धांवा करून, जीवित्वाचा संकल्प सोडून, एकदांच वाद्यें वाजवून फिरून सदाशिवपंतावर चाल केली. तेव्हां भाऊसाहेब यश संपादून आपले गोटांत जात होते. इतक्यांत शत्रू पाठीवर आला हें वर्तमान कळतांच महातास सांगून खाशांचे हत्ती माघारे फिरविले. तें संपूर्ण फौजेनें पाहून सर्व लढाईच्या प्रसंगें नीट चालिले. लढाई सुरू होतांच विश्वासरावसाहेब अंबारींतून तिरंदाजी करीत होते, एवढ्यांत कोणी दुष्टानें बंदुकीची जोडगोळी घातली. ती हृदयापार होतांच विश्वासरावसाहेब लागलेच वैकुंठवासी जाहाले. तेव्हां त्या महातानें व जो खवासखान्यांत चौरीबारदार होता त्यानें कमरेचा दुपेटा काढून, विश्वासरावसाहेबांस अंबारीचे खांबाशीं दृढ बांधून बसलेचे बसले तीरकमाणीसुद्धां तसेच ठेविले. पुढें लढाई होतच होती. या आकांताचें वर्तमान उजवे बाजूस भाऊसाहेब होते त्यांस विदित जाहालें.

नंतर भाऊसाहेबांनीं आपला अंबारीचा हत्ती खालीं बसवून, विश्वासराव-साहेब यांचे हत्तीजवळ जाऊन, तो हत्ती बसवून, रायाचें शरीर छिन्नभिन्न जाहालें होतें तें दृष्टीनें पाहून परम दुःख जाहालें. तें पत्रीं लिहिणारांची कल्पना कुंठित जाहाली. श्रीराम अयोध्यापूर सोडून वनवासास जावयास सिद्ध जाहाले, तें वर्तमान ऐकतांच दशरथानें कैकेयीच्या मंदिरांत अंतर्धान केलें, तसेंच भाऊसाहेबांस जाहालें. तेव्हां मल्हारजी होळकर यांस आज्ञा जाहाली कीं, "तुम्हीं पुण्यास जावें. बराबर आमचें कुटुंब व इतरांचे कबिले घेऊन जाऊन, श्रीमंत नानासाहेबांस व श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब यांस माझे साष्टांग नमस्कार सांगून विज्ञापना माझे तर्फेनें करावी, 'तुमचे चिरंजीव विश्वासराव साहेब व भाऊ-साहेब तीन लक्ष सेनेसहित इंद्रलोकीं सुखरूप आहेत, कांहीं चिंता न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावी. उभयतां वडिलांनीं आजपासून लोभ चिरंजीव माधवरावसाहेबावर करीत जावा. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचे हातून संपूर्ण शत्रू लयास जाणार. मीं परशुराम अवतार आणि चिरंजीव माधवराव साहेब केवळ अर्जुनाचा अवतार. आमचा संकल्प यांचे पराक्रमानें परिपूर्ण होणार. याप्रमाणें सांगितलेलें वर्तमान नानासाहेबांस व सौभाग्यवती वहिनीबाईस श्रुत करावें. कदाचित् शत्रूंनीं तुमचा पिछा पुरविला असतां आमच्या कुटुंबाचा शिरच्छेद तुम्हीं आपले हातीं करावा, परंतु शत्रूचे हातीं जिवंत लागूं देऊं नये.' तसेंच जनकोजी शिंदे यांस सदहू अन्वयें निरोपण जाहालें. शिंदे-मजकूर यांणीं उत्तर केलें कीं, "मी पुण्यास माघरा जावयाचा नाहीं. खावंद जर माघारें पुण्यास येतील तर मी जाईन. नाहींतर मी जेथें खावंदांचा जोडा पडेल तेथें माझें शिरकमल पडेल यांत तिळमात्र अंतर नाहीं." तें ऐकून समागमें स्वारीबरोबर गंगोदकाच्या कुप्या चालत होत्या त्या सदाशिवपंत भाऊंनीं आणवून, खालीं गाशा घालून, शेलापागोटें, जामानिमा, ढालतलवारसुद्धां सचैल स्नान करून एके कुपीचें उदक प्राशन केलें आणि उत्तर केलें कीं, आमचें पारणें जाहालें." मग मल्हारराव होळकर यांस रामराम करून. "आतां लोभ असों द्यावा" असें बोलोन हयपान घोडा अर्बी होता. तो आणवून वर स्वार जाहाले. एवढ्यांत होळकर वगैरे यांणीं विनंति केली कीं, "एवढे हट्टास पडावयाचें कारण नाहीं. आपण उज्जनीस साल मजकुरीं छावण्या कराव्या. पेस्तरसालीं शत्रू आपण पाहातच आहों. पुण्यास जावयाचीं खावंदास शरम वाटेल तर अलीकडे गंगा अथवा नर्मदा अथवा क्षिप्रा एवढ्या स्थळीं मुक्काम वर्ष सहा महिने करून, सर्व सरदार, घोडे, हत्ती व उंट व तट्टें, पायदळ व तोफखाना यांचे बैल व अवांतर सेना खाऊन पिऊन हुशार होऊन पेस्तरसालीं रूमशामची खबर घेऊं ! हिंदूचे मुसलमान होऊं परंतु छत्रपतींचें नांव राखूं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांत अंतर नाहीं ! आणि आपण कांहीं पदरचे सरदार यांचें ऐकत जावें. कारण पेशजी साष्टी, वसई कैलासवासी चिमाजी आपा यांनीं फत्ते केली. आणि प्रतिज्ञा मोठीच केली होती, परंतु चौघां सरदारांचे मतें कोणतीहि एकादी गोष्ट शेवटास नेत तसेंच आपण वर्तावें." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं "चिरंजीव विश्वासरावसाहेब गोळी लागून कामास आले. आतां आपण मोठा पराक्रम जरी करून पुण्यास गेलों तरी सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब माझें मुखावलोकन करणार नाहींत. कारण त्यांचे केवळ जिवाचे जीव विश्वासरावसाहेब ते लढाईंत पडले असतां त्या वडिलांचे भेटीस आपण जावें हें अयोग्य."

तेव्हां रावभाऊंनीं युद्धांत उडी घातली. पहिल्या लढाईच्या वेळेस सव्वा चार लक्ष फौज गणती लागली होती. त्या आलीकडेस सर्व सैन्य लढायांत खपून तीस सहस्र घोडा स्वार शिल्लक राहिला. त्यासुद्धां भाऊसाहेबांनीं उडी घातली. तेव्हां (भाऊ) केवळ कल्पांतींचा आदित्य भासला. ग्रीष्म ऋतूच्या दिवसांत मेघांचे ढग उठतात आणि विद्युल्लता चमकून लागलीच नाहींशी होते, त्याप्रमाणें भाऊसाहेबांनीं संग्रामांत उडी घातली ते समयीं सर्वांस दिसले. तिकडील खासा अबदल्ली व मनसूरअली व सुजातदौले इराणीकडील नादिरशाह, तंबूरशाह वगैरे उरल्या फौजेसहित त्यांनींहि उडी घातली. ते समयीं श्रीहरि त्या अमित्राकडील फौजेस सन्मुख जाहला. श्रीमंत पेशवे बहादूर यांस विन्मुख जाहला, याजमुळें सर्व नाश झाला.

हत्तीघोड्यांनीं व उंटतट्टांनीं संपूर्ण खंदक भरला. खंदक भरल्यावर जे लोक भिकारी होऊन अन्न अन्न करीत दुसरा वेश धरून पुण्यास आले ते आले. कितीकांचे तोतये जाहाले. हजारों हजार त्या कुरुक्षेत्रीं रण-मंचकीं निजलेच राहिले ! पुढें असा संग्राम होणें कठीण आणि अशा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यभूमीस मरणहि येणें कठीण. त्यांत धारातीर्थ! भाऊसाहेब केवळ परशुराम–अवतार, लढाईची या मृत्युलोकीं कीर्ति करून, मोठमोठ्या शत्रूंचीं पारिपत्यें करून, मरणकाळपर्यंत नानासाहेबांची आज्ञा न उल्लंघितां, दर रिकिबीस तरवार फत्ते करून, जन्मप्रभृती जय संपादून शके १६८२ विक्रम नाम संवत्वरीं मंगळवारीं पौष शुद्ध २ अवतार संपविला.

रघुनाथ यादव

परिचय

मराठ्यांच्या इतिहासावर अनेक जुन्या बखरी आहेत. त्यांत पानपतच्या युद्धावरील प्रस्तुतची बखर ही भाषेचा डौल, व रसभरीत वर्णनें यांविषयीं फार प्रसिद्ध आहे. वर घेतलेल्या उताऱ्यांत शेवटच्या साम-न्याच्या दिवसाची सकाळपासूनची हकीगत दिली आहे.

हें युद्धाचें वर्णन थोडेंसें पाल्हाळिक व अलंकारिक आहे. लेखकाचें सत्याकडे व तपशिलाकडे फारसें लक्ष्य नाहीं. त्याला युद्धाच्या कांहीं ठळक गोष्टी ऐकून माहिती होत्या, त्यांत बरीच भर घालून त्यानें अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलें आहे.

नवीन शब्द

१. चौकडा = कानांत घालावयाचा दागिना. २ तरकसकमाना = धनुष्यबाण. ३. निदानसमय = आणीबाणीचा अखेरचा प्रसंग. ४ सतीचें वाण घेणें = जिवावर उदार होऊन कार्यास प्रवृत्त होणें. ५ त्यापरती = याशिवाय. ६ रावसाहेब व अप्पासाहेब = बाजीराव व चिमाजी आप्पा. ७ यख्त्यारी = अखत्यार (अधिकार) असलेले अधिकारी म्हणजे सरदार. ८ रायांनीं (बाजीरावांनीं)...कैलासभुवनास गेले = गेलेचा अध्याहृत कर्ता ते याची विभक्ति प्रथमा परंतु "रायांनीं" याची विभक्ति वेगळी (तृतीया) असल्यानें आजकाल आपण 'ते' हा कर्ता मुद्दाम घालूं. पूर्वी हा नियम पाळीत नसत. ९ तमा = पर्वा. १० गर्दीस मिळविणें = धुळदाण करणें. ११ मिसल = दर्जा, जागा. १२ पेशजी = पूर्वी. १३ बादली पाखरा = बादली रंगाची,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेघाच्या रंगाची (निळसर काळी) झूल. १४ गोचर केली = पाहिली. १५ धार-करी = तलवारीनें लढणारे शिपाई. १६ राऊत = घोडेस्वार. १७ इब्राहिमखान गारदी = हा इमानी मुसलमानी सरदार मराठ्यांच्या तोफखान्याचा मुख्य होता. १८ फूटपथके = पायदळ. १९ गलोल = गोफण. २० पतके = पथक म्हणजे सैन्याची एक टोळी तिचा मुख्य तो पतक्या. २१ जुंभस = हालचाल न करतां, कच न खातां. २२ कविले = बायकामुलें. २३ बाजारबुणगे = मराठ्यांच्या सैन्याबरोबर लढवय्याशिवाय इतर हजारों लोक असत. शिपायांनीं लढाई केली म्हणजे हे बुणगे लूट करावयाला पुढें होत. २४ पुस्तपन्हा = पाठराखण, सहाय्य. २५ जमेत = जमात, टोळी. २६ सुतरनाले = उंटावरच्या तोफा. गरनाळे = तोफा; करोल = बंदुकस्वार. २७ उमास = श्वास, विसावा. २८ अरबुज = अडाणी, रानटी. २९ हावभरी होणें = फाजील हांव सुटणें. ३० कमरगा = सैन्याचा मध्य. ३१ पट्टा = दुधारी लांब तलवार. ३२ अंतरमाला = आंतली आंतडीं. ३३ कामास आले = मेले. ३४ अमित्र = शत्रु, -दुराणी. ३५ एकांडा = कोणाहि सरदाराच्या पथकापैकीं नसलेला, स्वतंत्र; जो मनुष्य कोणाच्या पक्षांत सामील न होतां एकटाच स्वतःच्या मताप्रमाणें व मर्जीप्रमाणें कार्य करितो त्याला 'एकांडा शिलेदार' म्हणतात. ३६ हुजुरात पागा = हुजूर म्हणजे मालक स्वामी पेशवे त्यांची खास निवडक घोडेस्वारांची टोळी, हिला जरीपटका नेण्याचा मान असे. ३७ खवासखाना = खवास म्हणजे हुजऱ्या, अंबारींतील हुजऱ्या बसावयाची मागची जागा. ३८ पेस्तरसालीं = पुढच्या सालीं. ३९ रूमशाम = रूम हें सध्यांचें तुर्कस्थान व शाम हें हल्लीचें सीरिया. ४० हक्क होऊन गेले मेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९

ऐरण

घाव घालुनी पहा एकदां सोशिल सारे घण
माझ्या हृदयाची ऐरण !
दुःख येउनी कधीं हिच्यावर कपाळ घे फोडुनी !
कण्हतसे शोकगीत ऐरण.
हर्षबाल खिदळुन करितसे स्वैर कधीं नर्तन;
नादती मंजुळ नृत्यस्वन.
कुणी कधीं येऊनी घाला येथें घण;
सौंदर्य–ज्योतिचे उडतिल तेजःकण !
या अशा कणांचे गीत–हीर बनवुन,
घाव घालितां, हार हिऱ्यांचा तुम्हालाच अर्पिन !
असली माझी ही ऐरण !

अनंत काणेकर

परिचय

ही एक लहानशी अकरा ओळींची कविता आहे. एकाच कडव्याचें गाणें आहे. पण त्यांत एक रूपक पूर्ण वठवलें आहे. लोहारांची किंवा सोनारांची ऐरण असते त्यावर घणाचे घाव घालून उपयोगी वस्तु किंवा सुंदर अलंकार बनवितात. घणाचे घाव ऐरणीस सोसावे लागतात. आणि त्या यातना सहन करून ती ऐरण लोकांना अलंकाराची प्राप्ति करून देते; कवि म्हणतो माझें हृदय ऐरणीसारखें आहे. माझ्या हृदयावर कुणी घाव घातले तरी सौंदर्याचे कण उत्पन्न होतील. त्या कणांचीं मी सुंदर गाणीं बनवीन आणि त्या गाण्यांच्या हिऱ्याचा हार मी त्या घाव घालणाऱ्यांनाच देईन ! कवींचीं गाणीं कशीं उत्पन्न होतात तें पाहा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही कल्पना तर उदात्त आहेच, पण आतां कवितेंतील दुसऱ्या कल्पना पाहा ! यांचें नेहमींच्या ऐरणीशीं कांहींच साम्य नाहीं. दुःख कपाळ फोडून घेतें त्यावेळीं ऐरण शोकगीत गाते. हर्ष नाचतो तेव्हां ऐरणहि नाचाचे सूर काढते. काय म्हणाल तुम्ही अशा हृदयाला ?

अभ्यास

१. घाव या शब्दाचे भिन्न भिन्न अर्थ सांगा. या कवितेंत हा शब्द कां वापरला आहे ?

२. मायदेवांची '**घे कुठार**' व प्रस्तुत '**ऐरण**' यांची भाषा, रस, मध्यवर्ति कल्पना या दृष्टीनें तुलना करा.

२०

हरवली म्हणून सांपडली !

अशा वेळीं अगदीं मनस्वी संताप येतो, नाहीं का ? आणि वाटायला लागतें, कीं जगांत मुद्दामच अशा कांहीं द्वाड शक्ति लपून बसल्या आहेत, कीं, ज्यांनीं माणसाची उगीचच्या उगीच खोडी काढावी आणि आपल्या गुप्त जागेवरून त्याची मौज पाहून कुत्सितपणें हंसावें !

तुम्ही कांहीं म्हणा, माझी तर या खोडकर द्वाड शक्तींच्या अस्तित्वा-बद्दल अगदीं पुरी खात्री आहे. नाहींतर त्या दिवशीं माझ्या टेबलाच्या खणाची किल्ली हरवावी याला कांहीं कारण !—

माझ्या अंगीं इतर सद्गुण असोत वा नसोत, व्यवस्थितपणा तरी माझ्या स्वभावांत खास आहे. हा गुण मला कोणीं शिकविला आहे असेंहि नाहीं; किंबहुना गुण किंवा अवगुण माणसाच्या ठिकाणीं शिकवणुकीनें कितपत उत्पन्न होतात याविषयीं मला शंकाच आहे. बालसंगोपन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बालशिक्षण वगैरें विषयांवर ठरीव सांच्याचे लेख लिहिणारी मंडळी या ठिकाणीं माझ्याशीं कदाचित् भांडायला उठतील व मोठमोठे फिरंगी ग्रंथ हातीं घेऊन ते मला वेडावतील. पण माझ्याहि-जवळ मानसशास्त्र व सारासार विचार नांवांचे भक्कम काष्ठदंड आहेत! पण तें असो. मला सांगायचें होतें येवढेंच कीं, टापटीप व व्यवस्थितपणा माझ्या अंगीं भरपूर आहे, व त्यामुळें माझी किल्ली हरवली, ती मी कोठें तरी निष्काळजीपणानें टाकली म्हणून हरवली असें म्हणतां यायचें



प्रो. ना. सी. फडके

नाहीं. ती मी नेहमीं खुणेनें ठेवीत असें, व ती मला अंधारांतसुद्धां नेमकी घेतां येत असे. परंतु आज ती त्या खुणेच्या जागीं दिसेना, आजूबाजूसहि सांपडेना, घरांतल्या किल्ल्यांच्या जुडग्यांतहि मिळेना, साऱ्या कोटांचे व ओव्हरकोटाचेसुद्धां खिसे तपासले तरी गवसेना!

मला तर ती अतिशय निकडीनें हवी होती. इंग्लंडला गेलेल्या एका मैत्रिणीला मला पत्र धाडायचें होतें. अगदीं अभ्यंतरांतल्या मित्रांना किंवा मैत्रिणींना पत्र पाठवायचें म्हणजे तो आपल्या भाग्याला आलेला एक रम्य विलास होय असें मीं समजतों. प्रत्येक मित्रासाठीं किंवा मैत्रिणीसाठीं मीं स्वतंत्र रंगाचे, आकाराचे आणि सुवासाचे नोटपेपर योजिलेले असतात, व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांवरच पत्र लिहिण्याचा मी अगदीं कटाक्ष ठेवतों. हे नोटपेपर ज्या खणांत होते त्याचीच किल्ली हरवून बसली. आज शुक्रवार, विलायतचें टपाल धाडायचा अखेरचा दिवस होता. आजची डाक टळली, कीं आठ दिवस थांबणें प्राप्त होतें. आधींच माझ्याकडून त्या मैत्रिणीला पत्र धाडण्यांत जरा चालढकल झाली होती. त्यांत आणखी एका आठवड्याची भर पडली, कीं तिचा माझ्यावर किती रोष होणार तें मला स्पष्ट दिसत होतें.

सारांश, आज पत्र लिहिणें तर अगदीं अगत्याचें होतें. ठरीव नोटपेपरा-खेरीज पत्र लिहावयास मी तयार नव्हतों, आणि ज्या खणांत नोटपेपर होते त्याची किल्ली तर कांहीं केल्या सांपडेना ! ती आपल्या ठरीव जागीं नव्हती, आणि मीं ती दुसऱ्या कोठें ठेवल्याचेंहि मला कांहीं केल्या आठ-वेना. एकादी गोष्ट आठवेनाशी झाली कीं तिच्या आठवणीच्या खटपटीस बसायच्या ऐवजीं जरा वेळ तिचा विचार अजिबात मनावेगळा करावा म्हणजे आपोआप ती एकदम आठवते असें कोठेंसें वाचलें होतें. म्हणून तसा प्रयोग करून पाहिला; परंतु किल्लीचा विचार थांबावयाच्या माझ्या प्रयत्नानें तो विचार उलट अधिकच डिंवचला जाऊं लागला. शास्त्रीय सिद्धांत पुस्तकांतच शोभतात, व्यवहारांत वापरूं नये म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

आतां काय करावें ? कुलूप फोडावें काय ? त्या अत्याचारी मोहाला मी बळी पडलों असतों; पण तितक्यांत मला आठवलें कीं, जी किल्ली सांपडत नव्हती तिची एक जोडकिल्ली टेबल घेतलें त्या वेळीं मला मिळाली होती. माझ्या मधल्या माडींत भिंतीच्या अंगचें एक लहानसें बंदिस्त फडताळ होतें त्यांत मीं ती जोडकिल्ली टाकली असावी असेंहि मला खात्रीनें वाटलें. कारण त्या फडताळाचा मी एखाद्या कोठीसारखा उपयोग करीत असें. माझ्या लिहावयाच्या टेबलांतल्या खणांत ठेवण्यासारखें जें जें नसे तें तें मी या फडताळांत टाकून देई. केव्हां तरी कांहीं निमित्तानें लागणारें असें जें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जें मला वाटे तें तें चटकन् या फडताळांत ठेवायची माझ्या विद्यार्थिदशे-पासून मला संवय झाली होती. माझ्या वाचण्याच्या, ऐकण्याच्या किंवा विचारांच्या ओघांत कांहीं चांगलें सांपडलें, कीं एका टांचणबुकांत त्याची नोंद करावयाची जशी मला संवय झाली होती तशीच ही संवय होती. कांहीं चांगलें वाचलें, ऐकलें किंवा सुचलें, कीं तें त्या बुकांत लिहिल्याशिवाय मला चैन पडत नसे. आपण कधीं हें बुक उघडून पाहातहि नाहीं, मग हें टांचण करण्यांत शोभा ती काय असें प्रत्येक वेळीं माझ्या मनांत येई; पण तें क्षणभरच. आणि मी काय लिहावयाचें तें लिहून टाकीत असें. तद्वतच त्या फडताळांत कांहीं ठेवायला लागलों, कीं मला वाटे, काय येथें ठेवून उपयोग ?—आपण कधीं यांतली वस्तु मुद्दम शोधून काढून वापरणार आहोंत थोडीच ! पण एकीकडे असें मनांत येई, तर दुसरीकडे जिवाला राहवत नसे व काय ठेवायचें तें फडताळ उघडून त्यांत टाकून दिलें म्हणजेच मला बरें वाटे !

म्हणून मी उठलों आणि तें फडताळ उघडून पाहूं लागलों.

पण बोलूनचालून मन मानेल तशा टाकलेल्या वस्तूंची जागा ती ! तेथें मला ताबडतोब हवी ती किल्ली थोडीच दृष्टीस पडणार ! ती झट्कन् दिसावी म्हणून अस्ताव्यस्त पडलेल्या त्या साऱ्या वस्तु मी अधीरतेनें इकडल्या तिकडे व तिकडल्या इकडे करूं लागलों. किती नाना प्रकारच्या वस्तु होत्या त्या ! जुन्या चांदीच्या दौती, जुने कंगवे, उन्हांत घालायचे चष्मे, शर्टचीं बटणें, फाउन्टन पेनच्या पोकळ नळ्या, कॅलेंडरवरचीं भडक रंगांतलीं चित्रें, टेबलावर चित्रें उभीं ठेवण्याच्या गंजलेल्या फ्रेमी, लग्न-मुंजीच्या किंवा समारंभाच्या निमंत्रणांचीं सोनेरी शाईंत छापलेलीं जाड कार्डें, कंपासपेटींतील चार—दोन सुटीं उपकरणें—अशा असंख्य वस्तूंचा गोंधळ त्या जागीं झाला होता; व प्रथम जरी मीं निर्विकार मनानें त्या उपसल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व चाळवल्या तरी हळुहळू त्यांतल्या कित्येक वस्तूंशीं निगडित झालेली आयुष्यांतल्या त्या प्रसंगांची व वृत्तींची आठवण मनांत उभी राहून माझ्या अंतःकरणांतहि अनेक भावनांचा गोंधळ दाटल्यासारखें मला वाटलें !

त्या पसाऱ्यांत दोन अलगुजें पडलीं होतीं. आज जवळ जवळ पंधरा वर्षांत मी त्यांस शिवलों नव्हतों. या वयांत मी अलगुज वाजवीत बसलों तर लोक हंसतील. मी लोकांच्या हंसण्याला किंवा टीकेला भीक घालणारा नाहीं. पण माझी संगीताची आवड व समजूतहि आतां अशी राहिली नाहीं, कीं अलगुज वाजविण्यांत माझें मन रमावें. पण तीं अलगुजें मीं घेतलीं तेव्हां तीं मला किती प्यार होतीं ! संगीतसुंदरीची व माझी पहिली जानपछान त्यांनींच करून दिली. माझी वृत्ति त्यावेळींहि अतिशय संगित-लुब्ध होती. पण वडिलांचा धाक व विद्यार्थ्यांची मर्यादा संभाळून मला जास्तींत जास्त धीटपणा करतां येण्यासारखा होता तो एवढाच कीं, दोन रुपयांत मिळणारीं विलायती अलजुगें आणून तीं वाजवावीं. आणि त्या टीचभर बांसऱ्यांनीं त्या काळीं माझ्या जीवनांत कितीदां तरी उन्मत्त आनंद ओतला होता. माझ्याबरोबरच्या वसतिगृहांतल्या विद्यार्थ्यांच्या मतें मी बांसरी चांगली वाजवीत असें, आणि—हाय रे, नवयौवनांतला तो गमतीचा आत्मविश्वास !—मलाहि वाटे मला चांगलें वाजवितां येतें. म्हणून कधीं खेळ आटपल्यावर तिन्हीसांजा, तर कधीं जेवण झाल्यावर रात्रींच्या प्रहरीं चांदण्यांत आम्ही टेंकडीवर जात असूं, व मी तेथें बांसरीवर जें जें येत होतें तें तें वाजवीत असें. एकदां आम्ही नोव्हेंबरमध्यें परीक्षेसाठीं मुंबईस गेलों. परत येतांना मुंबईहून पहाटे चारला निघणारी एक गाडी त्या वेळीं असे त्या गाडीनें निघालों. तेव्हां गाडी सुटल्यापासून मित्रांच्या आग्रहा-वरून बांसरी वाजवावयास मीं सुरवात केली; व मधून गप्पा व मधून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझें एक गीत, असा क्रम किती तरी वेळ चालू होता. गाडी सारे बोगदे ओलांडून ऐन घाटमाथ्यावर चढली तेव्हां एकीकडे मोठ्या उन्मादानें मी बांसरींतून गीताच्या स्वरमाला काढीत होतों, व एकीकडे साऱ्या दऱ्याखोऱ्या आणि पर्वतावरची नेहमीं दिसणारी वृक्षराजी लुप्त करून दशदिशा व्याप्त करणाऱ्या धुक्याच्या अफाट, तरंगत्या समुद्राची अरुणोदयाच्या प्रकाशानें उजळलेली शोभा मी नेत्रांनीं लुटीत होतों. त्या घटकेला मुग्ध आनंदाचे जे शहारे माझ्या अंगभर उठले त्यांचें शब्दांनीं वर्णन करूं पाहाणें व्यर्थ होय! आणि गतकालांतल्या अशा किती तरी आनंदाच्या घटका तीं अलगुजें पाहून मला या वेळीं आठवल्या. तीं मीं हातीं घेतलीं, कांहीं वेळ त्यांकडे पाहात राहून तशींच धरलीं व मग बाजूस ठेवलीं.

तेथें चार पांच चांदीचीं व सोन्याचीं पदकेंहि पडलीं होतीं. त्यांतलीं दोन मला कॉलेजांत असतांना वक्तृत्वनैपुण्याबद्दल मिळालीं होतीं. त्या वेळीं मी काय बोललों असेन तें आज आठवणें शक्य नव्हतें हेंच बरें. कारण तें आठवतें तर माझें मलाच हसूं आलें असतें. खचित् मीं एकाद्या उद्धटासारखी कांहींतरी वाचाळपंचविशी केली असेल, आणि त्या पारितोषिकांवरून माझ्या नैपुण्यापेक्षां देणाऱ्याच्या अंतःकरणांतल्या कौतुकाचाच बोध लोकांना झाला असेल. परंतु तीं पदकें मला जेव्हां मिळालीं तेव्हां त्यांनीं माझ्या हृदयांतल्या केवढ्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेचें समाधान केलें होतें व मला केवढा हर्ष प्राप्त करून दिला होता! आज तीं सुवर्णपदकें जुनीं होऊन विटलीं होतीं. पण जेव्हां तीं मिळावीं म्हणून मी झटलों तेव्हां माझ्या वांछेमुळें अधिकच वाढलेली त्यांची कान्ति किती अलौकिक होती! त्यांच्या प्राप्तीसाठीं केलेल्या श्रमांत ईर्षा, तळमळ, विश्वास, भीति, आशा, शंका यांच्या विचित्र संमिश्रणाचें केवढें सुख मीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवलें होतें ? भाषण मनाशीं जुळवून अगर कागदावर टिपून तें शेवटीं सफाईनें यावें म्हणून त्यांतलीं संकेतस्थळें मीं मनांत कितीदां जपून सांठविलीं होतीं. कधीं कधीं भरसभेंत उभें राहिल्याची कल्पना करून, जुळविलेलें भाषण कोठें तरी एकान्तांत करीत त्याचा सभेवर होणारा परिणाम माझा मींच अजमाविला होता. त्या वेळीं वक्ता व श्रोता या दोन्ही भूमिका मी एकदम केल्या होत्या आणि वक्त्याचा अभिनिवेश आणि श्रोत्याची तन्मयता हीं एकाच वेळीं अनुभवतांना माझें चित्त थरारलें होतें. सभेंत करावयाच्या भाषणाची मनाशीं सतत जुळवणी व उजळणी करीत असूनहि कसलीच तयारी न करतां बोलण्याची संपादणी मीं कितीदां तरी केली होती. व त्या त्या वेळीं साऱ्या जगापासून कांहींतरी गुपित लपविण्याचा जो एक सूक्ष्म आनंद असतो त्याचा मनसोक्त प्रत्यय मीं घेतला होता. आणि कधीं प्रात:काळच्या अगदीं पहिल्या किंवा संध्याकाळच्या अगदीं सरत्या घटकेची शांतता व एकान्त साधून, उंचवट्याच्या उघड्या जागीं जाऊन, सुराची उंची आणि वाणीची स्पष्टता साध्य करण्यासाठीं खड्या आवाजांत मी ओरडलों होतों. मोकाट माळावरच्या त्या बिनप्रेक्षकांच्या भाषणांतला आल्हाद और असे. डोंगरावरच्या शिला, वृक्ष व पक्षी आणि रानवारा किती तन्मयतेनें माझें भाषण ऐकत, आणि कोणाची भीडमुर्वत न ठेवतां आपल्याच रंगांत खळाळत वाहाणाऱ्या जलौघाच्या वृत्तीनें त्या ठिकाणीं उंच सुरांत बोलतां बोलतां आपणहि या सृष्टीचे एकरूप अंशच आहोंत असा विलक्षण सुखाचा भास मला कित्येक वेळां होई. डोंगरावर जाऊन त्या सुखाचा अनुभव मला आतां कोठला घेतां येणार ?—तीं चांदी-सोन्याचीं पदकें पाहून निदान त्या सुखाची गोड आठवण तरी मला ताजी करून घेतां येण्यासारखी होती, व तसें मनसोक्त केल्यावरच मीं तीं हातचीं खालीं ठेविलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फडताळांतल्या त्या पसाऱ्यांत एक कुत्र्याच्या गळ्यांत घालायचा धातूचा पट्टाहि होता. माझी ‘जाई’ नांवाची एक लाडकी कुत्री होती तिचा तो होता. मी बारा तेरा वर्षांचा होतों तेव्हां एका वैदूजवळून एका भाकरीवर विकत घेऊन मी ती बाळगली होती. माझ्या आईबापांना किंवा घरांतल्या कोणाहि वडील माणसांना ती आवडत नसे; पण माझ्या मतें ती फार गोजिरवाणी आणि हुशार होती. घरांतलीं माणसें तिला घाण समजत; पण मला ती अस्वच्छ कधींच वाटली नाहीं. मी तिला अंगाखांद्यांवर घेत असें, तिचें पटापट मुके घेत असें आणि तिला पांघरुणांत घेतल्याशिवाय दूर निजणें माझ्या जिवावर येई. मी शाळें-तून परत येतांच शेपटी हालवून व माझ्या अंगावर उड्या घेऊन ती आपला जीव कासावीस करी. एकदां गणिताच्या मास्तरांनीं मला छडी मारली होती, व छडीचा तो मला पहिलाच अनुभव असल्यानें घरीं आलों तों हातावर अजून तें दुःख आहेसें मला वाटत होतें व मन तर त्या अपमानानें जळत होतें. पण घरीं येतांच जाईनें आपल्या भाबड्या जिभेनें जेव्हां माझा तळहात अधाशासारखा चाटला, तेव्हां माझें मानसिक व शारीरिक सर्व शल्य पार नाहींसें झालें. जाईला दिल्याशिवाय मीं कधीं कांहीं खाल्लें नाहीं कीं प्यायलों नाहीं; व त्याबद्दल वडीलधाऱ्यांनीं रागाचीं कितीहि बोलणीं केलीं तरी तीं मला अवघड वाटलीं नाहींत, पण जाई फार दिवस मला लाभली नाहीं. पहिल्याच खेपेस वीत असतांना तिला काय झालें कोणास ठाऊक, तिचें प्राणोत्क्रमण झालें. शेवटच्या क्षणीं तिनें पाण्यानें भरलेल्या डोळ्यांनीं माझ्याकडे जी केंविलवाणी दृष्टि टाकली ती मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. तिचें शव नेलें तेव्हां मीं रडून आकान्त केला व तिची एक आठवण म्हणून तिच्या गळ्यांतला पट्टा काढून ठेवला. आज तो पट्टा हातीं घेतांच या साऱ्या आठवणी माझ्या मनांत उचंबळून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आल्या आणि नवल असें कीं, त्या इमानी, मुक्या जनावराच्या त्या अखेरच्या शोकपूर्ण कटाक्षाची आठवणहि मला सुखाचीच झाली. गतदु:खाच्या आठवणीपासून सुखाचाच अनुभव मिळतो हें कांहीं खोटें नव्हे.

त्या फडताळांतल्या किती वस्तूंनीं माझ्या आयुष्यांतले सुखदु:खाचे किती प्रसंग माझ्या दृष्टीपुढें उभे केले तें किती सांगावें ? जणुं माझ्या चरित्राचें एक पुस्तकच माझ्या हातीं आलें होतें व त्यांतील प्रकरणामागून प्रकरणें मी वाचीत राहिलों होतों. तीं प्रकरणें वाचतांना मला जो विलक्षण आनंद झाला त्याला दुसरी कसली उपमाच देतां येणार नाहीं. माझी टेबलाच्या खणाची किल्ली हरवली खरी, पण या केवढ्या सौख्यागाराची किल्ली मला सांपडली ? किंबहुना, ती हरवली म्हणूनच ही सांपडली !

ना. सि. फडके

परिचय

हा एक निबंध आहे. कदाचित् तुम्हांला ओळखतां येणार नाहीं; कारण तो नवीन प्रकारचा निबंध आहे. निबंध म्हटला म्हणजे 'मितव्यय' 'नियमितपणा' वगैरे भाववाचक नामें किंवा गाई, घोडा, सिंह, हत्ती इत्यादि प्राणी अशा ठराविक विषयांची तुम्हांला संवय झालेली असते. निबंधाची मांडणीहि तशीच ठराविक: आधीं व्याख्या, मग "आतां आपण या विषयाचा विचार करूं" ही ठराविक प्रस्तावना, मग फायदे–तोटे, शेवटीं उपसंहार या सांच्यांत सारे विषय मारून्-मुटकून बसविण्याची वहिवाट आहे.

नवीन निबंधांत तें कांहीं नाहीं. ठराविक असे कोणतेच विषय नाहींत. कोणताहि विषय चालतो. याच निबंधाचा विषय टेबलाची हरवलेली किल्ली हा आहे. निबंध म्हणजे कोणत्याहि महत्त्वाच्या किंवा कमी महत्त्वाच्या विषयावर लेखकाच्या मनांत जे विचार व भावना येत असतील त्यांना नीट जमवून त्यांची सुंदर कलात्मक व मनोवेधक मांडणी करावयाची; अर्थात् आपल्यापैकीं प्रत्येकाचे त्या त्या विषयावरील विचार व भावना या वेगळ्या असणार व शिवाय त्यांची सुंदरपणें मांडणी करावयाची तऱ्हाहि प्रत्येकाची वेगळी असणार– निदान असावयास पाहिजे. रामाच्या निबंधांत रामाचें रामपण, त्याचे विचार व भावना, त्याची मांडणीची खुबी दिसावयास हवी. रामा, गोविंदा, गोपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सगळ्यांच्या निबंधांत शिक्षकाचे किंवा निबंधावर पुस्तक लिहिणाऱ्या एकाद्या लेखकाचे विचार व मांडणी असतां कामा नये.

या दृष्टीनें **प्रो. फडक्यांचा** हा निबंध पाहा. विषय किती साधारण, क्षुद्र आहे पण त्याच्या निमित्तानें लेखकानें किती सुंदर विचार प्रगट केले आहेत! मांडणी पाहा, निबंधाची सुरवात पाहा. 'अशावेळीं अगदीं संताप येतो' कोणची वेळ, त्या वेळीं कोण बोलत आहे, त्याला संताप येण्यास काय कारण झालें हें आधीं न सांगतां एकाएकीं नाट्यपद्धतीनें निबंधाला सुरवात करून **फडके** आपलें लक्ष कसें वेधून घेतात पाहा. लेखक स्वतःच्या विचारांत गुंग झाला आहे अशी सर्व निबंधाची मांडणी आहे.

अभ्यास

१. या लेखांत कांहीं विनोदस्थळें आहेत तीं शोधून काढा व तो विनोद-प्रसंग कोट्या, श्लेष, कल्पनेची चमत्कृति यांपैकीं कोणत्या कारणानें साध्य झाला आहे तें सांगा.

२. लेखकाच्या या निबंधांत मुख्य हेतु काय आहे? हरवलेल्या किल्लीच्या शोधाची माहिती देणें हा हेतु आहे काय?

३. लेखाला असें नांव सुचवा कीं निबंधाची मध्यवर्ती कल्पना त्यांत व्यक्त होईल.

४. अधोरेखित वाक्यांचे अर्थ द्या.

५. या निबंधांत कोणतीं सुंदर स्थळें तुम्हांला आवडलीं? त्या त्या स्थळीं सौंदर्य, भावना, कल्पना किंवा शब्दचमत्कार यांपैकीं कोणकोणतीं कोण-कोणत्या कारणानें साध्य झालीं आहेत?

६. खणपटीस बसणें, विचार मनावेगळा करणें, अभिनिवेश, और, जानपछान, तिन्हीसांजा यांचे अर्थ द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१

अजात व अज्ञात मित्रांप्रत !

(राग–**जोगी**)

पांखरूं पंजरीं फडफडतें !
आदळे पंख शिर आपटतें !
वर्तमान ! तव अजस्र कारा
कुठुनि निघाया न दिसे थारा !
बाहेरिल नच फिरके वारा !
आंतल्या आंत मन हें कढतें ! पांखरूं० ॥ १ ॥

भविष्याचिया दूर कड्यांवरि !
सखे घुमविती मंजुळ बांसरि !
अंधुक मंदचि येति लकेरि !
भडभडे ऊर ! मन तडफडतें ! पांखरूं० ॥ २ ॥

अजात हो अज्ञात सखे जन !
जेव्हां तुमची होय आठवण !
विसरे मन भिंतीचें वेष्टन !
शिर भिंतीवर निघतां फुटतें ! पांखरूं० ॥ ३ ॥

हृदयाच्या माझ्या आकाशीं
आंतिल सूर्याचिया प्रकाशीं
तुमच्या छाया पडतां त्यांशीं
कुजबुजे, गमे, मन ! बडबडतें ! पांखरूं० ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या कुजबुजिच्या अंधुक ताना
शतकांतुनि का रिघतिल काना ?
डोलवाल का सांगा माना ?
का स्मराल मन जें धडपडतें ? पांखरूं० ॥ ५ ॥

भा. रा. तांबे

परिचय

ही कविता 'अजात व अज्ञात' म्हणजे अद्याप न जन्मलेल्या व म्हणून ज्यांचा परिचय झाला नाहीं अशा मित्रांना उद्देशून कवीनें लिहिली आहे. हे मित्र म्हणजे कवि मेल्यावर त्याच्यामागून ज्या असंख्य नव्या पिढ्या महाराष्ट्रांत जन्म घेतील त्या. मित्र म्हटला म्हणजे आपल्या बरोबरीचा, समकालीन असतो. परंतु कवीचें प्रेम अमर्याद, अनंत असतें. त्याला आपल्यामागून शेंकडो वर्षें जन्माला येणारे लोकहि मित्र वाटतात.

कवि स्वतःला पिंजऱ्यांत कोंडलेला पक्षी, चार भिंतींच्या आंत जखडून ठेवलेला कैदी समजतो. हा पिंजरा, या चार भिंती म्हणजे–वर्तमानकाळ–त्याचें या जन्मांतलें आयुष्य! त्याला आपल्यामागून वर्तमानकाळाच्या पलीकडे जें कांहीं होणार आहे तें डोकावून पाहाण्याची विलक्षण उत्सुकता व तळमळ वाटते. पण जरा प्रयत्न केला म्हणजे पिंजरा आड येतो, भिंतीवर डोकें फुटतें. कदाचित् ही भिंत म्हणजे मृत्यु असूं शकेल.

चौथें कडवें किती सुंदर आहे पाहा. कवि म्हणतो, "जरी चार उंच उंच भिंतीच्या आड मी असलों व म्हणून गडे हो! मला तुम्ही दिसत नसलां, तुमचें गोड नवें गाणें मला ऐकूं येत नसलें तरी मला माझ्या हृदयाच्या आकाशावर प्रतिभारूपी सूर्याच्या प्रकाशांत तुमच्या–भविष्यकाळीं महाराष्ट्रांत वावरणाऱ्या आणि गाणाऱ्या लोकांच्या–अंधुक छाया पडलेल्या दिसतात. त्या छायांशींच माझ्या या कविता मी कुजबुजतों. माझ्या अजात मित्रांनो! तुमच्या छायांबरोबर केलेली ही कुजबुज प्रत्यक्ष तुम्ही जन्माला आल्यावर तुमच्या कानीं पडेल का हो? तुम्हांला माझी आठवण येईल? १९२० सालीं तुमच्या छायेशींच बोलणाऱ्या या कवीवर २०२० सालीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१२० सालीं, २२२० सालीं तुम्ही प्रेम कराल ? मी भविष्यकाळाच्या स्वप्नांत गुंग होऊनच वर्तमानकाळ विसरून काव्यें लिहिलीं पण–पण तो भविष्यकाळ जन्माला येईल त्यावेळीं त्यावेळच्या महाराष्ट्राला माझी आठवण राहील काय ?"

कल्पनेच्या काय ह्या दांडग्या भराऱ्या ! या कल्पनांना साथ देतांना डोकें फिरूं लागतें, नाहीं ? पण घाबरूं नका; हा परिचय शांतपणें वाचा व मग कविता वाचा–म्हणा, परत ' परिचय ' वाचा म्हणजे कविता समजेल.

अ भ्या स

१. कारा = तुरुंग. वर्तमान = वर्तमानकाळ, जन्ममृत्यूच्या मधला काळ. हा जन्म. रिघणें = प्रवेश करणें. भविष्याचे कडे = भविष्यकाळीं जन्माला येणाऱ्या लोकांची परिस्थिति.

२. पक्षी वगैरे शब्दांऐवजीं ' पांखरूं ' हा शब्द असहायता, दुर्बलता, लघुता दाखविण्यास योजला आहे. हें पांखरूं कोण ?

३. कड्यावर उभे राहून गोड बांसरी वाजविणारे कोण ? त्यांना कवि ' सखे ' कां म्हणतो ?

४. सध्यां म्हटलेल्या गाण्याच्या ताना शेंकडों वर्षांचा प्रवास करितां करितां ' अंधुक ' बनतात म्हणजे काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२

मृगजळांतलें कमळ

'मीनाताई कोंकणांत येणार आतां माझ्याबरोबर?'

दादांच्या मांडीवर बसलेली मीना खुदकन् हंसली. पण लगेच लाडके-पणानें मान मुरडीत ती म्हणाली, 'आम्ही नाहीं जा येणार!' मान मुरडतांना पाठीवर सोडलेली तिची वेणी वेलीच्या चिमण्या फांदीप्रमाणें हलली. वेणीच्या टोंकाची फीत फुलांसारखी चमकली.

पळून जाण्याकरितां हाताशीं झोंबणाऱ्या मीनाकडे आईच्या डोळ्यांनीं पाहात दादांनीं म्हटलें 'कसं छान छान आहे आमचं कोंकण!'

'सिनेमा कुठं आहे तिथं?' खोलींतल्या छोट्या टेबलावर रचून ठेव-लेल्या रंगीबेरंगी जाहिरातींकडे अभिमानानें पाहात मीना उद्गारली. 'नी मामा म्हणत होता फटफटीहि नाहीं तिथं!' कोंकणाचें वकीलपत्र घेणें दादांना भागच पडलें. ते म्हणाले, 'दुसऱ्या खूपखूप गमती आहेत पण तिकडं.'

भिवयांचीं चिमुकलीं धनुष्यें किंचित् वांकून मीनानें त्या कोणत्या असा प्रश्नच विचारला जणुं कांहीं!

'उंच उंच झाडं आहेत माडाचीं.'

'पर्वतीहूनहि उंच!'

'अगदीं आभाळाला भिडलेलीं.'

आनंदानें टाळ्या पिटीत मीनानें विचारलें 'देवाचं घर दिसेल तिथनं?'

जमिनीवर कुठेंतरी पडून राहिलेला कांचेचा बारीक तुकडा पायांत जावा तसें दादांना झालें. माडांच्या शेंड्यावरून देवाचें घर दिसतें कीं नाहीं हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न नुसत्या बाळमनाचा नव्हता, आईसाठीं झुरणारें हृदय हळूच डोकावूं पाहात होतें त्यांतून. मीनाची आई आपली मुलगी रांगूं लागलेली पाहायला सुद्धां या जगांत राहिली नव्हती, त्यामुळें पांच वर्षांची होईपर्यंत मीना पुण्याला आजोळींच वाढली. इतर मुलें 'आई, आई' करून आईला मिठी मारतात तशी आपणहि मारावी असें तिला नेहमीं वाटे. पण तिचे आजोबा, मामा, मामी, सारीं माणसें तिला एकच सांगत 'देवाच्या घरीं गेली आहे तुझी आई.' मीनानें आईविषयीं कांहीं

प्रश्न विचारूं नये म्हणून दादा म्हणाले, 'कोंकणांत समुद्र आहे मोठा. खूप खूप पाणी आहे त्याच्यांत.'

'समुद्रांत देव असतो म्हणे, होय ना हो दादा?'

"लहान मुलांना कशाला हवी देवाची चौकशी?"

दादा रागावलेले पाहून मीनाचे डोळे भरून आले. त्यांच्या कुशींत तोंड लपवीत ती म्हणाली, "देवाचं घर दिसलं कीं मी त्याला हांका मारणार नी सांगणार—"

"काय?"

"माझी आई दे मला, सारा खेळ घे तुला, मोटार, विमान, बाळ—" बोलतां बोलतां हात जोडून मीना करुणदृष्टीनें आकाशाकडे पाहूं लागली. दादांनीं आपल्याला एकदम पोटाशीं घट्ट कां धरिलें हें तिला कांहीं केल्या कळेना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांवीं गेल्यावर मीनाची सर्वांत मर्जी बसली ती लाडक्या गाबतावर. काळें कुळकुळीत अंग, कंबरेभोंवतीं एक फडकें कसें तरी गुंडाळलेलें, नाकांतलें बोलणें—**लाडक्याचा** तो अवतार पाहून मीनाला प्रथम हंसूंच आलें. पण दादांनीं मीनासाठीं अडसर काढून द्यायला सांगितलें मात्र! लाडक्या अंगणांतल्या माडावर कसा वानरासारखा चढला. झोंपाळ्यावर बसावें तसा तो माडाच्या शेंड्यावर डुलत होता, खालीं उतरतांच त्यानें कोयत्याच्या टोंकानें अडसराला लहान भोंक पाडिलें आणि तें मीनाच्या हातांत दिलें. किती गोड गोड पाणी होतें तें! एका घटकेंत तिची व लाडक्याची गट्टी जमली!

लाडक्या तिला समुद्रावर फिरायला नेई. मऊ मऊ वाळूवरून धांवतांना कुर्रकुर्र असा आवाज होई, पावलें वाजलीं कीं कुरल्या पुटकन् लहान बिळांत लपत, लाटा धांवत धांवत येत आणि पाणी उडवून सरकन् मागें जात. संध्याकाळीं आभाळांत रंगीत सिनेमा सुरू होई—पण या सर्वांपेक्षां तिला अधिक आनंद देणारी गोष्ट निराळीच होती. लाडक्या जाळें टाकायला समुद्रांत गेला कीं त्याची होडी अगदीं ठिपक्यासारखी दिसूं लागे. अशा वेळीं लाटांप्रमाणें मीनाचें हृदयहि उचंबळून येई. मध्येंच तिचें मन म्हणे "लाडक्या समुद्रांत बुडाला तर?" तिला आईची एकदम आठवण होई. देवानें तिच्यासारखें लाडक्याला नेऊं नये, असेंहि तिला वाटे. वाळूचें घर अर्धेंच टाकून ती भरलेल्या डोळ्यांनीं समोरच्या अफाट पाण्याकडे पाही.

देवाविषयींच्या तिच्या प्रश्नांना उत्तरें देतां देतां लाडक्याला नको जीव होऊन जाई अगदीं. देवळाच्या बाजूला बोट दाखवून तो म्हणे "तिथं आहे देव." मग मीना मुद्दाम देवळांत जाई, घंटेचा गंभीर आवाज तिला फार आवडे; देवाला घातलेल्या फुलांच्या माळांचा मधुर सुगंधहि तिला आनंदित करी. पण गाभाऱ्यांतील अंधार, देवाची धिप्पाड मूर्ति, त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांदीचे डोळे, मिणमिण करणारा नंदादीप—हें सारें पाहिलें कीं तिच्या मनांत कसली तरी भीति उत्पन्न होई. ती मागें वळून पाही, सभामंडपांत देवापुढें हात जोडून बसलेला लाडक्या दिसला कीं ती भीति पार नाहींशी होई, ती भक्तिभावानें देवाला नमस्कार करी, कोनाड्यांतला अंगारा घेऊन तो लावी आणि तीर्थाच्या तीन पळ्या घेतल्याखेरीज गुरवापुढून कांहीं केल्या हलतच नसे.

* * *

हळूहळू उन्हाळा आला, लाडक्या दररोज सकाळीं मीनासाठीं सुरंगीचीं फुलें काढी, गोड बोंडू शोधून आणी आणि ओला काजूगर सोलून देई. तिला दादांच्यापेक्षांहि लाडक्याचाच अधिक लळा लागला. ती पूर्वींसारखी आईची आठवण काढेनाशी झाली. पांच वर्षे शहरांत वाढलेली ही हट्टी मुलगी इतक्या लवकर खेड्यांत रमून जाईल अशी दादांना कल्पनाहि नव्हती.

हळूहळू पावसाळा आला. विजा कडकडूं लागल्या कीं मीना ओटीवर बसलेल्या लाडक्याला बिलगून बसे. बाहेर वारा पावसांना लेझिम व झाडांना लाठी शिकवी. पण लाडक्या जवळ असला तरच तें पाहाण्याचा धीर मीनाला होई.

भर पावसांत गांवांत उंदीर पडूं लागले. प्लेग हा शब्द वारंवार मीनाच्या कानावर येई, तिला त्याचा अर्थ कळत नसे. पण या शब्दांत कांहींतरी भयंकर आहे अशी तिची खात्री होऊन चुकली होती. शेवटीं दादांनीं सावंतवाडीला बिऱ्हाड करायचें ठरविलें. मीनानें लाडक्याला विचारिलें, "तूं येणार ना आमच्याबरोबर?"

त्यानें हंसून मानेनें नाहीं म्हणून सांगितलें. मीना बुचकळ्यांत पडली. तिनें एकदम प्रश्न केला "दादा नेत नाहींत होय तुला?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" जायची परवानगी नाहीं देवाची ! "

" देवाची ? "

" हो. "

" देवळांतल्या देवाची ? "

" होय ताईसाहेब. "

" देव बोलतो ? "

" त्याच्या अंगाला तुळशीचीं पानं लावतात. पानावरनं कळतं सारं. देवानं गांवांतच राहा म्हणून हुकूम केलाय् मला. त्याची राखण असल्यावर—"

लाडक्यानें देवळाच्या दिशेकडे वळून नमस्कार केला. मीनानेंहि त्याचें अनुकरण केलें.

* * *

सावंतवाडीला येऊन दोन महिने झाले तरी मीनाला पडलेलें कोडें सुटलें नाहीं. देवानें लाडक्याप्रमाणें आपल्या दादांची राखण करायचें कां कबूल केलें नाहीं ?

तिला नव्या मैत्रिणी मिळाल्या, तऱ्हातऱ्हांचे खेळ सुरू झाले, पण रात्रीं पेंगळून अंथरुणावर पडल्यावर दिवसाचें हें जग दूर जाई आणि लाडक्या तिच्या डोळ्यांपुढें उभा राही. दोन महिन्यांत तो एकदां सुद्धां आपल्याला भेटायला कसा आला नाहीं याचें तिला आश्चर्य वाटे ! शेवटीं धीर करून ती दादांना म्हणाली " लाडक्या विसरून गेला मला, दादा होय ना हो ? " दादा कांहींच बोलले नाहींत. मीनाचें मन गुदमरून गेलें अगदीं.

कार्तिकांत प्लेग नाहींसा झाला. जत्रेदिवशीं संध्याकाळीं दादा घरीं राहायला आले. लाडक्या आपली वाट पाहात दारांत उभा असेल अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मीनेची कल्पना होती, पण ती खोटी ठरली. असा राग आला त्याचा तिला. तो आला म्हणजे त्याच्याशीं बोलायचेंच नाहीं असा तिनें मनाशीं निश्चय केला. परंतु मीनेला येऊन दोनतीन घटिका झाल्या तरी तो घराकडे फिरकला नाहीं. काळोख पडला. दादा तिला जत्रेला घेऊन गेले. गर्दींत लाडक्या कुठेंतरी दिसेल म्हणून ती इकडे तिकडे भिरभिर पाहात होती. दादांनीं देवापुढें ठेवण्याकरितां घेतलेलीं केळीं तिच्या हातांत दिलीं. त्यांतलें एक केव्हां खालीं पडलें हें तिला कळलें देखील नाहीं.



देवापुढल्या ताटांत केळीं ठेवून दादा कुणाशीं तरी बोलूं लागले, गुरव प्रसादाचीं केळीं देण्याकरितां खालीं वांकला: मीनानें हळूच पुढें होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला विचारलें, "लाडक्या कुठें आहे?" "लाडक्या मेला. प्लेग झाला त्याला." तिच्या मनांत आलें–देवानें लाडक्याची राखण करायचें कबूल केलें होतें. असला कसला हा खोटा देव; मीना तारवटलेल्या नजरेनें देवाकडे कां पाहात आहे हें गुरवाला कळेना. त्यानें प्रसादाचीं केळीं तिच्या हातांत दिलीं. तिनें तीं त्वेषानें मूर्तीवर फेंकलीं. हें पाहातांच दादा रागानें ओरडले,

'मीने—'

गुरवानें तीर्थानें भरलेली पळी पुढें केली. ती हातानें उडवून मीनानें देवाकडे पाठ फिरविली आणि ती गर्दींतून धूम पळत सुटली.

वि. स. खांडेकर

अभ्यास

१. 'मृगजळ' म्हणजे काय?
२. गोष्टीला 'मृगजळांतील कमळ' असें नांव लेखकानें कां बरें दिलें? गोष्ट पुन्हां एकदां लक्षपूर्वक वाचा आणि सांगा. या गोष्टीला नांव न देतां ती तुम्हांला वाचायला दिली असती, तर तुम्हीं तिला कोणतें नांव दिलें असतें?
३. 'आईच्या डोळ्यांनीं पाहात;' 'कोंकणाचें वकीलपत्र घेणें;' 'भरल्या डोळ्यांनीं पाहाणें,' यांचे अर्थ स्पष्ट करा.
४. धड्यांतील अधोरेखित वाक्यें विस्तारपूर्वक स्पष्ट करा.
५. 'फटफटी' हा 'मोटार सायकल'ला प्रतिशब्द योजिला आहे.
६. अडसर = कोंवळा नारळ. गुरव = कोंकणांत बऱ्याच देवळांतील पुजारी ब्राह्मणेतर असतात, त्यांस गुरव असें म्हणतात; यांची स्वतंत्रच जात बनली आहे. बोंडू = काजूचें फळ. चिमण्या = छोट्याशा, लहानशा. कुरल्या = खेकड्यांची एक जात. गाबतावर (गावीत) = कोंकणांत मासे मारणाऱ्या लोकांस 'गाबीत' म्हणतात.
७. 'तिची वेणी वेलीच्या चिमण्या फांदीप्रमाणें हलली, वेणीच्या टोंकाची फीत फुलासारखी चमकली.' किती सुंदर आहे वाक्य! अशा तऱ्हेच्या लिहिण्याला काव्यमय लिहिणें म्हणतात. यांत 'वेणी' ला 'वेलीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिमण्या फांदी'ची व टोंकाच्या 'फिती'ला 'फुला'ची **उपमा** दिली आहे. खांडेकर अशा तऱ्हेच्या गोड गोड उपमा देण्यांत मोठे पटाईत आहेत. त्यांचें '**नवमल्लिका**' हें गोष्टीचें पुस्तक वाचा. उपमाच उपमा तुम्हांला सांपडतील त्यांत.

८. या गोष्टींत आणखी कांहीं **उपमा** तुम्हांला आढळल्या का? कोणत्या?

२३

मृगया

प्रजा येऊनि राजसभे । जोहार करूनि राहिले उभे
"तुझीये शौर्य सूर्यप्रभे । माजी पशुतम दाटलें ॥
सांगावया योग्य नव्हे मात । न सांगतां आमचा प्राणांत
श्वापदें मातलीं वनांत । करिती घात जगाचा" ॥
ऐकोनि पौरयांची वाणी । राजा विचारी अंतःकरणीं
गुरु–वचन तें मानुनी मनीं । राहतां जनीं अपकीर्ति ॥
वनीं निवठुनी श्वापदगणां । सुखी करावें सकल जनां
वशिष्ठ कोपेल तरी चरणां । नमन करीन साष्टांगीं ॥
ऐसें विचारुनी चित्तीं । पाचारिला वाहिनी–पति
म्हणे जाणें वना–प्रति । सेना सिद्ध करावी ॥
तेणें त्राहाटिल्या भेरी । वाजती रणतुरें मोहरी
वीर–वसनें महावीरीं । परिधान केलीं तात्काळ ॥
अश्व–गज रथादि वहनीं । वळघल्या वीरांच्या श्रेणी
त्यामाजी राजा प्रताप गुणी । वीरश्रिया शोभला ॥
सज्जिलें असंख्य रहंवर । पाठीं चालती अश्वभार
मत्त कुंजरांचे भार । ऊर्ध्व शुंडें धांवती ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तया पृष्ठीं दिव्य पताका । भासती सेना–सागरीं नौका
उभय कर्णांमाजी देखा । वरी अंकुश शोभले ॥
नाना वाद्यांचिया ध्वनीं । राजा आरुढला वहनीं
तारामती शिबिकासनीं । सेना–गर्भी चालत ॥
छत्रछायेतळीं नृपवर । वीरश्रीयेसी राजेश्वर
नगरीं ठेवुनी राजकुमर । पुरीबाहेर निघाला ॥
राजा प्रवेशला महावनीं । श्वापद–कळप देखिले नयनीं
शस्त्रीं शरीं पाश–बंधनीं । वधुनी धरणीं पाडीत ।
ऐसे रायें मारिले कळप । एका अंगीं भरला कंप
उरलीं श्वापदें लंघिती नृप । प्राण–धाकें पळताती ॥
येरीकडे गाधिज मुनी । परम संतोष मानुनी मनीं
पुरी त्यागोनिया वनीं । राजा आला म्हणोनी ॥
आश्रमा आणावया राव । ऋषीनें केलें लाघव
कुरंग निर्मिला अपूर्व । कनक–कांति साजिरा ॥
तुझ्या स्वरूप-रज्जु-गळां । बांधुनी आणावें नृपाळा
निकें म्हणोनी चरण-कमळां । वंदुनी गेला वनासी ॥
मृग-राजा आला समीपु । राजा पाहे तंव कनक-वपू
नरनाथ हृदयीं कामना–सर्पू । फुंफाट करीत ऊठिला ॥
गुणीं लावुनिया बाण । घेवूं पाहे कुरंग प्राण
येरें फेडिलें कीं रान । भूमी चरण न थारे ।
राजा लागला तया पाठी । धावतां जाला परम कष्टी
पळत पातला आश्रमानिकटीं । विश्वामित्र ऋषीच्या ॥
अंतरें राहुनियां उभा । पहात ठेला वनश्री शोभा
वन–सरोजीं नेत्रारंभा । स्वादाऽमोदा लोभले ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वनश्री वर्णावी कवणें । उपमे नंदन–वन उणें
नाना वृक्षीं फळें सुमनें । रससुवासें दाटलीं ॥
येक सरळ शाखाविहीन । येक ते शाखामंडीत पूर्ण
तया ग्रीवा लतिका–वेष्टन । करुनी जाती सुरवाडें ॥
कर्पूर कर्दळी नारीकेली । चूतवृक्ष लवले फळीं
कंटकी फळांची नहाळीं । लागलीं मुळीं असंख्य ॥
द्राक्षीमंडपातळीं दाट । वाहती अमृतरसाचे पाट
फणस फळें त्यागुनी देंठ । दाविती वाट सिंधूची ॥
जाई जुई चंपक मालती । बकुळ मोगरे कांचन शेवंती
केतकी वनें वनें मघमघिती । पराग क्षिती सुगंध ।
अगरू चंदन देवदारू । न्यग्रोध पलाश पिंपळ तरू
जे देवत्रयांचे अवतारू । बिल्व तुळशी हरिहरू ॥
अनेक वृक्षांचिया जाति । माजि पशुपक्षी क्रीडती
कनक कण्हेर शोभती । पूर्ण जीवनीं तडाग ॥
ऐसी सिद्धाश्रमाची वाटिका । देखोनी रायें वारिलें कटका
आपण प्रधान पट्टनायिका । वांचुनि आणिकां येऊं नेदी ॥
प्रवेश करितां तया वनीं । राजा आश्चर्य देखे नयनीं
धनु व्याघ्र येके स्थानीं । येकमेकां चाटिति ॥
नकुळ, सर्प क्रीडती सुखें । मार्जारी–स्तना लागती मूषकें
सिंह, करी करीत कौतुकें । वनामाजी विचरती ॥
ऊळूका निरवूनि पिलीयांसीं । वायस जाती चरावयासी
विश्वामित्र–माया ऐसी । सहसा नकळे मानवा ॥
निर्वैर श्वापदांचे गण । देखोनि विस्मित रायाचें मन
पुढें जातां सुगंध जीवन । तडागीं पूर्ण देखिलें ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तया कासार जीवनें । स्नानें विश्रांती लाहिजे मनें
परिधान करूनी दिव्य वसनें । देवालया निघाला ॥
कर्दळी द्रोणी हेम-कमळें । नानापुष्पें सुपरिमळें
कनक-पात्रीं भरुनी जळें । शिवागारीं प्रवेशे ॥
सोमकांत श्वेत शिखर । माजीं शोभला कर्पूरगौर
द्वारीं ढवळा नंदिकेश्वर । मनोहर विराजे ॥
भावें पूजुनी गिरिजावर । नमन केलें जोडोनी कर
भार्येसहित राजेश्वर । स्वस्थानीं बैसला ॥

मुक्तेश्वर

परिचय

या कवितेंत ओवी हा साधा छंद वापरला असून वर्णनाचा अस्खलित ओघ वहात आहे. प्राचीन कवींत, आख्यानाच्या रूपानें पौराणिक कथा मराठी भाषेंत स्वयंस्फूर्तीनें गौरवून सांगणारा मुक्तेश्वरासारखा दुसरा कवि सांपडणार नाहीं. मुक्तेश्वराच्या भाषेंत माधुर्य, मनोरमपणा, कोमलता व शब्दसौष्ठव हे गुण भरलेले आहेत.

महाभारताच्या वनपर्वांतील या उताऱ्यांत राजा मृगया (शिकार) करण्यास गेला असतां शिकारीचा थाट, व अरण्यांतील आश्रम यांचें वर्णन यथोचित भाषेंत केलें आहे. या कवितेंत तुम्हांला कांहीं जुने शब्द सांपडतील व झाडांचीं नांवें आढळतील. जुन्या शब्दांपैकीं क्रियापदांकडे जास्त लक्ष द्या.

अभ्यास

१. अधोरेखित शब्दांचे अर्थ सांगून त्यांतील अलंकार समजावून सांगा.

२. न्यग्रोध = वड; नारीकेली = नारळ; चूतवृक्ष = आंब्याचीं झाडें; मघमघिती = घमघमाट सुटतो; अक्षरांची हल्लीं कशी उलटापालट झाली आहे पाहा. रणतुरें = रणवाद्यें; शिबिका = पालखी; वाहिनी = सैन्य; रहंवर = रथ; त्राहाठिल्या = वाजविल्या.

३. नागमोडी खूण केलेलें वर्णन विश्वामित्राची माया-जादू-मोहिनी दाखविते. असेंच वर्णन साधुत्वाचें लक्षण म्हणूनहि करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४

हांसत कर्म करावें !

कृष्णपक्षांतील अष्टमीची रात्र. तीन प्रहर रात्र उलटून गेलेली. सर्व जग निद्रानंदांत पूर्ण गुंगून गेलेलें. अतिशय खेळकर मूल ज्याप्रमाणें दिवसभर दांडगाई करून रात्रीं अगदीं गाढ झोंपीं जातें व कोणत्याहि तऱ्हेनें बाहेरील गडबडीनें त्याची झोंपमोड होत नाहीं, तद्वतच या उपद्यापी जगाची स्थिति झालेली होती. 'नीज आतां' म्हणून आईनें दामटून एकदां काळी दुलई डोक्यावरून घातल्याबरोबर या प्राण्याला इतकी गाढ झोंप लागली कीं, बाहेर विश्वांत काय घडामोड झाली त्याचा त्याला पत्ताहि लागला नाहीं. मध्यरात्रीच्या प्रशान्त वेळीं इकडे तिकडे कोणी नाहीं असें पाहून बाहेर येऊन सरोवरावर खेळणाऱ्या हरणाप्रमाणें चंद्रानें येऊन आपला खेळ आकाशांत सुरू केला. लहानसें राज्य स्थापून तारकारूपी परिवाराची योग्य ठिकाणीं नेमणूक करून रोहिणीसमवेत हा चंद्रमा पाहा कसा आपल्या सौंदर्याचें व पराक्रमाचें प्रदर्शन करीत वरून हंसत हंसत खालीं बघतो आहे ! पण झोंपेंत गढलेल्या मुलाला जगांत कोणी अलंकार घालून मिरवलें म्हणून त्याला आनंद कसला ? तो आपल्या निद्रानंदांतच तल्लीन ! हातांत दिवा घेऊन पाळण्यांत निजलेल्या मुलाच्या तोंडावरील पांघरूण काढून पाहाणाऱ्या आईला त्या मुलाचें जसें ईषत् हंसरें मुख दिसतें, त्याप्रमाणेंच चंद्राचा दिवा हातांत घेऊन जगाकडे हळूच निरखून पाहाणाऱ्या सृष्टिसतीला चंद्रप्रकाशांत जगाचें किंचित् हंसरें मुख दिसत होतें तेवढेंच ! तेवढाच त्यावर विश्वांतील घडामोडीचा परिणाम !

पण बऱ्याच गोष्टींची जगाला दाद नसली म्हणून काय झालें ? पाहा तर खरें एकदां आकाशाकडे ! त्या चंद्राचा नुसता डौल तर पाहा ! स्वतः-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जवळ विशेष सामर्थ्य नाहीं, पण जें काय लोकांकडून मिळेल तेवढेंच घेऊन संतुष्ट मनानें इमानेंइतबारें विश्वाची कामगिरी बजावणाऱ्या या एकनिष्ठ सेवकाची ऐट तर पाहा ! त्याच्याच मागोमाग डौलानें मिरवणारी ही रोहिणी. घरभर मुलांप्रमाणें आकाशाचें आंगण उणें करणारा हा तारकासमूह; गरिबींतच कां होईना पण तशाहि स्थितींत दुसऱ्यावर उपकार केल्या-मुळें कृतज्ञ बनून या चिमुकल्या राज्याचें स्वयंस्फूर्तीनें रक्षण करणारा व आपल्या एकामागें एक अशा कोटांनीं चंद्रराज्याला अभेद्य करणारा हा ग्रहसमुदाय; व सर्व गोष्टींची समृद्धि दर्शविणारी ही आकाशगंगा; असल्या राज्यांत उणीव तरी कसली राहणार ? पाहा बरें चोंहींकडे कसें समाधान, प्रेम व आनंद यांचें साम्राज्य पसरलें आहे ! बरोबरच आहे, संपत्तीची चकाकी नसली म्हणून गरिबींतील प्रेमाचें मार्दव कांहीं कमी सुखकारक नसतें !

अरे ! पण हें काय ? या आनंदसिंधूला ओहोटी लागली ! मघाशीं डौलानें मिरवत असलेला चंद्रमा एकाएकीं फिकट कां वाटूं लागला ? भविष्यकालीं घडून येणाऱ्या एकाद्या भयंकर प्रसंगाचें आधींच भविष्य कळलें असतां दहशत बसून जसा तोंडावर फिकटपणा येतो तसाच हा दिसत आहे. ही परचक्राची तर भीति नव्हे ना ! हें पाहा, पूर्वेकडून कसला पांढरा धुरळा उडत आहे तो ! हा पाहा मधून मधून एक पिवळा तीर आला. झालें ! पूर्वेकडील तारांचा फडशा पडूं लागला. तो तिकडे जाळ कसला ? हरहर ! शत्रूनें जाळपोळ करावयास सुरवात केली वाटतें ? आणि हें सर्व उघडे डोळे ठेवून पाहाण्याचें चंद्राच्या नशिबीं आलें हं ! पण चंद्रहि अंत-र्धान पावला ! आणि रोहिणी ? ती तर त्याचे पुढेंच अंतर्धान पावली. शत्रूच्या ताब्यांत सांपडून अपमान करून घेण्यापेक्षां जगांतून नाहींसें होणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खरोखरच चांगलें. चंद्रा ! तूं गरीब खरा पण बाणेदार आहेस. रजपुतांचा मूळ पुरुष तूं ! सर्व तारकांचा जोहार करून शत्रूच्या हातीं कोणालाहि लागूं न देतां शत्रूचा नाश करण्याच्या उद्देशानें अरण्यांत चालत आलास हेंच योग्य !

ही पाहा नवी कारकीर्द ! हा प्रखर प्रकाश तर पाहा ! अहो ! पण बघवत नाहीं तेथें पाहा काय ? ही भास्करराजांची स्वारी सोनेरी मंदील घालून मोठ्या दिमाखानें दिग्विजय करीत वर येऊं लागली ! सगळीं खडबडून जागी झालीं. बरोबरच आहे. अशा प्रखरतेपुढें कोणाला झोंप यावयाची आहे ! भास्करराज, आपण तेजस्वी आहां, पराक्रमी आहां, पण हा उद्दामपणा कशाला ? आपणहि किती केलें तरी विश्वाचे नोकरच आहां ना ? बिचाऱ्या गरिबाच्या संसाराची धूळधाण कां केलीत ? चंद्र तुमच्यापुढें यःकश्चित् तर खराच, तुमचा आश्रित तो ! पण आश्रितांचें वाटोळें करण्याची ही कोठली पद्धत ? आपण स्वयंप्रकाश असलां म्हणून दुसऱ्याच्या प्रकाशाचा लोप करावयाचा ? तुमचा तो चंद्रच पाहा कीं ? त्याच्या राज्यांत तोच सर्वांत तेजस्वी होता ना ? पण त्यानें कधीं असा दुष्टावा केला का ? आपल्या सर्व आश्रितांचें संरक्षण करून, त्यांचीहि उन्नति करून, त्यांच्या व आपल्या तेजानें कसा सुखानें मिरवीत होता. पण आपण पडलां स्वयंप्रकाशपराक्रमी ! तुम्हांला 'निर्वीरमुर्वीतलं' करण्याची आकांक्षा ! आधीं तुम्हीं मुलेंबाळें, बायको यांना तरी कोठें जिवंत ठेवलें आहे म्हणा ! म्हणून तुम्हांला आश्रितांचा सांभाळ करावयाला सांगावयाचें ? चंद्राचा परिवार कसा त्याच्या भोंवतीं बागडत होता ! आपण मुलें, बाळें, बायको सर्वांची वाट लावून बसलां. बरोबरच आहे. सगळ्यांची वाट लावून जळत्या अरण्याप्रमाणें दिसणाऱ्या या आकाशावर खुशाल सत्ता चालवा. खरेंच सांगा बरें ! तुम्ही सर्वश्रेष्ठ म्हणून तुम्हांला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काय ऐट वाटत असेल तेवढीच. परंतु ह्या एकलकोंड्या वृत्तीनें तुमच्या अंतःकरणाला समाधान मिळतें का? प्रेमाचा ओलावा येतो का? तो जर हवा असेल तर इतकें स्वयंमन्य होऊन चालावयाचें नाहीं. दुसऱ्याच्या मताची थोडी तरी पर्वा करावी लागेल; त्याखेरीज या नुसत्या पराक्रमानें खरें समाधान नाहीं हो नाहीं होणार! पण जाऊं द्या. परिस्थितीच तशी असल्याखेरीज तुम्हांला या शब्दांचें महत्त्व कळणार नाहीं.

पाहिलेंत, वरवर चढत आलेला रथ कलंडला हो कलंडला! आतां जाणार! पश्चिम समुद्रांत जाऊन पडणार! कारण मध्यें आधारच नाहीं. मुळीं खांबाचाहि आधार न घेतां आकाशांत राज्य स्थापावयाची आपली उमेद, आणि मदतहि कोणाची घ्यावयाची नाहीं. तुम्हांला तुमच्या कुटुंबाचें साह्य नाहीं. कारण आपण पहिल्यानेंच त्याची वाट लावून बसलांत. आतां कोण तुमच्या उपयोगी पडणार? अंतरिक्षांत साम्राज्य स्थापावयाची आपली महत्त्वाकांक्षा पुरी होत नाहीं तर! आतां कां बरें तुमचें तोंड फिकट झालें? इतका वेळ आम्ही बोललों त्याची प्रतीति येऊन त्यामुळें तर ही उदासीनता आली नाहीं ना? पाहा बरें, तुमचा चेहरा कसा लाल झाला आहे तो! पण मघांचें तेज गेलें. तुम्ही रागावलां आहां, पण त्याचा उपयोग स्वतःचा दाह करून घेण्यापलीकडे कांहीं नाहीं. पाहा, तुमचा हा संताप पाहून सगळें जग कसें तुमच्याकडे टक लावून हांसत आहे. हा संताप आहे, का पश्चात्ताप आहे, का लज्जा आहे? हा रक्तिमा तरी कसला! कसला का असेना! तुमची सद्दी फिरली एवढें खरें. हेंच जर स्वपराक्रमानें अंध न होतां दुसऱ्याची थोडी तरी पर्वा केली असतीत तर एखादा तरी बांधव गत उपकार स्मरून तुमच्या साहाय्याला धांवत आला असता. पण आतां काय उपयोग? लोकांचीं अंतःकरणें दुखविलींत, त्या वेळींच याचा विचार करावयाचा होता. तिकडे पूर्वेकडे काय पाहातां.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिकडे एकाद्दुसरा तारा चमकूं लागला होय? लागावयाचाच!–तुम्ही सर्वांचा संहार केलात, पण त्यांच्यांत एकी होती; प्रेमाचे लागेबांधे होते, ते चंद्राचे हेर होते. ते पाहा, हळुहळू लहानमोठे तारागण पुढें येऊन गडबड करूं लागले आहेत. ही पूर्वतयारी बरें! मध्यरात्रीच्या वेळीं फिरून मागच्यासारखें राज्य स्थापन झाल्याचें तुम्हांला दिसेल? नका, असे पश्चिम समुद्रांत तोंड दडवूं नका. आतां कां बरें तोंड रडवें केलेंत? पूर्वसमुद्रांतून वर येतांना आपलें हंसरें दिसणारें तोंड अजून आम्हांला आठवतें आहे. बरोबरच आहे. "हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं!"

कमलाबाई देशपांडे

परिचय

हें एक सुंदर रूपक आहे. लेखिकेचा हेतु अंतरिक्षाचें **शब्दचित्र** रंगविण्याचा नाहीं. (कां बरें?) एक रूपक म्हणण्यापेक्षां यांत दोन रूपकें मिसळलीं आहेत व पहिलें रूपक लेखिकेनें अर्धवटच टाकलें आहे. पहिलें रूपक असें:—आपली चराचर सृष्टि हें खट्याळ लहान मूल असून तें झोपीं गेलें आहे. आकाश–चंद्र–तारका–ग्रह–आकाशगंगा यांचें अनंत **विश्व** आपल्या उद्योगांत मग्न आहे, त्याची या मुलाला दादहि नाहीं. पुढें या कल्पनेचा विकास लेखिकेनें न करितां सूर्याचा प्रखर व जुलमी अंमल, चंद्र–ग्रह–तारा यांचें शीतल राज्य, त्यावर सूर्याचें आक्रमण, सूर्यावर चंद्रादिकांची उलट स्वारी हें रूपक रंगविलें आहे आणि तरफदारी केली आहे.

रूपक नाट्यपद्धतीनें सजविलें आहे; परंतु ही नाट्यछटा नाहीं. (कां बरें?)

अभ्यास

१. लेखिकेनें सूर्यांचे कोणते ठळक अवगुण व चंद्राचे गुण दाखविले आहेत?
२. या लेखांत कोणतें तत्त्व प्रतिपादन केलें आहे? त्याला साजेसें लेखाला नवीन नांव सुचवा.
३. खुणा केलेल्या वाक्यांचे व शब्दांचे अर्थ द्या व संदर्भपर टीपा लिहा.
४. लेखाचें नांव मोरोपंताच्या एका प्रसिद्ध आर्येचा चरण आहे. सबंध आर्या लिहून दाखवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५

घे कुठार—

घे कुठार, कर उगार, घाव अतां घालीं !
धरणीनें पोशियलें
रविकिरणीं वाढविलें
राहियला सतत मरुत आजवरी चाली १
किती विहगां खांद्यांवरि
खेळविलें बाळांपरि
शांत गुरें छायेमधिं आजवरी झालीं २
काळाचा कठिण हात
वस्तूचा होत पात
आनंदें पाहत मी प्रकृतिच्या चाली ३
होऊं दे देह छिन्न
शकलांवर शिजविं अन्न
मन निवेल ऐकुनियां तृप्ति तुला आली ! ४

वा. गो. मायदेव

परिचय

या काव्यांत उदात्तरस व शांतरस हे पाझरत आहेत. आपल्या अंगावर कुऱ्हाड उगारून आपल्याला छिन्नविच्छिन्न करूं पाहाणाऱ्या लाकूडतोड्याला वृक्ष हें शांत गाणें म्हणून दाखवीत आहे ! वृक्षानें जिवंत असतांना अनेक परोपकार केले, परोपकारासाठीं मरण्यांतहि त्याला समाधान वाटत आहे. कारण जन्मास आलेल्या वस्तुमात्राचें काळाच्या कठिण हातानें पतन व्हावें ही प्रकृतीची म्हणजे निसर्गाची चाल म्हणजे रीत त्याला ठाऊक होती. वृक्षाच्या या **अंत्यगीतांत** राग नाहीं, भीति नाहीं, द्वेष नाहीं, अथांग असा आत्मविश्वास, संथपणा, प्रेम, तत्त्वनिष्ठा भरली आहे. फार सुंदर आहे ही कविता !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२६

निबंधमालेचें स्वरूप



ग. त्र्यं. माडखोलकर

निबंधमालेचें वाङ्मयस्वरूप अत्यंत रमणीय आहे. विविध विषयांच्या सुलभ विवेचनानें व अनेक प्रकारच्या विपुल माहितीनें भरलेला इतका मनोरंजक व उद्बोधक ग्रंथ मराठींत दुसरा नाहीं. त्यांतहि मानवी आयुष्याच्या किती अल्पावधींत ही सुंदर व भव्य इमारत उठली, याचा विचार मनांत आला, म्हणजे चिपळूणकरांच्या कल्पकतेचा अचंबाच वाटतो. राष्ट्राची विवक्षित स्थिति व जिज्ञासा लक्षांत घेऊन मर्यादित प्रमाणावर रचलेला 'निबंधमाला' हा, केवळ वाङ्मयाचा असा, जणुं कांहीं एक 'ज्ञानकोशच' आहे. भूपृष्ठावर फार दूरवर पसरलेल्या विस्तीर्ण सरोवराला ज्याप्रमाणें 'सागर' म्हणतात, त्याप्रमाणें ज्ञानाचे बहुविध प्रदेश व्यापणाऱ्या विशाल निबंधसंहितेलाहि "ज्ञानकोश" म्हणणें अगदीं योग्य होईल व त्या दृष्टीनें निबंधमालेला ज्ञानकोश म्हणावयाला हरकत वाटत नाहीं. चिपळूणकरांची ज्ञानदानाची पद्धत नीरस किंवा रूक्ष नाहीं. कोणताहि विषय चित्ताकर्षक करून सांगण्याची त्यांची हातोटी अगदीं अपूर्व आहे. विषय केवळ सुबोध करणें हें पुष्कळांना साधतें; व असें बालबोध वाङ्मय लिहिणारे लेखक महाराष्ट्रांत चिपळूणकरांच्या वेळीं आणि पूर्वींहि बरेच होऊन गेले. पण त्यांचें लेखन त्यावेळींहि कोणी विशेष वाचलें नाहीं व आतांहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचीत नाहीं. विषय नुसता सुबोध केल्यानें तो वाचकाला प्रिय होईलच असें नाहीं. सामान्य वाचक हा बहुधा मनावरील भार हलका करण्याकरितां वाचतो. ज्या वाङ्मयांत त्याचें मन रमेल तेंच तो वाचणार. त्याला ज्ञान द्यावयाचें म्हणजे तें जसें सुबोध तसेंच मनोवेधकहि करून द्यावें लागतें. मनोरंजन हें ललितवाङ्मयाचें साध्य असल्यामुळें सामान्य वाचकाचा त्या वाङ्मयाकडे फार ओढा असतो. विवक्षित विषयाच्या मुद्देसूद विवेचनानें भरलेले लेख सहसा मनोरंजक होत नाहींत; व म्हणून सामान्य वाचकाला विवेचनात्मक निबंध वाचणें फार जड जातें. बोध आणि मनोरंजन यांचा मिलाफ ज्यांत झालेला आहे, असें ललितेतर वाङ्मय मात्र सामान्य वाचकहि गोडीनें वाचतो. लोकशिक्षणाचा हेतु नुसतें बोधप्रद वाङ्मय लिहिल्यानें साधत नाहीं. लोकशिक्षणाकरितां जें वाङ्मय लिहावयाचें, तें बोधप्रद तसेंच चित्तवेधकहि असलें पाहिजे. तरच तें लोक वाचतात. निबंधमालेचा हेतु भाषाशोधनाइतकाच लोकशिक्षणाचाहि होता. त्यामुळेंच बहुधा चिपळूणकरांनीं आपले निबंध शक्य तितके मनोवेधक केले आहेत. कोणताहि लेख मनोरंजक व्हावयाला त्यांत हृदयंगम भावना, सुगम आणि सरस विवेचन, सुंदर किंवा चमत्कृतिपूर्ण कल्पना, चटकदार वर्णनें अथवा खुबीदार विनोद यांपैकीं कांहीं ना कांहींतरी एक गुण अवश्य हवा. निबंधमालेंतील बहुतेक लेखांत हे सारे गुण कमी अधिक प्रमाणांत असल्यामुळेंच मालेला इतकी मोहकता आली आहे. केवळ विद्वत्तापूर्ण व बोधप्रद असून पुन्हां इतके चित्ताकर्षक असलेले निबंध मराठींत चिपळूणकरांपूर्वीं कोणीहि लिहिले नव्हते. याहि कारणामुळें 'माला' फार थोड्या अवधींत लोकप्रिय झाली. ॲडिसनपेक्षां चिपळूणकरांची भाषा अधिक आकर्षक परंतु कमी सुगम आहे. याला कारण त्यांनीं आपली भाषा श्रमपूर्वक नटविली, हें होय. ॲडिसनच्या लेखांत सुंदर कल्पनांची मुबलक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेरणी मुळींच केलेली नसते; व भाषेचा ओघ सहज असतो. त्यांचे लेख चित्तवेधक व्हावयाला त्यांचा गर्भित, सूचित व स्पष्ट विनोद कारण झाला आहे. चिपळूणकरांचा विनोद ख्रिस्ती मिशनरी व नवीन शिकलेली मंडळी या दोन ठराविक विषयांवरच बहुधा चालतो त्यामुळें तो प्रथम कितीहि हास्यप्रचुर भासला, तरी पुढें त्यांत विशेष मौज वाटत नाहीं. सूचक विनोद जितका आनंद देतो, तितका स्पष्ट विनोद देत नाहीं. चिपळूणकरांचा बहुतेक विनोद स्पष्ट आहे. व्यक्तीच्या वैरुप्यावर केलेला विनोद हा जितका कमी दर्जाचा असतो, तितकाच भाषेच्या वैरुप्यावर केलेला विनोदहि असतो. मात्र व्यक्तिविषयक विनोद हा भाषाविषयक विनोदाइतका निर्दोष असत नाहीं. व्यक्तिविषयक विनोदांत, जी गोष्ट मनुष्याच्या स्वाधीन नाहीं त्या गोष्टीबद्दल त्याचा निर्दय उपहास केलेला असतो. उलट भाषाविषयक विनोदाच्या मुळाशीं सुधारणेची योग्य सदिच्छा असते; व त्यामुळें तो विनोद थोडा निर्दय असला तरी निर्दोष, उपकारक आणि आनंददायक वाटतो. चिपळूणकरांच्या भाषाविषयक निबंधांतील विनोद अशा तऱ्हेचा आहे. समाजाच्या आचरट व बालिश समजुतीवर केलेला विनोद 'संपत्तीचा उपभोग' व 'लोकभ्रम' या निबंधांत आढळतो. हा विनोदहि सद्धेतुप्रेरित, स्पष्ट व हास्यकारक आहे. बाकी लेखांतील विनोदाचा भर अतिशयोक्ति, उपरोध, उपहास आणि विरोधाभास यांवरच फार दिसतो; व तो वाचतांना, स्विफ्ट, पोप, जूनिअस, मेकॉले वगैरे लेखकांची आठवण होते.

ग. त्र्यं. माडखोलकर

परिचय

ग. त्र्यं. माडखोलकर व श्री. ना. बनहट्टी या दोन प्रसिद्ध टीकाकारांनीं एकत्र लिहिलेल्या विष्णु कृष्ण चिपळूणकरांच्या चरित्रांतून हा उतारा घेतला आहे. माडखोलकरांचे वर्तमानपत्रांतील परीक्षणात्मक लेख, कवि व कविता–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारावरील टीकात्मक लेख यांत भाषेचा प्रौढपणा, व उपमा-दृष्टांतांनीं लेख सजविण्याची त्यांची हातोटी दिसते. या लेखांत त्यांनीं स्तुतिबरोबर चिपळूणकरांच्या लेखनांतील दोषहि मार्मिक रीतीनें दाखविले आहेत.

इंग्लंडांतील 'स्पेक्टेटर' पत्र चालविणारा ॲडिसन, 'गलिव्हरचा प्रवास' लिहिणारा स्विफ्ट, कवींवर कुचेष्टापूर्ण विडंबनकाव्यें लिहिणारा पोप, वर्तमानपत्रांतून निर्भीड पत्रें लिहिणारा जूनिअस व प्रख्यात निबंधकार मेकॉले यांच्याविषयींची माहिती शिक्षकांकडून मिळवा.

अभ्यास

१. अधोरेखित वाक्यांचा अर्थ करून या निरनिराळ्या प्रकारांच्या विनोदांचें एक एक वाक्य लिहून दाखवा.
२. 'विष्णु कृष्ण चिपळूणकर' या चरित्रांतील पृ. २४२–२४५ मध्यें प्रो. बनहट्टी यांनीं निबंधमालेसंबंधीं केलेलें विवेचन वाचा.
३. 'इतिहास' हा निबंध वाचून त्यांत माडखोलकरांनीं सांगितलेले गुण सांपडतात कीं काय ते पाहा.

२७

ख्रिस्ताचे शिष्य

(चित्रपरिचय)

या चित्रांत चितार्‍यानें आपलें कौशल्य भावना रंगविण्याकडे खर्च केलें आहे. आभाळ व जमीन यांचा उपयोग केवळ चित्र उठावदार करण्यासाठीं आहे.

सकाळचीं कोवळीं उन्हें, विरळ शुभ्र अभ्रांचे पुंजके, दूरवर दिसणार्‍या टेकडीवरील मनोर्‍यासारखी इमारत, पुढील सपाट मैदान, याकडे आपलें लक्ष फार वेळ गुंतून न राहतां लगबगीनें जात असलेल्या या वृद्ध तरुण-पीटर आणि जॉन–ख्रिस्तशिष्यांच्या जोडीकडे लागतें. कमरेखालचा भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(चित्र) ख्रिस्ताचे शिष्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाखविला नसूनहि त्यांच्यामागें भुरभुर उडणाऱ्या केसांवरून, जटांवरून, फुगीर झालेल्या झग्यावरून, पुढें वाकलेल्या शरीरावरून ते जोरजोरानें जात आहेत असें किती सहजपणें दिसून येतें पाहा !

बायबलच्या मराठी भाषांतरांत ख्रिस्ताला सुळीं देते वेळचें वर्णन वाचा. शिष्यांनीं ख्रिस्ताच्या देहाला सुळावरून काढून, यहुद्यांच्या प्रेतसंस्कारा-प्रमाणें, मसाला लावून शुभ्र दफनाच्या वस्त्रांत तो देह गुंडाळला; जोसेफ या शिष्यानें स्वतःसाठीं जें खडकांत कबरस्थान कोरवलें होतें त्या थडग्यांत ख्रिस्तास ठेवून वर जड शिळा ठेविली. यहूदी लोकांनीं सभोवतीं पहारेकरी ठेवले. मरणानंतर तीन दिवसांनीं आपण परत उठून भेट देऊं असें ख्रिस्तानें त्यांना अभिवचन दिलें होतें. शिष्या मेरी मागदालीन शोक करीत बाहेर बसून राहिली. तिसरे दिवशीं सकाळीं तिला असें दिसलें कीं, शिळा दूर लोटलेली असून आंत देह नसून फक्त शुभ्र वस्त्रें नीट गुंडाळून ठेविलेलीं आहेत. आश्चर्यचकित होऊन धांवत धांवत जाऊन तिनें हें वर्तमान शिष्यांना सांगितलें. पीटर व जॉन धांवतच निघाले. वाटेंत ते दोघे एकाद्याला कसे दिसले असतील याचें हें चित्र आहे.

प्रथम हाताकडे पाहा. वृद्ध पीटर उजव्या हातानें आपल्या धडधडणाऱ्या हृदयाला धीर देत झगा सावरून धरतो आहे. 'काय! खरेंच ख्रिस्ताचें पुनरुत्थान झालें ?' असें डाव्या हाताची तर्जनी जणूं काय बोलतेच आहे. किती कौशल्य आहे हा हात रेखाटण्यांत ! तरुण, अननुभवी, ख्रिस्ताचा लाडका शिष्य जॉन, तीव्र दुःखानें हात चोळीत, मुठी घट्ट आवळून आपले हुंदके दाबीत चालला आहे. किती कष्टानें त्यानें रडें आवरून धरलें आहे ! त्याच्या ओठांकडे व किंचित् आकुंचित झालेल्या डोळ्यांकडे पाहा. जणूं काय ख्रिस्ताला भेटण्यास त्याचें मन आतुर झालें आहे. आतां पीटरच्या मुद्रेवरील भाव पाहा. आश्चर्यानें व उत्कंठेनें विस्फारित झालेली दृष्टि,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भेदक पण सौम्य नजर, कपाळावरील आंठ्या, अंत:करणांतील दु:खानें कोंडलेले श्वास वगैरे सर्व सूक्ष्म दृष्टीनें पाहा. चित्र पाहतांक्षणींच आकर्षक वाटतें, पण या नवीन दृष्टीनें पाहिल्यावर आपला आनंद शतगुणित होतो.

श्री. बा. रानडे

२८

पाणपोई

[चाल–'पांडवा सम्राट्पदाला' या गज्जलाची]

येइ भाई येथ पाही घातली ही पाणपोई
धर्मजाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं
संसृतीचा हा उन्हाळा तल्खली होई जिवाची
स्वेदबिंदु अश्रुधारा याविना पाणीच नाहीं
वायुवीची भोंवतीं आंदोलुनी त्या वंचिताती
झोंबती अंगीं झळा अन् मूर्छना ये ठायिंठायिं
साउली नाहीं कुठेंही, तापतो मार्तंड डोई
श्रांत पांथा ! बांधली ही तूझियासाठीं सराई
आद्य जे कोणी कवी तत्स्फूर्तिच्या सिंधु गंगा
आणिल्या वाहून खांदीं कावडी त्यांतील कांहीं
पांथसेवासाधनीं हें व्हावयातें गार पाणी
मृत्तिकेचे मात्र माझे कुंभ, ही माझी नवाई
ओंजळी, दो ओंजळी, आकंठ घेई वा पिऊनी
हो जरा ताजा तवाना, येऊं दे सामर्थ्य पायीं
पावतां तृप्ती मना, संचारतां अंगीं उमेदी
जो दुवा देशील पांथा तेवढी माझी कमाई.

यशवन्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

उन्हाळयांत ज्या प्रदेशांत पाण्याचें दुर्भिक्ष्य असतें तेथें धर्मात्मे लोक ठिकठिकाणीं वाटसरूंच्या सोईसाठीं 'पाणपोई' घालितात. कवि म्हणतो, मी या कविता लिहितों त्या चैनीसाठीं—करमणुकीसाठीं नाहींत. माझ्या कवितांची मीं पाणपोई घातली आहे. कोणीहि या व खुशाल पाणी घ्या. धर्माचा, जातीचा येथें भेद नाहीं. मला पैसे नकोत, बडे-बडे किताब नकोत. माझ्या पाणपोयींत पाणी पिऊन वाचक मनःपूर्वक मला जो दुवा देतील तोच मला हवा.

कवि यशवन्त

अभ्यास

१. पाणपोई म्हणजे काव्यरचना असें समजून हें रूपक उलगडून दाखवा. उन्हाळा, जिवाची आग, मृगजल, श्रांत वाटसरू म्हणजे काय ?

२. कवीनें पाणपोईसाठीं पाणी कुठून वाहून आणलें ? म्हणजे काय ?

३. वायुवीची = वाऱ्याच्या लाटा. वंचितात म्हणजे फसवितात. मृगजळाचा भास; संसृति=संसार, दुनिया; झळा = उष्ण वारे, मार्तंड = सूर्य; श्रांत पांथा= दमलेल्या वाटसरा; सराई = धर्मशाळा; विश्रांतिस्थळ, मृत्तिकेचे कुंभ = मातीचे घडे, मडकीं. किती सुंदर कल्पना पाहा. कवि म्हणतो, माझ्या कवितेंतील विचार, कल्पना, विषय जुनेच—पूर्वींच्या कवीनें गायिलेले आहेत, ते फक्त मी नव्या चाली, नवे आकार देऊन तुम्हांला परत दिले. पाणी सिंधुनदाचें, केवळ त्याला थंडावा आणणारें मडकें माझें. किती विनय व शालीनता ! कवितेची चालहि विषयांतील गांभीर्य, संथपणा, शांतता यांना पोषक अशीच आहे. या कवितेची ग्रामोफोनची ध्वनिमुद्रिका—रेकॉर्ड ऐका.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९

वर्ड्स्वर्थचें फुलपाखरूं

(नाट्यछटा)

" ....ओ ! स्प्लेंडिड् ब्यूटिफुल् !—छेः ! वर्ड्स्वर्थची कविता म्हणजे काय !—मौज आहे ! फारच सुंदर, फारच उत्कृष्ट ! या महाकवीचें अंतःकरण किती प्रेमळ—अगदीं मेणासारखें आहे नाहीं ? आनंदामध्यें इकडून तिकडे घिरट्या घालणाऱ्या सूक्ष्म अशा किड्याला अगर मुंगीला, किंचित् कोणीं अडथळा केला, तर या कवीच्या हृदयाला लागलीच चटका बसून, अश्रूंनीं डबडबलेले नेत्र त्याच्या कवितेंत ठिकठिकाणीं कसे स्पष्ट दिसतात !—हीच पाहा कीं, 'फुलपांखरूं' ही कविता किती बहारीची आहे ! ही एकच काय, वर्ड्स्वर्थच्या सर्वच कविता गोड, मधुर रसानें भरलेल्या आहेत !—म्हणे माझी बहीण एमिलाइन आमच्या बागेंत बागडणाऱ्या फुलपांखराला—त्याच्या पंखावर बसलेली धूळ प्रेमानें हळूच पुसायलासुद्धां बोट लावीत नसे ! तर आपल्या नखाचा स्पर्श होऊन त्या बिचाऱ्याचा नाजूक पंख कदाचित दुखावेल—आणि त्याच्या आनंदाचा विरस होईल ! अहाहा ! वर्ड्स्वर्थ कवीची सृष्टी म्हणजे जिकडे तिकडे आनंद आहे ! धन्य तो कवी, आणि धन्य तो इंग्लंड देश ! खरोखरच अशा कवीच्या अध्ययनानें खडक देखील मेण होऊन जाईल ! मग माणूस तऽर—अरे हें काय ? या पुस्तकांत हा ढेकूण कोठून आला ! हां थांब चोरा ! पळून जातोस काय ? अस्सा बरा सांपडलास ! आतां जा कसा पळून जातोस तो ! तरी म्हटलें सकाळीं येवढें चावत काय होतें ! द्यावें याला खिडकीवाटे टाकून नाहीं ?—नको नाहींतर, तसें नको ! कारण, हा पुनः घरांत येऊन चावेल ! चिरडून टाकूं ? इश् ! हाताला उगीच घाण येईल अशानें ! मग ? हां हां !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या दिव्यांतल्या चिमणीवाटे द्यावा आंत फेकून म्हणजे चांगला भाजून मरेल !—पाहा, पाहा ! कसा चिकटून बसला आहे तो ! पडतो आहे का खालीं ?—स्स ! हाय ! बोट भाजलें ! पड खालीं—असा ! मर आतां !—कोण बाबू ? जेवावयाची तयारी झाली ?—चला तर लवकर. आपल्याला काय, जेवण झाल्यावर आणखी वर्ड्सवर्थ वाचूं !........"

दिवाकर

परिचय

साहित्यपरिचयाच्या पहिल्या दोन भागांत तुम्ही नाट्यछटा वाचून त्यांचा अभ्यासहि केलेला आहे. एकाच मनुष्याचें बोलणें व विचार लिहिलेले; पण ते वाचतांना, सभोंवतालचें वातावरण, माणसें त्यांच्या व बोलणाऱ्याच्या हालचाली आपणांस आपोआप कळतात. शब्दांत न लिहितां, वाक्यांच्या मांडणीमध्यें नाट्यछटेंत हे प्रकार मांडावे लागतात. विषय, कल्पना यांच्या उत्कृष्टतेवरच अर्थात् नाट्यछटेची योग्यता अवलंबून असते. सगळी नाट्यछटा वाचा, आणि, कोण कोठें, केव्हां काय करतो आहे तें सांगा. वर्ड्सवर्थ हा सृष्टींतील साध्या दृश्यांतील काव्य सोप्या भाषेंत सांगणारा इंग्लिश कवि होता. वर्ड्स्वर्थच्या कवितांचा लोक अभ्यास करीत. आपल्या आधुनिक कवींवरहि या कवीच्या कवितेचा परिणाम झाला आहे.

अभ्यास

कवितावाचनाचा मनुष्यावर काय परिणाम व्हावा असें या माणसाला वाटतें ? तुमच्या मनावर काय होतो ? नाट्यछटेस सुरवात करतांना मनाची कशी स्थिति होती व मध्येंच फरक कुठें व कसा पडतो ? शेवटचें वाक्य वाचून बोलणारासंबंधीं तुमचें मत काय होतें ? या प्रश्नांचीं नीट मननपूर्वक उत्तरें द्या.

वर्ड्सवर्थची कविता वाचणाऱ्यानें ढेकूण मारण्यांत चूक केली का ? विचारांतील व कृतींतील हा विरोध दिवाकरांनीं कुशलतेनें मांडून मनुष्यस्वभावांतील एक गंमत दाखविली आहे.

नाट्यछटेची सुरवात कशी केली आहे तें पाहा. तसेंच पूर्वार्ध व उत्तरार्ध यांतील भाषेंतील फरकहि लक्षांत घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३०

स्फूर्तीचें काव्य

(अभंग)

“न देखवे डोळां ऐसा हा आकांत। परपीडे चित्त दुःखी होतें॥
काय तुम्हीं येथें नसालसें जालें। आम्ही न देखीलें पाहिजे हें॥
परचक्र कोठें हरिदासाच्या वासें। न देखिजेत देशें राहातिया॥
तुका म्हणे माझी लाजवीली सेवा। हीनपणें देवा जिणें जालें॥ १
काय म्यां मानावें हरिकथेचें फळ। तरिजे सकळ जन ऐसें॥
उच्छेद तो असे हा गे आरंभला। रोकडें विठ्ठला परचक्र॥
पापाविण नाहीं पाप येत पुढें। साक्षीसीं रोकडें साक्ष आलें॥
तुका म्हणे जेथें वसतील दास। तेथें तुझा वास कैसा आतां॥ २
भीत नाहीं आतां आपुल्या मरणा। दुःखी होतां जनां न देखवे॥
आमची तों जाती ऐसी परंपरा। कां तुम्ही दातारा नेतां ऐसें॥
भजनीं विक्षेप तेंचि पै मरण। नच जावा क्षण एक वायां॥
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा। ते स्थळीं दातारा ठाव मागें॥ ३
“चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती। व्याघ्र ते न खाती सर्प तया॥
विष तें अमृत आघात तें हित। अकर्तव्य नीत होय त्यासी॥
दुःख तें देईल सर्व सुख फळ। होतील शीतळ अग्निज्वाळा॥
आवडेल जीवां जीवाचिये परी। सकळां अंतरीं एक भाव॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें। जाणिजेते येणें अनुभवें॥” ४
आतां तुझा भाव कळों आला देवा। ठकूनियां सेवा घेसी माझी॥
टाकूनि सांकडें आपुलीये माथां। घातला या संतांवरी भार॥
स्तुति करूनियां पिटिला डांगोरा। तें कोण दातारा साच करी॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातीनें वाणी मीं पोटींचें कुडें। नका मजपुढें ठकाठकी ॥
तुका म्हणे नाहीं आलें अनुभवा। आधींच मी देवा कैसा नाचूं ॥५॥

तुज घालोनियां पूजितों संपुटीं। परि तुझ्या पोटीं चौदा भुवनें ॥
तुज नाचूनि दाखवूं कौतुक। परि रूपरेखा नाहीं तुज ॥
तुजलागीं आम्हीं गात असो गीत। परि तूं अतीत शब्दाहूनि ॥
तुजलागीं आम्ही घातियेल्या माळा। परि तूं वेगळा कर्तृत्वासी ॥
तुका म्हणे आतां होऊनि परिमित। माझें कांहीं हित विचारावें ॥ ६ ॥

तूं माऊलीहून मवाळ। चंद्राहून शीतळ।
पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा ॥
देऊं काशाची उपमा। दुजी तुज पुरुषोत्तमा।
ओवाळूनि नामा तुझ्यावरूनि टाकिलों ॥
तुवां केलें रे अमृता। गोड त्याही तूं परता।
पांचां तत्त्वांचा जनिता सकळ सत्तानायक ॥
कांहीं न बोलोनि आतां। उगाच चरणिं ठेवितों माथा ॥
तुका म्हणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ॥ ७ ॥

आपुलिया बळें नाहीं मी बोलत। सखा भगवंत वाचा त्याची ॥
साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी। शिकविता धणी वेगळाचि ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें। परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा। वागवी पांगुळा पायांवीण ॥८॥

तुकाराम

परिचय

तुम्ही कधीं हरिदासाचें कीर्तन ऐकलें आहे का ? कोणतेंहि कीर्तन 'हेंचि दान दे गा देवा' हा अभंग म्हटल्याशिवाय पुरें होत नाहीं. कुठलेंहि भजन **'ज्ञानदेव तुकाराम'** या नांवाचा गजर केल्याशिवाय रंगत नाहीं. तुका-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामाच्या स्वभावाचें ग्रीक तत्त्ववेत्ता साक्रेटिस याच्या स्वभावाशीं साम्य दाखवितात. स्फूर्तीनें उत्पन्न झालेलें भाविकाचें काव्य तुकारामाच्या अभंगांत दृष्टीस पडतें. तुकारामाचे अभंग वाचा. त्यांत त्याचें हळुवार मन, निरनिराळ्या भावना, अन्यायी चालीरीतीमुळें रागावलेलें अंतःकरण, ईश्वरप्राप्तीविषयीं लागलेली प्रेमळ तळमळ तुम्हांला पाहाण्यास सांपडेल.

या उताऱ्यामुळें तुम्हांला अभंगांची गोडी लागली तर तुकारामाचे आणखी कांहीं अभंग वाचा.

अभ्यास

अभंग १, २, ३ हे प्रासंगिक आहेत. कीर्तनाला शिवाजीमहाराज आले आहेत अशा माहितीवरून पठाण स्वारांनीं देवळास वेढा दिला. कीर्तनाचा भंग होऊं नये म्हणून तुकारामांनीं हे अभंग म्हणून देवाचा धांवा केला व संकट टळलें अशी दंतकथा आहे.

अभंग ४. तुकारामाचा रामेश्वरभटांनीं छळ केला. त्याचें प्रायश्चित्त म्हणूनच कीं काय अनगडशहा नांवाच्या फकीरानें शाप दिल्यामुळें त्यांच्या अंगाचा दाह होऊं लागला. तुकारामांनीं हा अभंग त्यांना वाचावयास पाठविला. आग तत्काळ शमली ही अशी दंतकथा आहे.

तुकाराम कधीं देवावर प्रेमानें रागावतो, कधीं बरोबरीच्या नात्यानें बोलतो तर दुसऱ्या क्षणीं लीन होऊन सद्गदित अंतःकरणानें आळवणी करतो. शेवटल्या अभंगांतील त्याची नम्रता पाहा.

३१

मेघाचा प्रवास

(वृत्त : साकी)

पुढें अवंती देशीं जाऊनि पाहे पुरी विशाला
स्मरति जेथिल वृद्ध नागरिक उदयनभूपकथांला १
सुकृति जनांनीं भूवरि येतां उरलेल्या सुकृतानें
स्वर्गभाग जणुं आणिला खालीं त्या नगरीरूपानें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उभारूनियां थोर पिसारे प्रासादावरि मोर
हर्षे नाचावया लागतिल देखुनि तुला समोर. ३
महा काल जो त्रिभुवनपति त्या वंदाया मग जावें,
प्रभुकंठाची प्रभा मानुनी गण तुज बघतिल भावें. ४
तया स्थलींचीं बालोद्यानें हलवी मारुत मंद
विलसित पद्मा डोलवूनि जो हरी तयांचा गंध. ५
दुसऱ्या समयीं पोंचलास तरि जों सूर्योदय होई,
तोंवरि थांबें, पुढें जावया न करीं कांहीं घाई. ६
प्रभातपूजासमयीं प्रभुच्या दुंदुभिकार्य करोनी,
मंद गर्जना सफल घडो तव शिवसेवेलागोनी. ७
गंभीरेच्या प्रसन्न अभ्यंतरांत सुंदर रूप
तुझें बिंबुनी, घना, तयेला होइल हर्ष अमूप. ८
मत्स्य उसळतां उदरें त्याचीं चमकति वारंवार,
त्याच मिषें ती नदी तुजवरी फेंकिल कटाक्ष फार. ९
तव वृष्टीनें तृप्त वसुमती आनंदोद्गारांतें
टाकी, त्यांच्या संपर्कानें येत सुगंध जयातें. १०
दिनमणिकिरणीं तप्त मतंगज उचलुनि शुंडादंड
स्वस्थ जयांचे प्राशन करुनी पावति सौख्य उदंड. ११
निजसंयोगें उदुंबरफुलां जो पिकवीत वनांत,
देवगिरीप्रति सुखें वाहुनी नेइल तुज तो वात. १२
पावशील मग पुढें चालतां एका नदीतटाकीं,
मूर्तिमती जी रंतिदेवनृपकीर्तिच विलसे लोकीं. १३
तो राजर्षि बहु धेनूंतें यज्ञीं वधिता झाला,
सरक्त चर्मापासुन त्यांच्या जीचा उगम निघाला. १४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणुनि चर्मन्वती पुराणीं म्हणती कवी जयेला,
उतरुनि खालीं सादर चित्तें भेटें, घना तियेला. १५
तिच्या प्रवाहीं पांडुरवर्णी कृष्णवर्ण तव देह
देखुनि गगनांतुनी सिद्ध मनिं पावतील संदेह. १६
भूदेवीनें जणू धरियला कंठीं मुक्ताहार
मध्यें ज्याच्या इंद्रनीलमणि सुंदर चमके फार. १७
ब्रह्मावर्ताभिद देशांतुनि जाउनि पुढती पाहें
अति विख्यात स्थल, नाम जया कुरुक्षेत्र हें आहे. १८
जेथें पूर्वीं धनंजयें शर वर्षुनि राजमुखांतें
नासियलें; तूं करिशी जैसें जल वर्षुनि कमलांतें. १९
कौरव पांडव यांचा देखुनि उद्भवला संग्राम
चित्तीं द्रवला बंधुजनांचा कनवाळू बळराम; २०
पक्षपात मग टाळाया तो यात्रामिषा करोनी,
जींत रेवतीनेत्र बिंबले तीहि सुरा सोडोनी. २१
सरस्वतीच्या तटीं पातला; तीच्या सेविं जलाला.
शुभ्र अंतरीं होऊनि दिसशिल वरुनि मात्र मग काळा. २२
तेथुनि पुढती कनखल नामक तीर्थावरुनी जातां,
देखशील मग जन्हुकन्यका हिमगिरिखालीं येतां. २३
कपिलशापहतसगरसुतांची जी मनिं उपजुनि माया
सोपानांची पंक्तिच झाली स्वर्गीं त्या चढवाया. २४
बसुनि शंभुच्या शिरीं जटांशीं खेळे लहरिकरांनीं
गिरिजा भ्रुकुटी मोडी परि तें जी किमपीहि न मानी. २५
तीचें जल सुरगजापरी तूं गगनांतुनी लवोनी
पितां सावली तुझी प्रवाहीं पडतांना देखोनी. २६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जणु अस्थानीं गंगा यमुना संगम काय जहाला !
ऐसें वाटुनि खचितच मोठें होइल नवल जनाला. २७

कृष्णशास्त्री चिपळूणकर

परिचय

कालिदास या प्रसिद्ध संस्कृत कवीनें "मेघदूत" नांवाचें काव्य रचिलें आहे. त्याचें भाषांतर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलें. त्यांतील निवडक साक्यांचा हा उतारा आहे. भाषांतर इतकें उत्कृष्ट साधलें आहे कीं हें काव्य स्वतंत्रच असावें असें वाटतें. काव्याचा विषय असा आहे: यक्षांचा स्वामी कुबेर यानें एका यक्षाला कांहीं अपराधामुळें अशी शिक्षा केली कीं त्यानें आपलें घरदार सोडून कांहीं काळपर्यंत रामगिरी येथें एकांतवासांत राहावें. यक्षाचें आपल्या स्त्रीवर फार प्रेम होतें व हद्दपारीच्या ठिकाणीं त्याला तिची वारंवार आठवण होई. एकदां आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशीं आभाळांत आलेल्या एका मेघास पाहून यक्षानें विनंति करून त्याला दूत बनविलें व तसेंच आभाळांतून मार्ग आक्रमून आपल्या घरीं जाऊन स्त्रीस कळवावयाचा निरोप सांगून त्याला पाठविलें. वाटेंत काय काय स्थळें लागतील व तेथें काय काय अनुभव येतील हें तो यक्ष प्रस्तुत उताऱ्यांत मेघाला सांगत आहे.

अभ्यास

१. अवंती = उज्जयिनी नगरी. २. उदयनभूपकथा = उदयन नांवाचा बुद्धपूर्व राजा. याचें उज्जयिनीची राजकन्या वासवदत्ता इच्याशीं मोठ्या गमतीनें लग्न झालें. त्याविषयींची गोष्ट 'कथासरित्सागर' या गोष्टींच्या पुस्तकांत सांगितली आहे. ३. शंकर नीलकंठ असतो, मेघहि निळसर; तेव्हां शंकरदर्शनाला मेघ उतरला असतां तो शंकराच्या गणाला म्हणजे सेवकांना शंकराचा निळसर गळाच आहे असें भासेल. अशा उपमा–उत्प्रेक्षा कालिदासाच्या काव्यांत फार असतात. ४. गंभीरा नदी तळपणाऱ्या माशांच्या रूपानें तुझ्याकडे कटाक्ष फेकील ही दुसरी उत्प्रेक्षा पाहा. ५. दहा, अकरा, बारा या साक्या वाऱ्याला उद्देशून आहेत. दहाव्या साकींतील कल्पना किती सुंदर आहे पाहा. मेघा, तूं वर्षलास म्हणून 'वसुमति' म्हणजे पृथ्वी जे आनंदाचे उद्गार वर टाकते त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपर्कानें वारा सुगंधित झाला आहे. पाऊस पडला म्हणजे जमिनीचा कसा छानदार वास सुटतो व तो वाऱ्यावर आपणाकडे येतो. ६ तप्त मतंगज = उन्हाळ्यांतल्या उन्हानें तापलेले हत्ती. ७ रंतिदेवनृपकीर्ति = रंतिदेव नांवाच्या राजाची कीर्ति. ८ जन्हुकन्यका=गंगानदी. ९ कपिलशापहतसगरसुत= कपिल ऋषीच्या शापानें मेलेले सगर राजाचे मुलगे. या मुलांनीं खणलेल्या खळग्यांत गंगा नदीचें पाणी जाऊन सागर (समुद्र) झाला. सागराच्या मुलांना स्वर्गाला पोंचवणारी गंगानदी ही उंच स्वर्गास नेण्याची पायरीच झाली.

३२

इंग्रजी व्याकरण

आज पहांटेपासून पावसाची झड लागली होती. गुंड्याला घरांत डांबून पडण्याचा अगदीं कंटाळा आला होता. " बाबा ! मी काय उद्योग करूं ?" असें त्यानें दहा वेळां तरी विचारलें असेल. शेवटीं मात्र बाबांनीं वर्तमानपत्र खालीं आदळून गर्जना केली : ' शंभर वेळां सांगितलें, कांहीं करूं नकोस म्हणून ! आतां पुन्हां विचार तर खरं म्हणजे—'

बाबांचें बोलणें संपावयाच्या आंतच गुंड्या स्वयंपाकघरांत सटकला. वांकडें तोंड करीत, आळोखे पिळोखे देत तो आईला म्हणाला, ' आईग ! मी आतां उद्योग तरी काय करूं ? '

आईनें सुचविलें, ' बैस स्वस्थ देवासारखा ! '

गुंड्या म्हणाला, ' पण आई ! स्वस्थ बसणें म्हणजे कांहीं उद्योग करणें होत नाहीं. मी मनांत आणलें तर सारा दिवस हात जोडून बसेन. पण—

' मनांत यायला पाहिजे ना तसं ! ' आईनेंच वाक्य पुरें केलें.

गुंड्या वक्तृत्वाच्या भरांत वहावून म्हणाला, ' मनांत ढीग येईल, पण त्यांत अर्थ नाहीं. राम नाहीं. स्वस्थ, निरुद्योगी, आळशी माशांप्रमाणें—'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'अरे, मग कांहीं लिही. वाच—'

'अग, तो अभ्यास झाला! चांगलं! सुट्टीच्या दिवशीं—'

आईनें पोळपाट आपल्यापुढें ओढीत सुचविलें, 'बरं तर! पुऱ्या



लाटायला मला मदत कर! चल ये!'

आईकडे रागानें पाहात गुंड्यानें मागें पाऊल घेतलें.

माजघरांत गुंड्याची मोठी बहीण सुशीला आपल्या जीवश्च कंठश्च मैत्रिणीशीं कानगोष्टी करीत होती, 'अन् किनई त्या यमूला सासरीं मोठा—'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंड्याला दारांत पाहून दोघींनीं चपापून आपलें बोलणें थांबवून लोकरीचे गळपट्टे विणण्याचें काम चालू केलें. कुठून ही ब्याद मध्यें आली अशा अर्थाचे भाव दोघींच्या चेहऱ्यांवर उमटले होते.

त्यांच्यामध्यें बसून गुंड्या दोघींकडे आळीपाळीनें टक लावून पाहूं लागला. मैत्रिणीनें मानभावीपणानें गोड आवाजांत विचारलें, 'काय गुंड्याजी आज काय काढली आहे रिकामपणाची कामगिरी ?'

गुंड्या कपाळावर आंठ्यांचें जाळें करून म्हणाला, 'कुछ् नहीं ! हं, सासरीं मोठा काय आहे ?'

सुशीला म्हणाली, 'गुंड्या बाळ ! ओटीवर जातांना दार जरा लोटून घे हं ! फार वारा सुटला आहे; पावसाचे थेंबहि येतात आंत !'

गुंड्या रागानें लाल झाला. झटकन् उठून दाणदाण पावलें टाकीत दाराजवळ थबकून तो म्हणतो, 'बरं, बरं; आजीबाई ! जातों हं, मला मुळीं कामच आहे. तुम्हीं राहा म्हटलं तरी कोणाचं अडलं आहे बायकासारखें चकाट्या पिटीत बसायला ! म्हणे ओटीवरून माजघरांत पाऊस येतो ! कुकुलं बाळ आहें मी. हूं ?' धाड्कन् दार आपटून बाहेर आल्यावर त्याला जरा बरें वाटलें. बाहेरच्या खोलींत मोठा भाऊ वसंत आपल्या मित्राला नवीन आणलेली हवेची बंदूक दाखवीत होता: 'असा घोडा ओढला म्हणजे–' गुंड्याला पाहून तो खेंकसून म्हणतो, 'चल नीघ, का घालूं–' वाक्य पुरें होण्याच्या आंतच गुंड्यानें परत स्वयंपाकघराकडे धूम ठोकली. नवीन आणलेल्या 'स्त्री' मासिकाच्या स्वयंपाकघरांतील विभागाचीं पानें आई चाळीत होती. गुंड्यानें हलकेंच विचारलें, 'मी बाहेर जाऊन येऊं ?'

'भलतंच, वेडा आहेस ! मुसळधार लागली आहे बाहेर !'

'असूं दे ! मला आवडतं पावसांत भिजायला !'

'तोंड आटप !'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंड्याला वाटलें, किती आपण दुर्दैवी ! आईबापांना आपलं कांहीं आवडत नाहीं. मित्र कोणी नाहींत आपल्याला घरीं येऊन खेळायला ! 'आपलीं भावंडें किती भाग्यवान् !' तो एकदम म्हणाला; 'त्यांना मात्र मित्र आणि मला कां नाहीं ?'



आई पानावर बोट ठेवून पुटपुटत होती—'आधण आल्यावर पावशेर रवा ! काय म्हणतोस तूं ? उगीच नको मला सतावूंस. जा बाहेर विचार त्यांना वाटलें तर !'

'जा बाहेर. विचार त्यांना **वाटलें** तर !' गुंड्यानें मनांतल्या मनांत आपल्या इच्छेप्रमाणें शब्द तोडून पडत्या फळाची आज्ञा पाळली. तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओटीवर दिसतांच वर्तमानपत्राआड तोंड लपवून बाबा म्हणाले, 'गुंड्या, आतां प्रश्न विचारून भंडावणार असलास तर—'

गुंड्या शांतपणें म्हणाला, 'नाहीं बाबा! कांहीं विचारावयाचें नाहीं. पण तुम्ही सगळी मोठी मंडळी रविवारीं सकाळपासून संमेलनाला जाणार आहांत. मग मी माझ्या मित्रांना घरीं खेळायला बोलावूं?'

बाबांनीं चिडून उत्तर दिलें, 'नाहीं! मुळींच नाहीं. अरे, तूं करत कां नाहींस कांहीं तरी?'

गुंड्याचा राग पोटांत मावेना. तो रंजीस येऊन म्हणाला, 'मी पुष्कळ म्हणतों, पण मला करावेंसें वाटतें तें करूं द्यावयाचें नाहीं आणि नको तें मात्र करायला सांगावयाचें! म्हणे पुऱ्या लाट! हूंः!'

बाबांचें मुळीं लक्षच नव्हतें या कुरबुरीकडे. बाहेर पाहात ते एकदम म्हणाले, 'देव पावला. थांबला पाऊस. हो चालता बाहेर.' गुंड्या हूं का चूं न करतां पण घाईनेंच निसटला. हो, न जाणो बाबांचा बेत बदलला तर!

घराबाहेर फार फार मजा होती आज! रस्त्यांत पाण्याचीं थारोळीं सांठलीं होतीं. त्यांतून चालतांना कशी गंमत वाटते तें सांगावयास का पाहिजे? गुंड्यानें दोन समुद्र जोडणारा सुवेज कालवा पायानें खोदला. तुडुंब भरलेल्या एका सरोवरास पाट फोडून दूरवर मिसिसिपी नदी वाहत नेली. रस्त्याच्या बाजूच्या कुंपणाचीं झुडपें गदगदा हालवून तुषारस्नान केलें. गाडीच्या चाकोऱ्यांतून चिखल सांठला होता. अलीकडून पलीकडे पंचवीस वेळां उड्या मारून आपण कितीवेळां चाकोरींत न पडतां यशस्वी होतों या विक्रमाचा त्यानें प्रयोग केला. अखेरीस निष्कर्ष इतकाच निघाला कीं, गाड्यांचीं दोन्ही चाकें एकाला एक चिटकवून बसविण्याचा आपण मोठेपणीं वटहुकूम काढणार! चिखलांतून चाललें म्हणजे पायावर बूट चढतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोड्या वेळानें ते सुटून पडतात. आपल्याला शत्रु पकडून नेत आहेत आणि चिखलाच्या बुटांच्या खुणा रस्त्यांत पाहून आपल्याला बालवीर सोडवावयास येणार असा खेळ खेळत गुंड्या चालला. मध्येंच त्याला आठवलें, रविवारीं मंडळी जाणार. आपणहि मित्रांना घरीं बोलावलें पाहिजे. तो तसाच घरीं येऊन बापाजवळ उभा राहिला आणि म्हणाला, 'बाबा! मुलांना घरीं बोलाव रविवारीं असं मघाशीं तुम्हीं म्हणालां ना?' बाबांनीं ठासून सांगितलें, 'नाहीं! नाहीं! अगदीं गळेपडू आहेस. नाहीं असें दोनदां सांगितलें ना! आणि जा आधीं कपडे बदल. पळ!'



दुसरे दिवशीं इंग्रजी व्याकरणाच्या तासाला गुंड्याचें सर्व लक्ष रविवारच्या कार्यक्रमाकडे लागलें होतें. 'घरांत मोठें मनुष्य नसल्यावरच घरीं मुलांना बोलावण्यांत मजा! बन्या, मन्या, चंदू, बाळू हे पाहिजेतच. नाहींतर सगळ्या वर्गालाच बोलावूं झालं! बस्स!'

'हं गुंड्या, काय सांगितलें आतां मीं?' मास्तर गरजले. काय विचित्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न पाहा ! मास्तर नेहमीं हा प्रश्न विचारतात. कुणाला तें जास्त ठाऊक आहे, मला नाहीं; हें जर त्यांना पक्कें ठाऊक आहे, तर मग कशाला विचारतात मला ? ' हो सर ! कायसंसं अव्ययाचं होतें सर ! व्याकर्णा-तलंच होतें सर !'

' अहो लंबकर्ण ! व्याकरणाचा तास चालला आहे हें तरी लक्षांत राहिलें एवढं नशीब ! अव्ययें खलास झालीं गेल्या आठवड्यांत. गुंड्या ! लक्ष नाहीं तुझें. चंदू चलाखे ! तूं सांग पाहूं ?' बाकावरील चित्रावरून कोटाची बाही फिरवीत चंदू चलाखे म्हणाला, ' इंग्रजी भाषेंत दोनदां नकार म्हणजेच होकार !'

मास्तर म्हणाले—"घोक ! टू निगेटिव्हज् मेक् ऍन् ऍफर्मेटिव्ह." गुंड्यानें निर्विकार मुद्रेनें पांचदां घोकलें, पण डोक्यांत प्रकाश पडल्याचें चिन्ह दिसेना.

मास्तर टेबलावर छडी आपटत म्हणाले, ' नो म्हणजे नाहीं. नॉट म्हणजे नाहीं, यस म्हणजे होय ! नो, नॉट हे नकारात्मक शब्द एकाच वाक्यांत योजले तर होकारार्थी अर्थ होतो. त्या पेटींत पैसे नाहींत असें नाहीं म्हणजे आहेत. दोनदां नाहीं आलें ना वाक्यांत ? काय ? समजलें कां ?'

गुंड्या उडी मारून हात पुढें उंचावीत चटकन् म्हणाला, ' सर ! समजलं नाहीं असं नाहीं, म्हणजे समजलं सर !' त्याच्या डोक्यांत लखकन् प्रकाश पडला. " नो–नॉट = यस्. नाहीं नाहीं = होय. नाहीं ! मुळींच नाहीं = होय ! नाहीं, म्हटलें नाहीं = म्हटलं !" बाबा म्हणाले " नाहीं असें दोनदां सांगि-तलें–जा असें एकदां सांगितलें." असें दिवसभर तो सारखा घोकत होता.

त्याचा आनंद आज गगनांत मावत नव्हता. व्याकरणाच्या नियमांबद्दल त्याला आज किती तरी जिव्हाळा वाटत होता. 'नाहीं नाहीं = होय ! वा ! काय गंमत !' शाळा सुटावयाच्या वेळेस त्यानें सर्व मुलांना रविवारीं घरीं खेळावयास येण्याचें आमंत्रण दिलें. तो म्हणाला, " घरीं उगीच कळवूं नका आधीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संध्याकाळीं घरीं गेल्यावर सांगा जेवायचं नाहीं म्हणून; काय समजलांत ? नाहीं नाहीं = होय ?" मुलें गुंड्याच्या तोंडाकडे पाहूं लागलीं.

रविवारीं सर्व मोठीं माणसें संमेलनास चौघड्याच्या कार्यक्रमापासून हजर राहणार असल्यामुळें तीं लवकर सकाळीं निघालीं. आईनें ममतेनें पाठीवरून हात फिरवीत विचारलें, 'बाळ गुंडू ! तूं मोठा झालास म्हणजे नेत जाऊं हं तुला बरोबर ! वाईट नाहींना वाटत घरीं राहण्याचें ?'

गुंड्या आज अगदीं मनापासून खरें बोलला, 'नाहीं ग आई !'

सकाळची वेळ भटकण्यांत गेली. दुपारीं गडबड न करतां गुंड्याला स्वस्थ जेवतांना पाहून स्वयंपाकीण काकूस व ठकू मोलकरणीस फार नवल वाटलें. त्या हंसून एकमेकींस खुणावूं लागल्या. हातावर पाणी पडल्याबरोबर गुंड्या घराबाहेर पडल्यामुळें दोघींचा जीव भांड्यांत पडला. संध्याकाळपर्यंत त्रास होणार नाहीं असें वाटून त्यांनीं आपापले बेत ठरविले. कोठींतील झुरळें मारण्याचा काकूंनीं बेत ठरविला आणि धुणींभांडीं करून ठकू आपल्या बहिणीच्या समाचारास गेली.

दुपारीं कल्हईवाला आला असा भास होऊन मोळाची केरसुणी हातांत घेऊन तशाच काकू दाराशीं जाऊन पाहातात तों—चाळीस मुलांची तुकडी रस्त्यानें मारे धुमाकूळ घालीत येत होती ! या बाजारबुणग्यांच्या हातांत कुंपणाच्या उपटलेल्या काठ्या होत्या. घरून निघतांना जुलमानें घातलेल्या परीट-घडीच्या कपड्यांना लोणाऱ्याच्या कपड्यांची इतक्यांतच कळा आली होती ! जणूं काय 'तिळा उघड' म्हणतांच उघडलेल्या गुहेंतून चाळीस चोर अलीबाबाच्या घराचा पत्ता काढीत चालले होते. जणूं काय या मावळ्यांच्या आघाडीला तानाजी मालुसरे—गुंड्याजी—वीरश्रीनें फुगून छाती काढून चालले होते. केरसुणी परजीत दार अडवून उभ्या राहिलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काकूंस पाहातांच सर्व मावळे बागेच्या फाटकांतच थबकले. काकू किंचाळल्या, ‘ गुंडुराव, कशाला आणली आहे ही वानरसेना !’

गुंडोपंत एकएक अक्षरावर जोर देत म्हणाले, ‘ खेळायला, फराळाला !’

काकूंनीं विकट हास्य करीत धमकावलें, “ येऊं देत तुझे बाबा घरीं म्हणजे मिळेल चांगलें फराळाला !”



गनिमी कावा लढवीत गुंड्यानें एकएक पाऊल पुढें सरकत दार गांठण्याचा प्रयत्न चालविला. तो काकूस म्हणाला, “ बाबांनींच सांगितलें मला, आण मुलांना घरीं. मीं पुन्हां विचारलें तेव्हां म्हणाले, नाहीं ! मुळींच नाहीं.’ दोन नकार ! टू निगेटिव्ह म्हणजे एक अॅफ्....कांहींतरी ! इंग्रजी व्याकरणाच्या भाषेंत सांगितलें त्यांनीं. विचारा वाटलें तर मास्तरना. इंग्रजी व्याकरण समजत नाहीं तें नाहीं अन् उगाच—”

काकूंनीं धाडकन् दरवाजा लावल्यावर सर्व शिष्टाई विफल झाली. चाळीस तोंडें भुकेनें सुकलीं ! चाळीस पोटांच्या दामट्या झाल्या ! एकशेंसाठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हात पाय निराशेनें गळाले ! तानाजी आवेशानें म्हणाला, "मर्द मावळे हो ! थू तुमच्या जिनगानीवर ! बांगड्या भरल्यात काय ? डरतां काय काकूंना ? चला, हा सिंहगड सर करा !"

तोंपर्यंत काकूंनीं सर्व दारांचा बंदोबस्त करून खिडक्याहि लावून घेतल्या. मावळ्यांनीं बागेंतले दोडेच पेरू खाल्ले. गुलाबांचीं कलमें उपटून कांटेरी तरवारी केल्या.

ओणव्या मुलांच्या खांद्यावर चढून, चुकून उघड्या राहिलेल्या खिडकींतून गुंड्यानें ओटीवरच्या खोलींत प्रवेश केला. काकू धान्याच्या कोठीच्या खिडक्या लावीत होत्या. चंदु चलाख्यानें मांजराच्या चालीनें जाऊन चपलाईनें दार लावून कडी अडकविली ! तानाजीनें दिल्ली दरवाजा उघडतांच सर्व सेना 'हरहर महादेव' अशा आरोळ्या ठोकीत आंत घुसली ! मग काय ? माकडचेष्टांना ऊत आला ! वसंत—सुशीलेच्या कपाटांतले कपडे, बाबांचा रुमाल, हवेची बंदूक बाहेर पडून नाटकास सुरवात झाली. काकू तुरुंगांत असल्यामुळें चहा मिळणार नाहीं असें जाणून गुंड्यानें मुरांब्याच्या बरण्या, सुधारस, श्रीखंडाच्या वड्या, लाडू, पेढे, शंकरपाळी यांच्या फळीकडे मोर्चा फिरविला. इतक्यांत ठकू मोलकरीण बागेच्या फाटकांत, तिला तिथपर्यंत पोंचविण्यास आलेल्या बहिणीशीं बोलतांना दिसल्या. बरोबर मन्यानें मावळ्यांची निवडक तुकडी पाठवून तिच्यावर टोम्याटोंचा जंगी मारा केला. तीन मजली हंसण्याच्या आवाजानें गुंड्या तसाच रिकाम्या हातीं पण भरल्या तोंडी बाहेर येऊन पाहातो, तों फाटकाशीं एक चार चाकी घोड्याची बगी उभी राहिली ! प्रथम बाबा उतरले खालीं ! ! !

चंद्रोदयाबरोबर मावळणाऱ्या ताऱ्यांप्रमाणें, सूर्यकिरणाबरोबर अदृश्य होणाऱ्या दंवबिंदूंप्रमाणें, चाळीस भुकेलीं मुलें कुंपणांतून, भिंतीवरून उड्या मारून क्षणार्धांत नाहींशीं झालीं ! तोंडांतला पेढा आंवढ्याबरोबर गुंड्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसाच गिळला. पुढें वाढून ठेविलेल्या भवितव्याच्या भीतीनें त्याचें तोंड काळवंडलें !

* * *

संध्याकाळीं माळ्यावरच्या खिडकीच्या गजांतून, गाल चोळीत गुंड्या उभा राहून हुंदके देत बाहेर पाहात होता. मावळणाऱ्या सूर्याच्या लाल प्रकाशांत त्याच्या रागानें फुगलेल्या गालांवर इंद्रधनुष्याचे हिरवे निळे रंग चमकत होते !

शेजारच्या घरांतील बोबडी बगी भिंती-पलीकडून म्हणाली, ' गुंदू ! खेलायला ये माद्यासीं. अंधालांत माल्यावर काय कलतोस ? ये खालीं !'

गुंड्यानें खिन्नपणानें मान हलवली.

बगीनें कळकळीनें विचारलें 'तुला ताप आला ? गालगुंद दालं होय ?'



गुंड्या चिडून म्हणाला, 'गप्प बस कारटे ! कांहीं झालं नाहीं मला ! आईला इंग्रजी व्याकर्ण येत नाहीं आणि बाबा तर तें पार विसरून गेले. शिक्षा मात्र आम्हांला ! खासा न्याय !'

श्री. बा. रानडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

ही एक रूपांतरित गोष्ट आहे. मुलांना कांहीं उद्योग सांपडला नाहीं म्हणजे तीं खोड्या करतात. त्यांच्या मनांतले विचार मोठ्या माणसांना पुष्कळ वेळां कळत नाहींत. अशा मुलांसंबंधीं इंग्रजी भाषेंत पुष्कळ गोष्टी आहेत. मिस् रिचमल् क्राम्प्टनकृत 'विल्यम'; जिमीज् 'ॲडव्हेंचर्स' ह्या गोष्टी जरूर वाचा. मराठी भाषेंतहि, भोळा बाळू, बाबूच्या लीला, बूबी वगैरे पुस्तकें आहेत.

अभ्यास

१. नागमोडी खूण केलेल्या वाक्यांचा अर्थ करून त्यांत काय चुकीचा विचार आहे तो सांगा.

२. **जीव** भांड्यांत पडला, पडतें **फळ, माकड**चेष्टा यांचे अर्थ सांगा व या नामांवरून होणारे दुसरे वाक्प्रचार व म्हणी सांगा.

३. गुंड्यानें बाबांच्या बोलण्याला व्याकरणाचा नियम लागू करण्यांत काय चूक केली?

४. 'अलीबाबा व चाळीस चोर' ही गोष्ट सांगा.

५. पहिल्या पानांत घरीं आई, बाबा, वडील बहीण व भाऊ हे गुंड्याशीं ज्या प्रकारें वागले त्याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे?

३३

सारीं फुलेंच फुलें!

आकाशांत फुलें, धरेवर फुलें, वाऱ्यावरीही फुलें,
माझ्या गेहिं फुलें, धरेवर फुलें, भूगर्भि सारीं फुलें!!
माझें चित्त भुले, सुगंध सुटले! हें विश्व आनंदलें!
कोणी आकळिलें? कुणास कळलें उद्यान विस्तारलें! १

नक्षत्रें, सुमनें, विहंगम, मुलें, काव्यें, मणी! हीं जरी
नांवें भिन्न, खरोखरी मज फुलें हीं रम्य सारीं तरी!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेतों ह्यांतुन थोडका रस ! पुन्हां त्यांच्याकडे धांवतों,
धांवाधांव म्हणा, परी हिजमधें कैवल्य मी पावतों ! २
जातीच्या भ्रमरास " सोडुन फुलें ये फोड हीं लांकडें ! "
ऐसें कोण म्हणेल ? कोण भलतें घालील हें सांकडें ?
देवानेंच जयास पुष्प-हृदयीं खेळावया निर्मिलें,
त्याला वृत्ति दुजी सुचेल कुठुनी ? प्राणा जरी घेतलें ! ३
बोला चंचल हा क्षणांत गगनीं धांवे क्षणें भूवरी !
हा वाऱ्यावर ! हा गृहीं ! निज मनीं ! हा भूमिच्या भीतरीं !'
हांसा मानुनियां निरर्थ मम हो ह्या गोड गुंजारवा
माझे जन्मच हे फुलां निरविले ! भीतों न मी मानवा ! ४
मज गमे मजसाठिं जगत्पती, फुलवितो अवघ्या जगताप्रती !
भ्रमर मी रस सांठविं चाखुनी, मजसमान रसज्ञ न हो जनीं ! ५
जाइन सोडुन ह्या जगताला, ठेवुन हा मधुकोश तुम्हांला,
तोंवर आड नका मज होऊं ! पाप नका कुणि हें शिरिं घेऊं ! ६

नारायण वामन टिळक

परिचय

रे. टिळकांना 'फुलांमुलांचे कवि' म्हणतात. त्यांनीं स्वतःविषयींच एका कवितेंत " न मीं गायिलीं कुणास इतरां जशीं फुलांना काव्यें " असें म्हटलें आहे. ते म्हणतात, 'आकाशांत, जमिनीवर चोहींकडे मला सारीं फुलेंच फुलें दिसतात. फुलांवर काव्यें लिहिण्याऐवजीं मला तुम्ही दुसरें काम सांगून चालायचें नाहीं. मी तें करणार नाहीं. माझा जन्मच फुलांसाठीं. हंसा, नांवें ठेवा. मला तर असें वाटतें कीं देवानें हें विश्वरूप असें हें फूलच फूल माझ्यासाठींच फुलविलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. टिळक म्हणतात, "जातांना मी हा मधुकोश तुमच्यासाठीं ठेवून जाईन" म्हणजे काय ?

२. टिळकांची फुलांविषयीं काय कल्पना आहे ? ते कोणत्या प्रकारच्या वस्तूंना फुलें समजतात ? त्या वस्तूंचीं नांवें सांगा.

३. तुम्हांला कोणता श्लोक आवडतो ? कां ?

३४

निःस्पृहस्य तृणं जगत्

स्थळ : शनिवारवाडा; रघुनाथरावदादा पेशवे यांचा महाल.

रघुनाथरावदादा : (आनंदीबाईस) तुझ्या विचाराप्रमाणें वागण्याचाच मीं निश्चय केला आहे. सर्व बेत नीट पार पाडावा म्हणून निजामचे स्वारींत श्रीक्षेत्र पंढरपुरापर्यंत मी तुला नेणार आहें. पण ह्या सर्व बेतांत मला एक मोठी अडचण दिसते.—ही रामशास्त्र्यांची धोंड जेथें तेथें आमच्या आड येत आहे.—'माधवाला कैद कसा करूं !' म्हणून शंका माझ्या मनाला शिवली नाहीं, व नारायणाच्या हुकमांत 'ध' चा 'मा' करण्यास संमति देतांनाहि माझ्या जिवाला इतकी दिक्कत वाटली नाहीं. पण रामशास्त्र्याला कसा दूर करावा, ह्याचा मी विचार करूं लागलों, म्हणजे माझीं सर्व गात्रें गळून जातात ! राजसत्तेला निर्माल्यवत् करण्याची शक्ति एकाद्या बुद्धिवान् तपस्व्याच्या अंगीं असावी अं ?—मला केव्हां केव्हां वाटतें, ही पेशव्यांची गादी सोडून गंगाकिनारीं तपश्चर्या करून रामशास्त्र्याप्रमाणें विद्वान् योगी व्हावें !

आनंदीबाई : काय वाटतें आपणांला ? योगी व्हावयाचें जर मनांत असलें—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रघुनाथरावदादा : (जवळ बसवून घेऊन) आतां तसें कांहीं नाहीं वाटत.—तूं लांब उभी असलीस म्हणजे भलतेसलते विचार मनांत येतात.—तुझा हात असा हातांत धरला म्हणजे ज्यांच्या नांवाचा दरारा आबालवृद्धांस वाटत आहे, असा प्रखर प्रतापी पेशवा व्हावेंसें मला वाटतें.

आनंदीबाई : असें जर आपणांला वाटत असेल तर रामशास्त्र्यांना बोलावून आणून त्यांचीं पाहिजे तशीं आर्जवें करून त्यांना पंढरपूरास आपल्याबरोबर घेऊन चला. पुण्यांतील भटांभिक्षुकांची व त्यांची ताटातूट झाली म्हणजे पुणेकरांचा नक्षा उतरलाच म्हणून समजा. पंढरपुरास गेल्यावर माधवाला आणि रामशास्त्र्याला दोघांनाहि शिव्याशाप देणारे रामशास्त्र्यांसारखेच खवीस पाध्ये आहेत तेथें. त्यांना बगलेंत मारून देऊं रामशास्त्र्यांच्याविरुद्ध चिथवून—कांट्यानेंच कांटा काढला पाहिजे.—अशा रीतीनें पुण्यास रामशास्त्री मावळले व पंढरपुरास निस्तेज पडले म्हणजे झालें त्यांचें प्रस्थ कमी.

रघुनाथरावदादा : पण श्रीक्षेत्रीं जाऊन प्रायश्चित्त घेण्याचें आतां कबूल केलें तर मात्र रामशास्त्री येतील पंढरपुरास.

आनंदीबाई : कबूल करावें प्रायश्चित्त घेण्याचें. आपणांस काय? कार्यभाग साधला म्हणजे झालें. आतां रामशास्त्री आले म्हणजे मीदेखील हट्ट धरून बसेन प्रायश्चित्त घेतलेंच पाहिजे म्हणून.

रघुनाथरावदादा : हो, ही युक्ति बरी. करावें कबूल, सांगाल तें प्रायश्चित्त घेतों.—रामशास्त्र्यांना मीं केव्हांचें बोलावणें पाठविलें आहे, अजून कां बरें आले नाहींत?

[दासी येते.

दासी : सरकार, रामशास्त्री, सुमेरसिंग, खरकसिंग, व कोतवाल आले आहेत. सरकारच्या आज्ञेची वाट पाहात आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रघुनाथरावदादा : रामशास्त्र्यांना आंत पाठवून दे; आणि शेजारच्या दिवाणखान्यांत थोडा वेळ बसायला सरदारांना सांग.

[दासी जाते.

आनंदीबाई : (उठून दादासाहेबांच्या मागें उभी राहते) आज मात्र रामशास्त्र्यांना जाळ्यांत पुरें पकडलें पाहिजे, हो ! मुळामुठेच्या संगमांत आतां जें जाळें टाकायचें, तें पाण्याच्या ओघानें वाहत वाहत नेऊन पंढरपूरच्या वाळवंटावर बाहेर काढावयाचें, म्हणजे जाळ्यांतील माशाला फशीं पडलों आहें, हें ऐन वेळेपर्यंत ध्यानांत यावयाचें नाहीं.

[रामशास्त्री येतो.

रघुनाथरावदादा : (उठून) या, शास्त्रीबोवा, या; असें बसायचें होतें.

रामशास्त्री : श्रीमंतांबरोबर अर्धासनावर बसण्याची आम्हां गरिबांची योग्यता नाहीं.

रघुनाथरावदादा : शास्त्रीबोवा आपणांस माहीत आहे, धनी व नोकर हें नातें आपणासारख्या गुरुवर्याशीं ठेवण्याची पेशव्यांची रीत नाहीं.

रामशास्त्री : रावसाहेबांबरोबरच जुन्या चालीरीती लयास गेल्या. आतां नव्या चाली पडल्या. पुतण्याचा खून करण्याची पद्धत तुमच्या घराण्यांत पूर्वीं होती काय ?

रघुनाथरावदादा : (बसत) माझ्या माथीं हा अपराध नाहक आपण मारतां आहां !

आनंदीबाई : शास्त्रीबोवा, गारद्यांच्या हातून गाय चुकून मारली गेली, तर तुम्ही ह्या असल्या बोलण्यांनीं वासरूं जाणूनबुजून मारीत आहां.

रामशास्त्री : बाईसाहेब, मला दोष देण्यापेक्षां आपल्या कर्माला दोष कां देत नाहीं ! कैलासनाथाची इच्छा तशी आहे; मी खोटें कसें बोलूं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—दादासाहेबांवर हा खुनाचा आरोप ठेवून गांवांत सर्व लोक जेव्हां कुजबुजायला लागले, तेव्हां 'देवा, हें खोटें ठरूं दे,' म्हणून कैलासनाथाची मी किती वेळां तरी करुणा भाकली; पण कैलासनाथाचे मनास आलें नाहीं. मी तरी काय करूं बाईसाहेब ? नारायणरावांना मारण्याचा हुकूम मीं माझ्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्यावर दादासाहेबांना मी खुनी मसजूं नको तर काय करूं ?

आनंदीबाई : अहो, त्या हुकुमांत 'धरावें' असें होतें, हें मी माझ्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. गारद्यांना चकवून तुळाजीनें तो हुकूम आपल्या हातीं घेतला, आणि त्यानें ताईतांत घालून दंडांत बांधला. गारद्यांनीं किंवा तुळाजीनें 'ध' चा 'मा' मागाहून केला नसेल म्हणून कशावरून ?

रामशास्त्री : हुकुमांत जर 'धरावें' असें असतें, तर ज्यांनीं हुकूम लिहिला, ते हजर असतांना—दादासाहेब हजर असतांना,—आपण हजर असतांना—गारद्यांचे सरदार हजर असतांना,—नारायणराव मारले गेले नसते.

रघुनाथरावदादा : पण ह्या गोष्टीची वाटाघाट करण्याचा काय उपयोग ? खऱ्या गोष्टी काय झाल्या, हें एक परमेश्वराला माहीत. तथापि नारायण मारला गेला, ह्याबद्दल मला अंतःकरणपूर्वक वाईट वाटत आहे आणि प्रायश्चित्त न घेण्याचा सर्व हट्ट मीं सोडून दिला आहे. श्रीक्षेत्रीं पंढरपुरास जाऊन तेथें आपल्या हस्तें आपण सांगाल तें प्रायश्चित्त घेण्याचें मी ठरविलें आहे. आपण जें आज प्रायश्चित्त सांगाल, तें मी आपल्या देखत श्रीक्षेत्रीं घेईन. पूर्वीच्या सर्व गोष्टी विसरा आणि ह्या अपराध्याला प्रायश्चित्ताची शिक्षा सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामशास्त्री : दादासाहेब, मी पंढरपुरास कसचा येतों, आणि तुम्हांला प्रायश्चित्त देऊन कसचा शुद्ध करून घेतों !

आनंदीबाई : आपण न्यायाधीश आहां; प्रायश्चित्त द्यावयाचें आपलें काम आहे. आपण पंढरपुरीं आलें पाहिजे, व आम्हांला प्रायश्चित्त देऊन पवित्र करून घेतलें पाहिजे.

रामशास्त्री : माझ्या डोळ्यांनीं मी तो हुकुम पाहाण्यापूर्वीं प्रायश्चित्तानें मीं आपणांस शुद्ध करून घेतलें असतें; पण आतां काय ?

आनंदीबाई : आतां कोणची हरकत ?

रामशास्त्री : त्या वेळीं खुनाचा संशय होता; आतां प्रत्यक्ष खुनी ठरलां. दादासाहेब, पुतण्याचा खून करून गादी बळकावण्याचा भयंकर अपराध आपण केला आहे. त्या अपराधाबद्दल शास्त्रांत देहान्तप्रायश्चित्ता-शिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.

रघुनाथरावदादा : काय देहान्तप्रायश्चित्त !

रामशास्त्री : होय, देहान्तप्रायश्चित्त !

रघुनाथरावदादा : (उठून) देहान्तप्रायश्चित्त ?

रामशास्त्री : होय, देहान्तप्रायश्चित्त !

आनंदीबाई : (पुढें होऊन) देहान्तप्रायश्चित ?—नाहीं; आपण चुकून बोललां असाल. शास्त्रीबोवा नीट विचार करून सांगा, कोणाचें प्रायश्चित्त तें.

रामशास्त्री : बाईसाहेब, नीट विचार करून सांगतों, देहान्तप्राय-श्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित नाहीं.

रघुनाथरावदादा : (बसत, दुःखानें) देहान्तप्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं ?

आनंदीबाई : शास्त्रीबोवा, दुसरें प्रायश्चित्त असलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामशास्त्री : नाहीं, बाईसाहेब नाहीं, दुसरें प्रायश्चित्त नाहीं. आपणां-सारख्या महापातकी खुन्यांची सोय लावण्याकरितां ऋषींनीं शास्त्रें लिहिलेलीं नाहींत.

आनंदीबाई : (रागानें) काय शास्त्रीबोवा, दुसरें प्रायश्चित्त नाहीं? आमची सोय पाहाण्याची ऋषींना जरूरी नसली तरी तुम्हांला जरूरी आहे. नीट विचार करून उत्तर द्या.

रामशास्त्री : दुसरें प्रायश्चित्त नाहीं; देहान्तप्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्राय-श्चित्त नाहीं. मी पुन्हां सांगतों, देहान्तप्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.

आनंदीबाई : कोणापुढें, कोठें, व काय बोलतां आहां, ह्याची शुद्ध शास्त्रीबुवा, तुम्हांला नसावीसें दिसतें. श्रीमंतांना देहान्तप्रायश्चित्त सांगणाराची जीभ येथच्या येथें छाटली जाईल, हें ध्यानांत ठेवून नीट शुद्धीवर येऊन बोला ! तुम्ही आमचे नोकर आहां हें विसरलांत वाटतें?

रामशास्त्री : बाईसाहेब, आतां वाड्यांत येण्यापूर्वीं मी श्रीमंतांचा नोकर होतों; पण वाड्यांत आलों आहें तो नोकरी सोडून दिली, हें कळ-विण्याकरितांच आलों आहें. बाईसाहेब, ह्या जिभेनें ह्या वेळीं सत्य भाषण केलें आहे; पुढें कदाचित् खोटें बोलण्याचा मोह तिला उत्पन्न होईल; तेव्हां ह्याच वेळीं तिला छाटून टाकून सत्य बोलण्यांत ह्या जिभेची समाप्ति आपण केली तर त्यांत मला समाधानच आहे. राघोबा, पेशव्यांच्या गादीचा नोकर नसलेला हा रामशास्त्री तुला देहान्तप्रायश्चित्त सांगत आहे. राजाज्ञेनें तुझें डोकें उडविलें जाण्याचा जर संभव नसेल, तर देहाला झिजवून झिजवून अखेरीस देहाच्या पतनानें पापक्षालन कसें करावें, ह्या तपश्चर्येचा धडा शिकण्याचे उद्योगास लवकर त्वां लागावें, हें बरें. मजबरोबर गंगाकिनारीं येत असशील तर हा धडा शिकविण्यास मी तयार आहें. खुनी पेशवा गादीवर असे तोंपर्यंत पुण्याचे हद्दींत पाणी प्यावयाचें नाहीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या प्रतिज्ञेनें मुलेंमाणसें माहुलीस पाठवून मी घराचे बाहेर आतां पडलों आहें. स्वतः देहान्तप्रायश्चित्त कसें घ्यावें हें शिकण्याची जर राघोबा तुझी इच्छा असली तर गंगाकिनारीं—

आनंदीबाई : गंगाकिनारीं तपश्चर्या करीत बसण्याच्या गोष्टी शास्त्रीबोवा आतां विसरा. पेशव्यांचा असा उपमर्द करणारांना गंगाकिनारीं स्वस्थपणानें जाऊन बसण्याची फुरसत मिळत नसते. तुम्हीं आम्हांला कोण प्रायश्चित्त सांगणार ? विद्वत्तेची खोटी घमेंड तुम्हांला झालेली, निस्पृहतेचा नसता टेंभा तुम्ही मिरविणारे, तपश्चर्येच्या व देवधर्माच्या वल्गना तुमच्या तोंडांत कशाला ? स्वतःच्या मोठेपणाच्या फाजील गर्वानें तुमची बुद्धि कुजली आहे, मुख्य न्यायाधिशाची जागा मिळाल्यामुळें तुमचें मन नासलें आहे, माझ्या तोंडून निघेल तो शब्द खरा ह्या अहंकारानें तुमचें शरीर तारवटून बेताल झालें आहे ! तपश्चर्या आतां अंधारकोठडींत ! प्राण जाऊन कपाळमोक्ष होई तों अंधारकोठडी तुमच्या कपाळाची सुटली नाहीं म्हणून समजा ! कोण आहे, पलीकडचे दालनांत ? सुमेरसिंग, खरकसिंग, तुळाजी, या, लवकर या आणि ह्या उन्मत्त माथेफिरूला कैद करा.

(सुमेरसिंग, खरकसिंग, तुळाजी येतात.)

शास्त्रीबुवा, पुन्हां एकवार नीट विचार करा. तुमच्या सांगण्यावरून किरकोळहि प्रायश्चित्त आतां आम्ही घेत नाहीं. पण तुम्हांला जर एखाद्या डोंगरी किल्ल्यावरील अंधारकोठडी टाळावयाची असेल आणि गंगाकिनारीं स्वस्थपणें स्नानसंध्या करीत बसण्याची परवानगी पाहिजे असेल, तर नारायणाच्या वधासंबंधानें श्रीमंतांची लवलेशहि चूक नाहीं, इतकेंच नव्हे तर असले धर्मभीरु, प्रतापी, पुण्यश्लोक श्रीमंत पेशव्यांच्या गादीस पुन्हां लाभणार नाहींत, असें भरदरबारांत जाहीर करण्यास तुम्हीं तयार झालें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुळाजी : हें जाहीर कशाला करावयाला पाहिजे ? सूर्याचा प्रकाश जसा लपवितां यावयाचा नाहीं तसें या धर्मावताराचें तेज लपवितां येणार नाहीं.

खरकसिंग व सुमेरसिंग : जगांत अशी एकहि तरवार नाहीं, जी श्रीमंतांचा प्रताप कबूल करणार नाहीं.

तुळाजी : जगांत अशी एकहि जीभ नाहीं, जी ह्या पुण्यश्लोक श्रीमंतांचे पोवाडे गाणार नाहीं.

आनंदीबाई : पण ही जीभ (रामशास्त्र्यांकडे बोट दाखवून) श्रीमंतांचें मस्तक धडापासून दूर करूं पाहात आहे.

सुमेरसिंग व खरकसिंग : हुकूम व्हावा; ही जीभ येथल्या येथें छाटून टाकतों !

(रामशास्त्र्यांचे एका बाजूस एक असे उभे राहतात.)

आनंदीबाई : शास्त्रीबुवा, तुम्हांला आम्हीं कैद केलें आहे. बोला अंधारकोठडींत पडतां का भरदरबारांत श्रीमंतांचें यश गाऊन आतांचे अपराधांतून मोकळे होतां ?

रामशास्त्री : बाईसाहेब, पाहिजे तर माझी जीभ छाटून टाकण्याचा हुकूम करा, पाहिजे तर अंधारकोठडींत, कांट्यांच्या पिंजऱ्यांत मला कोंडून ठेवा, पाहिजे तर ज्या ह्या तरवारींनीं नारायणरावांचे तुकडे तुकडे केले त्याच ह्या तरवारी माझ्याहि शरीरावर पाहिजे तशा चालवा ! मला कोठेंहि न्या, कसाहि ठेवा, शब्द उच्चारण्याची जिभेंत शक्ति असे तों मोठमोठ्यानें ओरडून सर्व दुनियेला मी जाहीर करणार, 'नारायणरावाचा खून राघोबानें केला आहे, आणि ह्या पापाला देहान्तप्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं.'

आनंदीबाई : ह्या उन्मत्त माथेफिरूच्या मुसक्या अगोदर बांधा. पकडा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला ! पाहातां काय, धरा त्याला ! अंधारकोठडींत देहान्तप्रायश्चित्त आपणांस आतां लवकरच मिळेल. पकडा त्याला ! पाहातां काय ?

(सुमेरसिंग व खरकसिंग पकडूं लागतात).

रघुनाथरावदादा : नका, शास्त्रीबुवांना कैद करूं नका. माझ्या डोक्यावर पूर्वीच्या पातकांचेंच ओझें मोठें आहे. नको, रामशास्त्र्यांच्या खुनाच्या पातकाची आणखी भर नको. जा, शास्त्रीबुवा, जा, आमच्या राज्यांतून एकदम बाहेर निघून जा. आमची निंदा करायला जर क्षणभर अधिक आमच्या राज्यांत राहिलां, तर खरोखरच तुमची जीभ छाटली जाईल. सुमेरसिंग, खरकसिंग व तुळाजी, पुण्याच्या हद्दीबाहेर ह्यांना बंदोबस्तानें काढून लावा. [पडदा पडतो]

कृ. प्र. खाडिलकर

अ भ्या स

'भाऊबंदकी' या नाटकांतून हा उतारा घेतला आहे.

१. या उताऱ्यांतील हा प्रसंग केव्हांचा आहे ?

२. खालीलपैकीं ज्याला जीं विशेषणें बरोबर लागूं पडतील त्याला तीं लावा :—

रघुनाथराव	निःस्पृह
आनंदीबाई	वाणेदार
रामशास्त्री	खुषमस्कऱ्या
तुळाजी	चंचल
सुमेरसिंग	मवाळ
खरकसिंग	तेजस्वी
	महत्त्वाकांक्षी
	लबाड
	धूर्त

वरीलपैकीं जीं विशेषणें तुम्हीं लावाल तीं धड्यांतील कोणत्या वाक्यांच्या आधारें तुम्हीं मत बनवून लावीत आहां तें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. यांत आलेले संप्रदाय निवडून सांगा. उदाहरणार्थ, 'नक्षा उतरणें.'
४. खाडिलकरांनीं रामशास्त्र्यांच्या तोंडीं घातलेल्या भाषेला कोणतें विशेषण लावाल ? वाचतांना कोणत्या शब्दावर जोर द्यावा लागतो तें नीट पाहा.
५. 'निस्पृहस्य तृणं जगत्' या सुभाषिताचें स्पष्टीकरण करा, व मथळा म्हणून त्याचा कां उपयोग केला असावा तें सांगा.

३५

शांतता नको कधींच

शांतता नको कधींच जीवनांत माझिया ॥ ध्रु० ॥
क्षण छाया क्षण प्रकाश
सुख-दुःखांचा विलास
नवरंगीं जीवनपट सतत निघो रंगुनिया १
क्षण आशा हास्य करी
क्षणभरि दुःखाश्रुसरी
रविकिरणीं जलधारा चमकुं देत नयनीं या २
नौका ही भवसागरीं
लाटांवरि नृत्य करी
शक्ति धैर्य हृदयिं वसो वादळांत विहराया ३
कधिं घ्यावी करिं कट्यार
शत्रुसवें समर घोर
करुनि, विजय–सुमन मुदें अर्पावें प्रभुपाया ४
खलजिव्हा छेदो मन
देतां प्रभु संजीवन
छातीचा कोट खडा घाव सुखें झेलाया ५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मम जीवन-निर्झरिणी
खडकांतुनि खळखळुनी
उत्साहें गीत म्हणो जगताला रिझवाया ६

रजनी

अभ्यास

१. हें गीत आशावादी आहे का निराशावादी आहे? तुमच्या उत्तराचीं कारणें सांगा.

२. प्रत्येक कडव्यांत एकेक रूपक आहे. त्या कल्पनेचा तुमच्या शब्दांत खुलासा करा.

३. शेवटच्या ओळींत गाणाऱ्या गवयाची इच्छा दाखविली आहे. चित्रकार, खलाशी, शेतकरी किंवा मजूर आपली इच्छा कोणत्या कल्पनेनें व्यक्त करील?



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६

असूया

शांतिनिकेतनांतील शिक्षक श्री. विनायक मसोजी यांच्या सुंदर रंगीत चित्राचें हे छायाचित्र पाहा.

एका मोठ्या झाडाच्या खालीं घोडा थांबला आहे. झाडाच्या केवळ दोन-तीन फांद्या व जाडजूड असें खोड चित्रांत दाखविलें आहे. चित्र पाहिल्यावर तुमचें लक्ष इतर कुठेंहि न जातां पंचरंगी चिमुकल्या पक्ष्याकडे जावें अशीच चित्रकारानें खुबी केली आहे. उमदा पंचकल्याणी अबलख घोडा, एक पाय वर उचलून धरून पुढें जाण्याची आतुरता व्यक्त करीत आहे. त्याची दृष्टि, जमिनीवर उभे राहिलेल्या डोंगरी 'संताळ' माणसाकडे रोखली आहे. जणूं काय ह्याच माणसाच्या वागण्यामुळें आपणांस थांबावें लागत आहे हें त्याला समजलेंच आहे ! उतरत्या जमिनीवर



श्री. विनायक मसोजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्र] असूया [श्री. मसोजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थबकलेल्या घोड्याच्या मागील बाजूस निरभ्र आकाश दाखविल्यामुळें घोड्यास उठाव आला आहे हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

ज्या चित्रांत आकृतीला महत्त्व असतें त्यांत पिछाडी आकर्षक दाखवीत नाहींत यांतील मर्म हेंच.

पायांत वाळा, लज्जानिवारणापुरतें जरूर तेवढें वस्त्र, कानांत कुंडलें, डोकीवर मोरपिसाचा अलंकार असा हा रानटी असंस्कृत संताळ पोरगा, डाव्या हातांत मोकळा पिंजरा घेऊन उजवा हात अधिरपणें आतुरतेनें पुढें करून आपला लाडका, जीव कीं प्राण असा, पक्षी परत मिळेल कीं नाहीं या चिंतेंत आहे.

घोड्यावर बसलेल्या रजपूत रमणीचा पोशाख पाहा.

लगाम सैल सोडून तळहातावर अलगत धरलेल्या पक्ष्याकडे ती एकाग्र चित्तानें पाहात आहे. आपला सुंदर पक्षी आवडला म्हणून जितका त्याला आनंद व्हावा त्यापेक्षां रजपूत स्त्रीस तो जास्त आवडला म्हणून त्या संताळ पोराच्या मनांत भीति व असूया यांची गर्दी उसळली आहे.

रंगीत चित्राचा फोटो घेतांना शेल्यावरील सोनेरी बुट्टी उठली नाहीं व रंगाच्या मिश्रणामुळें होणारा आल्हादकारक परिणामहि समजून येत नाहीं.

घोड्याचा जर्द तपकिरी रंग; पाय, तोंड, शेपूट व आयाळ यांच्यापुरता पांढरा शुभ्र रंग, पंचरंगी पोपट, हिरवा शेला, तलम शुभ्र लहंगा असें चित्र मनांत आणा किंवा रंगवा म्हणजे रंगामुळें चित्र विशेष कसें खुलतें तें तुम्हांला समजून येईल.

श्री. बा. रानडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३७

माझी आकांक्षा

गरुड व्हावें न् आकाशांत घुसावें,
उन्मत्त व्हावें न् अधस्तळ न्याहाळावा
पक्ष्यांच्या पिलांवर, सापाच्या फणेवर
झडप घालून चोचीनें फाडून
जगाला दाखवावें—
कीं जगाचा राजा तो मी !
आणि देखीन तें लक्ष्य व झडपीन तें भक्ष्य माझें ?
या वृत्तीचा गरुड व्हावें
अशी माझी आकांक्षा नाहीं, पण—
उगाच उडावें उगाच गुंगावें
या फुलांतून त्या फुलांत सारखें घिरटावें
आणि बिंदुबिंदूनें मध चाखावा;
या पंखावर त्या पंखावर
सुंदरसे रंग गोळा करावे
आणि जगाला सांगावें—
कीं आनंद आनंद म्हणतात तो मी !
अशा वृत्तीचा भ्रमर व्हावें
अशी माझी आकांक्षा आहे.

शंकर साठे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

माझी आकांक्षा हा लेख छापतांना कवितेसारखा छापला आहे. पण त्यांत गण मात्रा यांचा कांहीं ठराविक क्रम सांपडणार नाहीं. सरळ बोलण्याच्या भाषेंत वाचा म्हणजे अशी माझी आकांक्षा नाहीं, पण अशी माझी आकांक्षा आहे अशीं दोन वाक्यें तुम्ही सहज वाचाल. राग नको, चाल नको, अन्वयार्थाची दगदग नको, खास हें गद्य आहे असें तुम्ही म्हणाल. पण आतां जरा दुसऱ्या दृष्टीनें विचार करा. इंग्रजी, संस्कृत, मराठी वाङ्मयांत कांहीं निर्यमकी कविता असतात. यांतहि यमक नाहीं. पण कांहीं तोकड्या ओळी गमतीच्या वाटतात. त्यांत कांहींतरी ताल आहे, नादमधुरता आहे. कोठें कोठें अनुप्रास आहे. 'झडपीन तें भक्ष्य माझें' ही ओळ गद्याप्रमाणें सरळ नाहीं. कल्पना पाहाव्या तर पहिली भयंकर, तर दुसरी रमणीय असून दोन्ही मनावर चमत्कारिक परिणाम करतात. शब्दांनीं बरोबर काव्यमय चित्र उभें रहातें. गरुड न होतां भ्रमर व्हावें ही खास कवीचीच कल्पना आणि या दोन्ही कल्पना कशा ताजव्यांत मोजल्याप्रमाणें मांडल्या आहेत. मग हें एक गद्यभाषेंतील विचित्र स्वरूपाचें काव्यच दिसतें. अशा काव्याला **गद्यकाव्य** म्हणतात. काव्यमय विचार व कल्पनेची मांडणी काव्यमय असून कोणताहि वृत्ताचा किंवा जातीचा उपयोग केला नाहीं एवढेंच. हेच अर्थपूर्ण शब्द बदल न करतां एखाद्या वृत्तांत बसतात कीं काय तें पाहा.

अभ्यास

१. उन्मत्त, अधस्थळ व घिरटावें यांचे अर्थ सांगा.

२. शंकर साठे यांचीं गद्यकाव्यें आणि यांनीं व इतर कवींनीं मुक्तछंदांत लिहिलेल्या कविता वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३८

साधुसंत

आमच्या बंडूनानांचा स्वभाव फार श्रद्धाळु असे. त्यांना एकदां नुकत्याच समाधिस्थ झालेल्या एका प्रसिद्ध साधूनें स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं ‘मी तुला उद्यां एका ढेंकणाच्या रूपानें दर्शन देणार आहें; उद्यां तुझ्या घरीं जो सर्वांत मोठा ढेंकूण सांपडेल तोच मी असें समज.’ बंडूनानांनीं उजाडतांच घराचीं सारीं दारें बंद करून कडेकोट नाकेबंदी केली.



आंतला ढेंकूण बाहेर जाऊं नये व बाहेरचा आंत येऊं नये म्हणून त्यांनीं दारांना कुलुपें ठोकण्यालाहि कमी केलें नाहीं. नंतर त्यांनीं पलंग, बाजा, पाट, खुर्च्या, मेजें, कपाटें, गाद्या, उश्या, लोड, तक्के, वगैरे ढेंकणांचीं सारीं आवडतीं वसतिस्थानें एकत्र केलीं व साधुबोवांच्या अवताराला शोधण्याचें काम भाविकपणें सुरू केलें. तें चालू असतां बंडूनाना अनेकदां सद्गदित होऊन आपले अश्रु पुशीत आणि पुनः तें काम चालू करीत. रात्रीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागरणानें घोरत पडलेले विचारे ढेंकूण खडबडून जागे झाले व या अचानक पडलेल्या छाप्यापुढें जीव घेऊन पळत सुटले. त्यांपैकीं लहान ढेंकणाचा मोठ्यांशीं घोटाळा होऊं नये म्हणून बंडूनाना त्यांवर तडकाफडकी नखाग्राचा प्रयोग करीत. एखादा लठ्ठसा ढेंकूण सांपडला, कीं बंडूनाना मस्तक लववून त्याच्या पायां पडण्यासाठीं हात पुढें करीत; पण दुसरा एखादा त्याहूनहि गलेलठ्ठ सांपडला, कीं भक्तीभाव जागच्या जागीं गुंडाळून ठेवून त्याच हाताच्या नखानें पहिल्याला चिरडून टाकीत. 'अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींतील शहारियर बादशाहा ज्याप्रमाणें रोज सकाळीं आदल्या दिवसाच्या शिळ्या बायकोला ठार करून दुसरीशीं लग्न करीत असे, त्याप्रमाणें बंडूनाना पळापूर्वीं वंद्य मानिलेला ढेंकूण वध्य समजून त्याच्या जागीं दुसऱ्याची स्थापना करीत. एकदां नानांनीं एका ढेंकणाच्या पायांवर मस्तक ठेंगणें केलें, तोंच त्या ढेंकणाचा पायांसुद्धां सारा देह त्या मस्तकाखालीं चिरडून त्याच्या रक्ताचा त्या मस्तकावर लाल टिळा उमटला. नानांना अतोनात वाईट वाटलें. पण तें क्षणभरच ! त्याच्यापेक्षा धिप्पाड शरीराचा एक ढेंकूण नजरेला पडून नाना त्या चिरडलेल्या ढेंकणाला योग्य प्रायश्चित्त मिळालें म्हणून हर्षानें नाचूं लागले. त्या ढेंकणाचें तें रक्त मूळचें वास्तविक त्यांच्या स्वतःच्याच शरीरांतील असून त्याचा टिळा लावण्याचा त्यांना पूर्ण हक्क होता. असो. याप्रमाणें त्या मृत साधूच्या शोधाकरितां नानांनीं हजारों ढेंकणांचे वध केले. त्यांना खून चढल्यासारखा झाला. ढेंकणांना मारणें म्हणजे पर्यायानें आत्महत्याच आहे हें जाणत असतांहि त्यांनीं त्यांचा निःपात करून घर निर्मत्कुण करण्याचा विडाच उचललेला दिसत होता. शेवटीं निवड होतां होतां सर्वांत जाड असा एक ढेंकूण उरला. त्याची नानांनीं लागलीच एका कुपींत स्थापना केली. झालेल्या श्रमां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळें म्हणा, किंवा बिछान्यांत झोंपमोड करणारें कोणीं न उरल्यामुळें म्हणा, अथवा हातून घडलेल्या सत्कृत्यांमुळें म्हणा, नानांना गादीवर अंग टाकतांच झोंप लागली, ती दुसऱ्या दिवशीं उन्हें वर येत तोंपर्यंत मोडली नाहीं. एका शेतकऱ्यानें मरतेवेळीं आपल्या मुलांना शेतांत द्रव्य पुरल्याचें खोटेंच सांगून त्यांजकडून द्रव्याच्या आशेनें सबंध शेत नांगरवून काढिलें व त्यांना खरोखरीच संपन्न केलें, या गोष्टीची येथें आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. बंडूनानांची झोंप बऱ्याच दिवसांपासून उडाली होती, ती पुनः पूर्ववत् आणण्याची साधुबोवांनीं त्या शेतकऱ्याप्रमाणेंच जी शक्कल लढविली तिजबद्दल त्यांना धन्यवाद दिल्यावांचून राहवत नाहीं. बंडूनानाहि त्यांचे हे उपकार विसरले नाहींत. त्यांनीं त्या कुपींतल्या ढेंकणाची रोज षोडषोपचारें पूजा करण्याचा क्रम सुरू केला. त्यांनीं त्याची काकडआरती, धूपारती व शेजारती एक दिवसहि चुकूं दिली नाहीं. त्याला ते जेवणाच्या पूर्वीं भक्तिपूर्वक नैवेद्य दाखवीत. पण बंडूनानांच्याच शेजेवर लोळण्याची व त्यांच्याच रक्ताचा घोंट घेण्याची चटक लागलेल्या ढेंकणाचें समाधान कोरड्या शेजारतीवर व दुरून दाखविलेल्या नैवेद्यावर कसें व्हावें ! त्यानें अन्नपाणी वर्ज्य केलें, व कृश होत होत थोड्याच दिवसांत तो महात्मा समाधिस्थ झाला !

येथपर्यंत नुस्त्या निर्बुद्ध व अचरट अशा साधूंविषयींच झालें. याशिवाय महाबुद्धिमान् व सामर्थ्यवान् अशाहि साधूंचा एक वर्ग असतो. यांना भूतभविष्यवर्तमान कळतें, व हे योगबलानें अत्यंत आश्चर्यकारक चमत्कार करूं शकतात. बंडूनानांना ज्या साधूंचा स्वप्नांत दृष्टांत झाल्याबद्दल वर लिहिलें आहे, ते अशाच विभूतींपैकीं होते. नानांच्या घरीं जर एखादा बैरागी मध्यान्हीं दत्त म्हणून उभा राहिला, तर त्यांना ते साधूच आपलें सत्त्व पाहाण्याकरितां त्या रूपानें आल्यासारखे वाटत. या त्यांच्या भाविक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पणानें बक्षीसहि त्यांना मिळत गेलें. कारण ते साधु रोजचे रोज मध्यान्ह-कालीं कोणातरी गोसाव्याच्या, बैराग्याच्या किंवा फकिराच्या वेषानें त्यांना दर्शन देऊं लागले. नानांकडून सुग्रास भिक्षा मिळून ते घराबाहेर पडत न पडत तोंच ते गुप्त होत. 'आपणासारिखे करिती तात्काळ' या न्यायानें त्यांच्याबरोबर अंगणांतील वस्तूहि गुप्त होऊं लागल्या. शेवटीं ही गोष्ट पोलिसांच्या कानांवर जाऊन ते नानांच्या घराभोंवतीं घिरट्या घालूं लागले. तेव्हांपासून साधूंनीं दर्शन देण्याचें बंद केलें, व अंगणांतील वस्तूहि गुप्त होईनाशा झाल्या. विघ्नसंतोषी पोलिसांनीं जर मध्यें खो घातला नसता, तर साधूंनीं नानांच्या डोईवरील संसाराचा भार बराच उतरला असता यांत संशय नाहीं.

साधूंचे आणखीहि कांहीं विस्मयकारक चमत्कार येथें वर्णिल्या-वांचून या विषयाला पूर्णता येणार नाहीं. हे साधु आमच्या गांवापासून दोन-चारशें कोसांच्या अंतरावर राहत असत. पण कधींकधीं ते आपल्या प्रेमळ भक्ताच्या घरीं रात्रीं गुप्तपणें येत व कोणाला न कळत स्वैंपाकघरांतील दुधाचें किंवा लाडवांचें भक्तवात्सल्यपूर्वक सेवन करून पुनः परत जात. या चमत्कारांच्या वेळीं नानांचा एक गुरुबंधु त्यांच्या घरीं नसता तर त्यांचा मागमूसहि कोणाला लागला नसता. या गुरुबंधूची निजण्याची सोय नानांनीं स्वैंपाकघराजवळील माजघरांत केली होती, व त्याला बिछान्यावर पडल्या पडल्या स्वयंपाकघरांतील सारे प्रकार दिसत असत. वरील चमत्कार त्यानें ज्या दिवशीं रात्रीं प्रथम पाहिला, त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें घडलेला वृत्तांत आम्हां सर्वांना इत्थंभूत सांगितला. लागलीच आम्हीं स्वैंपाकघरांत जाऊन त्याचा खरेपणा पडताळून पाहण्याकरितां दुधाचा गंज व लाडवांचा डबा उघडून पाहिला, तों खरोखरच दोन्ही रिकामे दिसले. गुरूचें आपणावरील प्रेम पाहून नानांचा कंठ सद्गदित झाला. त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुबंधूला मात्र गुरूंची लीला चोरून पाहाण्याबद्दल चांगलेंच प्रायश्चित्त मिळालें. त्याला त्याच दिवशीं आमांशाचा विकार होऊन अंथरूण धरावें लागलें, व पुन्हां खडखडीत बरा व्हावयाला चांगले आठदहा दिवस लागले. तो दुखण्यांतून उठल्यावर लवकरच पुन्हां तो चमत्कार घडून आला, आणि तो चोरून पाहाण्याबद्दल त्याला पुनः पूर्वीचेंच शासन झालें. मात्र एकदां इशारा मिळाला असतां त्यानें हा दुसरा गुन्हा केल्यामुळें त्याला या खेपेला पंधरावीस दिवस अंथरुणाला खिळून पडावें लागलें. इतकी अद्दल घडली खरी, पण जित्याची खोड मेल्याशिवाय थोडीच जाणार! त्यानें यानंतरहि दोन चार वेळां तोच चमत्कार प्रत्यक्ष पाहिल्याचें नानांस सांगितलें. मात्र या खेपेला साधुबोवांनीं सबंध गंजाचा व डब्याचा फन्ना उडविला नसून फक्त पेलाभर दुधावर व दोन चार लाडवांवरच पोटाचें समाधान करून घेतलेलें दिसलें. मग त्यांची त्या गुरुबंधूप्रमाणेंच शोचनीय अवस्था झाली असल्यास नकळे!

श्री. कृ. कोल्हटकर

परिचय

विनोदाचे तुम्ही पुष्कळ प्रकार पाहिले, पण हा एक नवीन प्रकार पाहा. साधूसंत हे खरोखर पूज्य पुरुष, पण लोकांच्या अंधश्रद्धेमुळें किंवा भोळसरपणामुळें लबाड लोक जेव्हां समाजास फसवूं लागतात, तेव्हां समाजास जागे करण्याचे दोन मार्ग उरतात. एक कडक शब्दांत कानउघाडणी करून भोंदू लोकांचीं बिंगें फोडून समाजास ताळ्यावर आणणें व दुसरा मार्ग म्हणजे 'शहाण्यास शब्दाचा मार' या न्यायानें उपरोध, उपहास, विनोद या पद्धतीनें हंसत हंसत लोकांचा मूर्खपणा त्यांना पटवून देणें. कित्येक वेळां या दुसऱ्या सौम्य उपायानेंच लवकर काम झालेलें आढळून येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. अधोरेखित शब्दांत काय विनोद आहे तो स्पष्ट करा.

२. या लेखांत कांहीं गोष्टींचा, संतवचनांचा निरनिराळ्या प्रकारांनीं उपयोग केला आहे. कांहीं ठिकाणीं 'अवतरण' दिलें आहे तर कांहीं ठिकाणीं '**श्रुतयोजन**' केलें आहे. श्रुतयोजन हा प्रकार गद्यवैभव भाग ३ मधून समजावून घेऊन कोणत्याहि दोन प्रसिद्ध म्हणी याप्रमाणें वाक्यांत वापरून दाखवा.

३. नागमोडी खूण केलेल्या वाक्यांचा अर्थ द्या व त्यांतील विनोद स्पष्ट करा.

३९

रम्य तें बालपण !

तुम्हीं कधीं लहान मुलींच्या खेळण्याच्या खोलींत डोकावून पाहिलें आहे काय? त्यांची 'जिनसांची' पेटी म्हणजे एक सर्व-वस्तु-संग्रहालयच असतें. **चांद** अर्थात्‌च या नियमाला अपवाद नव्हती. तिच्या पेटींत सर्व तऱ्हेच्या 'जिनसा' होत्या. मुंबईला मिळणारा केरवा मण्यापासून तों तीन दिवसांपूर्वीं वाढविलेल्या बांगडीच्या तुकड्यांपर्यंत सारे कांचेचे जिन्नस होते. विलायती सुंदर बाहुल्यांबरोबर खेड्यांत बनलेल्या मातीच्या व लांकडी 'भुलाया' पाहून चांदची पेटी मुंबईतील मिशनरी मुलींच्या शाळेच्या वर्गा-प्रमाणें दिसे. तिच्या चिमुकल्या प्राणिसंग्रहांत सिंह, वाघ, हत्ती, घोडे, उंट वगैरे निरनिराळे प्राणी बंधुभावानें नांदत असत. खेळांतील वाघसिंहांनीं हरणाकडे वांकड्या नजरेनें पाहिल्याचें कुणीं ऐकलें नाहीं. उंट लांब मानेनें गाढवाच्या कानांत सुखदुःखाच्या गोष्टी बोलतांना दिसे, पण गोष्टींच्या नादांत त्यानें कधीं कुणाची चुगली केली असेल तर शपथ. तसेंच सिंहानें आपल्या गर्जनेनें अथवा गाढवानें आपल्या गायनानें कोणालाच सळो कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पळो करून सोडलें नाहीं. सारांश, हा सर्व 'शिकारखाना' घेऊन चांद खेळूं लागली कीं लोकांना फुकट सर्कस पाहाण्याचें श्रेय मिळे.

मुलींना उपजतच संसाराची फार गोडी असते. चांदच्या चिमुकल्या संसाराचें 'खातें' उत्तम गृहिणीस शोभेल असें होतें. तिचें निरीक्षण इतकें सूक्ष्म होतें कीं बाहुलीच्या लग्नांतील सर्व विधि चांद यथास्थित करी. करवली, विहीण वगैरे नातीं तिच्यांत एकवटल्यानें पोरकट करवली-सारखी भांडणारी चांद दुसऱ्या घटकेला पोक्त विहिणीप्रमाणें बोलूं लागली कीं तिचें अतिशय कौतुक वाटे. लग्नानंतर थोड्या वेळांतच ती आपल्या बाहुलीला 'अष्टपुत्रा सौभाग्यवती' बनवून त्या पुत्रांच्या खस्ता खाई. आधींच बोबडें बोलणारी चांद 'मुलांच्या' समजुतीसाठीं जास्त बोबडें बोलूं लागली कीं तिच्या गोड ओठांचा पापा घेण्याची इच्छा **विश्राम** मोठ्या कष्टानें दाबीत असे. बाहुलीचें अपत्य आजारी पडलें तर चांदचा जीव वरखालीं होऊन तें सहीसलामत उठण्यासाठीं ती सर्व देवांना नवस करून मोकळी होई. एकदां बालपणींच्या संसारांत तिच्या यजमानपणाचा हक्क विश्रामकडे आला असतां 'त्यांचें' मूल आजारी पडलें. चांदनें एक किल्लीची मोटार देऊन विश्रामला लुटुपुटूच्या डॉक्टरकडे जाण्यास फर्मावलें. पण 'हपिसांत' जाण्यास उशीर होईल या सबबीवर विश्रामनें तें टाळलें! मुलाचें आयुर्मान चांदच्या हातांत असल्यानें त्याला अर्थात् दगा फटका न होतां तें लवकर बरें झालें. 'मी आतां तुझी कधींच बायको होणार नाहीं. तुला मुलांची किंमतच नाहीं. पुरुष सर्व द्वाड,' असें म्हणून चांद त्यानंतर विश्रामची बायको कधींहि झाली नाहीं. बायकांच्या हृदयांत मातृप्रेमाची ज्योत किती लहानपणापासून तेवत असते!

प्र. श्री. कोल्हटकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

प्र. श्री. कोल्हटकर हे, तुम्हीं नुक्ताच ज्यांचा 'साधुसंत' हा विनोदी लेख वाचलात, त्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे चिरंजीव. याचा 'मानसपूजा व इतर गोष्टी' या नांवाचा प्रौढ माणसांकरितां लिहिलेला एक सुंदर कथासंग्रह आहे. त्यांतील 'मानसपूजा' या कथेंतून हा उतारा घेतला आहे.

अभ्यास

१. अगदीं गमतीगमतीनें लिहिलेलं शब्दचित्र आहे हें. तें वाचीत असतांना तुमच्या किंवा तुमच्या एकाद्या मैत्रिणीच्या बालपणांतील अशाच तऱ्हेचीं चित्रें डोळ्यांसमोर उभींहि राहिलीं असतील कदाचित्; लिहून काढा बरें त्यांतील एखादें.

२. 'तुला मुलांची किंमतच नाहीं. पुरुष सर्व द्वाड,' असे उद्गार चांदच्या तोंडीं घालून, 'बायकांच्या हृदयांत मातृप्रेमाची ज्योत किती लहानपणापासून तेवत असते!' असें लेखकानें मत व्यक्त केलं आहे. तुम्हांला तें पटतें काय? कीं, लटुपटीच्या संसारांत आईबापांच्या केलेल्या इतर नकलांप्रमाणें हे उद्गार हीहि एक नक्कल असावी, असें वाटतें.

३. यांतील कोणतीं वाक्यें तुम्हांला गमतीचीं वाटतात?



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४० बातमीदार



चित्रकार : श्री. गोडसे संपादक ‘ संजीवनी ’ यांच्या कृपेनें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साहित्यपरिचयाच्या दुसऱ्या भागांत श्री. गोडसे यांचें ‘काव्यगायन’ हें चित्र पाहिलेंत आणि खूप हंसलांत, नाहीं? आतां त्यांनींच काढलेलें हें दुसरें व्यंगचित्र पाहा. हा प्रसंग जरा वेगळा आहे.

शहरांतल्या कुठल्यातरी घराला आग लागली आहे. धुराचे लोटचे लोट निघताहेत त्यांतून. आग आटोक्यांत आणण्यासाठीं ‘फायरब्रिगेड’चा माणूस रबरी नलिकेच्या द्वारा पाण्याचा नुसता वर्षाव करतो आहे. पण तो मागें वळून आश्चर्यानें, कानाला टेलिफोनचा रिसिव्हर लावून ह्यः ह्यः ह्यः करणाऱ्या त्या माणसाकडे असें काय पाहातो आहे? आहेच तशी ती अपूर्व व्यक्ति! ओळखलीत का ही व्यक्ति? मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना येईल ती ओळखतां. बातमीदार आहे ही व्यक्ति, बातमीदार!! दैनिक वर्तमानपत्राचा बातमीदार! आगीसंबंधीं, सर्वांच्या आधीं आपल्या पत्रांत बातमी पोंचवून ‘स्पेशल फीचर’ करण्याची संधी मिळाली म्हणून हर्ष झाला आहे बेट्याला. आणि त्याबद्दल त्याच्या कचेरींतील ‘वृत्तसंपादका’कडून (News-Editor) शाबासकीहि मिळत असावी त्याला यावेळेस टेलिफोनमधून. उगाच नाहीं त्याचा मुखडा हंसरा दिसत!!

फायरब्रिगेडच्या त्या शिपायाला मात्र, अशा या हृदयद्रावक प्रसंगीं, त्यांचें तें हंसणें व टेलिफोनमधून तिखटमीठ लावून आगीचें त्यानें चालविलेलें वर्णन ऐकून चमत्कारिक वाटतें आहे. तो मनांत म्हणतहि असेल ‘असला कसला हा बिनकाळजाचा माणूस! आग विझवायला मदत करावयाची सोडून टेलिफोनच्या फुंकणींतून, हपिसांत बसलेल्या ‘वृत्तसंपादका’च्या कानावर शब्दांचा पाऊस पाडण्यांतच दंग झाला आहे बेटा!’

शिपायाला काय ठाऊक, असले प्रसंग हीच बातमीदाराला आनंदाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खरी पर्वणी असते म्हणून! असल्या आगी लागल्या म्हणजेच बातमीदाराला आपली पोळी चांगली भाजून घेतां येते!!

हीं परस्परविरोधी दृश्यें पाहून कुणालाहि हंसूं येईल. विनोदी लेखक किंवा व्यंगचित्रकार अशीं दोन विरोधी दृश्यें उभीं करूनच हास्यनिर्मिती करीत असतात.

गंगाधरराव खानोलकर

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press, Chira Bazar, Bombay, and Published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्थ्यांसाठीं कांहीं वाचनीय पुस्तकें

	कापडी.	कागदी.
दैवलीला (कादंबरी) . ले. सौ. इं. हरिपूरकर .	१-४-०	१—०-०
शिवाजीचा उजवा हात (ऐतिहासिक कादंबरी) ले. प्रभाकर . . .	...	०-१२-०
मातृमूर्ति (कादंबरी)	१-८-०	१—४-०
पूर्व आणि पश्चिम (कादंबरी)	...	१—४-०
ज्ञानदीप	१-४-०	१—०-०
आसुरी माया (गुप्तहेरकथा) ले. वि. वि. भावे . .	१-१२-०	१—४-०
नानासाहेब पेशवे (चरित्र) ले. रियासतकार सरदेसाई	२-८-०	२—०-०
सौदामिनी (कादंबरी) ले. शं. बा. शास्त्री . . .	१-४-०	१—०-०
कर्मवीर हेन्री फोर्ड (चरित्र) ले. पेठे . . .	१-६-०	१—२-०
पहिले बाजीराव पेशवे (चरित्र) ले. प्रो. ना. के. बेहेरे	२-१२-०	२—८-०
डॉ. भाऊ दाजी लाड (चरित्र) ले. श्री. ना. कर्नाटकी	१-४-०	१—०-०
अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक (चरित्र) ले. खानोलकर	२-१२-०	...
गडकरी-व्यक्ति व वाङ्मय (चरित्र) ले. वि. स. खांडेकर	...	२—८-०
रघुवंशकथा, ले. नी. शं. नवरे } [प्रत्येकांत ३ ४	...	१—४-०
चक्रवर्ति नेपोलियन (चरित्र) } चित्रें घातलीं आहेत.]	१-८-०	१—४-०
हिंदुधर्मावरील कलंक, अनुवादक—गं. भा. निरंतर, एम्. ए.	२-०-०	१-१२-०
आजकालचा महाराष्ट्र (विवेचनात्मक) ले. पाध्ये व टीकेकर	३-८-०	...
संत तुकाराम (चरित्र) ले. ज. र. आजगांवकर .	२-८-०	२—४-०
पराधीन (स्त्रियांची करुण कहाणी) ॲ. वा. वि. जोशी .	३-१२-०	२—८-०
कर्मयोग, स्वामी विवेकानंद	...	०-१०-०
खासगी पत्रें, स्वामी विवेकानंद	...	०-१४-०
स्वामी-शिष्य-संवाद, स्वामी विवेकानंद	...	१—४-०
पूर्व आणि पश्चिम व युरोपांतील प्रवासाचीं टिप्पणें (एकत्र) } स्वामी विवेकानंद	...	१—४-०
विवेकानंदांचे समग्र ग्रंथ—तेरा भाग . . .	२२-८-०	१९-४-०
महाभारतार्थ—महाभारताचें सुलभ व सुरस मराठी भाषांतर—बारा खंडांत संपूर्ण . .	५०-०-०	...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar